# गुन्हेगार जाती.

त्रिं. ना. अत्रे.

# गुन्हेगार जाती.

त्रिंबक नारायण अत्रे, बी. ए. एल्. एल्. बी.
सबजज्ज, कोर्ट पारनेर जिल्हा, अहमदनगर

ह्यांनीं,

मे. एम्. केनडी सा. ब. इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस इलाखा मुंबई, ह्यांच्या क्रिमिनल क्लासेस इन् दि बॉंबे प्रेसिडेन्सी नामें पुस्तकावरून लिहिलें.

आवृत्ति पहिली, प्रती ५०००.

सन १९११.

किंमत सवा रुपया.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून पुस्तका-
संबंधीं सर्व हक्क कर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत रा. **नटेश अप्पाजी द्रवीड**
यांनीं छापिलें व पारनेर येथें रा. **त्रिंबक नारायण अत्रे**
यांनीं प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना.

ग्याझेटीअर्स, पोलिसखात्याचें दप्तर, अनुभवशीर पोलिसअंमलदारांचीं टिपणें, आणि जातीजातींचे भेद इत्यादि द्वारांनीं माहिती मिळवून मेहेरबान एम्. केनडीसाहेब बहादूर इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस, इलाखा मुंबई, ह्यांनीं गुन्हेगार जातींविषयीं इंग्रजींत पुस्तक रचिलें. पोलिसांतील व गुन्ह्यांचे कामाशीं संबंध असणाऱ्या इतर खात्यांतील ज्या लोकांस इंग्रजी येत नाहीं, त्यांस हा विषय समजणें इष्ट आहे. त्यांचे उपयोगासाठीं सदरहु पुस्तकाचें हें मराठी रूपांतर केलें आहे. सदरच्या अंमलदारांस गुन्हेगार जातींची रहारीत, त्यांची गुन्हे करण्याची पद्धत वगैरे माहीत असणें अवश्य आहे. त्याशिवाय इतर लोकांसही सामाजिक सुधारक, शेतकरी व निकृष्ट जातींचे उद्धारासाठीं प्रयत्न करणारे परोपकारी गृहस्थ—यांना प्रस्तुत पुस्तकापासून पुष्कळ उपयुक्त माहिती मिळण्याचा संभव आहे

मेहेरबान सी. सी. बॉईडसाहेब बहादूर, आय सी. एस., डिस्टिक्ट जज्ज, अहमदनगर व मेहेरबान एम्. केन सािहेब बहादूर इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस, मुंबई इलाखा, यांचे शिफारशींवरून नामदार मुंबईसरकारनीं मला हें पुस्तक प्रसिद्ध करण्याची परवानगी दिली, ह्याबद्दल मी उभयतां साहेबांचे व नामदार सरकारचे मनःपूर्वक आभार मानतों. मेहेरबान केनडीसाहेबांचे उपकारांचा भार तर मजवर फारच मोठा झाला आहे. मूळ पुस्तकाचें श्रेय त्यांना आहेच

आहे. पण त्याचे मराठी रूपांतराचें सुद्धा नेपथ्यविधान त्यानाच पुष्कळसें करावें लागलें. त्यांनीं पुस्तकाची हस्तलिखित प्रत साद्यंत तपासून दुरुस्त केली आणि अनेक ठिकाणीं सुबोध, अर्थपूर्ण व रेखले शब्द आणि शब्दरचना सुचविल्या. सबंध इलाख्याच्या एका खात्याचा कारभार शिरावर असतांना त्यांतले त्यांत वेळ काढून मेहनतीनें व काळजीपूर्वक पुस्तक सुधारण्यात त्यांनीं जें अगत्य दाखविलें त्याबद्दल त्यांचें कृतज्ञतापूर्वक कौतुक केल्यावांचून माझ्याच्यानें राहवत नाहीं.

मुक्काम पारनेर,
जिल्हा अहमदनगर. } **त्रिंबक नारायण अत्रे.**

**सूचना**—पुस्तकें खालील पत्त्यावर मागवावींत. दरमहा पंचवीस रुपयांखालील पोलिस अंमलदारांना व्ही. पी., व टपालखर्च माफ.

**त्रिंबक नारायण अत्रे,**
सबजज्ज, पारनेर,
पोस्ट पारनेर, जिल्हा अहमदनगर.

# अनुक्रमणिका.


| मुंबई इलाख्यांतील गुन्हेगार जाती. | पान. |
|---|---|
| बंजारे ... ... ... | १ |
| बेरड ... ... ... | ८ |
| भामटे ... ... ... | १० |
| रजपूत भामटे ... ... | २१ |
| भिल्ल ... ... ... | २४ |
| छप्परबंद ... ... ... | २९ |
| कैकाडी ... ... ... | ३९ |
| कातकरी ... ... ... | ५४ |
| कोळी (महादेव व गुजराथ) | ५८ |
| मांग ... ... ... | ६९ |
| मांग–गारुडी ... ... | ७७ |
| मिआने ... ... ... | ८२ |
| पारधी ... ... ... | ८६ |
| रामोशी ... ... ... | ९२ |
| वाघरी ... ... ... | ९९ |
| वड्डर ... ... ... | १०७ |

| मुंबई इलाख्यांत येणारे इतर प्रांतांतील गुन्हेगार. | पान |
|---|---|
| बौरी ... ... ... | ११३ |
| मारवाड किंवा गुजराथ बौरी | १२५ |
| उजळे मिने ... ... | १३२ |
| मैले मिने... ... ... | १३९ |
| औधिये ... ... .. | १४१ |
| पठाण ... ... ... | १४६ |
| सांसी आणि बेरीये ... | १५४ |
| लंगोटी पारधी ... ... | १६३ |
| हरणी ... ... ... | १६५ |
| चंद्रवेदी ... ... ... | १६८ |
| नौसारिये... ... ... | १७१ |
| भत्रे ... ... ... | ,, |
| ओरिसामधील पान लोक | १७३ |
| हबुरे ... ... ... | ,, |
| जदुये ब्राह्मण ... ... | १७४ |
| खोटीं नाणीं कशीं ओळखावीं? | १७६ |

# मूळ ग्रंथांतील चित्रें व त्यांचीं पानें.


दिल्लीवाल बौरी कमाऊ ... ... ... ... ... ...मुखपृष्ठ
धारवाड जिल्ह्यांतील लंबानी ... ... ... ... ... १
नेहमींच्या पोषाखांत भामटे ... ... ... ... ... १६
वेषांतर केलेले भामटे ... ... ... ... ... ... २५
विजापूर छप्परबंद ... ... ... ... ... ... ... ४९
दक्षिण महाराष्ट्रांतील कैकाडी ... ... ... ... ... ६३
सातारा जिल्ह्यांतील मांग ... ... ... ... ... ... १०८
हरण शिकारी ... ... ... ... ... ... ... १३३
रामोशी ... ... ... ... ... ... ... ... १४३
बडुर ... ... ... ... ... ... ... ... १६६
वाट चालणारा दिल्लीवाल कमाऊ ... ... ... ... १७३
औधीये ... ... ... ... ... ... ... ... २१९


पुस्तकाचे शेवटीं सात चित्रपट आहेत, त्यांत निरनिराळ्या जातींचीं गुन्ह्यांचीं उपकरणें दाखविलीं आहेत.

शि. प्र. मण्डळी, पुणे
कै. म. म. [illegible]
अभ्या[illegible]
दाखल अंक ……
क्रमांक ……
किंमत …… तारीख ……

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| २२ | २ को० २३ | घबेकू चेडै | घबेकू चैडे |
| २८ | २७ | कच्रया | कच्च्या |
| ३० | २० | ह्लूर | हुल्लूर |
| ४२ | ६ | अस | असें |
| ४३ | १ को० ३० | फरघोडींचें | घरफोडीचें |
| ४३ | २ को० २१ | को, | कोट्टु |
| ४५ | २६ | त | ते |
| ४७ | १० | तिऱ्हाइतान | तिऱ्हाइतानें |
| ५२ | ८ | त्यामुर्ळे | त्यामुळें |
| ६४ | २ को० १० | कु | कुलूप |
| ७२ | २ को० १ | यमल–हैस | येमूल–म्हैस |
| ७७ | १ | मागापेक्षां | मांगापेक्षां |
| ७९ | २६ | हाकन | हांकून |
| ८० | २६ | हात | होत |
| ८१ | २६ | विकातत | विकतात |
| ८३ | २६ | गुजराथत | गुजराथेंत |
| ९० | २० | बगण्या | बणग्या |
| ९३ | १ को० २७ | कडमल | कुडमूल |
| ९३ | १ को० २९ | पटण | पटणे |
| १०३ | १२ | ह्मणविते | ह्मणवितो |
| ११० | १६ | सव | सर्व |
| १२५ | १ | माफत | मार्फत |
| १२६ | १३ | डाळ्यांजवळ | डोळ्यांजवळ |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १२७ | २ कॉ० २ | धो | धोतराचा |
| १२८ | १ | रस्यानें | रस्त्यानें |
| १२८ | २४ | इच | इंच |
| १२९ | १ | बसल | बसेल |
| १३० | २७ | सांगृन | सांगून |
| १३२ | १ | उजळ | उजळे |
| १५७ | १ कॉ० १० | घरफाडीचें | घरफोडीचें |
| १५९ | २५ | वगैर | वगैरे |
| १६६ | १३ | नणें | नेणें |
| १६६ | १८ | पाखराचा | पांखराचा |
| १६९ | ७ | मेता | नेतात |
| १७६ | ४ | असतं | असते |

# गुन्हेगार जाती

## मुंबई इलाखा.

### बंजारे.

**संज्ञाः**– ह्यांना स्थानपरत्वें बंजारी, ब्रिंजारी, लमाण, लंबाणी व लंबाडी ह्मणतात. यांच्यांत पोटजाती पुष्कळ आहेत. त्यांत मथुरीये, लभाण, चारण ( रजपुत बंजारे ) धारी ( यांना कर्नाटकांत तंबुरेरु ह्मणतात ) या चार मुख्य होत. धारी मुसलमान आहेत, व ते ह्या जातीचे भाट आहेत. बंजारा मांगांना धाळीये ह्मणतात. हिंदु बंजाऱ्यांच्या पोटजातींत सोनार, खवाशी अथवा न्हावी, पुजारी वगैरे आढळून येतात. अहमदनगर, नाशिक, पुणें, खानदेश ह्यांमध्यें खेड्यापाड्यांतून बंजारी जातीची वस्ति आहे. ही जात बंजाऱ्याहून वेगळी आहे. त्यांच्या रीतीभाती, पेहराव, भाषा, दक्षिणी मराठ्याप्रमाणें असून ते गुन्हे करीत नाहींत. गुजराथेंत थोडेसे गोवरीया अथवा गोवलीया आणि लमाण बंजारे दृष्टीस पडतात. त्यांची भाषा, पेहराव व तोंडवळा दक्षिणी व कानडी बंजाऱ्याहून किंचित् भिन्न आहे. हे लोक शेतकरी असून बिनपरवाना अफू आणण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही गुन्ह्यांत पडत नाहींत.

**वस्तिः**– मुंबई इलाखा, निजामशाही, ह्मैसूर, मद्रास, मध्यप्रांत व वऱ्हाड येथें हे लोक सांपडतात.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**– यद्यपि कांहीं पोटजाती अजून फिरस्त्या राहिल्या आहेत, तथापि बंजारे बहुतेक स्थाईक झाल्यासारखेच आहेत. कोठें कोठें त्यांच्याच तांड्यांचीं गांवें झालीं आहेत. तळा ( तांडा ) पासून तीस ते साठ मैलपर्यंत ते गुन्हे करतात. जनावरें उचलण्यासाठीं ते वेळेवर याहीपेक्षां लांब जातात. तळाच्या आसपास ते गुन्हे करीत नाहींत.

**लोकसंख्याः**– या जातीची लोकसंख्या मुंबई इलाख्यांत एक लाख बंजारी व अठरा हजार लंबाणी आहे. बंजाऱ्यांचा भरणा खानदेश, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा, पुणें, ठाणें ह्यांत विशेष आहे; व लमाणांचा धारवाड, विजापूर, दक्षिण भागांतील संस्थानें, पंचमहाल, बेळगांव, कानडा येथें आहे.

**स्वरूपः**– गांवठाणापासून दूर अशा पडीत जमिनीवर बंजाऱ्यांच्या तांड्यांची वस्ति असते. दरएक तांड्याला नाईक असतो, तो तांड्याच्या पंचायती मिटवितो, व त्याच्यातर्फे इतरांशीं बोलणें चालणें करितो. पुरुष उंच, धट्टे कट्टे, निमगोरे, बांधेसूद, कंटक आणि जबरदस्त मजल काटणारे असतात. जरा घामटपणानें राहणारे त्यांच्यांतले गरीब लोक सोडून द्या; पण एकंदरींत ही जात थेट इतर शेतकरी जातीप्रमाणें दिसते. पुरुषांचा पेहराव व तोंडवळा अंशतः घरंदाज मराठे किंवा मारवाड रजपुताप्रमाणें दिसतो. त्यांचा नेहमींचा पोषाख झटला ह्मणजे धोतर अगर चोळणा, अंगरखा अगर पेहरण, पांढरें किंवा रंगीत पागोटें हा होय. ते सणावाराचे दिवशीं भपकेदार पागोटें घालितात. सधन बंजारे घराबाहेर जातात तेव्हां भलें मोठें तांबडें पागोटें घालून त्यावर उपरणें वेडेंवांकडें गुंडाळतात. धारी सुंता करतात, पण त्यांची रहाणी व पुष्कळ नांवें हिंदूप्रमाणें असतात. बंजारणींचा बांधा व रूप चांगलें असतें. कोठें कोठें त्या बड्या धीट व बोलक्या असतात; व कोठें कोठें त्या लाजाळू व अबोल असून बाहेर मारवाडणीप्रमाणें तोंडावरून पदर घेतात. चारणांच्या बायका मोठ्या गमतीच्या दिसतात; त्यांचे ते झळक-

फळक, लाल किंवा निळे घागरे ( लहंगे ), त्याच रंगाचीं भिंगें, मणी किंवा शिंपा बसविलेली कशिदेदार ओढणी, कडक पण पोकळ कांचोळी, हाडकांच्या, शिंगाच्या किंवा पितळेच्या कोंपरभर बांगड्या, नानाप्रकारचीं डोकीचीं फुलें ह्यांनीं भरलेली कंबरेपर्यंत वेणी, आणि अग्रफुलें गुंफलेल्या कानशिलावर लोंबणाऱ्या बटा, रेलचेल पितळी पैंजण, कानबाळ्या इत्यादि मोठी मजा दिसते. कोठें कोठें सौभाग्यवती बंजारणी माथ्यावर वेणीमध्यें सुमारें नऊ इंच लांबीचें शिंग अगर खुंटी घालितात व त्यावरून ओढणी घेतात. धारी जातीच्या बायका कोठें कोठें कोंपराच्या वर बांगड्या भरीत नाहींत. मुसलमानणीप्रमाणें साडीचोळी फक्त लग्नकार्यांत त्या नेसतात. धालिया जातीच्या बायका मांगिणीप्रमाणें साडीचोळी नेसतात व कांचेच्या बांगड्या भरतात.

बंजाऱ्यांत मथुरियांची जात बेगुन्हेगार, श्रेष्ठ, पण कमी भरण्याची आहे. ते खाऊन पिऊन सुखी असतात, घरांतून राहतात, जानवें अगर तुळशीची माळ घालतात, मद्यमांस खात नाहींत, आणि इतरांपेक्षां स्वच्छ राहतात. गुजरणीप्रमाणें त्यांच्या बायका साडी नेसतात, व केंसांच्या शेवटीं दोन इंच लांबीची कापडी खुंटी घालून माथ्यावर वेणी घालतात, आणि तिच्यावरून साडीचा पदर घेतात. लभाण पुरुष व बायकांचा पोषाख व राहणी मथुरियाप्रमाणें असते. बंजारे देवभोळे व फार चीडखोर असतात. ते नेहमीं आपसांत भांडतात, व कधीं कधीं रक्तपातही करतात. परंतु हळूहळू ते निवळत चालले आहेत. मथुरीये व लमाण सोडून बाकीच्या जातींच्या बंजाऱ्यांना मद्यमांस फार आवडतें. आपले भाले व नांवाजलेले कुत्रे घेऊन ते जंगलांत शिकार करतात. त्यांच्यांतल्या सधन लोकांचीं घरें मजबूत असतात; पण बहुतेकांचीं ताडपानांचीं किंवा गवताचीं छपरें असतात. प्रवासांत ते पालांतून राहतात. बंजारी कुत्र्यांची जात फार प्रसिद्ध आहे. ते घरींदारीं तांड्यांची राखण करितात.

**भाषाः**– बंजारी भाषा मारवाडीप्रमाणें असून तिच्यांत हिंदुस्थानी व मराठी शब्दांची भेसळ आहे. त्यांना हिंदुस्थानी बोलतां येतें, व ज्या प्रांतांत ते राहतात तेथील भाषाही त्यांना येते.

**सांकेतिक भाषाः**–कर्नाटकामध्यें लमाणी बोलींत घरफोडीच्या हत्याराला 'सुळा,' दरोड्याला 'धरदमार,' व रस्तालुटीला 'वाटमार' ह्मणतात.

**उपजीविकेचीं बाह्य साधनेंः**– रेल्वे व सडका होण्यापूर्वी बंजारे आपल्या बैलांवर मीठ, धान्य वगैरेंची ने आण देशभर करीत असत. आतां पुष्कळजण थोडथोडी शेती व शेतमजुरी करतात. त्यांतले गरीब लोक गवत, सरपण, मध जंगलांतून आणून विकतात. लोक त्यांच्याकडे गुरें राखुळीला घालतात. सावसावकारी करणारा बंजारा एखाद्‌दुसराच नजरेस पडतो. कांहींजण ढोरें, शेळयामेंढ्या वगैरे लांब लांब नेऊन विकतात; व कांहीं थोडे बैल बाळगून भाडे करतात. कांहींजण जागले, बेलीफ, पोलीस आगगाडीवर हमाल आहेत. नवी रेल्वे, तलाव वगैरे कामांवर लंबाण्याचे तांडे असतात. ते बहुधा दिवसा काम आणि रात्रीं आसपासच्या गांवांत चोऱ्या करतात.

**वेषांतरः**– दरोड्यासाठीं खबर काढण्याकरितां व जुळवाजुळव करण्यासाठीं कर्नाटकमध्यें बंजारे हे, लिंगायत किंवा ब्राह्मणांचा वेष घेतात. गुन्हा करतांना ते धाटा बांधतात व राख किंवा पिंवडी फांसतात.

**गुन्हेः**– खाऊन पिऊन सुखी असे बंजारे बहुधा गुन्हे करीत नाहींत. कर्नाटकांत राहणारे लंबाणी लोकांपासून फार प्रलय आहे. रस्त्यावर लूट व दरोडा, घरफोडी, झोंपड्यांवर दरोडा, ढोरें व शेळ्यामेंढ्या चोरणें, बेकायदा दारू गाळणें हे त्यांचे मुख्य गुन्हे होत. शिवाय ते पेवें फोडतात, रात्रीं चालणाऱ्या किंवा उतरलेल्या गाड्यांत चोऱ्या करतात, चोरलेलीं ढोरें परत देण्याकरितां दस्तुरी उकळतात, कधीं कधीं मुलें चोरतात. गुजराथेंत राहणारे गोवारिआ हे बिनपरवाना अफू आणतात.

**गुन्ह्याची पद्धतः**– ढोरवाड्यांतून किंवा मैदानांत चरणाऱ्या कळपांतून ते ढोरें व मेंढ्या पळवितात, व शिंगें खुडून, कानांचा आकार बदलून, आणि डागण्या देऊन चोरलेल्या जनावरांचें स्वरूप बदलतात. कधीं कधीं चोरीचीं जनावरें ते आपले जनावरांत मिसळतात. एका गांवचीं दहापंधरा जनावरें एका वेळीं जातात, पण ते प्रत्येक जनावर निरनिराळ्या वाटेनें नेतात. त्यामुळें चोरीचा पत्ता लागत नाहीं. दोन प्रहरीं गुराखी जेवण्यास गुंतला असतां किंवा त्याला डुकली लागली असतां पटाईत बंजारा उघड्या मैदानांतून ढवळ्यादिवसां देखील जनावरें लांबवितो. तांडे बायकांच्या जिमतीला लावून गुरें चोरण्यासाठीं बंजारे लांब लांब जातात, आणि चोरलेलीं जनावरें आडरस्त्यानें तांड्यांत आणून सोडतात. कधीं कधीं चोरीचें ठिकाण व तांडा यांच्या दरम्यान लोक ठेवून दोघेजण जनावरें चोरतात व हातोहात लांबवितात; आणि पेंड पोंचविला कीं, जो तो आडरस्त्यानें परततो. **रात्रींच्या** वेळीं बंजारे मेंढ्यांच्या कळपांत शिरून त्यांना बिचकवितात, आणि त्या धांदलींत प्रत्येक एक एक मेंढरूं उचलून वाटेस लागतो. मेंढक्या आडवा झाला तर ते त्याला ठोकतात, किंवा दगड मारतात. कोणी अडथळा केला ह्मणजे बंजाऱ्यांना सुमार रहात नाहीं, व मग ते खवळतात.

तिघे किंवा चौघे बंजारे एकट्या दुकट्या गाडीवाल्याला रस्त्यावर अडवितात. त्यांच्या जमावापुढें गाडीवाल्यांचें चालेनासें झालें ह्मणजे ते धान्य, रोकड अगर चीजवस्त लुटारूंच्या हवालीं करतात. बंजाऱ्यांचा जमाव मोठा असला तर ते गाड्यांची सबंद हार अडवितात, आणि सावकाश एक एक गाडी लुटतात. **दिवसां** चोरी करणें झाल्यास ते ती आडबाजूच्या किंवा डोंगरांतल्या रस्त्यावर करतात, म्हणजे निर्धास्त असतें.

दरएक टोळीला नाईक असतो व त्याच्या हुकुमाप्रमाणें तिच्यांतले लोक वागतात. नायकाला कानडींत ‘ साल्या ’ ह्मणतात. होरा पाहणें,

देवदेव करणें वगैरेचा पूर्व खर्च तो करतो, आणि वीस किंवा अधिक साथीदारांची टोळी बनवितो. कोठें डाका मारावयाचा ह्याची बातमी एकजण टेहळणी करून काढतो. पण बहुधा ही खबर कलाल, स्थानिक मारवाडी किंवा बंजारे ह्यांच्याकडून मिळते. तसेंच गांवचे गुन्हेगारही बातमी देऊन टोळींत सामील होतात. बंजारे वाटेवरच्या झाडांच्या काठ्या काढून त्या, आणि गोफणगुंडे, कोयते, व कधीं कधीं मिळाल्यास तलवारी, बंदुकाही बरोबर नेतात. बंजाऱ्यांची डाका मारण्याची रीत इतर गुन्हेगारांहून भिन्न नाहीं. दरोड्याचे वेळीं पहिल्यानें ते दगडांचा वर्षाव करतात व गोफणगुंड्यांनीं आसपासचे रस्ते रोंखतात. नंतर "दीन ! दीन !" ह्मणत काठ्यांचा व दुसऱ्या हत्यारांचा सपाटा सुरू करतात. जवळ असल्यास, दहशत बसविण्यासाठीं तलवारी, बंदुकाही ते चालवितात. ते एकमेकांशीं हिंदुस्थानींत बोलतात. पण बहुधा सांकेतिक अक्षरें उच्चारतात. माग चुकविण्यासाठीं ते परत जातांना टोळी फोडून आडरस्त्यानें जातात. तसेंच जावयाचें असेल पूर्वेस तर ते जातात पश्चिमेस; आणि ते वाटेनें फोल जिनसा फेंकीत जातात. दरोडा किंवा रस्तालूट झाल्यावर ते गुन्ह्याच्या ठिकाणापासून सुमारें एक मैलावर थोडावेळ मुक्काम करितात, लूट नीट तपासून घेतात, आणि मग तांड्याकडे वळतात. कधीं कधीं तांडा या गांवचा त्या गांवीं जात असतांना बंजारे चोऱ्या, दरोडे मारतात. बैलावर सामानाच्या गोण्या घालून त्याबरोबर ह्मातारे बायका पुरुष जातात; आणि धट्टेकट्टे संकेतस्थानीं जमून झपाट्यासरसा एखादा दरोडा घालून पुनः तांड्याला येऊन मिळतात.

झुंझुरका सकाळीं राखणदार झोंपीं जातात. अशा वेळीं ते पिकाची किंवा खळ्याची चोरी करतात. कांहींजण राखणदारावर नजर ठेवितात किंवा वेळ पडल्यास त्याचा समाचार घेतात; आणि बाकीचे गोण्यांत किंवा घोंगड्यांत धान्य भरून चालते होतात. उभीं पिकें ते बहुधा रात्रीं चोरतात. ते घरीं हुक्का व बाहेर चिलीम किंवा चुट्टा ओढतात. गुन्ह्याच्या ठिकाणाजवळ ह्या जिनसा किंवा कवड्या, शंख, भिंगें लाविलेले पानसुपा-

रीचे बटवे दृष्टीस पडले ह्मणजे लंबाण्यांनीं (बंजाऱ्यांनीं) गुन्हा केला असें समजावें. क्वचित् प्रसंगीं कैकाडी वगैरे जातीही असल्या जिनसा दुसऱ्यावर संशय जावा ह्मणून मुद्दाम तेथें ठेवितात. तसेंच लांबच्या तांड्यांनीं गुन्हा केला असल्यास गांवचे बंजारे फुटतात, मात्र तपासाचें काम जरा खुबीनें केलें पाहिजे. लंबाण्यांनीं गुन्हा केला असें वाटल्यास तांड्याची हजिरी घ्यावी, आणि गैरहजर घायाळ इसमांबद्दल बारीक तपास करावा.

दोन ते पांच गोवरिया बंजारे संस्थानांतून अफू आणण्यासाठीं सडकेनें किंवा रेल्वेनें जातात, आणि धोपट रस्त्याच्या जवळपासच्या आडरस्त्यानें परत येतात. ते रात्रीं चालतात व दिवसां मुक्काम करून आसपास अफू पुरतात. घरीं पोंचल्यावरही ते अफू पुरून ठेवतात आणि अफीमबाजांना किरकोळीनें विकतात.

**गुन्ह्यांचीं उपकरणें:**– जबरीचे गुन्हे करण्याचे कामीं कोयते, काठ्या, गोफणगुंडे, सुऱ्या, भाले व मिळाल्यास बंदुका, तलवारी यांचा बंजारे उपयोग करतात. मुख्यत्वेंकरून कर्नाटकांत ते, लोकांस भिवाविण्यासाठीं व आपण सशस्त्र आहों हें दाखविण्यासाठीं, कधीं कधीं आपटबार काढतात.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**– रोकडशिवाय बाकीचा माल तांड्यांच्या नजीकचे नाले, जुन्या विहिरी, वगैरेमध्यें ते पुरतात. लागलीच विकला नाहीं तर ते धान्य व कापूस, गवत, पाला किंवा वळहयीखालीं दडवितात. कपड्यांचे कांठ काढून ते विकतात, आणि बिनकांठांच्या कडांना दुमट घालतात. कलाल, लिंगायत, मारवाडी, तांबट, गांवचे पाटील व सावकार ह्यांना ते चोरीचा माल विकतात. लहान डाग ते बायकांच्या कपड्यांत, निऱ्यांत अगर अन्न शिजविलेले भांड्यांत ठेवितात, किंवा गोण्यांत शिवतात. चोरीचे दागिने वांटून न घेतां ते त्यांचे टक्के करतात. साल्यांला दोन हिस्से मिळतात. थापथुपीनें मालकीचे दाखले उपटून बंजारे चोरीचीं जनावरें एकएक, दोनदोन लांबच्या बाजारांत अगर खाटकांना विकतात किंवा क्वचित् सांभाळण्यासाठीं स्नेह्याजवळही देतात.

———

# बेरड.

**संज्ञा:**– ह्यांना बेडर, ब्याडेरू, तलवारू, नाइकमकळरू, काटक ( खाटिक, गळेकापू ) ह्मणतात.

**वस्ति:**– ह्यांची वस्ति बेळगांव, धारवाड, विजापूर व त्यांनजीकचीं संस्थानें आणि मद्रास इलाख्यांतील कांहीं भाग येथें आहे.

**गुन्ह्यांचें क्षेत्र:**– कर्नाटकांत आपले गांवापासून सुमारें चाळीस ते पन्नास मैल ते गुन्हे करतात. ही जात फिरस्ती नसून, ती खेड्यांत घरें-दारें करून राहिली आहे.

**लोकसंख्या:**– ह्यांची लोकसंख्या सुमारें पावणेदोन लाख आहे.

**स्वरूप:**– ह्यांचें खाणें व रहाणें गलिच्छ असतें. ते रामोशाप्रमाणें दिसतात. ते काळे, खाशा पीळदार व मजबूत बांध्याचे, सोशीक व जलद चालणारे असून त्यांचे डोळे व कान तिखट असतात. खडकाळ प्रदेशांत अंधाऱ्या रात्रीं तीस मैल ह्मणजे बेरडास कांहींच नाहीं. कुत्रे व भाले घेऊन रानडुकराची शिकार पायदळ करण्याचा त्यांना फार नाद असतो. ते जुव्वेबाज व दारूबाज असतात. पुरुषांचा पोषाख जाडेंभरडें पागोटें, पेहरण किंवा कुडतें, चोळणा, धोतर, किंवा लंगोटी हा होय. त्यांच्या हातांत आंगठ्या व कानांत बाळ्या असतात. त्यांच्या बायका पुरुषाप्रमाणें राकट असून चोळी लुगडें नेसतात, पण कासोटा घालीत नाहींत. त्या अंगावर कानडी पद्धतीचीं लेणीं घालतात. सन १८९५ सालीं बेरडांनीं बेळगांव जिल्ह्यांत बंडावा माजविला होता. जरा गड-बड झाली कीं ते बिघडतात आणि पोलिसला न जुमानतां आसमंतात् उपद्रव देतात. त्यांचेवर नेहमीं पोलीसची नजर पाहिजे.

**भाषाः**— ह्यांची भाषा अशुद्ध कानडी आहे. महाराष्ट्राचे लगत्याला जे राहतात ते अशुद्ध मराठी किंवा हिंदुस्थानी बोलतात. बेळगांवनजीक ते वड्डुरी बोलतात. सांकेतिक भाषा या लोकांत नाहीं.

**उपजीविकेचीं दर्शनी साधनेंः**— ह्या जातीचे पुष्कळ लोक मेहनती व इमानी आहेत. कांहीं थोडे जाहगिरदार, वतनदार व पाटील आहेत; आणि पुष्कळ सनदी ( गांवपोलीस ) जागले, शेतकरी, गुराखी, हमाल व गिरणींत मजूर आहेत. कांहीं गाडीवाले, लांकूडविके व पोलीस आहेत. कांहीं बेरडणी कसब करतात त्यांना 'जोक्तर' ह्मणतात.

**वेषांतरः**— ते आपणांला उंच जातीचे हिंदू, किंवा जनावरें विकण्याचा धंदा करणारे ( हेडे ) ह्मणवितात. गुन्हा करतांना तोंडाला राख वगैरे फांसून ते डोक्यावर घोंगडी घेतात.

**गुन्हेः**— ते मुख्यतः टोळी करून रस्तालूट, घरावर दरोडा, जनावरें, मेंढ्या चोरणें, पिकें चोरणें, घरफोडी व लहान चोऱ्या इत्यादि गुन्हे करतात. जानेवारी ते मेपर्यंत ते बहुधा लहान अगर जबरीची चोरी, दरोडा, जनावरें चोरणें, वगैरे गुन्हे करितात; जून ते आक्टोबरपर्यंत घरफोड्या करतात, आणि नोव्हेंबर ते जानेवारी शेतकाम किंवा दुसरा इमानी रोजगार करतात.

**गुन्ह्याची पद्धतिः**— मेंढवाड्यांतून किंवा जाळ्यांतून मेंढ्या चोरणें झाल्यास हातांत वाघनख घालून रानटी जनावराप्रमाणें आविर्भाव घालून ते कळपांत शिरतात. गोठ्यांतून चोरलेलीं जनावरें ते जंगलांत नेऊन बांधून ठेवितात. मालकानें अडत्यामार्फत निमीशिमी किंमत दिली तर त्यांना ते एखाद्या नेमल्या जागीं नेऊन सोडतात अगर कोंडवाड्यांत घालतात,व तेथें फी भरून मालक त्यांना सोडवितो. पोलीसकडे फिर्याद वगैरे देण्याचा मालकाचा झोंक दिसला तर जनावरें मारून टाकतात; किंवा त्यांचे शिंगांचा आकार बदलून एकएक दोनदोन लांबच्या बाजारांत किंवा यात्रेंत विकतात.

कोर्टाचे हद्दींची त्यांना चांगली माहिती असते, त्या बेतानें ते गुन्ह्याचें ठिकाण ठरवितात. दरोडे वगैरे घालण्याची त्यांची पद्धति जवळजवळ रामोशासारखी असते. 'बगली' (हात जाईल असें चौकटीजवळ भोंक पाडून) अगर 'रुमाली' (अंग जाईल असें भिंतीला धारें पाडून) पद्धतीनें ते घरफोडी करतात. ते स्वतः अगर गांवच्या गुन्हेगाराकडून खबर काढतात. पुष्कळ वेळां अदावतवाले आपल्या वैऱ्याचें घर फोडण्यासाठीं त्यांना बोलावून घेतात. गुन्हा करण्याचे कामीं कोणत्याही दुसऱ्या जातीच्या लोकांची ते संगत करतात. ते कैकाडी लोकांसारखे क्रूर व गुन्ह्याचे वेळीं निष्कारण इजा करणारे नसतात.

**गुन्ह्याचीं हत्यारें:**– 'कंगट्टी' (अठरा इंच लांब, दीड इंच व्यास असा, एका टोंकाला चपटा होत गेलेला लोखंडी बत्ता) 'अरसुकुंची' (अठरा इंच लांबीचा टिकाव) हीं त्यांचीं घरफोडीचीं हत्यारें होत. दरोडा किंवा जबरीच्या चोरीच्या वेळीं त्यांचेजवळ कुऱ्हाड, पहार, विळा, काठ्या, गोफणगुंडे, व अपटबार हीं असतात, व मिळाल्यास तलवार, बंदूकही बरोबर नेतात.

**चोरीच्या मालाची निर्गति:**– चोरीचा माल ते जंगलांत, झाडाखालीं, किंवा ओढ्यांत अगर अशाच दुसऱ्या ठिकाणीं पुरून ठेवितात, आणि संधि सांपडली ह्मणजे सोनार, कलाल, सावकार, पाटील-कुळकर्णी ह्यांना विकतात. चोरलेल्या जनावरांची काय वाट लावितात हें वर आलेंच आहे.

## भामटे.

**संज्ञा:**– हे घंटी चोर, उचले, खिसेकातरू, टकारी, वडारी, कलवडरू, तुडुग वडरू, कामाठी आणि पाथरट या नांवांनींही ओळखले जातात.

**वस्ति**:– मूळचे हे लोक तेलगू भाषा बोलणारे जिल्ह्यांपैकीं, एखा-द्यांतील रहिवाशी असावेत. पण हल्लीं पुणें, सातारा, अहमदनगर आणि सोलापूर या जिल्ह्यांत त्यांचा भरणा विशेष आहे. त्यांची वस्ति आहे अशा गांवांचीं नांवें जिल्हानिहाय खालीं नमूद केलीं आहेत. एखादे गांवीं त्यांना त्रास होऊं लागला, तर तें गांव सोडून ते दुसऱ्या गांवीं जातात, आणि तेथें सोयरसंबंध करून रहातात.

**पुणें जिल्हा**:– हवेली तालुक्यांत बोपुडी, भोपखेल, फुग्याची वाडी, मुंढवा, वडगांव शेरी. भिमथडी तालुक्यांत निंबाळकराचें वडगांव, चोप-डज ऊर्फ भडगव्हाण, वाकी,सोमयाचें करंजें, मोरगांव, बाभुर्डी, कऱ्हाटी. इंदापूर तालुक्यांत गोंदी. शिरूर तालुक्यांत तळेगांव ढमढेरे, पाबळ, केंदूर, धामारी. खेड तालुक्यांत लोणी, धामणी, कन्हेरसर. जुन्नर तालु-क्यांत वळती, रांजणी, खोडद. **सातारा जिल्हा**:– कोरेगांव तालुक्यांत रुई, शेंदुरजणें, कन्हेरखेड. कऱ्हाड तालुक्यांत उंब्रज, गोळेश्वर. खानापूर तालुक्यांत भिकार वडगांव, तडसर, चिचणी. वाळवें तालुक्यांत गोटाखिंडी, बाहादर वाडी. **सोलापूर जिल्हा**:– बार्शी तालुक्यांत दहि-टणें. **अहमदनगर जिल्हा**:– पारनेर तालुक्यांत रुई, बाभुर्डी, अस्तगांव. श्रीगोंदें तालुक्यांत चांभुर्डी. कर्जत तालुक्यांत शिंदें. जामखेड तालुक्यांत खर्डें. नेवासें तालुक्यांत हिंगोणी,केंगोणी. संगमनेर तालुक्यांत पिंपरी,लोकें अजमपूर. **नाशिक जिल्हा**:– निफाड तालुक्यांत रावळस,कुंदेवाडी,शेवरी, पिंपरी जांब, सौंदरपूर, ऊगांव, पिंपळस. **खानदेश जिल्हा**:– शिर्सोली स्टेशनाजवळ केळी, खर्डी. बऱ्हाणपूर स्टेशनाजवळ चोरवाडी. **बेळगांव जिल्हा**:– चिकोडी तालुक्यांत भेंडवड, खडक, भानवी, नवल्यल, यम-कनमर्दी, अंकलगी. अथणी तालुक्यांत सकुनहट्टी, यरगट्टी. **विजापूर जिल्हा**:– बदामी तालुक्यांत हंसनूर, हलकुर्की, ब्यंद्रबुडीहल, असंगी, कटनल्ली. बागेवाडी तालुक्यांत मसूटी. विजापूर तालुक्यांत अकेंरी, जलगेरी. इंडी तालुक्यांत बर्गुडी, कुमसगी. **धारवाड जिल्हा**:– बंकापूर

तालुक्यांत बालेहुसूर. **कोल्हापूर संस्थानः**–शिरोळ तालुक्यांत दनोली, शिरगांव. **सांगली संस्थानः**– सांगलीजवळ कौलापूर. **अक्कलकोट संस्थानः**– अंकलगी, बर्गुडी, कोनली, ( येथें भामटे कालीच्या दर्शनास जातात,) भगेली. **माळवाः**– देवास. **निजामशाहीः**– सिद्धपूर, मुंगाशी, एकनाथवाडी, येल्लमवाडी, भैरवाडी, श्रीपतवाडी, ओकर्डी, खरुंडी.

**गुन्ह्याचें क्षेत्रः**– भामट्यांचा प्रलय सर्व हिंदुस्थानभर आहे. रेल्वे, बंदरें, बाजार, देवळें, यात्रा वगैरे गर्दीच्या ठिकाणीं भामटे आपले ठेवलेलेच. प्रवासांत सोबतीच्या मुशाफरांनाही ते सोडीत नाहींत. पण त्यांचा विशेष भर रेल्वेवर असतो. कारण रेल्वेंत झालेली चोरी मालकाला बऱ्याच वेळानें कळते; तोंपर्यंत भामटा कोठेंच्या कोठें शेंकडों मैल मागेंच उतरलेला असतो. कोठें चोरी झाली आणि कोणाचें नांव घ्यावें ह्याचें मालकाला गूढ पडतें, व त्यामुळें पोलिसाचेही पाय मोडल्यासारखे होतात. जेव्हां बायकापोरांनिशीं भामट्यांचीं बिऱ्हाडेंचीं बिऱ्हाडें चोऱ्यांसाठीं लांब लांब प्रवास करतात, तेव्हां ते बाग, धर्मशाळा, देवळें वगैरे ठिकाणीं उतरतात; आणि थाप मारतात कीं आह्मी दुष्काळी मुलुखांतले मराठे शेतकरी असून पोट भरण्याला निघालों आहोंत.

**लोकसंख्याः**– सुमारें ६०० पुरुष व ६०० बायका अशी त्यांची खानेसुमारी आहे; पण ती बरोबर नसावी.

**स्वरूपः**– महार, मांग, चांभार, ढोर, बुरूड, टाकून बेरडांसुद्धां सर्व जातींचे हिंदु आणि मुसलमान ह्यांना भामटे लोक आपल्या जातींत घेतात. इतर जातींचीं मुलें लहानपणींच घेऊन त्यांना ते आपला धंदा शिकवितात. अशा मुलांना ‘ कोन्नड ’ अगर ‘ गोल्यड ’ ह्मणतात; आणि मुलींना ‘ कोन्नडी ’ ह्मणतात. एखाद्या कुलवान् स्त्रीचें वांकडें पाऊल पडलें तर भामटे तिला आसरा देऊन तिचें मूल ठेवून घेतात, आणि लुगडें, चोळी, व वर रुपया दोन रुपये देऊन तिची बोळवण करतात. दरएक गांवीं

सर्वांत वडील भामटा नाईक असतो, त्याला पाटील, तालमड, तालदरू अगर कट्टिमनी ह्मणतात. जातीच्या पंचायती तो मिटवितो. आपल्या साथीदारांना चोरून एखाद्यानें, चोरीचा माल बळकाविला किंवा एखाद्या स्त्रीनें व्यभिचार केला, तर तेलरवा अथवा तेलगोटी करण्याचा भामट्यां-मध्यें रिवाज आहे. कढत तेलांतून गोटी किंवा पैसा काढावयाचा, जर हात भाजला नाहीं तर तो इसम किंवा औरत निर्दोषी आहे असें समजावें. पाण्यांत हात भिजवून कढत तेलांत घालून चलाखीनें बाहेर काढला तर त्याला इजा होत नाहीं असें ह्मणतात.

भामटे खुजट, टणक, चपळ व जातिसंकरामुळें कांहीं काळे व कांहीं निमगोरे असतात. भामटिणी देखण्या पण व्यभिचारी असतात. त्यांची रहाणी डौलाची नसते, तरी एकंदरींत ते कपडालत्ता चांगला वापरतात. भामटिणी नथ घालतात, उजवे हातापेक्षां डावे हातावर जास्त गोंधून घेतात, व हाततोंडावरही गोंधतात आणि कधीं कधीं मराठे—ब्राह्मणांच्या बायकां-प्रमाणें पोषाख करतात. चोरीला निघाला ह्मणजे भामटा कधीं गाफील नसतो, तो एके जागीं फार वेळ ठरत नाहीं व त्याची नजर चोहोंकडे असते. चोरींत निष्णात ठरल्याशिवाय भामट्याला बायको मिळत नाहीं. त्यांची कैकाड्यांशीं सोयरीक होते. ते फार खादाड व दारूबाज असतात आणि गांवडुकरें खातात.

**भाषा:**—एकमेकांत ते वडारी बोली बोलतात. त्यांना मराठी, हिंदुस्थानी व कानडी येतें. विजापुर जिल्ह्यांत राहणारे घंटी चोर घरीं कानडी भाषा बोलतात.

## सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| उल्मुख अथवा, वाघनख | वाकडा चाकू. | ओचखर | आला. |
| | | डांगिकुशी | लप. |
| फुड्ड, गोषड | फौजदार, इन्स्पेक्टर. | नेल्ला, कुकुलु | कान्स्टेबल. |
| | | यरवेलक | सोन्याचे दागिने. |
| कट्टेड | पोलीस. | वैपलू | रुपये. |

| | | | |
|---|---|---|---|
| तलपुकयल | रुपें. | गोद | भिंत. |
| फारशी | सांकेतिक भाषा. | बोख पारशोती गूथम | भोंक पाडण्याचा खिळा. |
| मांगकर | अंमलदार. | जरांगी एलग्य, पार एलग्यर | निघून जा, |
| उंडई | तेथें आहे. | फड्ड इल्ल | तुरुंग अथवा मोठें घर. |
| टापशीचप | थाप मार. | यर्रमंकड यर्रमोथड | युरोपियन. |
| तुलग | सांगूं नको. | अंथबंगर | सोन्याचा जिन्नस. |
| गंट | लूट, गांठोडें. | बचकु | दागिना. |
| फड्ड | पुष्कळ, जड. | अंथयेंडी | रुपें. |
| चिकी | त्यांजवळ आहे. | मुचनी | चोरीचा माल. |
| सिटी | पैशाचा कसा. | मुचड | चोर. |
| रोंडी | कंबर. | मुचिल बत्तल, दोंतु | चोरीचें कापड. |
| कोशकिया | कांप. | अडपम | पोतें. |
| चक्क | पेटी. | फोगेबंदे | आगगाडी. |
| चिन्नैड | लहान, हलकें. | | |
| गूथम | घर फोडण्याचा खिळा. | | |
| बोख | भोंक. | | |

## विजापूर घंटी चोराचे सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| पिस्कत | सुरी. | नेडगर, वालीकर | गांवपोलिस. |
| तेलपडु कयल वायपळु | रुपये. | केवरर | औरत. |
| येंडी | रुपें. | पिन्नर | मूल. |
| गोशड | ब्राह्मण. | कोड्डरकी | चोरी. |
| यारदी | सोनें. | मोट | गांठोडें. |
| पड्ड | चालूदे. | दुगाणी | पैशाचा कसा. |
| बदक | दागदागिने. | केंपु | सोनें. |
| कनश्य | खेडवळ. | कड्ड | माल. |
| बंटगिया बंटकर | कॉन्स्टेबल. | बुडसू | पळ. |
| गयनू | धर. | चपर मडिको | लपव. |
| इरत | पाटील. | कोद्दु | चोर. |
| दोड्डइरत | पोलिस ऑफिसर. | गायना वडसू | घरफोडी. |
| | | शटो | फसवून नेलेल्या चोरीचा माल घेणाराला मारणें. |

भामटा आधीं खोकून मग खाकरला ह्मणजे जपून अस, असें त्याचे भिडूनें समजावें. जवळपास पोलीस असल्यास तो हलकें खोकतो व खाकरतो. अमके बाजूस भीति आहे असें सुचविणें झाल्यास भामटा आपलें डोकें खाजवितो व कोंपर त्या बाजूस करतो. तुजवर डोळा आहे असें सुचविणें झाल्यास डोकें खाजवितांना ते कोंपर मागच्या बाजूस नेतात. मजवर पोलिसचा डोळा आहे असें आगगाडींतून उतरणाऱ्या सोबत्याला सुचविणें झाल्यास ते आपल्या हाताभोंवतीं उपरण्याचा एक पदर गुंडाळतात; आणि उतरूं नको असें सुचविणें झाल्यास गाडी जाणार तिकडे डोकें खाजवीत आपला कोंपर नेतात. संकेतस्थानीं पुनः जमण्याचें ठरवून जेव्हां ते लहान लहान तुकड्या करून जातात, तेव्हां प्रत्येक तुकडी इतर तुकड्यांना माहीत आहे अशा जवळपासच्या जागीं कांहीं माल किंवा पैसे पुरून ठेवते. सदर माल त्या ठिकाणीं सांपडला नाहीं ह्मणजे समजावें कीं, तो माल पुरून ठेवणारी तुकडी येऊन गेली. मुक्काम हलविण्यापूर्वी भामटे चुलीचे दगड एके ठिकाणीं जमवितात, असे कीं त्यांची वरील बाजू एकमेकांस लागावी. तळावर असे दगड दिसले म्हणजे समजावें कीं ते पुढें सरकले, सदर दगडांजवळ पायाच्या कडेनें माती उकरून तिजवर पाऊल वठविलेलें दिसलें, ह्मणजे ज्या बाजूला माती उकरली असते, त्या बाजूला ते गेले असें समजावें. असली खूण चुलीपासून पन्नास यार्डीपर्यंत असते. दोन वाटांचा चौक होतो तेथें पन्नास ते शंभर यार्डांचे अंतरावर अशा दोन तीन खुणा ते करतात. आपल्या जोडीदारांच्या पावलांचा माग काढण्यांत ते मोठे तरबेज असतात. त्यांच्यांत करपल्लवी व नेत्रपल्लवी असते. तिच्या योगानें पूर्वीची ओळख नसली तरी ते एकमेकांना ओळखतात व आपले मनोदय कळवितात.

**उपजीविकेचीं दर्शनी साधनें:**— भामटे खेड्यांतले धंदे, शेती शेतकाम करतात. पण ते आपली जमीन दुसऱ्यांना—बहुधा पाटलांना—

लावितात. बरे असतात ते दुकानदारी व सावकारी करतात. ज्यांना पुष्कळ जमीन व गुरें ढोरें असतात, ते तेव्हांच जामीन पटवितात. जामीनकीची मुदत संपेपर्यंत ते बिलकुल गुन्हा करीत नाहींत. "बाजाराला जाऊन पोट भरतों" असें ते बिनदिक्कत सांगतात.

**वेषांतरः**– भामटे म्हटले म्हणजे महा बहुरूपी. ते भिकाऱ्यांपासून तों सरदारांपर्यंत वाटेल त्याचा वेष घेतील. वारा वाहील तसें तोंड फिरविण्यांत व साखर पसरण्यांत त्यांची शर्थ असो. खाऊन पिऊन सुखी अशा यात्रेकरूप्रमाणें किंवा मुलूखगिरीला निघालेल्या मराठ्याप्रमाणें ते बहुशः पोषाख करतात. उद्योग पाहण्यासाठीं निघालेल्या गरीब मराठ्याचें ते वेळेवर सोंग घेतात. श्रीमंत मारवाडी, किंवा हिंदू व्यापारी, जंगम, लिंगायत, ब्राह्मण, धनगर, साधु, भिक्षुक, सनादी कोरवा ( वाजंत्री ) किंवा दक्षिणी भाट यांच्या वेषानें ते पुष्कळ वेळां हिंडतात. ह्यामुळें रेल्वे, देवळें वगैरे ठिकाणीं त्यांना प्रतिष्ठितपणानें जातां येतें. मुंबईच्या चाळींतून ते मराठे म्हणून वावरतात. नांवें बदलून त्यांची टोळी शहरांत पुष्कळ दिवस राहते, व त्यांच्या बायकाही त्यांच्याकडे येतात. तेथून पुरुष रेल्वेनें लांबवर यात्रा वगैरे ठिकाणीं चोऱ्या करण्याला मधून मधून जातात; आणि धंद्याच्या अभावामुळें व त्यांच्या संशयी हालचालीमुळें त्यांच्याबद्दल पुसतपास सुरू झाला कीं, ते लागलीच नाहींसे होतात. कधीं कधीं एकजण साधु किंवा वैद्य बनतो, व टोळींतले इतर लोक त्याचे चेले बनतात, आणि लोकांना भोंदवितात. विजापूरकडील घंटीचोर मध्यप्रांतांत आपणाला कंग्रवाला ह्मणवितात.

**गुन्हेः**– गर्दींत उचलेगिरी व रेल्वेवर चोरी हा ह्या जातीचा मुख्य धंदा होय. अलीकडे बारा किंवा अधिकजणांच्या टोळ्या करून ते जबरीच्या चोऱ्या व घरफोडी करूं लागले आहेत. त्यांच्या बायकाही बाजार, देवळें, यात्रा, आगगाडींत बायकांचे डबे वगैरे ठिकाणीं चोऱ्या

करतात. पण त्या पुरुषाइतक्या लांब प्रवास करीत नाहींत. टोळ्या करून जबरीच्या चोऱ्या, दिवसां अगर रात्रीं घरफोडी, चोरीचा माल घेणाराला घुलावून एकांतस्थळीं नेवून ठकविणें वगैरे गुन्हे कर्नाटकांतले घंटी चोर करतात. त्यांचेजवळ एकदां ४००० रुपयांचा दरोड्यांतला माल मिळाला. सोन्याच्या मण्यामोहराऐवजीं पितळेच्या मोहरामणी ते गिऱ्हाइकाच्या माथीं मारतात ह्याला ' रामथडी ' ह्मणतात.

**गुन्ह्याची पद्धतिः**—ते मुलांना लहानपणींच जोडे, नारळ, वगैरे पळविण्याला शिकवितात, आणि त्यांना हें बरोबर करतां आलें नाहीं तर यथेच्छ बडवितात. भामट्यांचीं पोरें मुलांच्या अंगावरील दागिने लांबविण्यांत पटाईत असतात. खुर्दी, खाऊ, किंवा दोरा बांधलेल्या भुरंग्या मुलांना दाखवून त्यांना बाळभामटे एकांतस्थळीं चाळवीत नेतात, आणि तेथें त्यांचे दागिने काढून घेतात. चोरी कोठें करावयाची ह्याची माहिती मिळविण्याचे कामीं भामटे आपल्या पोरांची व बायकांची योजना करतात. त्यांचे घरफोडीसंबंधानें लिहिण्यासारखें कांहीं विशेष नाहीं. दोन, चार किंवा पांच भामटे एक होऊन कृष्णपक्षांत बगली पद्धतीनें गांवकुसाजवळील घरांत घरफोडी करतात. टोळीच्या नायकाला ' रंगटेड ' ह्मणतात, व त्याचा वांटा मोठा असतो. त्याचें काम घरांत शिरून माल काढणें हें होय. बाहेर राहिलेले इसम दगड घेऊन पाळत करतात. रंगटेडाची घरांतून सुटका करणें झाल्यास किंवा पाठलाग करणारांना पिटाळणें झाल्यास भामटे दगड मारतात, एरव्हीं मारीत नाहींत. त्यांची रस्तालूट करण्याची पद्धत पुढें लिहिल्याप्रमाणें आहेः भाटांचा ( जोशी ) वेष घेऊन भामट्यांची टोळी एखाद्या यात्रेला किंवा बाजाराला जाते. तेथें धनाढ्य इसमांला कोठें जावयाचें वगैरे माहिती काढून, रस्त्यावर सोईस्कर जागीं ते दबा धरून बसतात व त्यांना लुटतात. ह्याच वेषानें ते खेड्यापाड्याला जातात व गांवच्या एखाद्या वाचाळ मुलाला गांठून तेथील श्रीमंत गृहस्थांची व त्यांच्या कुटुंबांत घडलेल्या गोष्टींची माहिती त्याज-

कडून मिळवितात. पुढें त्या गृहस्थांकडे जाऊन त्यांना त्या गोष्टी सांगितल्या म्हणजे ज्योतिष्यावर त्यांचा विश्वास बसतो. मग मूल होण्यासाठीं किंवा दुसऱ्या एखाद्या इष्ट सिद्धीसाठीं कांहीं साधन करावयास सांगतात. साधन करण्यासाठीं बायका त्यांना दागदागिने देतात. ह्या वेषामुळें त्यांना घरें धुंडाळून चीजवस्त कोठें ठेविली आहे तें पाहण्याचीही संधि मिळून सवडीप्रमाणें चोऱ्या करतां येतात. घरून आठ किंवा दहा भामटे निघतात आणि एखाद्या मध्य ठिकाणाहून लहान लहान टोळ्या करून चोऱ्या करतात. ते आपणांला मराठे ह्मणवितात आणि आपल्या किंवा आपल्या सोबत्यांच्या नांवागांवांचा थांग लागूं देत नाहींत. यात्रा, धर्मशाळा, स्टेशन, वगैरे गर्दीच्या ठिकाणीं त्यांच्या टोळींत दोन ते चार असामी व एक मुलगा असतो. इशारती करणें, खुद्द उचल्यावरून इतरांचें लक्ष उडविणें वगैरे कामीं त्या पोराचा उपयोग होतो. एकजण दागिना काढून घेतो, किंवा खिसा कातरतो अगर गर्दींत एखाद्या इसमाला रेंटून त्याचा जिन्नस हिसकतो. त्याचे साथीदार बायका व पुरुष जवळपास असतात, ते तो जिन्नस हातोहातीं लांबवितात. मग उचल्या सांपडला तरी त्याच्याजवळ कांहीं नसतें आणि तोच उलट शिव्या शाप देऊन कांगावा करतो. उशाला गांठोडें घेऊन एखादा इसम निजला ह्मणजे भामटा त्याच्या पायाला कांहीं टोंचतो. काय चावलें हें पहाण्यासाठीं तो उठला कीं, दुसरा त्याचें गांठोडें पळवितो. गांठोडें पुढें घेऊन एखादी बाई बसली म्हणजे एकजण तिच्यासमोर लघवीला बसतो; कीं ती तोंड फिरविते आणि लागलेंच दुसरा तिचें गांठोडें लांबवितो. एखाद्या पैसेवाल्या गृहस्थाच्या जवळपास भामटे आपल्या पोराला खूप बदाडतात. तें पोर रडत ओरडत त्या गृहस्थाकडे धूम ठोकतें. तो त्याला समजविण्यांत गुंतला असतां त्याचा माल ते घेऊन जातात आणि एकजण येऊन त्या पोरालाही घेऊन जातो. दिसण्यांत व वजनांत सराफाच्या थैलीसारखी आहे अशा एखाद्या थैलींत दगड किंवा चुर्दा भरून ती

सराफाच्या दुकानीं टाकून तिच्या ऐवजीं सराफाची रुपयांची थैली हातचलाखीनें भामटे उपटतात. रेल्वेवर ते बहुधा दोघे तिघे मिळून वेटिंगरूम अगर तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत चोऱ्या करतात. पोतें किंवा कापडी पाकीट बरोबर घेऊन पोलीसच्या हातीं न लागावें ह्मणून ते जवळचें अगर लांबचें तिकिट काढतात. ज्या उतारूच्या पाकिटांत मौल्यवान् जिनसा असण्याचा संभव दिसतो त्यांच्या डब्यांत ते बसतात, व ते कोठें जाणार वगैरे विचारून घेतात. डब्यांतले लोक लवंडले ह्मणजे एकजण मोठें पांघरूण घेऊन बांकाखालीं निजतो. दुसरा समोरच्या बांकावर पाय ताणून वर मोठें पांघरूण घेतो, तें असें कीं, खालचा माणूसही झांकला जातो. सर्व सामसूम झालें ह्मणजे खालचा इसम अगोदर टेहाळलेलें पोतें अगर पाकीट चापसतो. त्यांत हात न गेला तर तोंडांतला वांकडा लहान चाकू (वाघनख) काढून त्यानें तें पुरतें उसवितो, आणि त्यांतला माल काढून घेऊन वेळ सांपडल्यास तें पुनः शिवून टाकतो. किंवा असें न करतां, आपलें पोतें अगर पाकीट ठेवून रोंखलेलें पोतें अगर पाकीट उचलतो. चोरलेला माल आपल्या सोबत्याजवळ देऊन दोघेजण पुढच्या स्टेशनावर उतरतात, किंवा दुसऱ्या डब्यांत जातात. चोरीचा बोभाटा झाल्यास खिडकीवाटे माल टाकून देऊन पुनः त्या ठिकाणीं येऊन ते तो घेऊन जातात. एखाद्या वेळेला गर्दींत उतारूंचे खिसे ते कातरतात. एखाद्या उतारूनें बांकावर आपलें पाकीट ठेविलें तर त्याच्या पलीकडे भामटे बसून झोंपेचें सोंग आणून हातानें त्या पाकिटाची व्यवस्था लावतात. शेजारचा उतारू पेंगूं लागला तर भामटे चटकन् त्याला निजावयाला जागा देऊन, त्याचें सामान बांकाखालीं असेल तेथें आपण निजून, त्याजवर उपकाराचें ओझें लादून आपलें काम साधतात. निसटण्यापूर्वी पकडलें तर भामटे वर्दळीवर येऊन निरपराधीपणाचा आव आणतात, आणि आपली सुटका करून घेतात. स्टेशन पोलीस वरिष्ठाकडे तार करण्यांत गुंतलेलें पाहून ते गुंगारा द्यावयाला कमी करीत नाहींत. गाडींत

साधलें नाहीं तर हेरलेल्या उतारूमागें ते धर्मशाळेंत जाऊन संधि साधून चोरी करतात. ते रात्रीं दुसऱ्या किंवा पहिल्या वर्गाच्या डब्यांतून थैल्या लांबवितात. सन १८९८ सालीं नामदार गव्हर्नरसाहेबांच्या डब्यांत भामट्यांनीं चोरी केली, आणि कित्येक महिनेपर्यंत चोरीचा पत्ता लागला नाहीं. भामटे उलट बाजूनें किंवा चालत्या गाडींतून उतरतात. गाडी चालू असतां ते पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत पायफळीवरून चालत जाऊन चोरी करतात.

गांवाबाहेर ओसाड ठिकाणीं ते चोरीचा माल घेणाराला घुलावून नेतात, आणि खरे दागिने दाखवून किंमत ठरवितात. पुढें पैसे मोजणें चाललें असतां त्यांतलाच एकजण पोलिसचें सोंग करून तेथें येतोसा दिसतो. तेव्हां धांदल उडून माल घेणाराच्या पदरांत खोटे दागिने ते टाकतात, आणि सर्व जण बाल्या हांकतात. कधीं कधीं माल घेणाराला कांहीं एक न देतां त्यापासून जबरीनें ते पैसे उपटतात. भामट्यांच्या तळाचा झाडा घेण्यासाठीं पोलिसानें पुरेसे लोक बरोबर न्यावेत. कारण भामट्यांचे लोक जास्त असले तर ते स्त्रीपुरुष मिळून पोलिसांवर हल्ला करून त्यांना पिटाळून लावितात.

**गुन्ह्यांचीं उपकरणें:**— उलथणें, पळी आणि मोठी अणीदार सुरी ह्यांनीं ते घरफोडी करतात. आंकडा, कोरणें, अडकित्ता व किंकरें ह्यांनीं ते कुलुपें तोडतात व पेट्या फोडतात. उल्मुख किंवा वाघनख नांवाचा कोयत्यासारखा लहान चाकू पुरुष नेहमीं वरचा ओंठ आणि दाढ ह्यांच्यामध्यें किंवा घशांत आणि बायका बुचड्यांत किंवा चोळीच्या खिशांत ठेवितात. साधे चाकू ते तपकिरीच्या किंवा चुन्याच्या डबींत ठेवितात. वाघनख, साधे चाकू, कातरी व भिंग ह्यांनीं ते खिसे, पोतीं व थैल्या फाडतात. किल्ल्यांचा जुडगा, सुईदोरा, छत्री, वेष पालटण्याचें सामान भरलेलें एक, उचललेल्या पाकिटाबद्दल ठेवण्यासाठीं रद्दी सामानानें भरलेलें दुसरें पाकीट वगैरे जिनसा त्यांच्याजवळ असतात. स्टेशनांचीं नांवें मराठींत टिपलेलीं असा एक नकाशा एका भामट्याजवळ सांपडला.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**– चोरी करून भामटे परत आले ह्मणजे ते जातीच्या पाटलाला ( थलमड ) रुपयांत दोन आणे देतात. त्यांतून तो गांवकामगारांची तोंडदाबी करतो. चोरीचा माल ते बहुधा आपल्या तळाजवळ पुरून ठेवितात, आणि त्याचा बोभाटा ऐकूं येईनासा झाला ह्मणजे तो आंखबंद किंवा थोडा थोडा, संभावित दिसणारे सोनार, मारवाडी, कलाल, ह्यांना विकतात. या प्रांतांतला माल त्या प्रांतांत ते लख्ख उघड रीतीनें विकतात. कधीं कधीं चोरीच्या मालाचें पार्सल ते आपल्या नातलगाकडे घरीं पाठवितात. पण बहुधा त्याचे टक्के करून मनिऑर्डरी करतात. मनिआर्डरी व पार्सलें पूर्वसंकेताप्रमाणें खोट्या नांवावर असतात. कित्येक वेळां तीं पाटलाच्या किंवा सावकाराच्या नांवांनीं असतात. लहान लहान दागिने अंगावर लपविण्यांत भामटे व त्यांच्या बायका फार हुशार असतात. लहान नाणीं कधीं कधीं त्यांच्या घशांत सांपडतात; कधीं कधीं ते तीं गिळून टाकतात. त्यांच्या घरांतल्या तुळया व जोडभिंतीमधल्या जागेंतही माल सांपडला आहे. सबब त्यांच्या बिऱ्हाडाचे कोनेकोंपरे हुडकले पाहिजेत, आणि संशयास्पद जमिनी भिंती खांदल्या पाहिजेत. भामट्यांच्या वस्तीच्या गांवकामगारांची त्यांच्यांशीं पाती असते असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

---

## रजपूत भामटे.

**संज्ञाः**– ह्यांना परदेशी भामटे ह्मणतात. भोपाळ आणि बुंदेलखंडांतील ‘ सोनोरिया ’ जातीच्या दिवसां चोरी करणाऱ्या भामट्यांचे हे वंशज आहेत. निजामशाहींतल्या एदलाबादचे जोवारी भामटे आणि हे एकच असावेत.

**वस्तिः**– जतसंस्थान, सोलापूर व अहमदनगर जिल्हे आणि निजामशाहींत उस्मानाबाद जिल्हा येथें हे लोक आढळतात. त्यांच्या वस्तीचीं

गांवें अहमदनगर जिल्ह्यांत जामखेड तालुक्यांत खर्डे व त्याच्या वाड्या दरडवाडी, गिटेवाडी, पंढरीची वाडी आणि बळगव्हाणची खंडवाडी; सोलापूर जिल्ह्यांत सांगोलें तालुक्यांत सोनंद, परे, हिंगर्गी व नरळ.

**गुन्ह्याचें क्षेत्रः**– हे लोक सर्व हिंदुस्थानभर व विशेषतः मद्रास इलाख्यांत फिरतात, आणि बायकांसह कार्तिकस्वामी, हंपी, गोकर्णमहाबळेश्वरच्या यात्रांना गुन्ह्यासाठीं जातात.

**लोकसंख्याः**– अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यांत त्यांचे सुमारें दोनशें लोक आहेत.

**स्वरूपः**– बहुतेक निमगोरे किंवा फिक्कट व कांहीं थोडे काळे असतात, त्यांचा पोषाख मराठ्यासारखा असून ते जानवीं घालतात, व कानांत कुंडलें घालतात. बायका नाक टोंचीत नाहींत, व डोळ्यापाशीं गोंधीत नाहींत. कुमारिका तांबड्या पोतीच्या एका सरामध्यें सोन्याचा एक मणी घालतात. सुवासिनी स्त्रिया काळ्या पोतीचे दोन सर आणि मध्यें एक सोन्याची ताली गळ्यांत घालतात. त्या ब्राह्मणासारखें लुगडें नेसतात, पण पुढच्या निऱ्या मोकळ्या सोडतात. रजपूत भामटे बडे दारूबाज व अफूबाज असतात; आणि गुंगले ह्मणजे खूप बकतात.

**भाषाः**– आपसांत ते हिंदुस्थानी बोलतात. ते मराठी, कानडी व तेलगु न अडखळतां बोलतात, आणि 'च'चा उच्चार ' च्य ' करतात.

## सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| थालीय ... ... | फौजदार. |
| पोंदड ... ... | पोलीस. |
| कपप्या ... ... | पाटील. |
| चेरकलीन ... | कुळकर्णी. |
| कुकड ... ... | जागल्या. |
| वटमल ... ... | मराठा. |
| डोकरा ... ... | म्हातारा पुरुष. |
| डोकरी ... ... | म्हातारी बायको. |
| छावा ... ... | मूल. |
| घभा ... ... | घर. |
| घबेकू चेडै ...<br>पोंदड ऐछे ... | पोलीस आले. |
| धोती उधय ... | टोळीचें काम सुरू झालें. |

**उपजीविकेचीं बाह्य साधनें**:– पुष्कळ रजपूत भामट्यांना जमीन असते. पण ते ती खंडानें लावितात. पुरुष बहुधा गांवीं नसतात. बायका घरीं शेतकाम करतात.

**वेषांतर**:– रजपूत भामटे यात्रेला जातात तेव्हां ते साधूंचा किंवा बैराग्यांचा वेष घेतात,आणि आपल्या नांवापुढें दास किंवा सिंग लावितात. रेल्वेवर चोरी करतात तेव्हां ते मारवाडी किंवा ब्राह्मणांप्रमाणें पोषाख करतात. मुलूखगिरीला निघाले ह्मणजे ते गांवाबाहेर मैदानांत राहतात. त्यांना पालें नसतात.

**गुन्हे**:– ते बहुशा दिवसां आगगाडींत, यात्रेंत किंवा गर्दींत चोरी करतात. रात्रीं चोरी करणारांना त्यांच्यांत जातीबाहेर टाकतात.

**गुन्ह्याची पद्धति**:– त्यांच्या टोळींत तिघेजण असतात. ज्याची चोरी करावयाची त्याचें लक्ष एकजण वेधतो, दुसरा चोरी करतो, आणि तिसरा ऐवज घेऊन धूम ठोकतो. मुलाच्या अंगावरचें जवाहीर काढण्यांत आणि खिसे कातरण्यांत त्यांचा हात खंडा आहे. नदीकांठावर हिंडून ते स्नान करणारांचे कपडे चोरतात. खर्ची उडाली ह्मणजे ते एखाद्याचे घरीं नौकरी पतकरतात, आणि तेथें स्वतः चोरी करून पळून जातात; किंवा साधूच्या वेषानें खेपा घालणाऱ्या आपल्या जोडीदाराचे हवालीं आपल्या मालकाच्या जिनसा करतात. चोरी करतांना ते तोंडावरून धोतर घोंगटून घेतात.

**गुन्ह्याचीं हत्यारें**:– त्यांचेजवळ चाकू, कातरी, कांचेचा तुकडा आणि वेष पालटण्याचें सामान असतें.

**चोरीचे मालाची निर्गति**:– बोभाटा मिटेपर्यंत ते चोरीचा माल तळाच्या आसपास पुरून ठेवितात आणि टोळीच्या पुढें तो रवाना करतात. जवाहीर होईल तितकें लवकर ते विकतात. चोरलेला माल ते अगदीं थोड्या किंमतीला विकून पैसे मनीऑर्डरीनें घरीं पाठवितात. भारी किमतीचा माल ते पार्सलानें घरीं पाठवितात.

# भिल.

**संज्ञा**:– खानदेश आणि दक्षिणेंत रहाणारे भिलांचे तीन वर्ग पडतील. सपाटीवरचे, डोंगरी व जंगली, आणि मिश्र जातीचे भिल. सपाटीवरच्या भिलांना खानदेशांत खोटिल ह्मणतात. डोंगरी व जंगली भिलांच्या येणें-प्रमाणें जाती आहेतः—नहाल, पावरे, बर्डे, धानके, धोरेपी, मठवाडी किंवा पनारी, मावची, वार्ली आणि डांगची. मिश्र जातीच्या भिलांच्या येणें-प्रमाणें जाती आहेतः—भिलाले ( भिल व रजपूत यांचें मिश्रण ) आणि तडवी किंवा निर्ढी ( मुसलमान भिल ). रेवाकांठा, महीकांठा, मोडासा, झालोड येथें वागडिये भिल आहेत.

**वस्तिः**– ह्यांचा भरणा मध्य हिंदुस्थान, राजपुताना, गुजराथ आणि खानदेश येथें आहे. उत्तरेस ते संयुक्त प्रांतांत आढळतात, आणि दक्षि-णेंत ते अहमदनगर, नाशिक व तुरळक पुणें जिल्ह्यांत सांपडतात. काठे-वाड, कच्छ व सिंधमध्यें थर, पारकर येथें त्यांची वस्ति आहे. भिल-वाड्याला भिल्हाटी ह्मणतात.

**गुन्ह्याचें क्षेत्रः**– ही जात फिरस्ती नाहीं. ते भले घरकोंबडे आहेत. ते आपले तालुक्यांत किंवा त्याचे आजूबाजूला गुन्हे करतात. पण जेव्हां ते व्यक्तिशः किंवा टोळी जमून बंड करतात तेव्हां ते मुलूखभर धुमाकूळ माजवितात, आणि लांबवर गुन्हे करतात किंवा पळ काढतात.

**लोकसंख्याः**– भिल सुमारें पावणेसहा लक्ष आहेत.

**स्वरूपः**– सामान्यतः भिल आळशी, दारूबाज, व्यभिचारी, बेफिकीर, डौली, उधळे, भोळे, सच्चे आणि आनंदी असतात. त्यांचा चेटकावर इतका विश्वास असतो कीं, कोणत्याही प्रकारचें संकट ओढवलें तरी, त्यांची धांव चेटकाकडे. त्यांच्या आपसांतल्या लठ्ठालठ्ठीच्या गुन्ह्याचे

मुलाशीं हाच विश्वास असतो. ते गलिच्छ दिसतात व राहतात. त्यांच्या ज्ञातीचा आळा इतका पक्का असतो कीं एकमेकांविरुद्ध बातमी देऊन ते घरभेद सहसा करीत नाहींत. त्यांना मासे धरण्याचा व शिकारीचा नाद असतो. त्यांना अब्रु झांकावयापुरतें वस्त्रप्रावर्ण असतें. त्यांचा वर्ण काळा, नाक बसकें, आणि तोंडवळा वाटोळा व उथळ असतो. ते कंटक, चपळ, कसलेले, मध्यम उंचीचे व श्रमसहिष्णु असून त्यांची नजर तीक्ष्ण असते. गुन्ह्याचे कामीं त्यांना बायकांची मदत असते. गुडघ्यापर्यंत धोतर अगर लंगोटी, अंगांत बंडी किंवा चवाळें हा पुरुषांचा पोषाख होय. गुजराथेंत त्यांच्या डोक्याला टोपी किंवा अपरा फेटा असतो, व मनगटावर डागल्याचे वण असतात. भिल्लिणी दाक्षिणेंत लुगडें-चोळी नेसतात, आणि गळ्यांत शिंपा व पोत यांचीं तंग पेंडीं घालतात. खानदेशांत कोठें कोठें त्या गुडघ्यापासून घोट्यापर्यंत पितळेचे वाळे घालतात. गुजराथेंतल्या भिल्लिणी साडी, बंडी व काचोळी नेसतात. त्या साडी डोक्यावरून घेतात, त्यामुळें पोटऱ्या उघड्या राहतात. बोर, राखडी हे त्यांचे दागिने होत. त्या कानामध्यें धातूच्या किंवा लांकडाच्या बाळ्या व वेल घालतात, नाकांत नथा घालतात. गळ्यांत कांच, शिंपा किंवा फत्तर वगैरेंच्या मण्यांच्या गळसऱ्या घालतात, हातभर गोठ व पायभर वाळे घालतात, आणि हातांवर पुष्कळसें व छाती—तोंडावर थोडेंसें गोंधतात. खानदेशांतले भिल हातावर व भिंवयांच्या मधोमध गोंधतात. भिलांचें खानदेशांत मुख्य दैवत वाघदेव आणि गुजराथेंत देवी होय. "बाराबीज"च्या शपथेला गुजराथी भिल फार मानतात.

**भाषाः—** भिलोरी भाषा हिंदुस्थानी, मराठी आणि गुजराथी यांपासून निघाली आहे. गुजराथ—काठेवाडांतले कांहीं भिल मारवाडी बोलतात.

**सांकेतिक भाषाः—** ते आपला हेतु अंगविक्षेपानें एकमेकांना कळवितात. खानदेशांत दरोड्याला 'वाटपाडी' पंचमहालमध्यें पोलिसला 'कागडा' अगर 'तरकड्डू' तिरकामटच्याला 'हरिओ कामटो' ह्मणतात.

**उपजीविकेचीं दर्शनीं साधनें:-** डिंक, मध, गवत,काथ, मोहाचीं फुलें विकणें, झाडांची तोड करून कोळसे पाडणें, आणि नागली, वरी-सारखीं धान्यें व इतर शेतकामें यांवर जंगली भिल्ल आपली उपजीविका करतात. सपाटीवरचे भिल्ल शेती व शेतकाम, जागलकी, सुतारकी, लोहारकी करतात. कांहींजण पोलीस, फॉरेस्ट, रेल्वे, गिरण्या यांमध्यें नोकरी पतकरतात. कांहीं थोडे गाड्या हांकतात व टोपल्या विणतात. शिकार करण्यांत व शिकारीचा माग काढण्याचे कामांत भिल्लांचा हात धरणारी दुसरी कोणतीही जात नाहीं.

**वेषांतर:-** गुन्हे करावयास निघाले ह्मणजे भिल्ल फॉरेस्ट अथवा पोलि-सचे शिपायाप्रमाणें खाकी किंवा काळे डगले घालतात. मोठ्या गुन्ह्याचे वेळीं ते धाटे बांधतात, व राख किंवा माती तोंडाला फांसतात. कित्येक वेळां भिल्लिणी पुरुषाचे वेषांत फरारी भिल्लांबरोबर हिंडतात.

**गुन्हे:-** दुष्काळ पडला, सावकारांनीं निकड लाविली आणि एखादा नाईक पुढें सरसावला ह्मणजे ते बंड करून दूरवर लूटमार करतात, एरव्हीं ते लहानसान चोऱ्या करतात. आपसांतल्या आकसामुळें किंवा चेटकाचे संशयामुळें ते क्वचित् खूनही करतात. भिल्लांमध्यें खोटील आणि तडवी हे अट्टल गुन्हेगार असतात. बहुतेक फरारी याच जातींतले निघाले. भिल्ल लोकांचे मुख्य गुन्हे ह्मटले ह्मणजे बाजारकऱ्यांवर दरोडे घालणें आणि रस्तालूट हे होत. सपाटीवर राहणारे भिल्ल व धानके घरफोडी व चोऱ्या करतात, आणि दुष्काळांत रेल्वेच्या मालगाड्या लुटतात. तडवी भिल्ल घरफोड्या व पिकांची चोरी करतात. खानदेशांतले भिल्ल दरोडे घालतात आणि चोरीचा माल सामलतींतल्या रोहिले, पठाणांना विकतात. माचवी चोरून दारू गाळतात आणि चेटकी ह्मणून एखाद्या बाईचा खून करतात. अहमदनगरकडील भिल्ल दरोडे, घरफोड्या, रस्तालूट व चोऱ्या करतात. आणि प्रसंगविशेषीं बंडही करतात. गुजराथेंतले भिल्ल दरोडे, घरफोड्या व चोऱ्या करतात, आणि पिकें व जनावरें ह्यांच्याही चोऱ्या करतात.

**गुन्ह्याची पद्धतिः—** जें घर फोडावयाचें तें कोठें आहे, त्याच्या आसपास काय काय आहे, त्यांत माल किती मिळेल, अडथळा किती होईल वगैरेसंबंधानें माहिती भिल्ल लोक गुन्हा करण्यापूर्वी मिळवितात. आपला माग लागूं नये ह्मणून गुन्हा करून परत येतांना ते टोळी फोडून निरनिराळ्या रस्त्यांनीं सखल जमिनीवरून जाऊन संकेतस्थानीं (चोरीच्या ठिकाणापासून संकेतस्थान एक मैलावर असतें) गोळा होतात. बंडखोर भिल्ल माग न लागूं देण्याची इतकी पर्वा करीत नाहींत. बंडखोरांची टोळी मोठी असल्यामुळें ती कोणाच्या न कोणाच्या तरी दृष्टीस पडावयाची, व ती जातांना रस्त्यावर कांहीं तरी सामान पडावयाचें. जरब देणें आणि जबरदस्तीनें अडथळा मोडणें हीं भिल्लांच्या गुन्ह्याचीं मुख्य चिन्हें होत. दुष्काळामुळें खाण्याची तुटार, सूड, देणें नसतां पैशाचा तगादा, अशा प्रकारच्या कारणांसाठीं भिल्लांनीं सावकारांच्या घरांवर मोठमोठे दरोडे घालून, रोखे फाडून, सावकारांना व त्यांच्या माणसांना पुष्कळदां बेदम ठोकल्याचीं उदाहरणें आहेत. क्वचित् प्रसंगीं त्यांनीं जीवही घेतले आहेत. त्यांचे नाईक वजनदार गुजर, रजपूत, रोहिले, पाटील व कलाल यांच्याशीं वळण बांधतात. आसपासच्या गांवांतील लुटण्याजोग्या घरासंबंधानें हे लोक त्यांना बातमी देतात, इतकेंच नव्हे तर खाणेंपिणें, आडोसा वगैरे हरतऱ्हेची मदतही देतात. ज्या गांवांत त्यांचे स्नेही असतात, तेथून पांच सहा मैल लांब अशा एखाद्या टेंकडीवर भिल्लांची टोळी तळ देते. स्वयंपाक करण्यासाठीं त्यांच्याबरोबर त्यांच्या बायका अथवा रखेल्या औरता असतात. एखाद्या अडचणीच्या ठिकाणीं येऊन पडले ह्मणजे ते फार सावध राहतात, आणि जलद जलद तळ बदलतात. खाण्याची भ्रांति पडली ह्मणजे त्यांना छपून राहणें मुष्किलीचें होतें, आणि मग ते तेव्हांच सांपडतात. भिल्लांना चांगलें निशाण मारतां येत नाहीं, ह्मणून ते सामना न देतां हत्यारें टाकून पळ काढतात. त्यांजवर हल्ला केला असतां ते मोठ्या धैर्यानें तोंड देतात. ते चपळ व कंटक असतात, आणि जंगलचे रस्ते व टेंकड्या यांची त्यांना पुरी माहिती

असते. त्यामुळें ते बहुधा हातीं लागत नाहींत. त्यांचा पत्ता त्यांच्या जातींतल्या बातमीदारांकडून लागतो. ज्या आप्ताच्या घरीं ते नेहमीं जातात, त्यावर किंवा दारूदुकानावरही पाळथ ठेवून त्यांचा पत्ता लागतो. आश्रय देणारे लोक त्यांना दारू पोंचवितात, किंवा ती आणण्याला त्यांच्या बायका येतात. लग्नाच्या जेवणावळींत फरारी भिल्ल बहुधा हजर असावयाचा. भिल्लिणी फरारी भिल्लावर इतक्या आषक होतात कीं नवरा सोडून त्याचे मागें जातात. ह्मणून जंगलांत जाणाऱ्या येणाऱ्या तरुण भिल्लिणींवरही नजर ठेवावी. त्या टोळीच्या हेरांचें काम अगदीं बित्तं करतात. गुन्ह्यांच्या कामीं भिल्ल इतर जातीचे लोक सामील करतात, आणि तेही दुसऱ्या जातीच्या गुन्हे करणारांला जाऊन मिळतात. ते बहुधा एका रस्त्यावर दोन तीन घरांवर दरोडा घालतात. गुन्हा करतांना ते हिंदुस्थानी बोलतात, व एकमेकांना फौजदार, जमादार ह्मणतात. ते बगली पद्धतीनें चौकटीजवळ भोंक पाडून, किंवा रुमाली पद्धतीनें भिंतीस धावें पाडून घरफोडी करतात, आणि जें हातीं लागेल तें नेतात. ते पेट्या उचलून नेतात व नंतर शोधतात.

गुजराथेंतले भिल्ल दहा ते वीसजण मिळून रस्तालूट करतात. त्यांच्याजवळ तीरकमटे, ढाली, तलवारी, काठ्या आणि कधीं कधीं बंदुकाही असतात. ते दारू झोंकून गुन्ह्याला निघतात. टोळीपैकीं एकदोघे झाडावर बसतात, आणि बाकीचे झाडींत दडतात. झाडावरच्या हेरांनीं इशारत दिली ह्मणजे ते बाहेर पडतात व पहिल्यानें धोंडे फेंकतात, आणि मग गाड्यांवर व वाटसरांवर येऊन पडतात. ते बैल सोडून देऊन गाड्या लुटतात, व आंतल्या लोकांस मारहाण करून त्यांच्याजवळ असेल नसेल त्याची झडती घेतात आणि तें व बैलही घेऊन निघून जातात. ते गुरखी पोरांना पकडून त्यांचे डोळे बांधतात किंवा कधीं कधीं त्यांचे हातपाय बांधतात, आणि त्यांचीं गुरें हांकून नेतात. दुपारीं अगर तिसरे प्रहरीं गुरें पाण्यावर नेण्यासाठीं गोळा करतात त्या वेळीं ते हें काम करतात. गुजराथी भिल्ल बहुधा कच्च्या घरांत चोरी किंवा घरफोडी करतात.

**गुन्ह्याचीं उपकरणें:**– गुन्हा करण्यास निघाले म्हणजे खानदेश, दक्षिणचे भिल्लांजवळ धनुष्यबाण, हातोडे,–काठ्या, गोफणी(गलूल), तलवारी (खऱ्या, नकली), भाले, बंदुका असतात. पंचमहाल, रेवाकांठ्यामधील भिल्ल धनुष्यबाण घेऊन बाहेर पडतात. बालाभ्यासामुळें त्यांना निशाण चांगलें मारतां येतें. रस्तालूट वगैरे गुन्हे करणाऱ्या टोळीजवळ ढाल, तलवार, बंदूक, काठ्या असतात. पहार किंवा कनथोडा ( मोठा लोखंडी खिळा ) हीं खानदेशी व दाक्षिणी भिल्लांचीं घरफोडीचीं हत्यारें होत. पालनपुरचे भिल्ल खातरीया (मोठी आंकडी) चा उपयोग करतात.

**चोरीचे मालाची निर्गतिः**– भिलांमध्यें जें ज्याला सांपडेल तें तो ठेवितो. पण बहुधा नाइकाला दोन वांटे मिळतात. चोरीचा माल आधीं पुरून ठेवितात, किंवा दडवून ठेवितात,आणि मग गुजर, रजपूत, ठाकूर, गांवकामगार यांना विकतात. खिसा गरम असला म्हणजे भिल्लांचा हात फार ढिला असतो. बाजरीच्या एका भाकरीला रुपया, दारूच्या तीन बाटल्यांना पंधरा रुपयांचें कडें भिलांनीं दिल्याचे दाखले मिळतात. चोरीचा माल उकिरड्यांत, वळहयींत किंवा माळ्यांत ते लपवून ठेवितात. भिल्लांच्या घराचा झाडा घेतांना उतरंडी, जातीं, चुलीखालची जागा यांकडे विशेष लक्ष्य द्यावें. एखाद्या वेळेला चोरीचे दागिने ते टोळींतल्या बायकांना घालावयास देतात. चोरलेलीं जनावरें ते लांबच्या बाजारांत विकतात, किंवा स्नेह्यांना अगर नातलगांना देतात आणि ते त्यांचीं शिंगें कापून व त्यांना डागून त्यांचें रूप पालटतात.

---

## छप्परबंद.

**संज्ञा:**– ह्यांना नाणीं पाडणारे फकीर ह्मणतात. आपापसांत ते आपल्याला भदू ह्मणतात, आणि उत्तरेकडे त्यांना खुलसूर्ये (खोटीं नाणीं करणारा) ह्मणतात. त्यांच्यांत दोन पोटजाती आहेत, बारागुंडे आणि

छेगुंडे. बारागुंडे लग्नापूर्वी नवरीचे बापाला बारा होन देतात. छेगुंडे सहा देतात. दोन्ही जातींचा रोटीव्यवहार आहे, पण बेटीव्यवहार नाहीं. संयुक्त प्रांतांतल्या मुजफरनगर जिल्ह्यांत रेंड किंवा बलुची नांवाची जात आहे. ते लोकही छप्परबंदाप्रमाणें आपल्या नांवापुढें 'शाह' लावितात, वर्षानुवर्षे देशांतर करतात, व खोटच्या नाण्याचा धंदा करितात. पण ही जात अगदीं निराळी आहे.

**वस्तिः**– गुन्हेगार छप्परबंद शेख आहेत, आणि ते विजापूर जिल्ह्यांत बागेवाडी व मुद्देबिहाळ तालुक्यांत रहातात.

**गुन्ह्याचें क्षेत्रः**– ते हिंदुस्थानभर व सिलोनांतही फेऱ्या करितात.

**लोकसंख्याः**–छप्परबंद सुमारें अडीच हजार आहेत.त्यांच्या वस्तीचीं गांवें खालीं दिलीं आहेत.

बागेवाडी तालुकाः– अब्बीहल, अकुलवाडी, अगसबल, अबलनूर, अंगडगेरी, अरेशंकर, बलोटी, बसवंतपूरहट्टी, ब्यल्यल, बीडनल, ब्यकोड, चिरलडिनी, गनी, गोनल, गुडडिन्नी, हलीहाल, हांचीनल, हानगर्गी, हेब्बल, निडगुंडी, हिप्परगी, इबंगी, जायवडगी, जिरलभानवी, कानाल, कंकाल, करीबंटनल, कौलगी, किरसाल, कोडगानूर, मजरे जैनापूर, मन्नूर, मसूती, मुड्डापूर, मुकरटीहल, नागूर, नागवाड, नरसंगी, ओनीभानवी, राजनाल, संकनाल, सिकलवाडी, सलवडगी, तेलगी.

मुद्देबिहाळ तालुक्यांत अलकोपर, बलबट्टी, बलवट, बुडीहाल, गुडडीनी, गुंडकरजगी, हंडेर्गल, ुल्लूर, कालगी, कंडगनूर, कसीनकुंटी, कोप्प, मसूटी, पाडिकनूर, रूडगी, सिदापूर, तारनाळ, वडवडगी, येरझरी.

**स्वरूपः**–छप्परबंद गरीब मुसलमानाप्रमाणें दिसतात, ते सडपातळ, रगदार व खंबीर चालणारे असतात. ते दाढी करीत नाहींत; त्यांची दाढी भरदार व मऊ नसते आणि तिचे केंस मागें पुढें आलेले असतात. पुरुषांचा पोषाख, पेहरण, धोतर व पोकळ पागोटें हीं होत. बायकांचा

पोषाख व राहणी बरीच स्वच्छ असते. त्या हिंदुस्त्रियांप्रमाणें पेहराव करतात व हिंदू आणि मुसलमान ह्या दोन्ही जातींचे दागिने घालतात. सुवासिनी बायका डावे नाकांत रुप्याची नथणी घालतात. बायका पुरुषांबरोबर फेरीला जात नाहींत, पण त्यांचेबद्दल खरी खबरही देत नाहींत. ह्मातारे–कोतारे, दुखणाईत व अजाण मुलें वगळून छप्परबंद हमेशा तीन ते दहाजणांच्या ( क्वचित् तीसजणांच्या ) टोळ्या करून मोहरमनंतर घर सोडतात; व वर्षानें परततात. गांव सोडण्यापूर्वी घरधनी आपल्या कुटुंबाची येणेंप्रमाणें बेगमी करून ठेवतो:–( १ ) ऐपत असल्यास कित्येक महिन्यांची, वेळेवर वर्ष दोन वर्षांची रोख खर्ची आपले माणसांपाशीं ठेवतो. ( २ ) गांवच्या सावकाराला किंवा पाटलाला घरच्या माणसांना खर्चावयास देण्याचें सांगून परत आल्यावर दुणी भरतो. ( ३ ) सहा किंवा आठजणांच्या टोळींत बहुधा एक श्रीमंत असतो. तो आपल्या व आपल्या गरीब साथीदारांच्या कुटुंबांची बेगमी करतो. हें कर्ज फिटेपर्यंत आश्रित छप्परबंद आपली सर्व कमाई त्याला देतात. छप्परबंद फेरी संपवून घरीं आले ह्मणजे खाण्यापिण्याची खूप दंगल व ख्यालबाजी चालते. ते गांवचे पिराला बकऱ्याची कंदुरी करतात व आपल्यावर पांघरूण घालणाऱ्या गांवकामगारांना पानसुपारी देतात. असें ह्मणतात कीं, गांवकामगारांना दर घरीं वर्षासन मिळतें. अक्कलकोट संस्थानांत बोरी नदीचे कांठीं दुधणी गांवाजवळ झिंदशाहमदारची कबर आहे. त्याचे मुजावराला फकिरांचा गुरु ह्मणतात. छप्परबंद त्याला फार मान देतात, व त्याचे दर्शनाला जातात. फकिराच्या वेषानें छप्परबंद सोईप्रमाणें पायीं अगर रेल्वेनें प्रवास करतात. गांवाबाहेर विहिरी, नदी किंवा तळ्याजवळ, अथवा बागेंत, अगर कोणी जात नाहीं अशा दर्ग्यांत किंवा फकिराच्या मकानांत ते उतरतात. एखाद्या मुसलमानानें बोलाविलें तरी त्याच्या घरांत बिऱ्हाड टेंकीत नाहींत. आपले जातींत जरी ते उघडपणें मद्यमांस सेवन करितात तरी मुशाफरींत सात्विक फकिराचा आव घालून ते भिक्षेवर गुजराण करतात.


**भाषाः**–ते हिंदुस्थानी व कानडी बोलतात, व हिंदुस्थानीप्रमाणें त्यांची एक भाषा आहे. तिच्यामध्यें तूंचे जागीं ‘ ते ’ तेराचे जागीं ‘तोरा’ मेराचे जागीं ‘ मोरा ’ वगैरेप्रमाणें बोलतात. जेथें जातात त्या मुलुखाची भाषाही ते जलद उचलतात.

## सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| खागा, खागडा बैठणारा, बैठणेंवाला | टोळीचा नाईक. |
| भोंदर | खोटीं नाणीं चालविणारा. |
| नंदव ... | ... मुलगा. |
| हांडिवल, इंथीलावाला | टोळीबरोबरचा मुलगा. |
| लोंडिया... | ... मुलगी. |
| कुत्ताखपराळा ... | सिपाई. |
| र्‍यंक, हेर ... | मांस. |
| खाम, पाट ... | ठसा. |
| घोटरी, मंडळ ... | टोळी. |
| घोटी ... | ... फेरी. |
| आगु ... | ... खोटा रुपया. |
| ... | ... दारू. |
| खांमुरलो | खोटीं नाणीं करण्याला सुरुवात करणें. |
| तोबगया ... | पोलीसच्या हातावर तुरी दिल्या. |
| तबजो ... | ... पळून जाणें. |
| उपरेल, होगय तेकोलीन, धरलीसई | अटक केली. |
| नरोटी ... | ... पळी. |
| टिक्षी ... | ... भाकर. |

| | |
|---|---|
| गुटारा | टोळींतल्या गरीब छप्परबंदाच्या घरची बेगमी करणारा श्रीमंत छप्परबंद. |
| भात् ... | ... छप्परबंद. |
| नुमता, कजवा | परकी माणूस. |
| रांग ... | ... शिसें. |
| कैन ... | ... कथील. |
| दुमदा, बोना ... | सोनें. |
| चिबडा ... | ... कामगार. |
| बुथानी ... | बायको. |
| फारसी ... | ... सांकेतिक भाषा. |
| बैगी ... | ... सोंग. |
| थैरी ... | ... खरा रुपया. |
| थैरा ... | ... खुर्दा. |
| नैईर ... | ... संकेतस्थान. |
| गिमालो, नुकादेव | लपविणें. |
| कोनसाबे चोलेमत | बोलूं नकोस. |
| जिनीबोले ... | सांगूं नकोस. |
| नैईरबुद्दी | भेटीच्या जागेकडे जा. |
| ... | ... रस्ता. |
| पान | रस्त्यावर केलेल्या निशाण्या. |
| नना ... | ... खेडें. |
| नावडी ... | ... पोलिसचौकी. |

| | | | |
|---|---|---|---|
| रप्पटणी... ... | नाण्यांवरील रेघा पाडण्याची तीक्ष्ण कोरणी. | चिमटी ... ... | सांच्याची माती. |
| | | कुलकुली... ... | ताडी. |
| | | दोंक ... ... | घर. |
| बदलामकराले ... | गुदद्वारांत रुपया लपव. | रेंद ... ... | रस्ता. |

आपण कोणत्या वाटेनें गेलों हें आपल्या साथीदारांना कळविण्यासाठीं ते वाट फुटते अशा रस्त्यांच्या पटाजवळ एक फूट लांब, सहा इंच रुंद व सहा इंच उंच असा मातीचा ढीग करितात; आणि ज्या दिशेनें ते गेले असतील त्या बाजूला त्याचे समोर एक बाण काढतात. सुमारें शंभर यार्डांचे अंतरावर ते असे तीन ढीग घालतात, कां कीं, एखादा बुजला तर बाकीचे तरी शाबूद रहातील. तसेंच रस्त्याच्या कांठावर पाऊल फरपटून ते मातीचे ढीग घालतात. ज्या बाजूला ढीग रुंद, त्या बाजूनें ते गेले असें समजावें. कधीं कधीं गेलेल्या रस्त्याचे बाजूला धुळीमध्यें आंकडीच्या काठीसारखी रेघ काढतात. असल्या रेघेच्या सरळ बाजूकडे ते गेले असें समजावें. जेथें दोन वाटा जातात तेथें एक उभी रेघ व तिच्यावर एक आडवी रेघ काढतात. केव्हां केव्हां ते रस्त्याच्या कडेला, झाडांच्या डहाळ्या दगडाखालीं ठेवितात, तेव्हां जिकडे देंठ असतील तिकडे ते गेले असें समजावें. रस्त्यावर दोन समोरासमोर आंकडीसारख्या रेघा  असल्या ह्मणजे जवळपास छप्परबंद आहेत असें टोळींतून फुटलेल्या लोकांना कळतें.

**उपजीविकेचीं दर्शनीं साधनें**:– हे लोक भिक्षा मागतात, कांहीं शेती व थोडेसे पोस्ट व फॉरेस्ट खात्यांत नौकरी करतात. बायका शेतकाम, चटया, गोधड्या करतात.

**वेषांतर**:–ते घरून नेहमींच्या पोषाखानें निघतात, आणि संकेतस्थानीं फकिरी पोषाख चढवितात. जवळ झोळी, चिमटा, खिस्ता (कटोरी), गळ्यांत माळा, हेल काढून खोल आवाजानें सवाल, आणि दीनवाण्या तोंडानें पुटपुट–ह्मणजे फकिराचें पुरें सोंग बनलें. पकडलें असतां ते न

डगमगतां सांगतात कीं, आम्ही मदारी फकीर आहोंत, व सवाल म्हणून भीक मागतों, किंवा अस्वलें शिकवितों, अथवा गुलबुर्गा, अजमीर, हिमालय वगैरे ठिकाणीं पिराचे दर्शनाला चाललों. दोन किंवा अधिक एकदम पकडले तर जो तो आपापली वेगळी हकीकत सांगतो. ते आपलें नांव, गांव चोरतात, व बहुधा आपल्या ऐवजीं बापाचें नांव सांगतात. परंतु खोटीं नाणीं चालवितांना हातचलाखींत चूक झाली, म्हणजे भ्रमाचा भोंपळा फुटतो. अशा रीतीनें सांपडलेल्या छप्परबंदावर नजर ठेवून त्वरित झाडा घ्यावा म्हणजे टोळींतले बाकीचे इसम हातीं लागतात. मिळाले तितके छप्परबंद सरकारानें हजिरींत घातले आहेत, व त्यांच्या बोटांचे ठसे घेतले आहेत. तत्रापि वहिमी छप्परबंदाबद्दल खात्रीची माहिती मिळविण्यासाठीं मे. पोलीस सुपरिंटेंडेंटसाहेब विजापूर ह्यांचेकडे सदर इसमांचे सहा फोटो पाठवावेत; आणि त्यांच्या बोटांचे ठसे फिंगर प्रिंट ब्यूरोकडे पुणें येथें पाठवावेत.

**गुन्हेः**—सांच्यांचे योगानें खोटे रुपये, अधेल्या, पावल्या, चवल्या पाडणें हा छप्परबंदाचा मुख्य धंदा होय. पण संधि सांपडली तर, सुऱ्या, भांडीं, बूट, कपडे, तट्टें वगैरेची चोरी व ठकबाजीही ते करतात, व निराश्रित बायकामुलें पळवितात. फारच पिच्छा पुरविला तर ते सांगतात कीं, मुलें विकत घेतलीं. असल्या मुलांना ते आपला धंदा शिकवितात, व बायकांना घरीं नेतात. सुमारें पांच सहाजण थाटाचा पोषाख करतात. दोन सारख्या थैल्या तयार करून एकींत थोडेसे उडीद आणि दुसरींत सॉव्हरिनएवढ्या शिशाच्या चकल्या घालतात. नंतर दोघे असामी सॉव्हरिन विकणाऱ्या उदम्याकडे जातात. आणि जितक्या चकल्या असतील तितकेच सॉव्हरिन विकत घेण्याचा सवदा करून, सॉव्हरिन मोजून ते उडीद असलेल्या थैलींत घालतात. आतां पैसे घ्यावयाचे इतक्यांत तिसरा इसम येऊन म्हणतो कीं आधीं धन्याला विचारूं या. आणि ती उडीद सॉव्हरिनची थैली उदम्यापाशीं ठेवून सर्वजण जातात ते लगेच परत-

तात व भावांत कमी करतात. मग तो उदमी ‘ नाहीं ’ ह्मणतो. ते आपली थैली परत मागतात. ती रिचवितांना जर उदम्याला न दिसतां सॉव्हरिनवर उडीद पडले, तर असें समजतात कीं शिकार साधणार. आणखी दोन इसम लागलींच येऊन सांगतात कीं धनी भाव चढविण्यास कबूल आहे. तेव्हां थैलींत पुन्हां सॉव्हरिन भरतात. नंतर जणों अगदीं नवखा असा एक इसम येऊन सॉव्हरिनचा सवदा करूं लागतो. तेवढ्यांत प्रथम सवदा करणारे सॉव्हरिनची थैली घेऊन तिच्या ऐवजीं शिशाच्या चकल्यांची थैली तेथें ठेवून चालते होतात, आणि उदम्यास सांगतात कीं मालकाला विचारून येईपर्यंत ही येथें असूं द्या. अर्थात् ते पुन्हां परत येण्याचें नांवच नको. त्यांची ठकबाजी करण्याची दुसरी युक्ति अशी आहेः– ते बाजारभावापेक्षां स्वस्त सोनें देऊं करतात. ह्या धंद्याला सुमारें २० तोळें सोनें बस्स होतें. दोन सारख्या थैल्यांपैकीं एकींत खोटे रुपये भरतात. नंतर चोरीचा माल घेणाऱ्या उदम्याला गांठून ते एखाद्या आडरस्त्याच्या जागीं सवद्यासाठीं जातात, आणि खोटे रुपये असतील तितक्या किंमतीचा सवदा करतात. त्या उदम्यानें मोजलेले रुपये ते रिकाम्या थैलींत घालून त्याच्या हवालीं सोनें करतात. इतक्यांत एकजण तेथें अचानक येतो आणि बोभाटा करण्याची भीति घालतो. अर्थात् मग धांदल आणि धांवपळ सुरू होते, आणि त्यासरसे उदम्याकडून सोनें परत घेऊन त्याला न कळत त्याच्या हातांत ते खोट्या रुपयांची पिशवी टाकतात.

**गुन्ह्याची पद्धतः**–लाभाचा होरा पाहून छप्परबंद एकेक दोन दोन असे लोकांची नजर चुकवून घर सोडतात. ते बहुधा पायीं चालतात, व कधीं रेल्वेनेंही जातात. कोणाला संशय येऊं नये म्हणून जवळचें तिकीट काढतात, आणि परत येतांना गांवच्या स्टेशनापासून दुसऱ्या किंवा तिसऱ्या स्टेशनावर उतरतात. त्यांचे टोळींत तीन ते दहा क्वचित् तीसही मनुष्यें असतात. जरी त्यांची संख्या बरीच असते, व हवें तेथें ते

राजरोष वावरतात, तरी ते अशा खुबीनें पद्धतशीर लहान लहान टोळ्या करतात कीं एकीच्या गांवांत दुसरी जात नाहीं, व त्यांचा एकमेकांशीं संबंध आहे ह्याची कोणाला गंधवार्ताही लागत नाहीं. आपल्यांतल्या वडील व अनुभवशीर अशा माणसाला ते टोळीचा नाईक नेमतात. त्याला ' खागडा ' ह्मणतात. त्याचा हुकूम सर्वजण बिनतक्रार मानतात, आणि किफायतींत त्याचा हिस्साही इतरांपेक्षां मोठा असतो. प्रत्येक टोळींत ' हंडीवाळ ' ह्मणून एक हरकाम्या मुलगा असतो. स्वयंपाक करणें, वाढणें, पाणी आणणें, जनावरें राखणें हीं त्याचीं कामें होत. शिवाय तो हेराचें काम करतो. छप्परबंद आपलें सामान डोक्यावर नेतात; पण वेळ पाहून घोडें चोरून त्यावर बसतात आणि सामानही वाहतात. त्यांचा तळ पाण्याजवळ उंचवट्यावर असतो,कारण कीं तेथें कोणी झाडा घ्यावयास आलें तर सांचे,खोटे रुपये वगैरे तेव्हांच नाहींसे करतां येतात. खागडा आणि हंडीवाळ खोटीं नाणीं चालवीत नाहींत. हें काम टोळीं-तील इतर लोक करतात, त्यांना " भोंडार " म्हणतात. तळावर राहून खागडा स्वयंपाक करतो, व जेव्हां टोळी वाट चालते तेव्हां तो हंडी-वाळाला बरोबर घेऊन घोडेस्वार होतो, आणि सांचे, माती, धातू आपले बरोबर नेतो. त्याचेजवळ खोटीं नाणीं कधीं नसतात. भोंडार निरनिरा-ळ्या वाटांनीं जीं लागतात त्या गांवीं आपला रोजगार करीत करीत पूर्वी ठरलेल्या मुक्कामाच्या जागीं आगाऊ जाऊन भिडतात. तळा-वर खागडा पोंचला ह्मणजे त्याचें पहिलें काम हें कीं जवळ-पास रोकड व सांचे पुरणें, किंवा नजीकचे गवतांत, झुडुपांत किंवा झा-डांचे गाभ्यांत लपविणें. भोंडारही आपलेजवळचीं खोटीं नाणीं ह्या-प्रमाणें दडवितात. सांचे, खोटीं नाणीं वगैरे तळावर अंथरुणाखालींही ठेविलेलीं सांपडतात. ह्मणून त्यांच्या तळाचा झाडा बारकाईनें घ्यावा.

छप्परबंद वाट चालत असतांना खोटीं नाणीं तयार करतात. गोपी-चंदन बलफ किंवा त्यासारखी दुसरी चिकणमाती वस्त्रगाळ करून पाण्यांत भिजवून एकजीव करतात. नंतर ती निमानिम करून

तिच्या खिशांतल्या घड्याळाएवढ्या दोन वाटोळ्या थापट्या करतात. खऱ्या रुपयाला तेल लावून तो त्या दोन थापट्यांत पाव इंच खोल थोडा वेळ दाबदाबून त्यांचा सांचा करतात. आणि पुढें त्याचे दोन्ही भाग जुळण्यांत चूक होऊं नये ह्मणून कडेला खुणेची रेघ काढतात. नंतर आंतला रुपया काढून घेतां येईल अशा रीतीनें तो सांचा आडवा कापतात, आणि धातूंचा रस आंत ओतण्यासाठीं लहानशी पन्हाळी त्यांत कोरतात. नंतर तो राखेंत वाळवितात, आणि त्याला चिंध्या गुंडाळून त्याचा खंगर होईपर्यंत भाजतात. उपयोग करण्याचे वेळीं सांचे एका ओळीनें शेणांत उभे करतात, तेव्हां धातूंचा रस ओतण्यासाठीं पन्हाळीचें तोंड वर असतें. पळीमध्यें तांब्याचा किंवा काशाचा आणि कथलाचा रस करून तो सांच्यांत ओततात, आणि सदर नाणें बाहेर काढून कानशीनें किंवा चाकूनें त्याच्या बाजूच्या कडा नीट नेटक्या करतात. जुनीं दिसावींत ह्मणून कधीं कधीं हीं नाणीं काळीं करतात. एका सांच्यांतून अजमासें दहा ते वीस नाणीं पाडतां येतात. अर्थात् असलीं नाणीं बद, बेरंग, हलकीं व गोबरीं असतात.

खोटीं नाणीं पाडण्याचें काम कोणी न येईल अशा ठिकाणीं गुपचुप उरकण्यांत येतें; व तेथें पाळतही ठेवण्यांत येते. म्हणून आंघोळीच्या किंवा देवदर्शनाच्या निमित्तानें पोलिसनें तेथें जावें. अशीं थोडीं खोटीं नाणीं तयार झालीं म्हणजे छप्परबंद फकीर एखाद्या बाईला गांठतो, आणि तिला बट्टा कबूल करून तिचा रुपया घेऊन तिला खुर्दा देतो. नंतर तिला सांगतो कीं तूं दिलेला रुपया आमच्या मुलुखांत चालत नाहीं, आणि खुर्दा परत घेऊन हातचलाखीनें तिनें दिलेला रुपया ठेवून घेऊन खोटा रुपया तिच्या पदरांत टाकतो. खोटीं नाणीं चालविण्याच्या त्यांच्या कांहीं युक्त्या अशा आहेत:—विक्रीसाठीं कांहीं जिन्नस घेऊन ते बाजारांत जातात,सौदा ठरून पैसे हातांत पडले म्हणजे मग तो मोडतात, आणि गिऱ्हाइकाचे पैसे परत देतांना हातचलाखीनें त्यांत कांहीं खोटे

पैसे मिसळतात. दुकानांत जाऊन पहिल्यानें खरे रुपये दाखवून माल घेतात, आणि पैसे देतांना त्यांचे ऐवजीं खोटे देतात. इंग्रजांखेरीज इतर राजांचींही खोटीं नाणीं ते चालवितात. यात्रा वगैरे गर्दीच्या ठिकाणीं ते आपला धंदा चालवितात. एका टोळीला एका फेरींत दोन हजार रुपये मिळाल्याची वदंता आहे. आपला रोजगार उघडकीस येण्याची भीति वाटली तर ठसे वगैरेचा नायनाट करून ते स्वतःही नाहींसे होतात.

**गुन्ह्याचीं उपकरणें:–** कात्री, मोठ्या पानाची सुरी, चिमटा, सांडस, पळी, खापरी, कटोरी, कानस, बांबूच्या नळींत लपविलेल्या सुया, आळशीचें तेल, डिंक, कासें, खोटीं नाणीं पाडण्याच्या कामीं लागणारे धातू व माती, काळी भुकटी, सहाण, फुंकणी, काटकोनी नळी, कसोटी, पारा, शिसें, जस्त, गंधक, कोळशाची फकी, मऊ कातड्याचा तुकडा, उजळा देण्यासाठीं मीठ किंवा रेती, कांहीं " हल्ली शिक्का " " राजशाही " रुपये व सांचे वगैरे सामान छप्परबंदांजवळ सांपडतें. सांच्यासाठीं लागणारी माती, तिच्या मण्यांची माळ करून, किंवा तिचा लहानसा दर्गा किंवा महाल करून, ते बरोबर वागवितात. त्यांच्याजवळ मातीची भुकटी तशीच सांपडली तर ती एखाद्या दर्ग्यांतून प्रसाद ह्मणून आणली असें सांगतात. त्यांच्या रोजगाराचीं हत्यारें कातडी पिशव्यांत असतात.

**गुन्ह्याचे मालाची व्यवस्थाः–**छप्परबंदांच्या टोळीला अटक केली ह्मणजे हातांत बेड्या घालून त्यांना एकमेकांपासून दूर बसवावें. नाहीं तर ते कलागत काढून गोंधळ करतात, आणि त्यांत त्यांना सांचे, खोटीं नाणीं वगैरे लांबविण्याला फावतें. छप्परबंदांच्या लंगोटीच्या पुढच्या पदराला एक लहानसा चोरखिसा असतो. त्यांत ते खोटें नाणें व रुपये लपवितात. त्याचप्रमाणें ते गुदद्वारांत व तोंडांत पैसे लपवितात, आणि वेळेवर ते गिळतातही. जुलाबावाटे पडलेले रुपये ते पुन्हां गुदद्वारांत लपविणार नाहींत याविषयीं खबरदारी घ्यावी.

होईल तितकें लवकर ते जमलेल्या रुपयांच्या मोहरा किंवा सॉव्हरिन विकत घेतात. तसेंच ते आपली कमाई पोस्टमार्फत गुन्हा न केलेल्या ठिकाणाहून पाठवितात. त्यांच्या गांवचे पाटील त्यांना पाठीशीं घालून पोलीसला झुकवितात. एका छप्परबंदानें सर्व मनीऑर्डरी पाटलाच्या बायकोच्या नांवानें करून आपल्या घरीं रुपये पोहोंचते केले. कधीं कधीं ते टोळींतील एका इसमाजवळ आपली कमाई देतात, आणि तो सोनें खरेदी करून घरीं घेऊन जातो. ह्मणून जर एखादा छप्परबंद अवेळीं घरीं आला तर त्याजवर चांगली नजर ठेवावी.

## कैकाडी.

**संज्ञाः—** महाराष्ट्रांत कैकाडयांच्या पोटजाती खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः— ( १ ) चोर कैकाडी ऊर्फ फिरस्ते किंवा डोंटलमोर; ( २ ) गांव कैकाडी ऊर्फ बुटी, टोपले कैकाडी; यांपैकीं वाजंत्री काम करणारांना वाजंत्री किंवा सनादी कैकाडी म्हणतात, व घरदार करून राहिले त्यांना गृहस्थ कैकाडी म्हणतात; ( ३ ) कुचडी कैकाडी किंवा कुंचीवाले; (४) माकडवाले; ( ५ ) कूथ ( माकड ) कैकाडी यांना लालबाजारवाले किंवा गनसूर म्हणतात; ( ६ ) तेलंगण किंवा कामाठी कैकाडी हे कर्नाटक किंवा मद्रासेकडील फिरस्ते कोर्चे, कोर्वे व पामलोर लोक होत. कर्नाटकांत कोर्च्यांच्या अगर कोर्व्यांच्या पोटजाती खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः— ( १ ) कोर्वे अथवा कल्ल ( चोर ) कोर्वे. ( २ ) कड्डी अथवा अगडी कोर्वे. ( ३ ) कुंचे कोर्वे. ( ४ ) कोर्चे. ( ५ ) पामलोर. ( ६ ) वाजंत्री, सनादी किंवा उर कोर्वे. ह्या प्रत्येक पोटजातींत चार कुळया किंवा गोत्रें आहेत — ( १ ) साथपाडी, ( २ ) मेलपाडी, ( ३ ) कावाडी व ( ४ ) मेंद्रगुट्टी.

कै. स. म. ब. बा. पोतदार
ग्रंथ संग्रह

**वस्तिः**— महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, निजामशाही, मद्रास, ह्मैसूर, वऱ्हाड व मध्यप्रांत ह्यांत ते सांपडतात.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**— वर लिहिलेल्या मुलुखांत ते गुन्हे करतात. आपल्या तळापासून सुमारें तीस मैलांवर व चांगली शिकार मिळण्याचा संभव असला तर रेल्वेनें प्रवास करून शंभर मैलांवरही कैकाडी गुन्हे करतात. ते आपल्या तळाजवळच्या गांवांत गुन्हे करीत नाहींत. तळाच्या जवळपास एखादें घाऊक घर दिसलें तर ते तेथून तीस चाळीस मैलांवर मुक्काम हलवितात. आणि नंतर सुमारें एक महिन्याच्या आंत बाहेर त्या घरांवर छापा घालतात. ह्या जातीला भारी वळवळ असते आणि त्यांच्या टोळ्या खूप लांबवर पायपीट करतात. पुणें जिल्ह्यांत गुन्हे केलेले कैकाडी वऱ्हाडांत सांपडले आणि सोलापुरांतले बल्लारींत हातीं लागले. पण ते मोकार हिंडत नाहींत. त्यांना खबर देणारे चहूं मुलुखीं आहेत. आणि जिकडील खबर येते तिकडे ते जातात. गांव कैकाडी, उर कोर्वे आणि पुष्कळ चोर कैकाडी व कल्ल कोर्वे हे गांवांतून कायमची वस्ति करून राहिले आहेत. बाकीचे फिरस्ते आहेत.

**लोकसंख्याः**—ह्या जातीची गणति सुमारें सव्वीस हजार आहे; पण हा आंकडा बरोबर नसावा.

**स्वरूपः**— ही जात हाडची गुन्हेगार व फिरस्ती आहे, सहकुटुंब सहपरिवार बायकापोरें, गाईबैल, तट्टें, गाढवें, कोंबडीं, बकरें, कुत्रीं, वगैरेसह त्यांच्या लहान मोठ्या टोळ्या महाराष्ट्र व कर्नाटकांत भटकतात. आपलें सामान व पालें ते गाढवावर नेतात. आणि गांवापासून दूर उंचावर पाण्याजवळ तळ देतात. कुंची कोर्व्यांचा मात्र गांवाजवळ तळ असतो. बेळगांव, धारवाड, विजापूर, सोलापूर, या जिल्ह्यांत त्यांचा सुळसुळाट फार आहे. तसेंच कोंकणांत त्यांचे हेर पुष्कळ असल्यामुळें ते कधीं कधीं घाटाखालीं उतरतात. स्वसंरक्षणाकरितां आणि येणारे संकटाची एकमेकांस तावडतोब बातमी देतां यावी ह्मणून, चोर कैकाडी

प/२८८६

व कल्ल कोर्वे आपल्या झोंपड्या गांवाच्या ज्या विशेष भागांत ते राहतात, तेथें फार कसबानें बांधतात. एकमेकांस लागून त्या अशा रीतीनें बांधल्या जातात कीं त्यांमधून तावडतोब एकमेकांस खबर पोंचवितां येते. कल्ल कोर्वे नदीनाल्यांजवळ झाडाखालीं उतरतात, आणि गुन्हा केल्याबरोबर तळ मोडतात. त्यांच्याबरोबर बायकापोरें नसतात. क्वचित् सैंपाकाकरितां एखाददुसरी तरुण स्त्री ते बरोबर घेतात. कड्डी कोर्वे गवताच्या किंवा बोरूच्या पालांत सहकुटुंब सहपरिवार उतरतात. त्यांच्या गोण्यांच्या पदरांना बाहेरून कातडें लाविलेलें असतें. कुंची कोर्वेही गवताबोरूंच्या पालांत सहकुटुंब सहपरिवार राहतात, शिवाय त्यांचेबरोबर डुकरें, माकडें असतात. कोर्चे चटयांच्या पालांत सहकुटुंब सहपरिवार राहतात. त्यांच्याबरोबर बरेच गोणीचे बैल असतात. पामलोरांच्या कांबळ्यांच्या पालांवर खादी टाकलेली असून दोन्ही तोंडांसमोर चटयांचे पडदे बहुतकरून बांधतात. त्यांच्याबरोबर बायकामुलें, गाईबैल, तट्टें, कुत्रीं, ओझ्याचीं गाढवें वगैरे असतात.

कैकाडी मध्यम ते पुऱ्या उंचीचे, बांधेसूत, धट्टेकट्टे, अति चपळ व श्रमसाहिष्णु असतात. त्यांचे कान व नजर तिखट असते. बायका आणि पुरुष काळे, गदळ असतात व अव्यवस्थित रीतीनें राहतात. गाय, बैल, म्हैस वर्ज्य करून ते सर्व प्रकारचें मांस खातात, आणि खूप दारू व ताडी पितात. कल्ल कोर्वे आणि पामलोर यांच्यांत बेटीव्यवहार होतो; बाकीच्या जातींत फक्त रोटीव्यवहार होतो.

महाराष्ट्रांत पुरुष धोतर किंवा चोळणा नेसतात, बारबंदी घालतात, अंगवस्त्र पांघरतात, आणि रुमाल किंवा पागोटें बांधतात. त्यांच्याजवळ कधीं कधीं हसवी ( खारवी बटवा ) असते. बायका चोळी घालतात व कासोटा न घालतां लुगडें नेसतात. त्या अंगावर भरपूर गोंदतात. कर्नाटकांत कड्डी व कुंची कोर्वे लंगोटी नेसतात आणि कांचा कसतात; ते डोक्याला रुमाल बांधतात आणि खांद्यावर धोतर किंवा घोंगडी घेतात.

कोर्चे बहुधा चड्डी किंवा चोळणा घालतात; व लंगोटी घातली तर वरून धोतर गुंडाळतात. ते अंगांत अंगरखा व डोक्याला रुमाल घालतात, आणि कांबळी किंवा हाचडा (पासोडा) पांघरतात. पामलोरांचा पोषाख अंगरखा, अंगवस्त्र, रुमाल आणि डाव्या खांद्यावरून लटकणारी झोळी हा होय. इतर कैकाडणींप्रमाणें कोर्च्यांच्या बायका कांहीं चोळी घालीत नाहींत, आणि लुगडें अस नेसतात कीं, आंतला पदर डावीकडून उजवीकडे निघून खांद्यावरून उरावर येतो व स्तन झांकतो. त्या गळ्यांत पोत व हातांत पितळी बांगड्या घालतात. त्या कांचेच्या बांगड्या घालीत नाहींत. पामलोरांच्या बायका चोळी घालतात व लुगड्याचें कमळ काढतात.

कैकाडी व कोर्वे यांच्या बायका पुरुषांप्रमाणें राकट असून गुन्ह्याचे कामांत पुरुषांना हरप्रकारची सांथ करण्यांत मोठ्या पटाईत असतात. टोपल्या वगैरे विकण्याच्या मिषानें दारोदार हिंडून गुन्ह्यासंबंधाची बातमी काढणें, माल लपवून त्याची विल्हेवाट करणें, दग्याची व पोलिसच्या हालचालीची बातमी आपले पुरुषांला देणें, प्रसंगानुरूप पोलिसाला झुकविणें किंवा त्यांना व्यत्यय आणणें, पुरुषांना भाकरी पोंचविणें, त्यांना काय पाहिजे याचें धोरण बांधणें वगैरे सर्व कामें त्या मोठ्या चतुराईनें करतात. त्या स्वजातींत व्यभिचार करितात. टोळीच्या तर्फेनें बोलण्याचें काम बहुधा एखाद्या मोहक तरुणीवर सोंपविलें असतें. जिकीरखोर पोलिसला किंवा गांवकामगारांना मुठींत आणण्याला हवें तें करण्याची तिला मुभा असते.

जो गुन्हे करण्यांत अट्टल व बोलण्यांत हुशार अशा इसमाला ते नाईक करतात; आणि त्याचा हुकूम सर्वजण पाळतात. सोलापुराकडे पुढारीपण कांहीं बायकांकडे आलें. नायकाला उघड रीतीनें वावरतां येत नाहीं, अशा वेळीं त्याचें काम त्याची बायको करते. कछु कोर्व्यांत नायकाला 'रंगाएट,' पामलोरांत 'पुलाकुंज,' कोर्च्यांत 'बेरमुन्सा,'

आणि कड्डी कोव्यांत नायकिणीला ' पुलाकुलसी ' म्हणतात. रंगाएट आणि पुलाकुंज यांचें लग्न सुरी व ' कंगट्टी ' ( घरफोडीचें हत्यार ) ह्यांशीं लावितात. लुटींतील वांट्याशिवाय एकंदर लुटीचा पांचवा हिस्सा त्याला मिळतो.

**भाषाः**–कैकाडी अर्वी किंवा अशुद्ध तेलगू बोलतात. त्यांना मराठी व कानडीही येत असतें. शिवाय त्यांचे सांकेतिक शब्द व खुणा आहेत.

## कल्लकोव्यांचे सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| कोयका ... ... | कॉन्स्टेबल. | सोनिमू, सुनिमू... | सोनें. |
| वंचू ... ... | आला. | कुंजप्पा ... ... | गोफण. |
| पंसाकोल्लू... ... | घरफोडीचें हत्यार. | शिद्रामप्पा ... | काठी. |
| बेटवनी ... ... | कुऱ्हाड. | कोल्लूल्लेपा ... ... | दगड. |
| तेनवोल्ला ... ... | फौजदार. | यईयई ... ... | दगडमार. |
| सुल्ला ... ... | लांच. | तिगडू ... ... | चोरीचा माल. |
| केलमल ... ... | रुपये. | येलगू, पिंगली ... | मशाल. |
| यल्ली ... ... | रुपें. | | |

## पामलोरांचें सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| मुल्लवाडू, हूल्लंकी | कॉन्स्टबल. | मेंगडू ... ... | फौजदार. |
| शिलाकट्टा, वख-पेडू ... ... | घरफोडीचें हत्यार. | परमशवाडु ... | वरिष्ठ अंमलदार. |
| | | वलिमड्डु ... ... | पळ. |
| उल्लमुख ... ... | सुरी. | वर्सुसो ... ... | ते आले. |
| वलकमु ... ... | चोरीचा माल. | कावकर ... ... | वालिकार अथवा रखवालदार. |
| यलिमकट्टेलु. ... | रुपया. | | |
| यलिम ... ... | रुपें. | उनसु, को ... | मार. |
| नमतु ... ... | गांवकरी किंवा चोरीचा माल घेणारा. | उनसालु ... ... | जबरीची चोरी, दरोडा. |
| | | मुलपवाडु ... | कलाल. |
| परडू ... ... | घर. | गोंडलवाडू ... | ताडी दुकानदार. |

## महाराष्ट्रांतील कैकाड्यांचें सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| कोयका अथवा नाई ... ... | पोलिस शिपाई. | सोजनी ... ... | झाडा. |
| | | पक्काफोहू ... | फेरीला निघाले. |
| वाल्लकडु ... ... | फौजदार. | वोर्फू ... ... | पळ. |
| कंगथ, सिल्लाकल मुल्लकडी ... | फरघोडीचें हत्यार. | | |

कल्लकोर्वे आणि पामलोर ह्यांच्या सांकेतिक खुणा खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—पोलिस येत आहे, हें दर्शविण्यासाठीं ते तोंड मिटून रात्रकिड्याप्रमाणें आवाज काढतात. पळून जा, हें दर्शविण्यासाठीं ते तोंडाला हात लावितात, किंवा कांहींसा घुबडाप्रमाणें व कांहीं कोल्ह्याप्रमाणें आवाज काढतात. गचांडी धरली असतां, ते तळहाताचा मोठ्यानें मुका घेऊन मुंगसाप्रमाणें आवाज काढतात; ह्मणजे मागें राहिलेले लोक धांवून येतात. दडल्या ठिकाणाहून ते तोंडाला हात लावून लहान मुलाच्या रडण्याप्रमाणें आवाज काढतात. त्यामुळें वाटसरू इकडे तिकडे पाहतो आणि त्याचे अंगावरचे दागिने दृष्टीस पडतात, ह्मणजे त्याला लुटण्यांत कांहीं जीव आहे किंवा नाहीं हें उघड होतें. लांबच्या मनुष्याला बोलावणें झाल्यास ते भालूसारखा आवाज काढतात. दग्याचे भीतीनें पांगलेली टोळी गोळा करणें झाल्यास ते खोकडासारखा किंवा घुबडासारखा आवाज काढतात, अगर शिटी फुंकतात. आंत सांपडलेल्या घरफोड्याला दग्याची इशारत देणें झाल्यास ते मांजरासारखें किंवा शेळीसारखें ओरडतात. नाहींसा हो, असें जोडीदाराला परक्यांसमक्ष सुचविणें झाल्यास कपाळ खाजवितात. अमुक बाजूला जा हें कपाळ खाजवितांना त्या बाजूला कोंपर करून सुचवितात. तळ मोडून टोळी कोणत्या दिशेनें गेली हें मागून येणाराला कळावें म्हणून ते खालीं लिहिल्याप्रमाणें चिन्हें करितात:— झाडाची डाहाळी मोडून ती चुलीच्या दगडांजवळ ठेवितात, आणि डाहाळीजवळ काटकोनांत एक पाऊल वठविलेलें असतें. जिकडे टोळी गेली, त्या दिशेला डाहाळीचें मोडलेलें टोंक असतें. जेथें दोन किंवा अधिक रस्ते मिळतात, तेथें पटाजवळ एक कडें काढून त्यांतून मधोमध नीट रेघ ओढतात म्हणजे कड्याबाहेर आलेल्या रेघेच्या टोंकाच्या बाजूला टोळी गेली असें समजावें  पावलाच्या कडेनें भुसभुशीत जमिनीवर एक रेघ काढतात आणि तिच्या शेवटीं पाऊल वठवितात. जिकडें पाऊल त्या दिशेला टोळी गेली असें

समजावें. किंवा एखादें पान अगर डाहाळी तोडून तिजवर एक दगड ठेवून नजरेस पडेल अशा ठिकाणीं हें ठेवितात. जिकडे पानाचें अगर डाहाळीचें टोंक तिकडे टोळी गेलेली असते. जेव्हां रस्ता सोडून जंगलांतून व डोंगरांतून भटकावें लागतें तेव्हां ते थोड्या थोड्या अंतरावर झाडांचीं पानें पसरतात, म्हणजे मागच्या लोकांना माग लागतो.

**उपजीविकेचीं दर्शनीं साधनें:–** चटया विणणें, कोष्ट्यांच्या कुंच्या, ओबडधोबड पाट्या व कणगी करणें आणि कधीं कधीं जातीं विकणें, उकटणें वगैरे कामें ते करतात. कोठें कोठें कैकाडी पोलिसांतही नौकर आहेत. महाराष्ट्रांत कांहीं वाजंत्री असतात, कांहीं शेतकी व मातकाम करतात. कैकाडी आपल्या जमिनी बहुधा दुसऱ्यांना लावितात. कांहीं कैकाडी माकडासापाचे खेळ करतात, आणि खोड्यांत जनावरें पकडतात. कांहींच्या बायका कसब करून घर चालवितात. मुंबई इलाख्याच्या बाहेर या जातीचे कांहीं लोक कसरत करतात. कर्नाटकांत कल्लकोर्व चटया, टोपल्या करतात. कड्डी कोर्वे चटया करतात व त्यांच्या बायका भीक मागतात. कुंची कोर्वे पुंगी वाजवून पायांत घुंगरें घालून नाचतात व भीक मागतात. ते माकडाचे खेळ करतात, शिकार धरतात, दोरखंडें, मुलांच्या कुरकुल्या, शिंकीं, व कोष्ट्याच्या कुंच्या करतात. त्यांच्या बायका गांवांत गोंधून व नशीब सांगून पैसे मिळवितात. कोर्चे, चटया, सोल, शिंकीं व धान्याची ने आण करतात आणि ढोरें विकतात. पामलोर पुंगी वाजवून सापाचा खेळ करितात आणि भीक मागतात. वाजंत्री कोर्वे घरदार करून राहिले आहेत. ते शेतकाम, वाजंत्रीपणा, शिंदीच्या पाट्या, दोरखंड, केरसुण्या, शिंकीं वगैरे करतात.

**वेषांतर:–** महाराष्ट्रांत कैकाडी आपणांस वडार म्हणवितात, आणि बतावणी पुरी करण्यासाठीं त्यांच्या बायका चोळी घालीत नाहींत. पुरुष चोळणे घालतात व टिकाव घेऊन फिरतात. एकटे दुकटे हिंडतांना त

आपण घोंगडी तुणणेवाले, मराठे, गोसावी किंवा जंगम आहोंत असें भासवितात. कल्ल ेर्वे आणि पामलोर हे लिंगायत, जंगम यांचा वेषधारण करतात, आणि आपण नशीब सांगणारे, शंखघंटाधारी दास्सये, शास्त्रीगोळ, वैद्य, सनादी वाजविणारे वाजंत्री आहोंत असें दर्शवितात. या वेषानें त्यांना घरांत व देवळांत जातां येतें व खबरही मिळते. कधीं कधीं ते आपणांला धनगर, कुंची अगर वाजंत्री कोर्वे म्हणवितात. महाराष्ट्रांत कैकाडी एकटे किंवा जोडीनें मारवाड्याच्या वेषानें व कर्नाटकांत घरंदाज मराठ्याच्या वेषानें सोयरीक पाहण्याचा बाहणा करून हिंडतात. पामलोर आणि कल्लकोर्वे एखाद्या गांवांत मन्याराचें दुकान घालतात आणि गांवाचा ठाव घेतात. सावकारासारखा पोषाख करून ते कसबिणींच्या घरीं उतरतात आणि खबर काढतात. कैकाड्यांना टोपणनांवें फार असतात.

एखादी कैकाड्यांची टोळी चैनींत दिसली आणि तिच्यांतले धट्टे-कट्टे पुरुष वरचेवर नाहींसे होतांना दिसले म्हणजे ती गुन्हेगार आहे असें समजावें. ज्या कैकाडवाड्यांत बहुतेक बायका, मुलें व थकले-भागलेले म्हातारे दृष्टीस पडतात त्यालाही वरील नियम लागूं पडतो. विचारपूस केल्यास बायका स्वच्छ सांगतील कीं, आमचे नवरे व मुलगे मेले. तरी पण पोलिसनें पाळतींत कसूर करूं नये.

**गुन्हेः**— कैकाड्यांच्या टोळ्या आसपासच्या पिकांची चोरी करतात आणि शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या चोरून त्या लगेंच मारून खातात. हे लोक अज्ञान मुलें चोरून तीं गरजूंना विकतात. महाराष्ट्रांतील कैकाडी आणि कर्नाटकांतील पामलोर आणि कल्लकोर्वे हे निधड्या छातीचे, पाषाणहृदयी, पिढीजाद दरवडेखोर आहेत. ते रस्तालूट व घरफोडी करतात, खऱ्या म्हणून पितळेच्या मोहरा व मणी विकतात, आणि चोरीचा माल घेणारांना भरंवसा देऊन एकांतस्थलीं नेऊन लुबाडतात. कट्टी कोर्वे, पिकें व शेळ्यामेंढ्या ह्यांची चोरी आणि रस्तालूट करतात.

पेवें फोडून त्यांतील धान्य ते लांबवितात आणि दरोडे घालतात. त्यांच्या बायका भीक मागतांना चोऱ्या करतात. कुंची कोर्वे, ऊरकोर्वे किंवा वाजंत्री बहुधा मोठासा गुन्हा करीत नाहींत. कोर्चे रस्तालूट करतात आणि दरोडे घालतात. ढोरें, शेळ्या, मेंढ्या चोरण्यांतही ते पटाईत आहेत. ते पामलोर किंवा कल्लकोर्वे ह्यांना दरोड्याचे कामीं सामील होत नाहींत.

**गुन्ह्याची पद्धति–घरावर दरोडाः**–टोपल्या विकतांना आणि जातीं उकटतांना कैकाडी, पामलोर आणि कल्ल कोर्वे ह्यांच्या बायका घर शोधून ठेवितात, आणि त्याची खबर आपल्या पुरुषांला देतात. जर तिऱ्हाइतान खबर दिली तर टोळींतील एकजण पहिल्यानें त्या घराची नीट पाहणी करतो, पण केव्हां दरोडा घालावयाचा हें त्या बातमी देणाराला ते कळूं देत नाहींत. घराची पाहणी करणारा इसम टोळींतल्या इसमांना त्या घराचा नकाशा जमिनीवर काढून दाखवितो. कधीं कधीं कोठें दरोडा घालावयाचा याची खबर कैकाडी तुरुंगांतच दुसऱ्या कैद्यांकडून मिळवितात, आणि तेथेंच सुटकेनंतर घालावयाच्या दरोड्याबद्दल बेत ठरवितात. खबर लागल्यावर त्यांच्या पायापिटीला सीमा नसते. ते बहुधा रात्रीं वाट चालतात. हमरस्ते व पोलीस भेटतील अशीं ठिकाणें ते टाळतात. घरीं पोंचण्यापूर्वीं उजाडलें तर ते एखाद्या एकांतस्थलीं किंवा जंगलांत दडतात, अगर टोळी फोडून वेगवेगळे चालून जातात. दरोड्याचें ठिकाण फार लांब असलें तर ते कांहीं मजलपर्यंत बैलगाडी करतात आणि तिला बोकड बांधतात, जणूं काय यात्रेला निघाले आहेत. फेरीला निघण्यापूर्वीं ते शकुन पाहतात. भवानीची आराधना करून जेवण करतात आणि खूप दारू झोडतात. कर्नाटकांत ते कुऱ्हाड आणि कंगट्टी यांची पूजा करतात तिला ‘ गवी ’ ह्मणतात. दरोडा मारल्यावरही याचप्रमाणें ते पूजा व जेवण करतात. अशा प्रसंगीं महाराष्ट्रांत सत्यनारायण करतात. गुन्ह्याचे वेळीं माल काढण्यासाठीं

किंवा आपली अगर झटापटींत घायाळ झालेल्या किंवा मेलेल्या साथीदाराची सुटका करून घेण्यासाठीं वेळेवर कैकाडी खून सुद्धां पाडतील. त्यांना त्वेष फार चढतो. मोठी दुखापत झाली असेल, बांबू अगर ताज्या तोडलेल्या काठ्या टाकून दिलेल्या असतील, विड्याच्या पिचकाऱ्या दिसत असतील, किंवा घरचे जोडे चोरीस गेले असतील तर कैकाड्यांनीं दरोडा घातला असें समजावें. ते बहुधा रात्रीं ८ ते १२ वाजेतों, आणि क्वचित् प्रसंगीं मोठ्या पहांटेस दरोडा घालतात.

तळाच्या नीट रस्त्यापासून एकीकडे आणि दरोड्याच्या ठिकाणापासून सुमारें एक मैलावर ते एक संकेतस्थान ठरवितात. गुन्हा करण्यापूर्वीं त्या ठिकाणीं टोळींतले लोक जमून आपापले फाजील कपडे काढून ठेवितात, आणि कोणी काय करावयाचें वगैरेसंबंधानें टोळींतल्या लोकांना नाईक समजूत देतो. महाराष्ट्रांत कधीं कधीं ओबडधोबड शिडी किंवा चढण्याचा वासा कैकाडी आपल्याबरोबर नेतात. दरोड्याच्या घरांत ते मागच्या भिंतींनीं धाब्यावरून उतरतात, आणि कुऱ्हाडीनें किंवा दगडांनीं दारें फोडून इतरांना रस्ता खुला करून देतात. कधीं कधीं आसपासच्या घरांना बाहेरून कड्या लावितात, आणि रस्त्यांत कांटे पसरतात. कोणी ओळखूं नये ह्मणून गुन्हा करतांना ते कंबर कसतात, धाटे बांधतात आणि तोंडाला राख किंवा पिंवडी फांसतात. त्याचप्रमाणें, " कालेखान संभाळो, जमादार, बताव, मारो, गरीब लोक मत आव बंदुक भरो " वगैरे हिंदुस्थानी शब्द ते वापरतात. टोळींतील कांहींजण घरावर आणि घराबाहेर गर्दी करतात. त्यांच्याजवळ मशाली असून ते कुऱ्हाड, पहार किंवा मोठ्या दगडांनीं खिडक्या–दरवाजे फोडतात. दुसरे कांहीं वाटेवर गोफण एकसारखी चालवितात, आणि जो मध्यें आडवा येईल त्याचें काम काढतात. महाराष्ट्रांतले कैकाडी कधीं कधीं आपटबारही काढितात. माल कोठें ठेविला आहे हें समजण्यासाठीं आणि घरांतलें माणूस बाहेर जाऊं नये

ह्मणून कैकाडी घरांतल्या सर्व माणसांना गोळा करून एका खोलींत कोंडतात, व तिला कडी लावून घेतात; अगर मालक किंवा दुसरा माहीतगार इसम माल दाखवीपर्यंत त्या गोळा केलेल्या इसमांवर कांहीं-जण पाहरा करतात. त्यानें माल दाखाविला नाहीं तर, ते त्याचे अति-शय हाल करतात. याप्रमाणें इकडे असें चाललें आहे तों दुसरे लोक पेट्या फोडतात, आणि बायकांच्या अंगावरचे दागिने काढून घेतात. निघून जाण्याची इशारत देण्यासाठीं नाईक महाराष्ट्रांत 'नडा' किंवा 'खूष' आणि कर्नाटकांत 'काळ्या' किंवा 'फैल' ह्मणतो. त्या-बरोबर सर्वजण घराबाहेर गोळा होतात. सर्व आले असें पाहून नाईक हुकूम करतो, (कर्नाटकांत 'पांजरा' ह्मणतो) आणि सर्व टोळी संकेतस्थानीं व तेथून तळावर जाते. माग लागूं नये ह्मणून ते बहुधा सकत जमिनीवरून जातात. ज्यांच्याजवळ चोरीचा माल असतो ते मध्यें चाल-तात व इतर त्यांच्या बाजूनें चालतात. पोलिसला झुकविण्यासाठीं ते गुन्ह्या-च्या ठिकाणीं परजातीचे कपडे किंवा परठिकाणचे जोडे टाकतात, आणि चोरीच्या मालापैकीं फोल जिनसा संकेतस्थानीं फेंकून देतात. तसेंच वाटेवरच्या गांवाजवळ कांहीं चोरीचा माल ते कधीं कधीं टाकतात. तळ लांब असला तर परत जातांना टोळींतील एखादा दुसरा माणूस वाटेवरच्या खेड्याच्या दुकानांतून गूळ, शेंगादाणे वगैरे विकत आणतो. आणि सर्वजण एखाद्या एकांतस्थळीं ते कसें बसें खाऊन पुढें चालते होतात. कैकाडी बहुधा एका गांवांत एकापेक्षां अधिक घरें लुटीत नाहींत.

एका खटल्यांत असें दिसून आलें कीं फिर्यादीचे घरीं एका कैका-ड्यानें लहानसान कामें केलीं व पुढें तो नाहींसा झाला. कांहीं दिवसांनीं त्याच्या टोळींतले इसम एकेक दोनदोन निरनिराळ्या वाटांनीं एका संकेतस्थानीं जमले आणि गुन्हा करून आले तसे गेले. त्यांना एक ब्राह्मण सामील असावा असा संशय आला होता.

**घरफोडीः**—धाब्याला धारें पाडून शिरावयाचें असल्यास त्या धाब्या-वर एक काठी आडवी ठेवितात आणि तिला पागोटें किंवा दोरी लटका-

वून ते घरांत प्रवेश करतात. महाराष्ट्रांतले कैकाडी भिंतीच्या तळाला धावें घेऊन त्यांतून आंत जातात. आंत घुसलेले इसम घर धुंडाळतात, तोंपर्यंत बाकीचे इसम चोहोंकडे पाहरा करतात. कर्नाटकामध्यें कैकाडी रुमाली पद्धतीनें घरफोडी करतात तिला ' मनकलू ' ह्मणतात; आणि बगली पद्धतीनें घरफोडी करतात तिला ' नोंदबक्क ' ह्मणतात. पहिल्या पद्धतीनें भिंतीच्या तळाशीं धावें घेऊन आंत शिरतात आणि दुसऱ्या पद्धतीनें चौकटीजवळ भोंक पाडून आंत हात घालून दाराची कडी काढतात किंवा आगळ सारतात. कोणी जागा होऊन मारण्यासाठीं उभा आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं आंत जाण्यापूर्वी काठीला कांबळी गुंडाळून ती आंत घालतात, ह्मणजे बसला तर काठीला टोला बसावयाचा. पामलोर आणि कल्लकोर्वे हे घरफोडींत अट्टल आहेत. ते भिंतीला जें धारें पाडतात तें फार मोठें नसून नीटनेटकें असतें. कैकाडी लोक बायकापोरांवर हात टाकीत नाहींत, व मंगळसूत्र, केकतकेवडा आणि जोडवीं-विरुद्या नेत नाहींत. ते बाकीचे दागिने निर्दयपणें काढतात. जर एका घरीं कांहीं हातीं लागलें नाहीं तर दाक्षिणी कैकाडी दुसऱ्या घरावर छापा घालतात.

**रस्त्यावर दरोडा:**— कोर्चे आणि कड्डी कोर्वे रस्त्यावर दरोडा मारण्यांत फार पटाईत आहेत. ते पांच तें पंचविसांची टोळी करून ज्या रस्त्यावर दरोडा घालावयाचा त्यापासून दोन तीन मैलांवर एखाद्या एकांत लपण्याच्या ठिकाणीं जातात. तेथें फाजील कपडे काढून ठेवितात. तेथून त्यांचा बेर्मुन्सा गांवापासून लांब अशा सोईस्कर रस्त्याच्या भागावर टोळी नेऊन तिचे दोन तीन भाग करून, त्यांना थोड्या थोड्या अंतरावर बसवितो, आणि आपण एक इसम बरोबर घेऊन रस्त्यावर बसतो. गाडी, टांगा, किंवा लुटण्याला योग्य असा वाटसरू आला ह्मणजे तो इशारत देतो. त्या बरोबर सर्वजण लपलेल्या ठिकाणांतून बाहेर पडतात. वाटसराजवळ हत्यार असल्यास बेर्मुन्सा त्याजवर

हल्ला करून, तें हिसकावून घेतो. टोळींतील लोक बैल किंवा घोडे सोडून गाडी उलथतात, मुशाफरांना ठोकतात, त्यांच्या अंगावरचे मूल्यवान् जिन्नस हिसकून घेतात, व बोभाटा करूं नये ह्मणून कधीं कधीं त्यांना झाडाला बांधून ठेवितात. नंतर सर्वजण कपडे ठेवलेल्या ठिकाणीं जातात, व कपडे घेऊन जे निघतात, ते सुमारें वीस मैलांवर मुक्काम करतात. अशा रीतीनें अनेक रस्त्यांवर दरोडे मारून ते आपल्या तळाला परततात. अशा प्रसंगीं त्यांच्याबरोबर बायका नसतात, ते बहुधा दिवसां व क्वचित् रात्रीं दरोडा घालतात.

कड्डी कोर्व्यांच्या बायका बड्या चोर असतात. त्यांच्या नायकिणीला चार वांटे मिळतात, आणि तिच्या नवऱ्याला दोन वांटे मिळतात. त्या भीक मागतां मागतां घराचीं कुलुपें काढून चोऱ्या करतात. त्यांची चोरीची एक रीत अशीः— ज्या घरांत थोडीं माणसें असतील त्याच्या मागच्या दारीं कांहींजणी बसतात, व कांहीं पुढच्या दारीं भांडून एकमेकींना रक्त निघेपर्यंतही मारतात. अर्थात् घरचीं माणसें तंटा तोडण्याला बाहेर येतात तों मागच्या दारीं असलेल्या कोर्विणी आंत शिरून हातीं लागेल तें घेऊन चालत्या होतात. तळ सोडण्यापूर्वीं पामलोर आणि कल्लकोर्वे आपल्या चुलीच्या तीनचार दगडांचा एक असे ढीग घालतात, आणि कपाळाला राख फांसतात. विड्याच्या पिचकाऱ्या खूप दिसल्या किंवा जवळपास आग अगर आकड्याच्या पानांच्या पत्रावळी दिसल्या ह्मणजे पामलोरांचा तळ होता असें समजावें.

कैकाडी बहुधा कबुलीजबाब देत नाहींत. ते जिकडे तिकडे सामसूम होईपर्यंत चोरीच्या मालाची वांटणी करीत नाहींत. दुसऱ्या जातीचे जे लोक त्यांना सामील होतात, त्यांना ते रोकड देतात. महाराष्ट्रांतील कांहीं टोळ्यांमध्यें सर्व लूट नाईक घेतो, आणि टोळींतील इसमांना व त्यांच्या कुटुंबांना खाणें पिणें दारू, मांस पुरवितो. कांहीं टोळ्यांमध्यें नायकाला दोन वांटे मिळतात. टोळींतल्या कैकाड्यांना शिक्षा झाली तरी

त्यांच्या गैरहजिरींत मिळालेल्या लुटीचा वांटा त्यांना पोंचवितात. गुन्हा करतांना एखादा मेला तर त्याचा मुलगा किंवा दुसरा माणूस गुन्हा करण्या जोगा मोठा होईपर्यंत त्याच्या कुटुंबाला वांटा मिळतो. कैकाड्यांना पोलीस ठाण्यांची व जिल्ह्यांची हद्द चांगली माहीत असते. एका जिल्ह्याच्या सरहद्दीवर तळ देऊन ते दुसऱ्या जिल्ह्याच्या सरहद्दीवर गुन्हा करतात. मोठ्या टोळ्या बहुधा संस्थानच्या सरहद्दीवर तळ देतात. गांवपोलीस व गांवकरी यांशीं, वेळेवर तालुक्यांतील कामगारांशीं कैकाड्यांची दोस्ती असते, त्यामुळें गुन्ह्याचे तपासाला पुष्कळ अडचण पडते. दरोडा मारल्यावर जर कांहीं तपास वगैरे चालू नसला तर कैकाडी देवीची मोठी जत्रा करतात, आणि बायकांपोरांसुद्धां यथेच्छ दारू पितात. दारूच्या कैफांत ते बरीच हकीकत बरळतात. सबब पोलिसांनीं असल्या जत्रांच्या टेहळणीवर असावें. अटकेंतल्या कैकाड्यांवर फार जपून पाहरा करावा. कारण ते वाटेल ती युक्ति लढवून निसटून जातात. नुकतेच तेरा असामी तुरुंगांतून खालीं लिहिल्याप्रमाणें निसटले. तेरा इसमांना एका कोठडींत ठेविलें. एकानें कबुलीजबाब देऊन माल दाखविला. रात्रीं आठ वाजतां सर्वजण मारामारी करूं लागले. ज्यानें कबुलीजबाब दिला तो पहारेवाल्यास ह्मणाला 'मला जर दुसऱ्या कोठडींत ठेविलें नाहीं तर मी मेलों.' वटहुकुमाविरुद्ध पहारेकऱ्यानें दार उघडलें आणि तेराही इसम दाराकडे धांवले, पहारेकऱ्याच्या तोंडावर मडकें आपटलें, आणि सर्वजण पळून गेले. त्यांपैकीं फक्त एकजणाला तेव्हांचे तेव्हां पकडलें. तात्पर्य, कैकाडी तुरुंगांत भांडूं लागले कीं दार उघडण्यापूर्वीं सर्व पहारेकरी गोळा करावेत ह्मणजे त्यांना पळून जातां येणार नाहीं.

**गुन्ह्याचीं हत्यारें**:– गुन्हे करण्यासाठीं कैकाडी काठ्या नेतात, व गोफण, धोंडे, चवाळ्यांत किंवा धोतरांत घालून ते कंबरेला गुंडाळतात. शिवाय त्यांजवळ कोयता, कुऱ्हाड, सुऱ्या, पहारी, म-

शाली आणि सांपडल्यास बंदुका तलवारीही असतात. त्यांच्याजवळ ' कंगट्टी, ' ' पंसकोल्लु, ' किंवा ' शिल्लाकल ' ( सुमारें एक फूट लांबीची टोंकाकडे चिंचोळी होत गेलेली पहार ) असते. महाराष्ट्रांतल्या कैकाड्यांजवळ एक ओबडधोबड शिडी किंवा एखादा लहान झाडाच्या फांद्या तोडून त्याचा चढण्याकरितां केलेला वांसाही असतो. त्यांच्या कुऱ्हाडीला दांडा बहुधा नवीन लाविलेला असतो, आणि काठ्याही नवीन तोडलेल्या असतात. शेतकऱ्यांच्या गोफणींपेक्षां त्यांच्या गोफणी लहान असतात. कड्डी कोर्व्यांच्या बायकांजवळ कुलुपें उघडण्यासाठीं खिळा किंवा किल्ल्यांचा जुडगा असतो.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**—चोरीचा माल ते दरींत, नाल्यांत शेतांत, जंगलांत, स्मशानांत किंवा उकिरड्यांत पुरतात, आणि कांहीं दिवसांनीं गांवकामगार, सावकार, कलाल, सोनार यांच्या मार्फत तो फुंकून टाकतात. कैकाडी आतां सोनें, चांदी गाळावयाला शिकले आहेत. पुरलेला माल लवकर बाहेर काढण्याचा संभव नसला तर रुपया कापून तो लोखंडाच्या तुकड्यासह तेथें पुरतात, म्हणजे मालाला भूतबाधा होत नाहीं, अशी त्यांची समज आहे. मराठे, पाटील किंवा देशमूख यांचा वेष घेऊन मुंबईसारख्या शहरांत कैकाडी माल विकतात. तसेंच टोळींतली एखादी देखणी व हुषार बायको लिंगायतणीचा पोषाख करून गहाण जमीन सोडाविण्याच्या मिषानें चोरीचा माल राजरोस विकते. एका सोनारानें कैकाड्याच्या टोळीबरोबर जाऊन त्यांजवळील माल चोरी झाल्याबरोबर संकेतस्थानीं विकत घेतला. एकदां कैकाड्यांनीं चोरीचा माल घोड्याच्या तंग्यांतून नेला. पूर्वीं चुली, अंथरुणें, पालाच्या मेखा, वळीमूठ ( खोगीर ) यांच्याखालीं कैकाडी माल पुरून ठेवीत असत. एका प्रसंगीं चोरलेले दागिने व तीस रुपये कैकाड्यांनीं सुपाटोपल्यांच्या कांठांत विणले आणि गोधडींत शिवले. कैकाड्यांचें एकमेकांत इमान नसतें. टोळींतील इसम कधीं कधीं एकमेकांच्या चोरून चोरीचा माल

एकीकडे फेंकून देतात, आणि परत येऊन तो घेऊन जातात. एखाद्याविषयीं कपटाचा संशय आल्यास त्याला प्रमाण करावयाला लावितात. म्हणजे कढत तेलांत आंगठी किंवा चवली टाकतात आणि ती त्याला काढावयास सांगतात. जर त्याचीं बोटें भाजलीं नाहींत तर तो निरपराधी समजतात. कैकाड्यांचा तळ फार दिवस एकाच गांवीं पडून राहिला तर असें समजावें कीं गांवकामगार वगैरे त्यांना अनुकूल आहेत. चोरींचा माल गाढवाच्या वळींत किंवा गोणींत लपवून एखादी म्हातारी बाई त्याजवर किंवा त्याबरोबर जाते. कैकाड्यांचा झाडा घेतांना एखादी बाई शौचाला किंवा लघवीला जाऊं लागली तर तिजवर लक्ष असावें. कारण बायका लुगड्याच्या निऱ्यांत, तोंडांत, बगलेंत जिनसा लपवितात. एकदां कैकाड्याच्या तळाची जमीन नांगरली तेव्हां तेथें चौदाशें रुपये सांपडले. सबब झाडा घेतांना तळाची जमीन नांगरावी. कोल्यांमध्यें अशी रीत आहे कीं, टोळींतील एक इसम आडरस्त्यानें हलक्या किंमतीचा चोरीचा माल व कंगट्टी आणि कुऱ्हाड घेऊन जातो. नवीन तळाला पोंचल्यावर टोळींतील एखादा दुसरा इसम जुन्या तळाच्या जागेवर परत येतो आणि रात्रीं तेथील माल घेऊन जातो; आणि मग नव्या तळाजवळ तो पुरून ठेवितात.

---

## कातकरी.

**संज्ञाः**—ह्यांना "काथोडी" ह्मणतात. ह्यांच्या दोन पोटजाती आहेत. "ढोर कातकरी" आणि मराठे अथवा "सोने कातकरी."

**वस्तिः**—समुद्रकांठ व सह्याद्रि पर्वत यांच्यामधील, नद्या, नाले वाहतात अशा जंगलप्रदेशांत त्यांची वस्ति आहे. समुद्रकांठीं किंवा घांटाखालीं त्यांची वस्ति नाहीं. त्यांची शेंकडा नव्वद वस्ति ठाणें आणि

कुलाबा या जिल्ह्यांत आहे. बाकीची पुणें, सातारा, रत्नागिरी व त्यांमधील संस्थानें ह्यांत आहे.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः–** ह्यांचा उपद्रव उत्तर कोंकणांतील जंगलांत व डोंगरांत फार आहे. गुन्ह्यासाठीं ते सुरत, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, पुणें, कुलाबा, रत्नागिरी, धरमपूर, दमण वगैरे ठिकाणीं हिंडतात. तळापासून दहा ते पंधरा मैलांवर ते गुन्हा करतात. ते बहुतेक फिरस्ते आहेत. परंतु बरेचजण खेड्यांच्या आसपास घरदार करून राहिले आहेत.

**लोकसंख्याः–**कातकरी सुमारें साठ हजार व काथोडी सोळा हजार आहेत.

**स्वरूपः–** कातकऱ्यांना कष्ट पुष्कळ पडतात आणि खावयाला पुरेसें मिळत नाहीं, त्यामुळें तरुणपणांत जरी ते बांधेसूत, मजबूत आणि टणक दिसतात, तरी ते लवकर खंगतात. ते सडपातळ, मध्यम उंचीचे, आणि फार चपळ असतात. त्यांचा रंग काळवट व जरा सतेज, डोळे खोल, नाक चपटें, ओंठ भरदार व केंस कुरळे असतात. पुरुषाला, लंगोटी आणि डोक्याला एक फडकें असतें. त्यांच्या अंगावर कधीं कधीं फाटलेली कर्पी ( बंडी ), उपरणें किंवा जुनी घोंगडीही असते. ढोर कातकरी हजामत करीत नाहींत. बाकीचे करतात, आणि शेंडीला गांठ मारतात. ढोर कातकरी गळ्यांत आणि मनगटाला काळी पोत घालतात, इतर घालीत नाहींत. बायका आंखूड लुगडें नेसून घट्ट कासोटा बांधतात, आणि पदर खांद्यावरून, क्वचित् डोक्यावरून उरावर काढितात. त्या बहुधा सणावाराशिवाय चोळी घालीत नाहींत, परंतु गांवाजवळ राहिलेल्या आणि बऱ्या स्थितींतल्या कातकरणी चोळ्या घालतात. त्यांच्या गळ्यांत चित्रविचित्र पोत असते. कांहीं कातकरणी बांगड्या, पितळेचे गोठ, वांक्या, बुगड्या, काप व बुचड्याला पितळी गुंड्या घालितात. ढोरांच्या बायका हातांवर गोंधतात व फक्त कांचेच्या बांगड्या घालतात.

त्यांच्या कानबाळ्या सोन्याच्या कानबाळ्यापेक्षां लहान असतात. ढोरांच्या बायका पायांत पितळेच्या सांखळ्या घालतात. सोन्याच्या घालीत नाहींत. कातकरी घाणेरडे असून गांवाबाहेर राहतात. त्यांच्या घरांत सामानसुमान कांहीं नसतें. घरदार करून राहिलेले कातकरी गवताच्या झोंपड्या करून राहतात. त्यांच्या वस्तीला कातवाडी ह्मणतात. ते नाचणी, वरी, सावा, कंदमुळें खाऊन राहतात. त्यांना शेतांतले उंदीर, खारी, कांहीं जातीचे सरड, व मुंगूस आवडतात. कांहीं माकडेंही खातात. पैसे असले तर ते दारूंत व तंबाखूंत उडवितात. कातकरी ह्मणजे जंगलचा बच्चा होय. कातकरी मेला ह्मणजे ते म्हणतात कीं ब्राह्मणाच्या जन्माला जाशील तर लिहूं लिहूं मरशील, कुणब्याच्या जन्माला जाशील तर नांगरूं नांगरूं मरशील, इत्यादि, असा प्रत्येक जातीचा कांहींतरी आयब काढून शेवटीं ह्मणतात कीं कातकऱ्याच्या जन्माला जाशील तर जंगलचा राजा होशील. जातप्रकरणीं पंचायत भरवून ते आपल्या "नायका"चे तंत्रानें चालतात. त्यांच्याशीं व्यवस्थेनें वागलें म्हणजे ते एकमेकांविरुद्ध पोलिसला बातमी देतात.

**भाषाः**– ते मराठी नाकांत बोलतात आणि प्रत्यय गाळतात.

**सांकेतिक भाषाः**– त्यांच्यांत सांकेतिक भाषा आहे. ते माशांला सारो आणि मासे धरणाऱ्याला लोधैला म्हणतात.

**उपजीविकेचीं बाह्य साधनेंः**– पुष्कळ सोने कातकरी शेतकाम करतात. ते जंगलचीं फळेंमुळें, सरपण व खैराचा कात काढतात, लांकडें तोडून कोळशे पाडतात, मासे धरतात, व भुईंतील शिकार करतात, आणि शिकार विकून भात नागली खावयाला घेतात. उन्हाळ्यांत ते मजुरीनें शेतांचे बांध दुरुस्त करतात. शिवाय खळें उलगडल्यावर ते शेतांत सांडलेला भात वेंचतात, आणि उंदराच्या बिळांतील धान्य काढतात.

**वेषांतरः**–गुन्ह्याचे वेळीं ते धाटे बांधतात.

**गुन्हे**:—ते घरफोडी, धान्य, शेळ्यामेंढ्या व कोंबड्या यांची चोरी करतात. तंबूत चोऱ्या करण्यांत ते पटाईत आहेत. ते गुपचुप कनातींतून येऊन तंबूंतल्या लहानशा पेट्या व हातीं पडेल तें सामान लांबवितात. कधीं कधीं ते जंगलाच्या अति— काढू मक्तेदाराला जंगलांत लुटतात, आणि गाड्या व वाटसरू आडवितात. पण ते बहुधा फार ठोकमार करीत नाहींत. ते बहुशः मोठीशी टोळी अगर बातबेत करून गुन्हे करीत नाहींत. आणि क्वचित् फरारी होतात. अलीकडे कुलाबा जिल्ह्यांतील कोपोल गांवचा जान्या नांवाचा सोने कातकरी बंडखोर निघाला होता. पैसा सांपडण्याच्या आशेनें एका युरोपियनाची कबर फोडल्याचा कातकऱ्यांवर संशय होता.

**गुन्ह्याची पद्धतिः**— चोरीबरोबर खाण्याचे जिन्नस आणि शिजविलेलें अन्न, कोंबड्या, बकरीं, हीं नाहींशीं झालीं, किंवा गुन्ह्याच्या जागीं बांबू अगर कोयता सांपडला म्हणजे कातकऱ्यांनीं गुन्हा केला असें समजावें. कातकरी उंच वर्णाच्या हिंदूचें स्वयंपाकघर विटाळीत नाहींत. ह्याशिवाय त्यांचे पद्धतींत कांहीं विशेष नाहीं.

**गुन्ह्याचीं हत्यारेंः**— विळा, कोयता, पहारई, तीरकामठा हीं होत.

**गुन्ह्याचे मालाची निर्गतिः**—ते आपल्या बायकांमार्फत चोरीचा माल सोनार, कलाल, पाटील यांना विकतात. ते मांसळीच्या पाटीच्या बुडाशीं माल लपवून तो फक्त चोरीचा माल घेणाराला विकतात. कधीं कधीं गुडघ्यामागें किंवा पायाच्या पोटरीला चोरीचा माल फडक्यानें गुंडाळून ते लंगडत लंगडत जाऊन सोनाराला विकतात. सबब लंगड्या कातकऱ्यावर पोलिसाची नजर असावी. चोरीच्या कोंबड्या व शेळ्यामेंढ्या ते मारून खातात, किंवा गांवच्या लोकांना विकतात.

---

# कोळी.

**संज्ञाः**—कोळयांपैकीं फक्त महादेव ऊर्फ राजकोळी आणि गुजराथ कोळी या दोन जाती गुन्हे करणाऱ्या आहेत.

## महादेव कोळी.

**वस्तिः**—पुणें, ठाणें, कुलाबा, अहमदनगर, नाशिक आणि जव्हार-मधील सह्याद्रीच्या डोंगराळ प्रदेशांत ह्यांची कायमची वस्ति आहे.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**— कोळी फिरस्ते नाहींत. त्यांना आपला डोंगराळ मुलूख फार आवडतो. ते देशी भागांत येत नाहींत. कांहीं कोळी मुंबईस मजूर आहेत; व बंडखोर कोळी दडण्यासाठीं ह्मणून मुंबईस जातात.

**लोकसंख्याः**— नक्की आंकडा तयार नाहीं.

**स्वरूपः**—ह्या जातीच्या बायका व पुरुष मध्यम ते मजबूत बांध्याचे काळे अगर निमगोरे, टणक, ठेंगणे, चलाख असतात. त्यांचे चेहरे सतेज आणि बुद्धिमान् दिसतात, आणि इंद्रियें तीक्ष्ण असतात. त्यांच्यांतल्या पुष्कळ बायका साधारण कुणब्यांच्या बायकांपेक्षां देख-ण्या, बांधेसूत व नीटनेटक्या दिसतात. डोंगराळ प्रदेशांत रहात असल्यामुळें त्यांना अनेक प्रकारच्या कष्टांची संवय असते. त्यांना निवळ वाऱ्यावर राहतां येतें असें म्हटलें तरी चालेल, तरी ते मांजरासारखे चपळ असतात. ते एका दिवसांतून डोंगरांत तीस चाळीस मैल सहज काटतात. त्यांना नेम चांगला मारतां येतो. ते बहुधा गरीब, अल्पसंतोषी, उद्यांची फिकीर न करणारे, आणि जातिबंद असतात. धोतर किंवा पंचा, काचा, बंडी, पेहरण, पांढरें किंवा रंगाचें पोगाटें, घोंगडी किंवा पासोडी, हा पुरुषांचा पोषाख होय. कोंकणांत धोतर किंवा लंगोटी, पागोटें किंवा रुमाल आणि घोंगडी हा त्यांचा नेहमींचा

पोषाख होय. बायका कुणबाऊ, किंवा धोतराच्या धर्तीवर लुगडें नेसतात, आणि पदर कमरेला बांधतात, डोकें उघडेंच टाकतात, किंवा त्यावरून फडकी घेतात. त्यांची नथ मोठी असून तिच्यांत पितळेचे किंवा सोन्याचे मणी असतात. त्या बहुधा प्रत्यक्ष गुन्हे करण्यामध्यें सामील नसतात, परंतु क्वचित् एकाद दुसरी फराऱ्याबरोबर जाते. त्या चपल, सोशिक असून त्यांना डोंगरबारीची पूर्ण माहिती असते. पुरुषांना शिधासामग्री व पोलिसच्या हालचालीची बातमी पोंहचविण्यांत त्या फार हुषार आणि अचूक असतात. कोळ्यांचा पोषाख फारसा स्वच्छ नसतो. ते तंबाखू ओढतात, बेतशीर दारू पितात, व आपल्या घरांत दिवा क्वचित् लावितात. त्यांच्या बायका जातींतल्या जातींत व्यभिचार करतात, व दुसऱ्याचें घरही निघतात. बायकोपायीं तंटे, मारामाऱ्या व खून होतात. बदफैली बायकोमुळें वेळेवर नवरा बंडखोर बनतो. जातीच्या पुढाऱ्याला कोंकणांत " खोत " आणि देशांत " कारभारी " ह्मणतात. ते बहुधा केंबळींत राहतात. जे थोडे खाऊन-पिऊन सुखी आहेत, ते कवलारू किंवा पऱ्याच्या घरांत राहतात.

सन १८४५ सालीं राघोजी भांगऱ्याचें बंड उठलें. त्यांनीं मारवाड्यांचीं नाकें कापलीं. शेवटीं राघोजीला धरून फांशीं दिलें. सन १८७३ सालीं होन्यानें बंड केलें व मारवाड्यांचें काम काढलें. त्याला सन १८७६ सालीं पकडण्यांत आलें. वाण्यांच्या जरब घेण्याला, दुष्काळाची जोड मिळाली म्हणजे ते उठाव करितात.

**भाषाः**—ते मराठी भाषा नाकांत बोलतात. त्यांच्यांत सांकेतिक भाषा नाहीं.

**उपजीविकेचीं बाह्य साधनें**ः—बहुतेक कोळी शेतकरी किंवा शेत मजूर आहेत. पण ते वाण्यांच्या हातांत गेले आहेत. ते बहुधा हिरडा, गवत, सरपण, जंगलचीं फळें वगैरे विकून निर्वाह करतात. पुष्कळजण उन्हाळ्यांत कंदमुळें खाऊन राहतात किंवा गुन्हे करतात. थोडेजण पोलीस, फॉरेस्ट व शाळाखात्यांत नोकर आहेत.

**वेषांतरः**– गुन्ह्याचे वेळीं ते धाटे बांधतात, बकरीच्या कातड्याच्या मिशा–दाढ्या लावितात, किंवा पोलीस अगर जंगलकडील शिपायांचा जुना काळा किंवा खाकी पोषाख व बूटपट्टी चढवितात. ते हिंदुस्थानी शब्द बोलतात, व मधून हुर् हुर् म्हणतात. एका खटल्यांत कोळयाच्या एका टोळीनें पोलिसचा काळा पोषाख करून हत्यारें घेऊन आपल्याचपैकीं दोघांना कैदी म्हणून दंडाला बांधून चालविलें. तेव्हां पोलिसची तुकडी म्हणून त्यांना राजरोष गांवचे चावडीवर जातां आलें.

**गुन्हेः**– ते गैर कायदा दारू गाळतात, व किरकोळ चोऱ्या करतात. पण बंडखोर बनल्यावर भिल्लांप्रमाणें ते दरोडे, जबरीच्या चोऱ्या, खून वगैरे करतात. बंडखोर म्हणून कोळ्यानें एकदां नांव कमाविलें कीं इतर कोळी तेव्हांच त्याला सामील होतात. मग ते खेड्यापाड्यांवर हल्ले करतात, शिधा, पैसे, बंदुकीची दारू यांच्या रूपानें त्यांजकडून खंड उकळतात, मारवाड्यांना लुटतात, त्यांच्या वह्या जाळतात, व त्यांचीं नाकें, कान कापतात. एकटदुकट फारेस्टचा किंवा पोलिसचा शिपाई सांपडला म्हणजे ते त्याला झाडाशीं बांधतात, मारतात व लुटतात. कोळ्याचें बंड मोडणें फार कठिण पडतें. कारण ते कंटक व पायशूर असून त्यांना जंगलांतली वाट ना वाट व दडण्याची जागा माहित असते, आणि भिण्याभावें कीं भक्तिभावें बंडखोरांना त्यांचे जातवाले आश्रय देतात.

**गुन्ह्यांची पद्धतिः**– गुन्हा कोळ्यांनींच केला आहे हें सहज समजतें. कारण ( १ ) त्यांचें गुन्ह्यांचें क्षेत्र सबंद मुलूखभर असतें व ( २ ) त्यांत गुप्तपणा बिलकुल नसतो. ते माणसांवर, घरांवर किंवा गांवावर रात्र असो अगर दिवस असो, उघडपणें हल्ला करतात. हल्ला करावयाचा तेथें ते नीट जातात, आरडाओरड करतात, व जें पाहिजे तें मागून घेतात. ते आपल्या जमावानें व क्रौर्यानें लोकांना कांपरें आणतात आणि लूट मिळाली कीं तडक जंगलचा रस्ता धरतात. अति–कादू सावकाराचा

ते खालीं लिहिल्याप्रमाणें सूड उगवितातः– त्यांची टोळी बहुधा रात्रीं त्याच्या गांवांत शिरते. ते आसपासच्या घरांना बाहेरून कड्या लावितात, त्याच्या वह्या जाळतात, जे कांहीं कपडे, पैसे, जवाहीर हातीं लागेल ते घेतात, त्याचा एखादा अवयव कापतात किंवा खूनही करतात, आणि घरांतील बायकांवर जुलूमही करतात. जेव्हां कोळयांच्या टोळीचा उद्देश शिधा किंवा खंड उकळण्याचा अगर बायको काढून नेणें वगैरेसाठीं सूड उगविण्याचा असतो, तेव्हां तिच्यांतले लोक तलवारी दाखवून आणि बंदुकींचे बार किंवा आपटबार काढून गांवकऱ्यांना भिवावितात, आणि त्यांना जें लागतें तें उघडपणें मागतात, किंवा जबरदस्तीनें घेतात; अगर ज्यावर सूड उगवावयाचा, त्यावर अतिक्रूरपणानें हल्ला करतात. एका खटल्यांत असें दिसून आलें कीं, एका बाईशीं लागू झाल्याबद्दल एका सधन कोळयाला बंडखोरांनीं रात्रीं घराबाहेर काढलें, पडवींतल्या खांबाला बांधलें, व तलवारीनें त्याला भोंसभोंसकून मारलें. एकदां आठ पोलीसकामगारांच्या ताब्यांतून त्यांनीं हल्ला करून बातमीदार नेला आणि त्याला मारलें. बंडखोर टोळया आपली बातमी देणाराचा खून करतात, पोलीसलाईनी लुटतात आणि पोलिसचे पोषाख व हत्यारें ते आपल्या उपयोगाला लावितात.

बंडखोराबद्दल एकंदर कोळी जातीला मोठा अभिमान वाटतो. कोणी बंडखोर निघाला ह्मणजे फायदाच आहे असें ते समजतात. कारणः–

( १ ) व्याजाचा दर उतरतो आणि पैसे मागण्याला सावकार फारसे निघत नाहींत. ( २ ) फॉरेस्टचे शिपाई जरा भलाईनें वागतात, आणि आपल्या कामांत चालढकल करतात. ( ३ ) हे लोक तेव्हांच उठतात असें नांव पडलें ह्मणजे सरकार जरा ढिल देतें. असें त्यांना वाटतें.

कोळी फरारी झाला ह्मणजे त्याचें गांव, त्याच्या बायकोचें किंवा राखेचें गांव आणि त्याच्या आवडीच्या जागा वगैरे ठिकाणीं हत्यारी पोलिस ठेवावे. त्यानें टोळी जमविली ह्मणजे तेथें शक्य तितके हत्यारी

पोलीस जमवावे. कारण कीं, इतर लोकांना पोलिसला मदत करण्याला धीर पोंचतो. तसेंच वजनदार कोळ्यांची सभाही करून पहावें. आपलें कांहीं चालत नाहीं असें कोळ्यांना कळलें ह्मणजे ते पळून जातात, किंवा स्वाधीन होतात.

**गुन्ह्याचीं उपकरणें**:–कोळ्यांजवळ लवंगी किंवा साध्या काठ्या, जुन्या बंदुकी, तलवारी ( खऱ्या किंवा नकली ) असतात. घाटांतील कोळ्याजवळ नेहमीं कोयता असतो.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**–दरोड्यानंतर टोळींतील लोक चोरीचा माल लागलींच वांटून घेतात. कारभाऱ्याचा वांटा इतरांपेक्षां मोठा असतो. वांटणी होईपर्यंत ते माल जंगलामध्यें पुरून ठेवितात. ते चोरीचा माल सोनाराला विकतात. कोंबड्या वगैरे सारखे खाण्याचे पदार्थ चोरल्यास ते ताबडतोब खाऊन टाकतात.

---

## गुजराथ कोळी.

**संज्ञाः**–गुजराथ कोळ्यांच्या चार पोटजाती आहेत–( १ ) चुंवालीया किंवा जहांग्रिया, ( २ ) खांत किंवा सरहद्दीवरील, ( ३ ) पाटणवाडिया किंवा अन्हिलपूर कोळी–यांना खोडे किंवा झांगड ह्मणतात–( ४ ) तळब्दे, धाराळ किंवा ठाकरडे. यांशिवाय बारीये, दळवाडी, गेडींये, शियाळ, वलकीये वगैरे आणखीही पोटजाती आहेत.

**वस्तिः**–ते गुजराथ आणि काठेवाडभर पसरले असून त्यांची वस्ति उत्तर गुजराथेंत फार व भडोच–सुरतकडे कमी आहे. चुंवालियांचा भरणा अहमदाबाद, काठेवाड आणि बडोदें येथें; खांतांचा काठेवाड व गुजराथच्या इशान्य भागांत; पाटणवाडियांचा खेडा जिल्हा व मध्य गुजराथेंत आणि तळब्दे यांचा अहमदाबाद, खेडा आणि बडोदें येथें आहे.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**—पुष्कळ कोळी उद्योगधंद्यासाठीं मोठमोठ्या शहरांत जाऊन राहिले आहेत. कांहीं तर मद्रास, सिंधपर्यंतही गेले आहेत. ते गुन्ह्यासाठीं फार लांबवर जात नाहींत. फार तर घरापासून तीस ते पन्नास मैल फिरतात. ते बहुधा काठेवाड, गुजराथ, रतलाम, माळवा आणि बी. बी. आणि सी. आय. रेल्वेवरील मोठमोठ्या शहरीं गुन्हे करतात. ते बरोबर आपलीं बायकामुलें नेत नाहींत, व आपल्या मित्रांच्या घरीं किंवा मुशाफर म्हणून धर्मशाळा, देवळें ह्यांत अगर गांवाबाहेर झाडाखालीं उतरतात.

**लोकसंख्याः**—त्यांची लोकसंख्या सुमारें तेरा लक्ष आहे.

**स्वरूपः**—तळब्दे रजपूत किंवा कुणब्यासारखे दिसतात. ते निमगोरे सुरेख, मजबूत, बांधेसूत, चपळ, सरासरी उंचीचे, खातेपिते आणि काटकसरी असतात. त्यांच्या बायका नाजूक आणि देखण्या असतात. चुंवालीये भिल्लांप्रमाणें दिसतात. त्यांच्यांत अद्याप कांहीं बेफाम गुन्हेगार आहेत. ते उंच, चपळ, मजबूत, बांधेसूत व पिंगट असतात. त्यांतील ठाकरडे किंवा जमिनीदार तळब्द्यांप्रमाणें सुरेख दिसतात. खांत रानटी आहेत, ते भिल्लांप्रमाणें दिसतात. त्यांचे नाईक मात्र तळब्द्यांप्रमाणें देखणे असतात. ते काळे, राकट, मजबूत, सरासरी उंचीचे आणि बांधेसूत असतात.ते चोऱ्या फार करतात.पाटणवाडीये काळे,धाडशी,चपळ, मजबूत, कठोर आणि पाणीदार असतात. त्यांचें भिल्ल आणि वाघ्री यांशीं साम्य आहे. एकंदर कोळी आळशी, खुशालचेंडू, उडाऊ, छातीबाज, क्रूर, चपळ, कसबी आणि काटक असतात अशी ख्याति आहे. साधारणतः त्यांचा पोषाख म्हटला ह्मणजे जाडाभरडा पांढरा किंवा रंगीत फेटा, बंडी किंवा कमरेपर्यंत अंगरखा, धोतर किंवा चोळणा आणि जोडा होय. ते लग्नकार्यांत मोठें पागोटें घालून खांद्यावर पिचोडी घेतात. काठेवाड, पाटण, चुंवालमध्यें थोडे लोक दाढी ठेवितात. पण बहुतेक दाढी करतात आणि कांहींजण कल्ले ठेवितात. गोमांस सोडून इतर मांस कोळी खातात. कांहीं

खांत व पाटणवाडिये म्हशीचें मांस खातात. बायका व पुरुष दारू पितात, तंबाखू ओढतात आणि उत्तर गुजराथेंत अफू खातात. काचोळी, लहंगा व अंगी हा बायकांचा पोषाख होय. सुरत, भडोचकडे बायका अंगी न घालतां खांद्यावरून साडीचा पदर घेतात. जे खाऊनपिऊन सुखी असतात, ते सोन्याची किंवा रुप्याची हांसळी, कांचेची किंवा सोन्याची पोत, बाळीबुगडी, कांचेच्या बांगड्या, रुप्याच्या सांखळ्या, जोडवीं घालतात.

**भाषा:**– ते कनिष्ठ प्रतीची गुजराथी भाषा बोलतात.

## सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| रमवाजाऊन | चोरी करण्यास जाणें. | खुंटो ... | वाटेल तें कुलूप काढण्याची किल्ली. |
| च्यामी जाऊन ... | समजणें. | बांडो ... ... | सांथीदार. |
| चवली उथवून ... | जागें होणें. | मर्यो ... | सोन्यारुप्याचे दागिने. |
| खांगा वालो ... | पाहरा, घड्याळ. | झेमी ... ... | चोरी. |
| काळो भैरव, बलाडी, कुतरू ... | पोलीस. | मुसीभाई ... | धारळांच्या टोळीं-तील वाघरी. |
| सांध पाडो ...... | पोलिस अंमलदार. | धूरउंची ... ... | मोठी शिकार. |
| पांखडी ... ... | रक्कम. | धूर नीचीं ... | भिकार शिकार. |
| गडबियो, पथारो, ढेखालो ... | गाळलेले सोन्या-रुप्याचे दागिने. | जूत ... ... | सोबती. |
| | | कांथी ... ... | अडचण. |
| | | रेंकटी ... ... | ढोरें. |

सागर–वाघऱ्यांच्या टोळींतील धाराळ. यांचें काम गांवांतून शिधा आणणें आणि वाघरी बाहेर गेले असतां तळ राखणें.

टोळी जमविण्यासाठीं किंवा साथीदारांचें लक्ष वेधण्यासाठीं ते कोल्ह्यासारखा शब्द करतात. तसेंच गुन्हा करतांना ते हलकेच शीळ फुंकतात.

**उपजीविकेचीं दर्शनीं साधनें:**–कोळ्यांचा मुख्य धंदा शेती होय. ते आंबे, मोहाचीं फुलें, सरपण विकतात, गाड्या हांकतात, हातगाड्या

ओढतात, आणि सुरतेकडे गवंडी काम करतात, मासे धरतात व होड्या हांकतात. कांहीं सरकारी खासगी जागलकी, व गिरणी, रेल्वे, पोलिसांत नोकरी करतात. त्यांना माग काढण्याचेंही काम मिळतें. कोळ्यांतील जमीनदारांना ठाकूर म्हणतात. त्यांच्या बायकांना गोषा असतो.

**वेषांतरः**– रजपूत, ठाकूर, बारोट, पाटीदार यांचा वेष ते उत्तम प्रकारें घेतात. ते कधीं कधीं नानकशाही साधु व ब्राह्मणांचा वेष घेतात. पण अडाणीपणामुळें त्याची त्यांना नीट बतावणी करतां येत नाहीं. गुन्ह्यांचे वेळीं ते लंगोटी नेसतात. आणि गुरांच्या केंसांच्या " भुक्यां"नीं आपलीं तोंडें झांकतात.

**गुन्हेः**– ते घरफोडी, चोरी, गुरांची आणि पिकांची चोरी, आग लावणें, मालगाडीवर चोरी, घरावर किंवा रस्त्यावर दरोडा, बी. बी. व सी. आय. आणि आर. एम. रेल्वेच्या मालगाड्यांत चोऱ्या वगैरे गुन्हे करतात. लोकांना दहशत बसण्यासाठीं किंवा सूड उगविण्यासाठीं ते जबर दुखापत व खूनही करतात. खेडा जिल्ह्यांतील बोरसद व आनंद तालुक्यांतले पाटनवाडीये कोळी पैसे घेऊन मारेकऱ्याचें काम करतात. अहमदाबाद आणि काठेवाडामधील कोळी पैसे घेऊन चोरलेलीं जनावरें परत देतात. आणि काठेवाड आणि गुजराथेंतल्या संस्थानांतील कोळी भूल देऊन चोरी करतात. याशिवाय बेकायदेशीर रीतीनें दारू, मीठ तयार करणें आणि चोरून अफू आणणें हे गुन्हेही कोळी करतात.

**गुन्ह्यांची पद्धतिः**– घरफोडीबद्दलची माहिती ते स्थानिक स्नेह्यांकडून काढतात. पण बहुधा ते दिवसां घरें हेरून ठेवितात. आगाऊ शोध न आणवितां रात्रीं इकडे तिकडे हिंडून एखाद्या एका बाजूच्या घरावरही कधीं कधीं ते धाड घालतात. कोळी नोकर आपल्या जातभाईंना आपले मालकाचे घराची खबर देतात, आणि ते गुन्हा करून गेल्यावर

पोलिसच्या तपासासंबंधीं त्यांना बातमी पोंचवितात. ह्मणून कोळी नोकरावर पोलिसांनीं नजर ठेवावी. अंधेर पडल्यावर व पोलीस गस्तीला निघण्यापूर्वीं कोळी घराबाहेर पडतात, आणि पडक्या इमारतींत, किंवा आडरस्त्याच्या देवळामशिदींत, किंवा स्नेह्याचे घरीं संधि सांपडेपर्यंत वेळ घालवितात. रात्र बरीच झाली आणि जिकडे तिकडे सामसूम झालें म्हणजे मग टोळी नवीन तोडलेल्या काठ्या आणि ( खातरीया ) आंकडीची काठी घेऊन जें घर फोडावयाचें तेथें जातात. कांहींजण पाळतीवर राहतात, आणि कांहीं रुमाली पद्धतीनें मागच्या भिंतीला (पुढची भिंत फोडणें अपशकुनी समजतात. ) धारें पाडतात. आंत भिंतीजवळ कोणी नाहीं अशी खात्री करून घेण्यासाठीं आंत काठी घालून ती इकडे तिकडे फिरवितात. नंतर एक दोघे किंवा तिघे चौघे धाऱ्यावाटें आंत जातात, आणि माल घेण्यासाठीं दोघेजण बाहेर उभे राहतात. आंत गेलेल्या इसमांपैकीं कांहींजण घर शोधतात, आणि बाकीचे लाठ्या, सुऱ्या घेऊन निजलेल्या इसमांवर नजर ठेवितात. कोणी जागें झालें आणि आरडाओरड करितात असें दिसलें, म्हणजे हत्यारें दाखवून आणि मारपिटीची तंबी देऊन ते त्यांना गप्प करतात. अन्न खेरीजकरून जें हातीं पडेल तें ते उचलतात आणि दारावाटें किंवा खिडकीवाटें निघून जातात. माग लागूं नये म्हणून गुन्ह्याच्या ठिकाणापर्यंत व तेथून थोडेंसें दूर परत, कोळी लोक चवड्यावर चालत जातात. आपल्या गांवाशेजारच्या गांवीं घरफोडी करणें झाल्यास ते आपले जोडे, फाजील कपडे वगैरे जेथें गुन्हा करावयाचा त्या गांवाबाहेर काढून टोळींपैकीं एकाच्या स्वाधीन करतात आणि गुन्हा केल्यावर त्या ठिकाणीं परत येऊन कपडे, जोडे घालून परततात. कोळ्यांनीं पाडलेलें भोंक बरेंच मोठें व ओबडधोबड असतें. माळा फोडणें, लहान खिडक्यांच्या झडपा फोडणें किंवा काढून टाकणें, माळवदावर किंवा वरच्या मजल्यावर चढून खिडक्यांचीं दारें बिजागऱ्या वरून उचलणें इत्यादि मार्गांनींही ते घरांत शिरतात

पालनपूर, राधनपूर, पट्टण येथील कोळ्यांशिवाय इतर कोळी टोळी करून घरांवर दरोडा घालीत नाहींत. गुजराथी कोळी हाडाचेच रस्तालूट करणारे आहेत. त्यांची टोळी रस्त्यावर एखाद्या सोईस्कर जागीं दडून बसते. ज्याला लुटावयाचें त्याला मागच्या मुक्कामाला हेरलें असतें. टोळींतला एखादा इसम त्याच्याबरोबर जातो आणि आपल्या सोबत्यांना शिकार आल्याची इशारत देतो. त्यासरशीं टोळी बाहेर पडते. कांहींजण गाडी थांबवून धरतात, तर कांहीं तिची झडती घेतात, आणि वाटसरूंना चोपून त्यांच्या अंगावरची चीजवस्त आणि गाडींतलीं बोचकीं व भांडींकुंडीं काढून घेतात. कोणी आडवें आलें कीं पार बायकापोरांसुद्धां जबर दुखापत किंवा खून होईपर्यंत ते ठोकून काढतात. गुरांची चोरी ते येणेंप्रमाणें करितातः— रात्रीं गोठ्यांत शिरून, मुशाफरांचीं किंवा गाडीवाल्यांचीं जनावरें मुक्कामाच्या ठिकाणाहून हांकून नेऊन, किंवा हांकणारे पेंगत असतां गाड्या हळू चालतात अशा वेळीं एक बैल सोडून, ते बैल चोरतात. गाडी वांकडी तिकडी चालूं लागल्यावर हांकणारा जागा होतो, आणि मग त्याला बैल गेल्याचें कळतें. कोळ्यांचा विशेष डोळा बैलांवर आणि म्हशींवर असतो. ते कधीं कधीं उंट घोडेही चोरतात, पण शेळ्या मेंढ्या फारसे चोरीत नाहींत. पाटणवाडीये शिवायकरून ते गाई बहुधा चोरीत नाहींत. चोरलेलीं जनावरें ते लागलींच लांबवर नेतात, आणि मालकांनीं हातदाबी केली ह्मणजे तीं त्यांना परत देतात. काठ्या आणि दुसरीं हत्यारें घेऊन पिकांची चोरी ते बहुधा रात्रीं करतात. राखणदारानें ओरड केली आणि शेजारच्या शेतांतले लोक मदतीला आले तर ते मोठी मारामारी करतात. खेडा जिल्ह्यांतले कोळी मालगाड्या लुटतात. ते रेल्वेवर नोकर असल्यामुळें मालाची चढउतर करणें, गाड्या एका बाजूला नेणें वगैरेंची त्यांना माहिती असते. त्यामुळें चालत्या गाडीवर उडी मारून जाण्यांत व गाडीवरून उडी टाकण्यांत ते बडे धीट होतात. प्यासेंजर गाडीचे सामानसुमानाचे डबे ते रात्रीं न्याहाळून ठेवितात, आणि संधि सांपडल्यास मागच्या बाजूनें आंत

शिरतात. तिकडे जर पहारा असला तर पुढच्या बाजूनें थोडेसें पुढें जाऊन गाडी चालूं लागल्यावर ते फळीवर उडतात व दारावाटें शिरतात, आणि दार लागलें असल्यास पुढच्या डब्यावाटें शिरतात. चालत्या गाडीच्या आवाजांत हें सर्व बिलकुल ऐकूं येत नाहीं. काम झाल्यावर गाडी उताराजवळ किंवा स्टेशनाजवळ पोंचून तिचा वेग कमी झाला ह्मणजे ते उतरतात. बफरवर सरपटत जाऊन ते मालगाड्या उभ्या असतांना त्यांत शिरतात. गाड्या चालूं झाल्या ह्मणजे ते मालाच्या डब्यावर चढून जातात आणि धान्याचीं पोतीं खालीं लोटतात. तीं त्यांचेखालीं उभे ठेविलेले साथीदार उचलून नेतात. खालीं असलेले लोक काड्या उजळून गाडींतल्या साथीदारांना इशारत देतात. कोळी मोठे खुनशी असतात. ज्याचें वाकडें असेल त्याच्या घराला किंवा सुडीला आग लावून ते सूड उगवितात. पाटीदार आणि वाणीलोक कोळ्यांना पैसे देऊन त्यांचेकडून आपले वैऱ्याचे घराला आग लावितात. अफू पिकविणाऱ्या संस्थानांच्या सरहद्दीवरचे कोळी चोरून अफू आणतात, व आपल्या शेतांत पुरून ठेवून किरकोळीनें विकतात. गुन्हेगार टोळ्यांत एकाच गांवचे लोक नसतात. त्यांत ते निरनिराळ्या गांवचे लोक भरतात. त्यांतला एखादा इसम मेला तर त्याच्या घरावर निंबाची डहाळी टाकतात. याप्रमाणें त्याच्या कुटुंबाला मरणाची बातमी समजते आणि त्याचे आप्त स्तब्ध राहतात.

**गुन्ह्यांचीं उपकरणें**:– कोळ्यांचें घरफोडीचें मुख्य हत्यार ह्मटलें ह्मणजे " गणेशीया " किंवा " खातरीया " होय. गुन्ह्याचे वेळीं त्यांचे कमरेला म्यानांत मोठा सुरा असतो. त्याला 'चर' ह्मणतात. शिवाय करीयलीढांग किंवा लाठी ( भरदार काठी ), धारिया ( तीक्ष्ण कोयता लाविलेला बांबू ), वान्सी ( दांते असलेला विळा लाविला आहे असा बांबू ), काटोर किंवा कातरीया ( तीरकमठ्यासारखें कठिण लांकडाचें कातड्यांत मढविलेलें तीन फूट हत्यार ) हींही त्यांच्याजवळ असतात.

काटोर गरगर फिरवून मारलें असतां सुमारें पन्नास यार्ड जातें आणि चांगलें बसलें तर तंगडीच मोडतें. तीरकमठा, तलवारी, किल्ल्यांचा जुडगा, काड्याची पेटी, मेणबत्तीचा तुकडा हीं कधीं कधीं त्यांच्या-जवळ असतात.

**चोरीच्या मालाची निर्गतिः–** चोरीचा माल ते शेतांत, उकिरड्यांत, गवताच्या गंजीखालीं, झाडांच्या ढोलींत, विहिरीच्या किंवा डोहाच्या पाण्याखालीं छपवून ठेवितात. कधीं कधीं ते तो आपल्या घरांत चुलीखालीं, माळ्यांत, पोकळ बांबूंत, गोठ्यांत, बिळांत, अगळीच्या भोंकांत ठेवितात. तपास मंदावला ह्मणजे माल गाळून सोनार, पाटीदार, गिरासे, वाणी, बोहरी, मेमन, लोहार यांच्या मार्फत विकतात. असा संशय आहे कीं, गांवकामगारांचाही त्यांत वांटा असतो. चोरीचें कापड ते गांवच्या वाण्याला विकतात, किंवा तें गोदडींत शिवून टाकतात; नाहीं तर तें जाळून टाकतात आणि जळालेले कांठ देऊन टाकतात. चोरलेलीं जनावरें लांब एका बाजूला ठेवितात, आणि मालकानें स्वतः किंवा आडत्यामार्फत निमीशिमी किंमत दिली ह्मणजे संकेतस्थानीं जनावरें आणून सोडतात. याप्रमाणें न झालें तर तीं खाटकांना किंवा लांबच्या बाजारांत नेऊन विकतात. चोरलेल्या शेळ्यामेंढ्या लागलीच खाऊन चट्ट करतात. चोरलेले घोडे आणि उंट सिंध प्रांतांत नेऊन विकतात. संभावित दिसणाऱ्या एखाद्या पाटीदार, गिरासी किंवा वाणी वगैरेंच्या हातून भारी किंमतीचा चोरीचा माल ते घरीं पोंचता करतात.

---

## मांग.

**संज्ञाः–** मांगांना गुजराथेंत " मांगेला," आणि कर्नाटकांत " मादर किंवा मादीगरू " ह्मणतात. त्यांच्या मुख्य पोटजाती खालीं लिहिल्या-प्रमाणें आहेतः– नुडा किंवा खोत्रा, होलड, रखवालदार किंवा घाटोळी, ढाकेलवार, पेड्या, मोची.

**वस्ति**:– महाराष्ट्रांत व दक्षिण महाराष्ट्रांत त्यांची वस्ति गांवोगांव आहे. पुणें, सातारा आणि कोल्हापूर येथें त्यांचा उपसर्ग फार आहे.

**गुन्ह्यांचें क्षेत्र**:– ते बहुधा आपल्या गांवच्या आसपास गुन्हे करीत नाहींत. पण गांवापासून सुमारें तीस मैलांच्या आंत बाहेर परजिल्ह्यांत किंवा तालुक्यांत ते गुन्हे करतात. एकदां सोलापूरच्या मांगांनीं शंभर मैलांवर कोल्हापुराकडे दरोडा मारला. डाकेलवार फिरस्ते आहेत. बाकीचे ठायीं बसे आहेत.

**लोकसंख्या**:– त्यांची लोकसंख्या सुमारें अडीच लाख असून अहमदनगर, खानदेश, नाशिक, पुणें, सातारा, सोलापूर, विजापूर, धारवाड, बेळगांव, कोल्हापूर वगैरे ठिकाणीं त्यांचा विशेष भरणा आहे.

**स्वरूप**:– ते खुनशी, क्रूर, तापट, बेफाम, धट्टेकट्टे, बांधेसूत, तालिमबाज व चपळ असतात. त्यांचा वर्ण काळा, शरीर रांठ, मुद्रा उग्र आणि राहणें व खाणें घाणेरडें असतें. ते मेलेलीं जनावरें खातात, व फार दारूबाज, गांजेकस असून तंबाखू ओढतात. मांगवाडा ऊर्फ मादरगेरी गांवाबाहेर महारवाड्यापासून दूर असतो. ते बेलभंडाराची शपथ घेतात व आपल्या जातींत चोरी करीत नाहींत. त्यांच्या जमातीच्या मुख्याला “ देशमेहत्रे ” ह्मणतात. आणि गुन्हेगारांच्या मुख्याला “ सरनाईक ” ह्मणतात. त्यांच्या बायका बुचडा आगोळाशिवाय बांधतात, हातांवर विंचू, साप गोंधतात, आणि बोटावर उभ्या तीन रेघा व एक आडवी व हाताचे पाठीवर सूर्यफुलें गोंधतात. त्यांच्या लुगड्याला कासोटा नसतो, व चोळ्या अपऱ्या असतात. त्या अंगावर पितळेचे कथलाचे दागिने घालतात. पुरुषांचें धोतर घाणेरडें आणि पागोट्याच्या चिंध्या असतात. ते पेहरण घालतात आणि अंगावर धोतर घेतात. ते आपापसांत हजामत करतात, ह्मणून त्यांची हजामत वाढलेली असते.

**भाषा**:– ते राहतात त्या जिल्ह्याची भाषा बोलतात. त्यांचें बोलणें बहुधा दांडगें येतें.

## सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| टिकरी हिकविती, तिकरीया नेमितो | शिवी देतो. |
| हिडका, हिडकी | मारामारी. |
| हिडुक ... ... | मार. |
| कोर, लिपडा कपडल | घोंगडी, कापड. |
| रेगाळ, परड, तिंकन ... ... | ब्राह्मण. |
| कुडतुल ... ... | पेटी. |
| धादल, खडल ... | फोडणें. |
| करपटी ... ... | भाकरी. |
| येडुल, नक्या ... | बैल. |
| वरावला ... ... | आला. |
| कुणी वरवल ... | कोणी तरी येईल. |
| डंडल, पेडल ... | तपासाला आला. |
| कुडपळ ... ... | गाडी. |
| गागरु, गांगल ... | चांभार. |
| पेडणें ... ... | पळून जाणें. |
| पकुचे ... ... | कोंबडा. |
| खुमर ... ... | दार. |
| तवला ... ... | खुनासहित दरोडा. |
| हेडकला... ... | जबर दुखापतीसहित दरोडा. |
| नायाल, झुकैल | कुत्रा. |
| आपलु आपलु शेग | माल वांटा. |
| पेडम, भुरा ... | युरोपियन. |
| दटव अथवा... दटीव | खा. |
| किवन्या, किजवा | डोळा. |
| खुमरा ... ... | चेहरा. |
| गवना ... ... | पाय. |
| धुपा ... ... | विस्तव, अग्नि. |
| तनकुला, यलच ओहिळी | मांस. |
| नेकले, गोरीन नेमनी. | बकरूं. |
| येरल ... ... | देव. |
| हलक, हलवा ... | सोनें किंवा चोरीचा माल. |
| चुनखा ... ... | सोनार. |
| हिंगला ... ... | गुजर. |
| नान ... ... | चांगलें. |
| कोबल, कोलकल | धान्य. |
| दुबक, फुकणी ... | बंदूक. |
| झिरज ... ... | केंस. |
| कूरम, कुरमा ... | घोडा. |
| कूड, कुडच ... | घर. |
| करका, कोरका | हात. |
| नाली, खवडी ... | घरफोडी. |
| कसू ... ... | कडब्याची गंज. |
| तिक, मंगल भनप. | पाळत ठेवणें. |
| बेय, बोय ... | दिवा. |
| वाजी ... ... | जमीन. |
| चिलड, चिल्लड ... | कुलूप. |
| चनपतो, कनीवतो | पहातो. |
| सोबाडा, सोंबाला | मनुष्य. |
| अंबुज ... ... | मांग. |
| अरील, गोडगा, दांदल ... | मराठा. |
| पेना, घटर, भुकर | महार. |

| | |
|---|---|
| खारपे, दमुल ... | पैसा. |
| सस इमा ... | खुनी. |
| ऊन ... ... | चांदणें. |
| झिमक, झुमेन ... | मुसलमान. |
| रय ... ... | रात्र. |
| शिखरे ... ... | नाक. |
| कलामा ... | भांडें. |
| झुकील, झुकीर मुंगसी | पोलीस. |
| पूयाळ ... ... | गरीब. |
| मातु, शेगा, यमा. ... | जबरीची चोरी. |
| बोयला ... ... | रामोशी, जागल्या. |
| निर्तकले ... | नदी. |
| ताड ... ... | दोरी. |
| हुरकत, पेडा, हुशकडा ... | पळ. |
| किंगल वाला, धुलाकिया. | भंगी. |
| येमल ... ... | हैस. |
| गोरील ... ... | मेढरू. |
| तिकने ... ... | बसणें. |
| तोलकला, तोलकवला | निजला. |
| निलींगी, कोडपन निलगंटी | काठी. |
| आपाल, वापाल | दगड. |
| गोडला, गोयडा | ऊस, गूळ. |
| कट्टल, कटनूल, धाराळी. | तलवार, हत्यार. |
| सेग, सेद ... | घेणें. |
| चवरे ... ... | दांत. |
| नकरवामा, नकवाला | तेल. |
| मूच, नली ... | चोरी. |
| अंडतुले ... | बायको. |
| फर्मान ... ... | जोहार. |

**उपजीविकेचीं दर्शनीं साधनें:–** मांग जागलकीवर असतात, व ते त्यासंबंधानें इनामजमीन वाहतात. ते गांव सफा करतात, व वाजंत्रीपणाही करतात. कांहीं जळवा लावितात, कांहीं बैलांना बडवितात, पुष्कळजण वाध्याचे व अंबाडीचे सोल, गोफणी, शिंकीं, केरसुण्या करतात. कांहींजण जोडे व कातडीं काम करतात. फांशी देणारे मांग असतात. डाकेलवार मांग या जातीचे भाट (गुरू) असतात आणि ते भीक मागतात.

**वेषांतर:–** मांग बहुधा गोसाव्याच्या वेषानें घरें न्याहाळून ठेवितात. गुन्ह्याच्या वेळीं ते धाटे बांधतात, तोंडाला राख किंवा काजळ फांसतात आणि कमरेपासून डोक्यापर्यंत कांबळीं बांधतात.

**गुन्हे:–** महाराष्ट्रांतील मांग टोळ्या करून जबरीची चोरी, दरोडे, घरफोडी, जनावरें चोरणें, त्यांना विष घालणें, सर्व प्रकारच्या चोऱ्या,

खरे म्हणून खोटे दागिने विकून ठकबाजी करणें वगैरे गुन्हे करतात. रात्रीं चोरी व घरफोडी करण्यांत ते पटाईत असतात. ते चोरीचा माल घेणाराला जंगलांत एकांतठिकाणीं नेऊन लुटतात, किंवा ' बोथिंगा ' (थाप) देऊन त्याचे पैसे लुबाडतात. सातारा जिल्ह्यांतले " भिसी " व " सोनवले " अट्टल चोर आहेत. कर्नाटकांतले मादर लहानसान चोऱ्या करतात आणि गुरांना विष घालतात. हक्कावरून शेतकऱ्याचें व त्यांचें वांकडें आलें ह्मणजे किंवा दुष्काळ पडला आणि कातड्याला भाव आला ह्मणजे ते जनावरें मारतात. महाराष्ट्रांत हक्कवहिवाटीसंबंधानें महारमांगांचे नेहमीं तंटे व मारामाऱ्या होतात. दरोडेखोर मांगांबरोबर त्यांच्या बायका क्वचित् स्वयंपाकपाणी करण्याला जातात.

**गुन्ह्यांची पद्धतिः**– मांगांचा धंदा दोरखंड, केरसुण्या विकण्याचा असल्यामुळें लुटण्याजोगें घर त्यांना आगाऊ पाहून ठेवतां येतें. ज्या गांवीं गुन्हा करावयाचा तेथल्या मांगांमार्फत किंवा वहिमी लोकांमार्फत किंवा ज्याचें घर लुटावयाचें त्याच्या वैऱ्यामार्फत त्यांना बातमी लागते. अशा प्रसंगीं बातमी देणाराला कमाईचा वांटा मिळतो. सणानिमित्त किंवा कार्यानिमित्त लोक चीजवस्त अंगावर घालतात. तेव्हांही ते संधि साधतात. सरनाईक दहा ते विसांची टोळी करून दरोडा घालतो. जो चौर्यांत अट्टल, बोलण्यात हुशार, अकलेचा पुरा, व चारचौघांना घेऊन चालणारा असा असून ज्याचें जमीनदारांपाशीं व गांवकामगारांपाशीं वजन असतें अशाला टोळींतले लोक नाईक निवडतात. गुन्ह्यासंबंधानें कोणीं काय काय करावयाचें हें सर्व तो साधकबाधक गोष्टींचा विचार करून मुक्रर करतो. ह्या मसलतीच्या बैठकींत ते रगड दारू झोंकतात. नाईक टोळीबरोबर गुन्ह्याला जातो किंवा दुसरा इसम नेमून देतो. तो बरोबर गेला तर त्याला एक वांटा जास्त मिळतो, न गेला तरी त्याचा वांटा त्याला मिळतो. ठाम बेत झाल्यावर ते बहुधा अंधाऱ्या रात्रीं गुन्हा करतात. जेथें गुन्हा करावयाचा

त्याच्या आसपास कोणाला न दिसेल अशा ठिकाणीं टोळी नेमल्यावेळीं जमते. तेथें जोडे आणि फाजील कपडे एका इसमाच्या ताब्यांत देतात. आणि ज्या घरावर छापा घालावयाचा, त्याच्या आसपास ढीग घालून ठेवण्यासाठीं पुष्कळसे दगड घेऊन जातात. गोफणीचा नेम मारण्यांत मांग फार तरबेज असतात, आणि कोणी अंगावर आले किंवा पाठलाग केला तर ते गोफण चालवितात. त्यांची घरावर दरोडा घालण्याची रीत दोन प्रकारची आहेः– दरोडखोर मशाली घेऊन बंदुकीचे बार किंवा आपटबार काढीत धोंडे फेंकीत व आरोळ्या ठोकीत गांवांत घुसतात, आणि घराबाहेर येऊ नका असें लोकांना बजावितात. किंवा चोरपावलानें दरोड्याचे घराकडे जातात. तेथें कांहीं थाप मारून घरांत जाण्याचा प्रयत्न टोळींतील एखादा इसम करतो. त्याचें न जुळलें तर कुऱ्हाडीनें दार फोडतात, किंवा वाशावरून अगर शिडीनें भिंती चढून आंत जातात. टोळींतील कांहींजण घरांत शिरतात आणि बाकीचे वाटा रोंखतात. आंत शिरल्यावर मशाली पेटवितात. घरच्या लोकांना माराची दहशत घालून कोठें पैसे जवाहीर आहे तें दाखवावयाला लावितात. संशय टाळण्यासाठीं ते आपापसांत कधीं कधीं कैकाडी किंवा हिंदुस्थानी शब्द बोलतात. पाठलाग करणाऱ्यांच्या हातून सुटण्यासाठीं मांग वाटेल तें घोर कृत्य करतात. माल काढून दिला नाहीं तर ते मारपीट करतात. ते विनाकारण कोणाचे अंगावर हात टाकीत नाहींत. बायकांच्या कानानाकांतला दागिना सहज काढतां आला नाहीं, तर तो ते हिसकून घेतात, मग कान तुटो किंवा नाक तुटो. जो तो आपलें काम बरोबर करतो किंवा नाहीं याजवर सरनाइकाची देखरेख असते. काम झालें म्हणजे सरनाईक "चालो" "पेड" "निबला" ह्मणतो. त्यासरसें टोळींतील लोक व्यवस्थित रीतीनें मागें फिरतात. आणि कोणी आड येऊं नये म्हणून गोफण चालवितात. नंतर ते कपडे जोडे ठेविले असतात त्या संकेतस्थानीं जातात. तपास लागूं नये म्हणून ते इतर जातींच्या विशिष्ट जिनसा रस्त्यानें टाकून देतात, आणि

आडरस्त्यांनीं जातात. संकेतस्थानीं किंवा गुन्ह्याच्या ठिकाणापासून दोन तीन मैलांवर नाईक टोळींतील लोक गोळा करतो आणि कमाईची वांटणी करतो. वांटणीच्या वेळीं आपसांतील बेइमानामुळें व गैरविश्वासामुळें बहुधा तंटेबखेडे होतात. मांग एका वेळेला तीन तीन घरेंही लुटतात. चार ते दहांची टोळी करून ते गाड्या किंवा तांगे सूर्यास्ताच्या सुमारास लुटतात. त्यांच्याजवळ काठ्या–कुऱ्हाडी असतात. टोळींतील दोन इसम रस्त्यावर पानसुपारी खात बसतात, आणि बाकीचे जवळपास दडून राहतात. गाडी किंवा तांगा आला ह्मणजे ते एकदम उडी मारून घोडे अगर बैल थांबवितात; आणि बाकीचे आपल्या दडण्याच्या ठिकाणाहून बाहेर पडतात, हांकणाराला खालीं ओढतात आणि वाटसरूंना लुटतात. कधीं कधीं वाटसरूंना झाडाला किंवा गाडीला बांधून ते चालते होतात. हें सर्व कृत्य इतक्या झपाट्यानें उरकतात कीं मुशाफराच्या लक्षांत गुन्हेगार रहात नाहींत. मांग घरफोडींत फार पटाईत आहेत. ते बहुधा " बगली " पद्धतीनें घरफोडी करतात. एक किंवा दोघेजण घरांत शिरतात आणि बाकीचे बाहेर पाळत करतात. ते धाब्याला धारें अशा शिताफीनें पाडतात कीं उकरलेली माती एके बाजूला सारून आंत पडूं देत नाहींत. त्यामुळें आंतलीं माणसें जागीं होत नाहींत. घरांत शिरल्यावर तेथें दिवा सांपडला तर ते लावितात; निजलेल्या इसमांपैकीं कोणाचें पांघरूण एकीकडे सरलें असल्यास ते त्याच्या तोंडावर घालतात. आंतील इसम जें देतील तें बाहेरचे इसम चलाखीनें घेतात, आणि आंतल्या इसमांना दग्याची इशारत वेळेवर देतात. कांहीं मांगांमध्यें अशी चाल आहे कीं, बाहेरचा इसम चुटकी वाजवीत राहतो. चुटकी बंद पडली म्हणजे धोका आहे असें समजावें.

मांग बहुधा दिवसां किंवा त्यांच्या कुळधर्माच्या दिवशीं चोरी करीत नाहींत. ते आपल्या टोळींत महार, लिंगाईत, जंगम वगैरे इतर जातींचे

लोक घेतात. गुन्हा कबूल केला तरी ते चोरीचा सर्व माल काढून देत नाहींत. ते येणेंप्रमाणें 'बोथिंगा' देतात– चोरीचा माल घेणाराशीं सौदा चालला असतांना टोळींतील एक इसम पोलिसच्या वेषानें येतो, त्यासरसें मांग दागिने आणि पैसे घेऊन एका बाजूनें पळतात आणि माल घेणारा दुसऱ्या बाजूनें पळतो. किंवा माल घेणारा इसम दागिन्यांसह घरीं चालला असतां पोलिसच्या वेषानें एकजण त्याला वाटेंत अडवितो आणि त्याचे दागिने हिसकावून घेतो.

**गुन्ह्यांचीं उपकरणें**:–त्यांचें घरफोडीचें हत्यार "खनतोडा" होय. तो फूटभर लांबीचा लोखंडी बत्ता असून त्याचे टोंकाला टाकीसारखें असतें. दरोडा घालतांना ते गोफण, धोंडे, काठ्या, मशाली, कुऱ्हाड, सुऱ्या, कट्यारी, मिळाल्यास तलवारी, बंदुका, आणि आपटबार बरोबर नेतात. त्यांची लाठी खांद्याइतकी लांब असते. असें ह्मणतात कीं, मांग जाड बाजूनें लाठी धरतात आणि रामोशी बारीक बाजूनें धरतात. संशय येऊं नये ह्मणून ते घरून काठ्या न नेतां रस्त्यानें गोळा करतात.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**– लुटीमध्यें रोकड मिळाली तर टोळींतील इसमांना एक व सरनाइकाला दोन हिस्से मिळतात. कांहीं टोळ्यांमध्यें गुन्ह्यांत जें नाईक स्वतः मिळवितो, त्यावर त्याचीच मालकी असते; आणि शिवाय टोळीच्या कमाईतही त्याचा वांटा असतो. नवशिक्यांना बहुधा रोकड देतात. कारण पोलिसनें पकडलें असतां ते चोरीचा माल काढून देतील किंवा त्याची त्यांना बरोबर व्यवस्था लावितां येणार नाहीं, अशी त्यांना भीति वाटते. ते चोरीचा माल पुरून ठेवितात, आणि पोलिसचा तपास मंदावला म्हणजे तो तसाच सोनार, सावकार, कलाल, बांगडीकासार किंवा आपले आप्तांच्या गांवकऱ्यांना विकतात.

# मांग गारोडी.

**संज्ञा**:—यांची जात मागापेक्षां हलकी असते. त्यांचा व मांगांचा हुक्कापाणी होत नाहीं. त्यांच्या बायकांना कोंकण व महाराष्ट्रांत काथकडणी ह्मणतात.

**वस्ति**:—हे फिरस्ते आहेत, व मुंबई इलाखा, मध्यप्रांत, वऱ्हाड आणि निजामशाही ह्यांमध्यें दृष्टीस पडतात.

**गुन्ह्यांचें क्षेत्र**:—त्यांच्या टोळ्या निरनिराळ्या राहाळांत तेवढ्याच्या तेवढ्यांत भटकतात. ते आपल्या तळाच्या आसपास गुन्हे करतात. पण लागाची बातमी लागली तर रात्रींतून गुन्हा करून वीस मैल जातात. एकदां एक मांग गारोडी तळापासून चाळीस मैल खिसे कातरण्याला गेला होता.

**लोकसंख्या**:— खानेसुमारींत त्यांची निराळी गणती झाली नाहीं.

**स्वरूप**:—पुरुष मध्यम उंचीचे, सशक्त, चपळ, टणक, आळशी आणि कामकंटाळे असतात. ते पंचा किंवा लंगोटी लावितात, बंडी अगर अंगरखा घालतात, कमरेला काचा बांधतात, कसेंबसें जुनें पागोटें डोक्याला गुंडाळतात, आणि खांद्यावर उपरणें घेतात. ऐपतदार असतील ते जोडे घालतात. बायका अपरें व भोंगळ लुगडें आणि चोळी नेसतात. जुन्या कापडाची झोळी मांग गारोडणींचे खांद्यावर लटकते, तिच्यांत जें सांपडेल तें त्या कोंबतात. त्या पोत घालतात आणि लग्नांत किंवा सणावाराच्या दिवशीं कुंकूं लावितात. मुलें कधीं कधीं गळ्यांत पितळेचे किंवा रंगीत सुती गोफ घालतात. पुरुष आणि बायका यांचे केंस बिनविंचरलेले व पिंजारलेले दिसतात. ते गलिच्छ आणि भांडखोर असतात. पोलिस पोस्टाचीं गांवें टाळून ते बाजारच्या अगर मोठ्या गांवाच्या टप्प्यांत गवती पालांतून उतरतात. ते आपला संसार भाकडम्हशींवर नेतात.

त्यांच्याबरोबर बायका, पोरें, कुत्रीं, तट्टें, गुरेंढोरें असतात. त्यांच्या तांड्यापैकीं एकजण झोरका असतो. बाहेरच्या लोकांशीं बोलणें चालणें तो करतो.

**भाषाः**—ते अशुद्ध मराठी बोलतात.

## मध्यप्रांतांतील मांग गारोड्यांचे सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| येलगु ... ... | पोलीस. |
| कौरी ... ... | चोरी. |
| लिपट, लट्ट ... | चोरीचें कापड. |
| लफ ... ... | पैसे. |
| दमरी ... ... | रुपया. |
| कपुलुन ... ... | पळ. |
| जकिया ... ... | कुत्रा. |
| झुमनी ... ... | मुसलमान. |
| नकोर ... ... | बैल. |
| झमैसी ... ... | म्हैस. |
| सोंड, सोंडी ... | मुलगा, मुलगी. |
| केटमी ... ... | आई. |
| तिपोनी नको ... | सांगूं नको. |
| येलगु वैरला, कुऱ्यार तल | पोलीस येतो आहे बघ. |
| लिपट कपुरला तुगज ... | माल आहे. चोर. |

## दक्षिणेंतील मांग गारोड्यांचे सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| आसरा ... ... | दहा. |
| सुती ... ... | वीस. |
| कपसुती ... ... | पंचवीस. |
| करपटी ... ... | भाकर. |
| खामोसा ... ... | पैसे. |
| लिपडा ... ... | कापड. |
| झुकैल ... ... | कुत्रा. |
| नाकोड ... ... | बैल. |
| इरमाची ... ... | म्हैस. |
| खरी ओल ... | आला. |
| घनल ... ... | भांडें. |
| थामानिया ... | ब्राह्मण. |
| दांडाल नाटीया | कुणबी. |
| कूड ... ... | घर. |
| कूर्मा ... ... | घोडा. |
| मर्कल ... ... | बकरा. |
| निरोमा ... ... | पाणी. |
| रिपाइ ... ... | पोलीस. |
| रोजदार ... ... | फौजदार. |
| किव ... ... | सोनें. |
| खपड, पेहेड ... | पळ. |
| पंक्ति ... ... | कोंबड्या. |
| कोबल ... ... | धान्य. |
| गवना ... ... | जोडा. |
| खोयरा ... | रामोशी. |
| भुकरीया ... | महार. |
| चिमगीया ... | मांग. |
| खापा ... | रुपया. |

**उपजीविकेचीं बाह्य साधनेंः**— भीक, खेड्यापाड्यांनीं जादूचा तमाशा करणें, भाकडम्हशी, पाड्या, तट्टें विकणें, म्हशी भादरणें

वगैरेंवर मांगगारोडी पोट भरतात. गवळ्यांजवळून भाकड म्हशी घेऊन त्या गाभण झाल्या म्हणजे ते त्यांना दुप्पट किंमतीला परत विकतात. त्यांच्या बायका व्यभिचारी असतात. त्या गाणें गाऊन भीक मागतात, आणि गवत, सरपण विकतात.

**वेषांतरः**–गुन्हे करतांना ते धाटे बांधतात व आपलीं नांवें वरचेवर बदलतात.

**गुन्हेः**–बायकापुरुषांसुद्धां सर्वांना चालतां येऊं लागल्यापासून चोरीचा अभ्यास असतो. पुरुष रात्रीं गुन्हे करतात. हंगामाच्या दिवसांत विशेषेंकरून ते धान्य व कापूस चोरतात, आणि उभ्या पिकांत आपलीं जनावरें चारतात. ते कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या, ढोरें विशेषतः म्हशी चोरतात, व गुरांना विषही घालतात. त्यांच्या तळावर जाण्यास गांवकरी धजत नाहीं. कधीं कधीं ते घरफोडी, दरोडे, रस्तालूट वगैरे करतात. अलीकडे ते रेल्वेवर चोऱ्या करूं लागले आहेत. थोडासा विसार देऊन भाकडम्हशी फळविण्याचा बहाणा करून ते त्यांना दूरच्या बाजारांत नेऊन विकतात. खरे ह्मणून खोटे दागिनेही ते विकतात. त्यांच्या बायका दिवसां चोऱ्या करतात. बाजारांत खिसे कातरणें, वाळत घातलेलीं कापडें, जोडे, कोंबड्या वगैरे हलकेंच चोरणें ह्यांत त्यांच्या बायका फार पटाईत असतात.

**गुन्ह्यांची पद्धतिः**–त्यांचा तांडा फार मोठा असतो. कधीं कधीं त्यांत ऐंशी, शंभर माणसेंही असतात. तळावर बहुधा मुलें व तान्ह्या मुलांच्या आया राहतात. पण विचारलें असतां त्या चक्क सांगतात कीं आम्हांला कोणी पुरुष नाहींत. ते आसपासचीं शेतें लुटतात. रस्तालुटीच्या वेळीं ते लहान लहान टोळ्या करून मैल दोन मैल रस्ता रोखून धरतात, आणि जसजशा गाड्या, वाटसरू येतात तसे ते त्यांना लुटतात. म्हशी चरण्याला सोडल्या असतां ते त्या लांबवितात, गांवचीं गुरें आपल्या गुरांबरोबर हांकन नेतात, आणि त्यांना डागून व त्यांचीं

शिंगें कापून त्यांचें रूप असें बेमालूम बदलतात कीं धन्याला तीं ओळखतां येत नाहींत. चोरीचा माल घेणाराला ते आडरस्त्याच्या जागीं बोलावितात, आणि तेथें त्याचे पैसे लुबाडतात. ते मेंढवाड्यांतून शेळ्या, मेंढ्या लांबवितात; किंवा कळपांतून एकीकडे चरत असलेलें बकरूं किंवा मेंढरूं ते न्याहाळून ठेवितात, व मेंढक्यानें पाठ फिरविली कीं हलकेंच पकडून त्याची झपाट्यासरशी मुंडी मुरगाळतात, आणि त्याला झुडुपांत, किंवा खांचेंत टाकून तेथून निसटतात. मेंढक्या दृष्टीआड झाला ह्मणजे ते तेथें परत येऊन त्याला तळावर घेऊन जातात. तेथें त्याच्या शिंगें, कातड्याची व्यवस्था वगैरे लागलींच लावून टाकतात. भीक मागतांना किंवा तमाशा करतांना त्यांचें सर्व लक्ष एखादी शिकार हुडकण्याकडे असतें. भिक्षेच्या मिषानें त्यांच्या बायका घरें व त्यांच्या वाटा वगैरे पाहून ठेवून पुरुषांना खबर देतात. जवळ किंवा आंत कोणी नसलें तर त्या बेलाशक घरांत जाऊन हातीं लागेल तें उचलतात. चौघी पांचजणी मिळून त्या आसपासच्या बाजारांत भीक मागण्याला व चोरी करण्याला जातात. बाजारांत कोणी गांठोडें खालीं ठेविलें म्हणजे त्यावर त्या नजर ठेवितात. मालकाचें लक्ष्य दुसरीकडे गेलें म्हणजे तें गांठोडें व मालक यांच्यामध्यें त्या उभ्या राहतात, आणि लागलींच त्या तें आपल्या पाटींत घालून हलकेंच निसटतात. त्यांच्या पाटींत बहुधा चिंध्या असतात. कोणी पहात आहे असें त्यांना वाटलें, तर त्या पहिल्यानें गांठोड्यावर चिंध्या पसरतात, आणि मग तें उचलतात. गुन्ह्यांत एखाद्या मांगगारोड्याला पकडलें तर टोळींतले इतर लोक तो आपल्यांतला आहे असें कबूल करीत नाहींत, आणि मी अमक्या टोळींतला आहें असें तोही कबूल करीत नाहीं. चांगली कमाई झाली तर ते देवीचा गोंधळ घालतात.

**गुन्ह्यांचीं उपकरणें:–** काठ्या आणि गोफणी हीं त्यांचीं मुख्य हत्यारें हात. घरफोडीसाठीं ते कधीं कधीं कुऱ्हाड, खंटोडा ( लोखंडी

बत्ता ) बरोबर नेतात. त्यांच्याजवळ कुचला, धोतराही असतो. त्याची भूल देऊन ते गुन्हे करीत असावेत.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**—मांग गारोडी जवाहीर, रोकड आणि कपडे पुरुषबायकांच्या अंगावर किंवा म्हशीच्या गोण्यांत वागवितात. झाडा घेतांना पुरुषांचें गुदद्वार आणि बायकांचें मायांग तपासावें. तसेंच चोरीचा माल ते आपल्या तळाच्या आसपास किंवा जनावरें बांधतात त्या ठिकाणीं पुरून ठेवितात. ते चोरीचा माल कलालांना विकतात. चोरलेलें धान्य तळानजिकच्या कडब्याच्या गंजीखालीं लपवून ठेवितात; अगर सामलतींतल्या कुणब्याजवळ किंवा पाटलाजवळ ठेवितात; किंवा चोरल्या ठिकाणाहून दूर नेऊन ताबडतोब विकतात. थोडकेंसें धान्य बायका आपल्या कमरेला बांधलेल्या कपड्यांत लपवितात, म्हणून गरोदर दिसणाऱ्या बायकांचा झाडा घेत जावा. मौल्यवान् चोरीचा माल ते शेजारच्या जिल्ह्यांत अगर प्रांतांत असलेल्या स्वजातीच्या टोळीच्या स्वाधीन करतात. लोहार, पाटीलही त्यांना तो विकण्याचे कामीं मदत करतात. त्यांच्या बायका फार उत्तम हेर असतात. एखाद्या तांड्यांत जर पोलीस आले तर पुरुष लगेच वर्दळीला येतात, आणि बायका एकच आरडाओरड करून सोडतात. वेळ पडल्यास त्या स्वतःला आणि आपल्या पोरांना दुखापत करून घेतात, आणि पोलिसांवर भलभलते आळ घालतात; पोराची तंगडी धरून त्याला गरगर फिरवितात, आणि पोलिसला म्हणतात निघून जा, नाहीं तर मी पोर आपटतें. पोलिसनें लाजून निघून जावें म्हणून त्या कधीं कधीं लुगडें सपशेल वर करतात, किंवा नागव्या होतात. झाड्यांत जर चोरीचा माल निघाला तर पुरुषाला वांचविण्यासाठीं बायका आपल्या अंगावर गुन्हा घेतात.बायकांनीं चोरलेला माल तिच्याच कुटुंबांत ठेवितात. चोरीचें कापड ते कलालाला देऊन दारू विकत घेतात, किंवा गोण्यांत अगर गोदड्यांत शिवून संधि पाहून विकातत.

---

# मिआने.

**संज्ञा:–** उत्तराहिंदुस्थानांतील घरफोडे मिने व मिआने हे एक नव्हत. मिआन्यांच्या पोटजाती खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:–जाम, संधवानी, मोर, परेडी, मानेक, गंध, लढाणी, सुमेज, सैंतानी, बैदानी, खटिआ अथवा कटिया, भटी, सखाय, मालानी, झेड, सुमेर, वाघेर, काजर-दिये, मुल्ला, जमनी, मालेक, सम आणि धर.

**वस्ति:–** त्यांचें वसतिस्थान काठेवाड आणि कच्छ होय. ते काठे-वाडांत मालिया संस्थानांत, जामनगर संस्थानच्या किनाऱ्याच्या बाजूच्या मालिया, काजर्डा, चिकली, नवागांव येथें राहतात. धंदुका तालुक्यांत पालनपूर आणि पटीपिपलिया येथेंही ते आहेत. कधीं कधीं सिंधमध्यें ते जातात.

**गुन्ह्यांचें क्षेत्र:–** पिकें उलगडल्यावर ते सिंध, कच्छ, राधनपूर, पालनपूर व अहमदाबादेकडे जातात, आणि सर्व काठेवाडभर फिरतात. मुलतान येथें एक पीर आहे. चोरी केल्यावर पाठलाग चालू झाला म्हणजे मिआने मुलतानला जातात. ते रात्रींतून चाळीस ते साठ मैल चोरी करून उजाडण्यापूर्वी घरीं येतात. ते फिरस्ते नाहींत.

**लोकसंख्या:–** त्यांची लोकसंख्या सुमारें साडेदहा हजार आहे.

**स्वरूप:–**मिआने मूळचे हिंदू होते. पण ते पुष्कळ दिवसांपूर्वी मुसल-मान झाले. ते सिंधी लोकांप्रमाणें दिसतात. ही जात सरासरीपेक्षां अधिक उंच, जोमदार व सुस्वरूप आहे. त्यांचे अवयव ठसकदार, केंस लांब सडक, डोळे पाणीदार, दांत शुभ्र, दाढी खाशी पुंजकेदार व वर्ण काळसर असतो. त्यांना घोड्यावर बसण्याचा व शिकारीचा शोक असतो; आणि ते धूर्त, चपळ, श्रमसाहिष्णु, धीट पण क्रूर व विश्वास-घातकी असतात. त्यांच्या बायका सुस्वरूप आणि बदफैली असतात.

पुरुष तंग विजारी, अंगरखा, पसबंडी, आणि मोरवी पद्धतीचें वाटोळें निरनिराळ्या रंगांचें पागोटें घालतात. टिर्‍याभोंवतीं खाकी किंवा काळ्या रंगाचा कपडा बांधून त्याचे पदर ते विजारीवरून सोडतात, त्याला " पिचोडी " ह्मणतात. ते कधीं कधीं तांबडी किंवा खाकी टोपी किंवा हातरुमाल पागोटट्याचे आंतून घालतात, व खांद्यावर उपरणेंही घेतात. कच्छी मिआने पागोटट्याचा एक पदर मोकळा सोडतात. मिआन्यांची राहणी रजपुतांप्रमाणें असते. त्यांचा स्वभाव आनंदी असून ते फार मस्करीबाज असतात. ते करारांप्रमाणें कधींच चालत नाहींत. ब्रिटिश मुलुखांत त्यांनीं गांवांत राहिलेंच पाहिजे, असें ठरविलें गेलें आहे. कांहींना आपल्या शेतांत, गवती छपरांत ( त्यांना वंढ असें ह्मणतात ) राहूं देतात.

**भाषाः**— मिआने आपापसांत कच्छी आणि सिंधीपासून झालेली मिश्र भाषा बोलतात. तिला " करो काजडी " किंवा " कुरो कुरो " म्हणतात. त्यांना हिंदुस्थानी व गुजराथी बोलतां येतें. " मेचिओ " म्हणजे मी म्हणतों हीं पालुपदें बोलण्यांत वारंवार आलीं म्हणजे बोलणारा मिआना आहे असें समजावें. मालीये मिआन्यांचें बोलणें उद्धट असतें. ते रागावले म्हणजे " ध्या " " गडाडीया " अशी शिवी देतात.

**उपजीविकेचीं दर्शनीं साधनेंः**— कांहींजण इमानेंइतबारें शेती करतात. पण बहुतेक निरुद्योगी असतात; आणि कधीं मजुरी, कधीं शिकार, कधीं गुरखेपणा, यावर कसेंबसें पोट भरतात. क्वचित् प्रसंगीं त्यांना रामोशी म्हणून अगर वाणी लोक मुशाफरींत रखवालदार म्हणून नोकरीस ठेवितात. थोडेसे पोलिसांत नोकर आहेत. परठिकाणीं ते गाडीवाल्याचा किंवा मजुराचा धंदा करतात.

**वेषांतरः**— ते बहुधा आपणाला सिंधी किंवा जाट व कधीं कधीं गिरासिये अगर फकीर म्हणवितात. मोटा दरोडा मारतांना किंवा गुजराथत सडकेवर मुशाफरांना अडवितांना ते सांगतात कीं, आपण कस्टम

किंवा पोलीस अंमलदार अगर संस्थानचे पलटणींतले लोक आहोंत. अशा वेळीं त्यांचे अंगावर चोरलेले पोषाख, पट्टे, तलवारी असतात.

**गुन्हेः**— मालिया मिआने पक्के लुटारू असतात. बदफैली स्त्रियांवरून किंवा सरकारविरुद्ध खऱ्या अगर काल्पनिक तक्रारीवरून ते पुंडावा माजवितात. काठेवाडांत त्यांच्यासारखे दरवडेखोर कोणी नाहींत. ते रस्तालूट, दरोडे, गांवें लुटणें, गुरें चोरणें, घरफोडी, चोरी, लहानसान जमीनदारांना दहशत घालून पैसे अगर धान्य उकळणें, परजातीच्या मिआन्यांच्या बायकामुली पळविणें वगैरे गुन्हे करतात. ते जारिणी स्त्रियांचीं नाकें कापतात. ज्यांचा त्यांना जांच असतो अशा पोलीस अंमलदारांना ते गांठून त्यांचीं नाकें, ओंठ कापतात. ते तुरुंगांतून आणि पोलिसच्या पाहऱ्यांतून निसटून जाण्याच्या कामांत फार पटाईत असतात. ते पुष्कळ हत्यारें व दारूगोळा जवळ ठेवितात, व हत्यारें चांगल्या तऱ्हेनें चालवितात. गुन्हे करण्यासंबंधानें त्यांची योजना मोठ्या अकलेची असते, आणि ती योजनाही ते मोठ्या धाडसानें अंमलांत आणतात. जाम, संधवानी, मोर, परेडी, मानेक, गंध, लढाणी ह्या जाती फार गुन्हे करतात.

**गुन्ह्यांची पद्धतिः**— थोडकेसे धाडशी लोक युक्तिप्रयुक्तीनें दाखला मिळवून तलवार, बंदूक घेऊन उंटावर स्वार होऊन गांव सोडतात, आणि एखाद्या वाण्याला अडवितात, ढोरवाड्यावर छापा घालतात, किंवा सावकाराला लुटतात. त्याच्या रखवालदार अरबांनीं किंवा पठाणांनीं उलट हल्ला करून जबर दुखापत केली तरी ते आपल्या जायबंदी सोबत्याला उजाडण्याच्या आंत गांवांत नेऊन सोडतात; आणि पोलिसला सांगतात कीं सदर इसम झाडावरून पडला किंवा त्याला बैलानें मारलें. गुन्हा पुरता अंगीं लागला म्हणजे ते फरारी ( बारवाटीये ) बनतात, आणि लोकांना पुरे पुरे करून सोडतात. थोड्या वर्षांपूर्वीं मिआने आणि कोळी ह्यांची एक टोळी बनून तिनें अहमदाबाद, बडोद्याकडे बराच

पुंडावा माजविला होता. लुटावयाच्या घराची बातमी ते गांवच्या लोकांकडून मिळवितात. त्यांच्या टोळींत बहुधा पांचांवर इसम असतात. जेथें गुन्हा करावयाचा तेथून सुमारें दहा मैलांवर जंगलांत, तळीं, विहिरींजवळ ते उतरतात. बंदुका, तलवारी, काठ्या घेऊन ते बेकायदा आणलेल्या अफूसाठीं झाडा घेण्याच्या मिषानें घरांत शिरतात, आणि लोकांना खूप तंबी देतात. दागिन्यांची जागा दाखविली नाहीं तर ते त्यांना सपाटून मार देतात. हें चाललें असतांना टोळींतील इतर लोक वाटा व गांवकूस रोंखून धरतात. केव्हां केव्हां मोठा दरोडा घालण्यापूर्वीं किंवा गांव लुटण्यापूर्वीं एक दोन मिआने येऊन जागा नीट पाहून जातात, किंवा एखादा आसपास कांहीं काम पत्करतो; आणि सर्व बेतबात झाला म्हणजे जेथें मिआन्यांचा तळ ( डंग ) असेल तेथें निरोप करतो. अशा वेळीं ते नदीच्या कांठाकांठानें खूप मजल काटतात. रस्तालुटीच्या वेळीं ते टोळीचे दोन भाग करून, दोन्हीकडून येणाऱ्या गाड्या व मुशाफरांना अडविण्यासाठीं सुमारें एक मैलाच्या अंतरावर बसतात. परत जातांना ते सकत किंवा दलदलीच्या जमिनीवरून जातात; आणि जिकडे जावयाचें त्याच्या उलट चालत जातात, कीं माग लागूं नये. तसेंच टोळींतल्या कांहीं लोकांना इतर पाठकुळीं घालून नेतात, म्हणजे तितकीं पावलें कमी उठतात, आणि म्हणून किती लोकांची टोळी आहे हें समजत नाहीं. ते रात्रीं चालतात आणि दिवसां मुक्काम करतात, व तळाच्या आसपास झाडांझाडांनीं हेर ठेवितात. एखादा प्रवाशी किंवा गांवकरी तळावर चुकून आलाच तर टोळीचा मुक्काम हालेपर्यंत त्याला सोडीत नाहींत; आणि बहुधा त्या बापड्याला झाडाला बांधून ठेवून आपण चालते होतात. मोठी लूट मिळाली किंवा तुरुंगांतून सुटले म्हणजे मिआने मुलतानी पिराला जातात. ते बहुधा गुन्हा कबूल करीत नाहींत; केलाच तर तो वडील माणसांच्या मध्यस्थीनें कबूल करतात.

**गुन्ह्यांचीं उपकरणें:**–मिआने घोड्यावर किंवा उंटावर बसून आणि तलवार, बंदुका घेऊन गुन्ह्याला निघतात. त्यांच्याजवळ लोखंडाच्या विडीची काठी, कुऱ्हाड, सुरी, " चागल " ( पखाल ) आणि कधीं कधीं दुर्बिण असते.

**चोरीचे मालाची निर्गति:**– चोरीचा माल ते आपल्या देशांत, शेतांत किंवा स्मशानांत पुरतात, इतरत्र नदीच्या पात्रांत किंवा नाल्यांत पुरतात. जिकडे तिकडे सामसूम झाली म्हणजे ब्राह्मण, वाणी, लोहाने, गिरासे यांना ते माल विकतात. मिआने लोकांस सर्व " माल घेणारे " भीत असल्यामुळें त्यांजपासून कांहीं माहिती मिळण्याचा संभव फार कमी असतो.

---

# पारधी.

**संज्ञा:**– ही जात बौरिआ जातीचा एक फांटा आहे; परंतु मध्यहिंदुस्थानांतल्या लंगोटी पारध्याहून ही भिन्न आहे. जे फांसानें डुकरें, हरणें वगैरे धरतात, त्यांना " फास पारधी किंवा मेवारी " म्हणतात; आणि जे वाघरीनें ससे वगैरे पकडतात त्यांना " वाघरी पारधी " ह्मणतात. ह्या जातीचे पुष्कळ लोक जात्यांना टांकी देतात म्हणून त्यांना " टकारी किंवा टाकणकर " म्हणतात. फास पारध्यांना पाल पारधी, लंगोटी पारधी, गाय पारधी, ( शिकविलेल्या गाईच्या साहाय्यानें शिकार करतात म्हणून ) म्हणतात. कांहीं फास पारधी आपणांला " राजपारधी " म्हणवितात. कर्नाटकांत फास पारध्यांना हरण शिकारी, अडवीचंचर किंवा चिग्रीबटगीर म्हणतात. त्यांची " तेल वेचण्या " म्हणून एक जात आहे. ते नारायण तेल विकतात. कच्छ, खानदेश,

धारवाडकडे कांहीं मुसलमान पारधीही आढळतात. त्यांच्यांत चित्तेवाले पारधी म्हणून एक जात आहे.

**वस्तिः**—पारधी मुंबई इलाखाभर पसरले आहेत. त्यांची वस्ति खानदेशांत फार आहे. शिवाय ते मध्यप्रांतांत व सिंधप्रांतांत आढळतात.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**—टाकणकर घरेंदारें करून राहिलेले आहेत. ते गुन्ह्यासाठीं जिल्ह्याच्या बाहेर आणि फार दिवस जात नाहींत. बाकीचे सर्व जातीचे पारधी फिरस्ते आहेत. ते तळापासून आठ दहा मैलांच्यावर गुन्हा करीत नाहींत. खानदेशच्या सरहद्दीवर आणि मध्यप्रांतांत ते क्वचित् पंचवीस ते पन्नास मैल गेल्याचीं उदाहरणें आहेत. फिरस्ते पारधी शिकारीच्या लागानें पाण्याजवळ आणि गुरें चरणाचे जागेजवळ गवती पालांत राहतात.

**लोकसंख्याः**—ह्यांची लोकसंख्या अजमासें तेरा हजार आहे.

**स्वरूपः**—फिरस्ते पारधी बहुतेक वस्त्रहीन असून घाणेरडे व अव्यवस्थित रहातात. ते केंस कधीं काढीत नाहींत, व विंचरीतही नाहींत. कांहीं बायका लुगडेंचोळी नेसतात, कांहींजणी अपरा घागरा घालतात. पुरुष आणि स्त्रिया गळ्यांत रंगीबेरंगी मण्यांच्या माळा घालतात. बायका हातांत कथील, कापरब्रास किंवा पितळेच्या बांगड्या, कानबाळ्या व सांखळ्या घालतात. पुरुषही असल्या बाळ्या, कडीं, सांखळ्या घालतात. त्यांचे अंगावरचें धोतर काळसर असतें. ते डोक्याला एक चिंधी किंवा पागोटें गुंडाळतात, पण माथा बहुतेक उघडा राहतो. टाकणकर किंवा घरदार करून राहिलेल्या पारध्यांचा पोषाख बहुतेक कुणब्याप्रमाणें असतो. बायका लुगडेंचोळी नेसतात, आणि कांहीं गुजराथणीप्रमाणें लहंगा किंवा घागरा नेसून तोंडावरून ओढणी घेतात. पारध्यांच्या पोटजातींत बेटीव्यवहार नाहीं. टाकणकर आपणांला उच्च जातीचे म्हणवितात. पारधी दारू फार पितात, आणि गोमांस खेरीजकरून सर्व मांस खातात. फिरस्त्या पारध्यांचा रंग काळा, उंची मध्यम, व

इंद्रियें तीक्ष्ण असतात. ते कैकाड्याप्रमाणें फार टणक, चपळ, धीट, सोशीक आणि काम करून निघणारे असतात. त्यांच्या गळ्यांत लांकडाची काळी शिटी अडकविलेली असते, तिच्या वाटें ते चितर पक्ष्यासारखा आवाज काढतात. ते तोंडानें हुबेहूब मोर, ससाणा, बदक, कोल्हे, ससे, खोकड ह्यांचा आवाज काढतात. फिरस्ते पारधी आपलीं बायकापोरें घेऊन फिरतात. कधीं कधीं त्यांचे तळांत शंभरांवरही माणसें असतात. कधीं कधीं ते आपला संसार गाई, म्हशींवर नेतात. पण बहुधा पुरुषांच्या डोक्यांवर पाट्या, वागुरी, फांस आणि बायकांच्या डोक्यांवर पालें असतात. त्यांच्या तळावर घाणेरडे कुत्रे, कोंबड्या, खप्पड जनावरें असल्यामुळें एकंदर जिकडे तिकडे घाण दिसते. पावसाळ्यांत पारध्यांच्या टोळ्या गांवाजवळ गोळा होतात, आणि हंगाम लागला म्हणजे फुटून फेरीला जातात. चित्तेवाले पारधी लहान वाघ धरून राजेलोकांना विकतात ( म्हणून त्यांना राजपारधी म्हणतात ), किंवा लहान चाकाच्या गाड्यांवर वाघ घालून गांवोगांव फिरवितात. ते बैलांच्या आड्न हरणाला जाळें घालतात, म्हणून त्यांना " बहेलिया " म्हणतात. त्यांच्याजवळ पालें नसतात, ते झाडाखालीं गांवापासून दूर उतरतात. पारध्यांच्या वस्तीला " पारधवाडा " म्हणतात.

**भाषाः**– ते मिश्र भाषा बोलतात. तिच्यांत गुजराथीचें प्रमाण जास्त असतें. शिवाय ज्या जिल्ह्यांत राहतात, त्याप्रमाणें त्यांना अशुद्ध कानडी व मराठीही येतें. परजातीच्या समोर ते मोठ्यानें हिंदुस्थानींत बोलतात.

## सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| राज | ... फौजदार. | काळू | ... पोलीस अंमलदार |
| खपै | ... कॉन्स्टेबल. | वस्सै | ... चोरी. |
| मूल | ... पळणें. | खोनुकुस | ... सोनें. |

**उपजीविकेचीं बाह्य साधनें**:– पुष्कळ टाकणकर मजुरी, जातीं उकटणें, शेतकाम, जागलकी वगैरे करतात. फिरस्ते पारधी भीक माग-

तात, हरीण, डुकर, ससा, पांखरें ह्यांची पारध करतात, वनस्पतीचीं औषधें करून विकतात, आणि बजरबट्टू व जंगलचा माल विकतात.

**वेषांतरः**— गुन्हा करतांना पारधी कंबर बांधतात, धाटे बांधतात आणि छातीवरून कापड घेऊन त्याची मागें गांठ बांधतात; व हिंदुस्थानी बोली बोलतात.

**गुन्हेः**— घरफोडी टाकणकरांच्या हाडांत जितकी खिळलेली आहे तितकी फिरत्या पारध्यांच्या नाहीं. शिकार मिळते तोंपर्यंत ते धान्याच्या व गुरांच्या लहानसान चोऱ्या करतात. तथापि खाण्याला मिळेनासें झालें किंवा योग्य संधि सांपडली म्हणजे ते दरोडा, जबरीची चोरी, घरफोडी, ठकबाजी, गुरांची, शेळ्यामेंढ्यांची, पेवांतल्या धान्याची, कापसाची व उभ्या पिकांची चोरी करतात. ते आपलीं गुरें रयतेच्या उभ्या पिकांत चारतात. गुन्ह्याचे आवेशांत टाकणकर मारहाण, वेळेला खूनही करतात.

**गुन्ह्यांची पद्धतिः**— पारधी लोक दरोडे व रस्तालूट मोठ्या व्यवस्थित रीतीनें व क्रूरपणें करतात. कांहींजण जबरीनें घरांत घुसून हल्ला करतात, आणि बाकीचे बाहेरून मदत येऊं देत नाहींत. त्यांच्या टोळींत बहुधा दोन ते चार इसम असतात. पण फक्त नवराबायकोनें मिळून चोरीचा धंदा केल्याचेंही उदाहरण आहे. त्यांच्या बायका भीक मागतांना बातमी काढतात. शिवाय ते कलालामार्फत अगर हेरामार्फतही बातमी काढतात. टांकी लावण्याच्या धंद्यामुळें टाकणकरांना आयतींच घरें धुंडाळण्याला फावतें.

गुन्हे करण्याच्या कामीं पारधी लोक दुसऱ्या जातीला मिळतात, आणि दुसऱ्या जातीचे लोकही आपल्यांत घेतात. अलीकडे टाकणकर खरे म्हणून खोटे दागिने भोळ्या खेडवळांना विकूं लागले आहेत. ते मुलाम्याचे दागिने घेतात, आणि ज्या गांवांत आपला साथीदार असेल तेथें जातात. त्याचे मध्यस्थीनें थोडक्यांत सोन्याचे दागिने पाहिजेत

अशा एखाद्या भोळवट खेडवळाला गांठतात. ‘ हा माल चोरीचा आहे सबब पोलिसतपास संपेपर्यंत तो बाहेर काढूं नका, ’ असें त्याला सांगतात. कांहीं दिवसांनीं तो माल वापरूं लागतो आणि मग त्याला कळतें कीं, आपण ठकलों. पोलिसकडे तक्रार करण्याचें धैर्य त्याला होत नाहीं, हें सांगणें नकोच. त्याचप्रमाणें चोरीचा माल विकत घेणाऱ्या इसमाला एकांतस्थळीं नेऊन, टाकणकर त्याला लुबाडतात. भिक्षेच्या मिषानें दिवसां वर टेहळून ठेविलेलें असतें. मग रात्रीच्या वेळीं गांवांत “ दीन दीन ” म्हणून ओरडत ते घुसतात, आणि त्या घरावर हल्ला करून घरांतल्या माणसांना ठोकतात. माल काढण्यासाठीं ते भुई खणतात, आणि काड्यामोड्याचें घर असल्यास त्याला आग लावून चालते होतात, ह्मणजे अर्थात् लोकांचें लक्ष्य आग विझविण्याकडे लागतें. ते चोरलेलीं कणसें लागलींच कुटतात, आणि तें धान्य दुसऱ्या चोरलेल्या धान्यांत मिसळतात, ह्मणजे तें ओळखण्याची पंचाईत पडते. खळ्यावर किंवा पेवांत चोरी करतांना राखणदार आडवा आला तर त्याला ते बेलाशक सुरीनें भोसकतात, किंवा त्याच्या डोक्यावर काठीचा टोला मारतात. दिवसां भीक मागत असतां ते पेवें टेहळून ठेवितात. मालकानें जर सुखानें धान्य दिलें तर बरें, नाहीं तर ते त्याचीं पेवें लुटतात. नेतांना गळून पडलेल्या धान्याच्या योगानें माग लागूं नये ह्मणून ते थोडें थोडेंच धान्य नेतात. चोरलेलें धान्य ते तळाबाहेर कोठें तरी भरून ठेवितात. घोंगडीला भोंड किंवा बगण्या चिकटलेल्या पोलिसला आढळल्या, तर ते बहुधा गुन्हा कबूल करतात; ह्मणून त्यांच्या घोंगड्या तपासाव्या. चोरलेल्या शेळ्यामेंढ्या जर लागलींच मारून टाकता आल्या नाहींत, तर त्यांना ते लांब नेऊन ठेवितात. ते गुरें जंगलांत चरत असतांना चोरतात, व त्यांना लांबवर हांकून नेतात, आणि मग त्यांना विकतात. किंवा त्यांच्या मालकापासून पैसे घेऊन ते तीं परत देतात. “तेलवेचे” पारधी खोटें नारायण तेल खालीं लिहिल्याप्रमाणें विकतात. गिऱ्हाईक म्हणालें कीं, तळहाताला चोळून तें हाताच्या पाठीवाटें आलें

पाहिजे, तर ते युक्तिप्रयुक्तीनें तेलांत बुडविलेली चिंधी किंवा दोरी गिऱ्हाइकाच्या हाताखालीं टाकतात. अर्थात् तो हात दाबला म्हणजे त्या बोळयाचें तेल त्याला लागतें. टाकणकरांना अगदीं गुन्हे करतांना पकडलें तरी ते गुन्हा कबूल करीत नाहींत, व आपलीं आणि आपल्यापासून माल घेणाऱ्यांचीं नांवें सांगत नाहींत.

**गुन्ह्यांचीं हत्यारें:–** दरोड्याचे वेळीं पारधी लोक गोफण, धोंडे, काठ्या, कुऱ्हाडी, सुऱ्या, मशाली आपल्याबरोबर नेतात. क्वचित् प्रसंगीं त्यांच्याजवळ तलवारी, बंदुका, भालेही असतात. ते किंकरें, कुस ( नांगराचा फाळ ) व खंतिया, केत्तुर किंवा कुत्तुर्न ( लांकडी दांडीची लोखंडी मेख ) यांनीं घरफोडी करतात.

**चोरीचे मालाची निर्गति:–** टाकणकर आपल्या घरामध्यें माल दडवीत नाहींत. फिरस्ते पारधी जमिनीला जेथें लहान भेग असेल तेथें ती खोदून तळाशीं मोठी खांच तयार करतात, आणि तिच्यांत धान्य घालून तोंड बंद करतात, व त्यावर बहुधा कोणीतरी निजतो. ते कधीं कधीं चोरीचा माल आपल्या तळाजवळ शेतांत किंवा नदीच्या पात्रांत किंवा जनावरें बांधलीं असतील तेथें अगर तळामागें पुरून ठेवितात. मौल्यवान् चोरीचा माल ते गुन्हा केल्यावर पुष्कळ दिवसांनीं विकतात, शेळ्या मेंढ्या लागलींच मारून खातात, आणि कातडें गांवच्या चांभारांना किंवा ढोरांना अगर दूरच्या बाजारांत नेऊन विकतात. सोनार, कलाल, शेतकरी, पाटील, कुळकर्णी, सावकार त्यांच्यापासून चोरीचा माल विकत घेतात. चोरीचें नाणें ते गोदडींत शिवतात. मुक्काम हलविला म्हणजे एक इसम चोरीचा माल घेऊन मैल दोन मैल तांड्याच्यापुढें जातो किंवा मागें राहतो. अगर चोरीचा माल मागच्या तळावर ठेवून तांडा पुढें जातो आणि मग मागाहून येऊन तो माल ते घेऊन जातात. त्यांच्या बायका चोरीचा माल टांगामध्यें किंवा जखम झाली आहे असें दाखवून तंगडीला फडकें गुंडाळून त्याखालीं दडवून ठेवितात. पारधी व त्यांच्या बायका हात-

घाईवर येतात म्हणून त्यांचा झाडा घेतांना पोलिसांनीं पुष्कळ लोक घेऊन जावें आणि तळाची जागा नांगरून काढावी.

---

## रामोशी.

**संज्ञाः—** रामोशांच्या दोन पोटजाती आहेतः— पुरंदर किंवा भंडाते रामोशी आणि होल्गे रामोशी. दोघांचा रोटीव्यवहार होत नाहीं.

**वस्तिः—** त्यांचें घर महाराष्ट्र आणि माहेरघर पुणें व सातारा प्रांत होय. हे जिल्हे, व त्यांतील संस्थानें ह्यांत अटोकाट छातीचे रामोशी दृष्टीस पडतात. कांहींजण मुंबईंत हमाल, गाडीवाले, गिरण्यांत व गोद्यांत मजूर आहेत.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः—** रामोशी महाराष्ट्रांत आपल्या गांवापासून सरासरी तीस चाळीस मैलांवर गुन्हे करतात. ते आपल्या गांवच्या आसपास किंवा तालुक्यांत मोठे गुन्हे करीत नाहींत. बंडखोर रामोशी पकडावयाला फार कठिण पडतें. तरीपण तो घरापासून पन्नास मैलांच्या आंतबाहेर असतो, व मधून मधून चोरून घरीं येतो.

**लोकसंख्याः—** त्यांची लोकसंख्या सुमारें साडेसाठ हजार आहे.

**स्वरूपः—** ते सरासरी पुऱ्या उंचीचे, बांधेसूद, पिळदार, सोशिक असतात. त्यांचा रंग काळा, शरीर रासवट पण चांगलें, आणि बुद्धि मंद असते. ते आळशी, घाणेरडे व शिकारीचे शोकी असतात. गोमांस सोडून ते सर्व प्रकारचें मांस खातात. ते दारूबाज असतात, आणि तंबाखू खातात व ओढतात. त्यांचा पोषाख हलक्या जातींच्या हिंदूप्रमाणें असतो. गुन्ह्याचे वेळीं रामोशिणी पुरुषाबरोबर जात नाहींत. ते बडे जातिबंद असतात, गुन्हा कबूल करीत नाहींत व साथीदारांचीं नांवें सांगत

नाहींत. परंतु त्यांचा कोणी अब्रूदार व वजनदार आप्त किंवा त्यांच्यावर वजन आहे असा एखादा गांवांतला " डुड्ढाचार्य " हाताशीं धरला, म्हणजे ते बातमी फोडतात. होल्गे रामोशी तुळशीची आणभाक करतात, आणि पुरंदर रामोशी बेलभंडाराची आणभाक करतात. रामोशांची वस्ति गांवकुसाला असते. ते हाडाचे दरोडखोर आहेत. ते मोठे अचपळ, धाडशी, अविचारी व लुटारू आहेत. दुष्काळासारखी संधि सांपडली कीं ते उचल करतात. कांहीं वर्षांपूर्वीं त्यांच्यांत उमाजी नाईक, त्याचा मुलगा तुक्या महांकाळ, हरी व तात्या मकाजी हे भाऊ भाऊ, वगैरेंनीं पुंडावा माजविला होता, हें सर्वांस माहीत आहेच.

**भाषाः—** ते मराठी बोलतात. होल्ग्यांच्या भाषेंत थोडे थोडे कानडी शब्द येतात.

## रामोशांचे सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| पटाव ... ... | अटक. | नालग्या ... ... | फौजदार. |
| गर्धम ... ... | गाढव. | न्यनवल ... ... | तूप. |
| टिनली, टागला ... | खाणें. | कपदूल, कपदूली | कपडा. |
| यरवाड, येरीड ... | वाईट, थोडा. | कोडले, कोडील | कोंबडें. |
| सज ... ... | बाजरी. | गडगली, गदगील | नारळ. |
| नाडवड ... ... | न्हावी. | खोगड ... ... | ये. |
| तुपली ... ... | दाढी, मिशी. | टिकलिया, टिकतो | येत. |
| अकूल ... ... | विड्याचें पान. | मुरेल, मुरली ... | खुर्दा. |
| कोर ... ... | घोंगडी. | ओतुकली ... | गवऱ्या. |
| पल, निदल ... | रक्त. | कोसने ... ... | कापणें. |
| येंकूल ... ... | हाड. | न्यान ... ... | सोनें. |
| कुटली ... ... | भोंक. | रै ... ... | अंधारी रात्र. |
| चिकड, चिलड | मूल. | जेनेली ... ... | खजूर. |
| पारग, पारूड ... | ब्राह्मण. | देवरमी ... ... | दिवस, सूर्य. |
| कुडमल ... ... | भाकर. | देवारम उकंटो ... | पहांट. |
| यड्डल ... ... | बैल. | आर्ले ... ... | पकडणें. |
| पटण ... ... | पकडणें. | ससला ... ... | मेला. |
| चामगड ... | चांभार. | कुकूल ... ... | कुत्रा. |

| | |
|---|---|
| यरगू नको ... | भिऊं नको. |
| वलसु नको | गुन्हा कबूल करूं नको. |
| निडल ... ... | दारू किंवा पाणी. |
| येनम, येनुली ... | कणसें. |
| कोकन वड्या ... | इंग्रज. |
| नकोली, कनोली | डोळे. |
| तगने ... ... | खाणें पिणें. |
| पैसूर ... ... | जलद पळणारा. |
| मदोद, मुदक ... | आई बाप. |
| तरगड ... ... | म्हातारा, म्हातारी. |
| धारकरी ... | लढवय्या. |
| शिट, धूप ... | विस्तव, मशाल. |
| मेनुली मेनगूल | मासे. |
| इसमड ... ... | दे, घे, सांग. |
| ओकन ... ... | पळ. |
| मेकली ... ... | बकरा. |
| देवरम ... ... | ईश्वर. |
| जातवाड, जातिक | पुष्कळ, चांगला. |
| नगुलवाला ... | सोनार. |
| कोलच ... ... | धान्य. |
| कडला ... ... | हरभरा. |
| तुबुक, नडली ... | बंदूक. |
| कल्ली ... ... | बंदुकीची दारू. |
| पडली, पट्टा ... | हिस्सा. |
| कतुल ... ... | तलवार. |
| मोकर, नोर ... | डोकें, तोंड. |
| गेरेली ... ... | हात. |
| किडपुल्ला ... | केंस. |
| फडवाड ... | मुख्य, नाईक, पाटील. |
| खोगड ... ... | लपीव. |
| गुडुमी ... ... | टेंकडी. |
| गुरम ... ... | घोडा. |
| गुड्डस, गुडसल ... | घर. |
| सितरपाडी, मुच | घरफोडी, चोरी, दरोडा. |
| बोकूल ... ... | भिंतीचें भोंक. |
| शेनट ... ... | जमिनींत. |
| प्यार ... ... | बातमी. |
| गोन्ने ... ... | मारणें, लुटणें. |
| कडले, नगूल | कुलूप, किल्ली किंवा खिळा. |
| पिल्लड ... ... | चाकू. |
| माचूल्य... ... | कुणबी. |
| वांकडी ... ... | फावडें. |
| पुडकुल ... ... | शिडी. |
| गेरेली, अड्डुक ... | तंगडी. |
| कम ... ... | पत्र. |
| कन ... ... | पहा. |
| अंबुज ... ... | मांग. |
| मुडकायली ... | आंबा. |
| अरील ... ... | मराठा. |
| शेडवड ... ... | महार. |
| पाल ... ... | दूध. |
| दमल, दमकटी | पैसे. |
| फकट ... ... | चांदणें. |
| हलवा ... ... | हलके दागिने. |
| मुलवड ... ... | मुसलमान. |
| टुनकुल ... ... | बकऱ्याचें मांस. |
| नकुल ... ... | नाक. |
| नेडले, निडला ... | तेल. |
| कडली ... ... | पांढरे दागिने. |
| गाडगिल ... | मडकें. |
| गाडगिलवाला, गर्दमवाली | कुंभार. |
| जंका, झिमक ... | पोलिस कॉन्स्टेबल. |
| घुम्मड ... ... | गाजरें. |
| कोंडल ... ... | ससा. |
| बोईल, भुयल ... | रामोशी. |

| | |
|---|---|
| पारोशी... ... | रामोशांची भाषा. |
| अडत, अडतूल... | बायको. |
| नेतत ... ... | तांदूळ. |
| तेरू ... ... | रस्ता. |
| होरकडला ... | पळाला. |
| तिसकव ... | चोरणें, हिसकणें. |
| खूगडने ... | बसणें. |
| गोरिल ... ... | मेंढा. |
| कोरगुली, ... कोरपाडे ... | धनगर. |
| कोलगिया,... कोलगिल ... | जोडा. |
| बेलम ... ... | खाऊ. |
| त्याबगडला... त्यावडला ... | निजला |
| ताड ... ... | गोफण. |
| रातल ... ... | धोंडे. |
| वुडिल ... ... | काठी. |
| मात, मातल ... | गोष्ट. |
| मुचवाड ... | चोर. |
| कट, कटून टाक | बांधणें. |
| पोग ... ... | तंबाखू. |
| अडूक ... ... | माग. |
| तल ... ... | पागोटें. |
| कोलगिलीवर पतत्यल | तुझ्या जोड्यावरून तुझा शोध लावताल. |
| उरोंड ... ... | शहर. |
| बंगड, बंगडिया | वाणी. |
| बोकुल ... ... | भांडें. |
| फदूर, ऊर, उरूल | खेडें. |
| चानपा ... ... | पाळत ठेव. |

| | |
|---|---|
| गोधमल ... ... | गहूं. |
| पुडकुल ... | लांकूड. |
| यडसला ... | रडला. |
| पोगड्या ... | बकरूं. |
| निडले तगायची | दारू अगर पाणी पिणें. |
| कुडमली तगायची | भाकरी खाणें. |
| पाडली इसमड आमची ... | आमचा वांटा आम्हांस दे. |
| फदवाड पटदमली इसमड | मुख्यांस कांहीं पैसे दे. |
| गुडसांत शीट आहे का | घरांत दिवा आहे का? |
| पार गुंधून टाकली | ठार मारलें. |
| गुडस गोणायचे | घर लुटावयाचें. |
| गुडमिले, ओकणें | टेंकडीकडे पळणें. |
| देवराम (सूर्य) टिकले | सूर्यास्त. |
| देवराम खुगडले | सूर्यास्त झाला. |
| गुडसांत कुकुल खोगडले ... | घरांत कुत्रे आहेत. |
| दमली इसमड ... | त्यांस पैसे दे. |
| शिट यरपली ... | दिवा विझला. |
| अडता, चिल्डा, मात इसमड नका... ... | बायका, मुलांनो बोलूं नका. |
| चिलडी अम्ही तुमची ... | आम्ही तुमचीं लेंकरें. |
| अदुक गुडसला येईल ... | तुम्ही माग ठेवाल. |
| अंबुज गुडसला का खोगडले ? | मांग आपल्या घरांत कां आला ? |

कुडमली इसमड अन ओकना.... त्याला भाकरी द्या आणि जाऊं द्या.

कंटी क कयबडली...तो आपल्याकडे पाहतो आहे किंवा निजला आहे ?

के. म. म. द. वा. पोलवार

गुडस माचल्याची का पारग्याची...कुणब्याचें घर आहे कां ब्राह्मणाचें ?

गोंन्ये तरी यरवाड मात इसमाड्ड नको... ठार मारलें तरी सांगूं नको.

जातवाड तळ गुडसात खोबले अन यरवाड इसमड...चांगलें पागोटें घरांत ठेव, आणि वाईट घे.

फदवाडच्या गुडसामधी झीमक खोगडला पटींलरे पटील...पाटलाच्या घरांत शिपाई बसला आहे. हुशार रहा. पकडील.

का बोयलीस, यारवाड का जातवाड...तुम्ही खरे रामोशी आहां अगर नांवाचे ?

**उपजीविकेचीं दर्शनीं साधनें:**– पुष्कळ रामोशी जागलकीवर आहेत,व कांहीं थोडे पोलिसांत आहेत.ते जमीन कसतात,राखण,शेतकाम, घरकाम पत्करतात, गाड्या हांकतात व गिरण्यांत वगैरे हमाली करतात.

**वेषांतर:**– टोळी करून दरोडा किंवा जबरीची चोरी करण्याचे वेळीं ते धाटे बांधतात, डोक्यावरून कांबळें घेऊन तें कमरेला बांधतात, आणि तोंडाला राख किंवा रंगाची पूड फांसतात. दूरवर प्रवासास गेले ह्मणजे ते आपणांला मराठी किंवा कुणबी ह्मणवितात.

**गुन्हे:** –ते दरोडा, जबरीची चोरी करतात. रात्रीं जे मुशाफर किंवा गाड्या त्यांच्या गांवीं मुक्कामाला उतरतात त्यांजपासून ते दस्तुरी घेतात. ती न देणारांची रात्रीं किंवा दुसऱ्या दिवशीं पहांटेस वाट चालत असतांना चोरी झालीच समजा. भक्कम राखण नसेल किंवा राखणावर रामोशी नसेल, तर ते आपल्या शिवारांतील उभ्या पिकांची चोरी करतात.

**गुन्ह्यांची पद्धति:**– मोठे गुन्हे ते अंधाऱ्या रात्रीं करतात. दरोड्यासारखा गुन्हा करण्यापूर्वी रामोशी लोक गुन्ह्याचे ठिकाणची, माणसांची, घराची, माऱ्याच्या जाग्याची, अडथळ्याची वगैरे सर्व माहिती काळजीपूर्वक मिळवून तिचें मनन करतात. पैसे मागण्याच्या मिषानें त्यांच्या बायका घरें हुडकून पुरुषांना बातमी देतात. तसेंच असली बातमी गांवच्या बदमाष लोकांकडूनही मिळते. शिवाय दर गांवाला रामोशी

असतात तेही आपल्या जातभाईंना माहिती पुरवितात. गुन्हा करण्यासाठीं ते तीन ते पंधरा इसमांची टोळी करतात. तिच्यांत एकाच गांवचे लोक असतात असें नाहीं. तिच्यावर नाईक असतो. तो कोणीं काय करावयाचें वगैरे ठरवितो. मांग वगैरे परजातीचे लोक ते आपल्या टोळींत क्वचित् घेतात. मांग नाइकाचे टोळींत रामोशी जात नाहींत.

गुन्ह्याच्या ठिकाणापासून एकदोन मैलांवर, व गुन्हा करून परत जावयाचें तिजहून भिन्न दिशेला, एखाद्या सोइस्कर ठिकाणीं ते थांबतात, आणि फाजील कपडा वगैरे तेथें काढून ठेवितात. गुन्ह्याचें ठिकाण जवळ आलें म्हणजे ते मशाली पेटवितात, आणि आपटबार काढतात. त्यासरसे गांवकरी आपल्या घराच्या खिडक्या, दरवाजे बंद करितात. कांहींजण घराच्या वाटा रोंखून धरतात आणि एकसारखी चहूंकडे गोफण चालवितात. कांहींजण कुऱ्हाडीनें दारें फोडून आंत घुसतात, आणि मालकाला माल काढावयाला सांगतात. तो त्यानें लवकर काढून द्यावा ह्मणून ते त्याला मशालीनें पोळवितात, कुऱ्हाडीनें मान छाटण्याची भीति घालतात, आणि सर्वांच्या आईमाई उद्धरतात. ते बायकांच्या अंगावरचे दागिने चांचपतात आणि वेळेला ओरबाडून घेतात, पण सुवासिनी बायकांचें मंगळसूत्र काढून घेत नाहींत. घरांतल्या माणसांनीं मागणीबरोबर दागिने दिले तर ते कोणाला इजा करीत नाहींत. ते बायकांशीं अदबीनें वागतात, पण जर कोणी आडवें झालें तर बिलकुल दया करीत नाहींत. तथापि ते जरूरीपेक्षां जास्त इजा करीत नाहींत, आणि खांद्याच्यावर वार करीत नाहींत. 'पुकारा कराल तर मराल' असें ते जातांना घरधन्याला बजावितात, आणि दाराला कधीं कधीं कडी लावून मिळालें तें घेऊन चालते होतात. घरांत घुसलेले इसम बाहेर पडेपर्यंत बाहेरचे लोक आजूबाजूस रस्त्यांवर आणि घरांवर धोंडे फेंकीत राहतात. त्यामुळें जिकडे तिकडे दगडांचे ढीग पडतात. गुन्हा आटोपल्यावर ते झपाट्यानें कपडे वगैरे

टाकले असतात त्या ठिकाणीं येतात, तेथें टोळीवाल्यांचा झाडा घेऊन माल एकत्र करतात आणि त्याची वांटणी करतात. नंतर वाटा फुटतात तेथून ते एकएक वेगवेगळे घरांकडे जातात. धारकरी ( लढवय्ये ) आणि पायसूर ( जलद पळणारे ) यांना मोठा वांटा मिळतो. रस्तालुटीसाठीं टोळीचे लहान लहान भाग करून ते माऱ्याच्या जागेजवळ दडून बसतात व गाडी किंवा मुशाफर आला म्हणजे त्यावर तुटून पडतात, माणसांना चोपतात, आणि त्यांचें जडजवाहीर लुटतात. ते मागची किंवा बाजूची भिंत फोडून रुमाली पद्धतीनें घरफोडी करतात. रामोशी लाठी किंवा मोठी काठी बारीक बाजूनें धरतात आणि मांग जाड बाजूनें धरतात असें म्हणतात. कोणाच्या दृष्टीस पडूं नये म्हणून ते रात्रीं जंगलांतून प्रवास करतात, आणि दिवसां दरींत, नाल्यांत दडून राहतात. एकदां पुरंदरच्या बारा रामोशांची टोळी आगगाडीनें २० मैल जाऊन मधल्याच स्टेशनावर उतरून १०।१२ मैल सडकेनें गेली, आणि पूर्वीं पाहून ठेविलेल्या घरावर दरोडा मारून परत सडकेनें आली. रामोशी बातमी मिळवून ज्या खोलींत घुसतात तिच्या पलीकडे सर्व घर धुंडाळीत बसत नाहींत. ते मेंढ्यांची चोरी मध्यरात्रीं एकएकटे किंवा टोळीनें करतात. एक इसम मेंढवाड्याजवळ निवाऱ्याच्या बाजूनें झपाट्यानें जातो व बसतो; आणि बाकीचे शें दोंडशें कदमांवर राहतात. नंतर तो कडेचें मेंढरूं उचलतो आणि उजवा हात त्याच्या मागच्या पायांमध्यें व डावा हात पुढच्या पायांमध्यें घालून त्याची मान बगलेंत अशी दाबून धरतो कीं त्या मेंढराला ब्यां म्हणून करतां येत नाहीं. अशा रीतीनें आरडाओरड होईपर्यंत मेंढरें नेऊन तीं आपल्या साथीदारांच्या हवालीं करतो. नंतर टोळी संकेतस्थानीं जाते व तेथें तीं जनावरें मारतात आणि त्यांचें मांस वांटून घेतात. असें सांगतात कीं, चोरलेल्या शेळ्यामेंढ्यांनीं ओरडूं नये म्हणून रामोशी, कैकाडी आणि कातोडी हे त्यांचे जिभेला मोठा कांटा टोंचतात.

**गुन्ह्यांचीं हत्यारें:–** मशाली, मिळाल्या तर तलवारी, बंदुका, काठ्या, गोफण, धोंडे, पहारी, कुऱ्हाडी आणि आपटबार, ही रामोशांची गुन्हे करण्याची सामग्री होय.

**चोरीच्या मालाची निर्गति:–** चोरीचा माल रामोशी आपल्या शेतांत पुरीत नाहींत. तो ते जंगलांत, दऱ्याखोऱ्यांत पुरतात; आणि कांहीं दिवसांनीं बाहेर काढून मारवाडी, गुजर, सोनार, पाटील, कुळकर्णी, यांच्यामार्फत विकतात. चोरीच्या मालाची ते एकदम वांटणी करीत नाहींत. तो बहुधा नाइकाच्या दिमतीला असतो. त्याचे पैसे केल्यावर ते वांटणी करतात. नायकाचा वांटा जरा मोठा असतो. ते दुसऱ्या जातीच्या अडत्यामार्फत चोरीचा माल विकतात, व आठ ते बारा रुपये तोळ्याप्रमाणें सोनें विकतात.

---

# वाघरी.

**संज्ञा:–** मारवाडी वाघरी ऊर्फ गुजराथ बौरी किंवा टाकणकर पारधी ह्या दोन्हीही जाती गुजराथ वाघऱ्याहून भिन्न आहेत. वाघऱ्यांच्या सुप्रसिद्ध पोटजाती खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत– चुनारिया, दातनिया ( ऊर्फ तंबुरिया, आणि गोदारिया ), वेडू अथवा वेडवा, चुंवालिया, कंकोडिया ( यांत चिकडी यांचा समावेश होतो ), पटनी अथवा पटनवाडिया, तळब्दा, धांडरिया अथवा धांडया.

**वस्ति:–**ह्यांचें वसतिस्थान गुजराथ असून त्यांचा भरणा अहमदाबाद आणि खेडा या जिल्ह्यांत आहे. ते काठेवाड, सुरत, पंचमहाल, मुंबईशहर येथेंही पांगलेले आहेत.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**—वाघरी गुन्ह्यासाठीं मुंबई इलाखा, सिंध, मध्यप्रांत, मद्रास, बंगाल, दिल्ली वगैरेपर्यंत फिरतात. पण ते विशेषतः गुजराथ, काठेवाड, मुंबईशहर येथें गुन्हे करतात. बहुतेकजण घरेंदारें करून राहिले आहेत. पण कित्येक बायकापोरें, देव्हारा, पालें घेऊन भटकतात. कांहींजण प्रवासामध्यें देवळांत, धर्मशाळेंत वेळ पडल्यास गांवांतल्या घरांतही राहतात. ते दिवाळीनंतर घराबाहेर पडतात. हंगामांत ते गांवोगांव फिरतात, आणि पावसाळाभर एखाद्या गांवीं मुक्काम करतात. तळब्दे वाघरी अमुकच वेळेला घर सोडतात असें नाहीं. त्यांच्या टोळींत चार पांच सडे इसम असतात. ते गांवाबाहेर मुक्काम करीत नाहींत. रेल्वेनें प्रवास करतांना ते आपल्या गांवापासून कांहीं अंतरावरच्या स्टेशनावर बसतात, व निराळ्या स्टेशनावर उतरतात, आणि तेथपर्यंत पायीं चालतात.

**लोकसंख्याः**—वाघऱ्यांची लोकसंख्या सुमारें साठ हजार आहे.

**स्वरूपः**—त्यांची जात कोळी आणि धेड यांच्या दरम्यान आहे. त्यांची वस्ति गांवाबाहेर राहते. त्यांच्या गुरूंना "भुवे" ह्मणतात. त्यांचा पोषाख हलक्या जातीच्या गुजराथ्याप्रमाणें असतो. पुरुषांचा पोषाख धोतर अगर चोळणा, अर्ध्यामुर्ध्या डोक्यास गुंडाळलेलें एक फडकें व पेहरण हा असतो. तळब्दा आणि चुनारिया वाघरी बाकींच्यापेक्षां जरा स्वच्छ राहतात, आणि पांघरूण चिरगूट जास्त वापरतात. वाघरिणी घागरा किंवा साडी, कांचोळी व ओढणी नेसतात. त्या बुगड्या आणि रुंद लांकडाच्या किंवा कांचेच्या बांगड्या घालतात. तळाब्दिणीशिवाय बाकी सर्व जातींच्या वाघरिणी पायांत रुप्याचे तोडे घालीत नाहींत. वाघरी ठेंगणे, फाटक्या अंगाचे, चपळ, बांधेसूद, टणक, रगदार व श्रमसहिष्णु असतात. त्यांचा वर्ण काळा व शरीर रासवट असतें. त्यांमध्यें सुरेख स्त्रीपुरुष क्वचित् आढळतात. ते घामट आणि गचाळ राहतात, आणि त्यांत भिकारचाळे पूर्ण भरलेले असतात. त्यांचे पांच ते दहा

इसम, बायकामुलें, जनावरें बरोबर घेऊन एक मेळानें फेरीला निघतात. दरटोळीला एक नाईक असतो. एकेका गांवीं ते दोन तीन दिवस मुक्काम करतात. गाय आणि कोल्हा सोडून ते डुकरासुद्धां सर्व जनावरांचें मांस खातात, पण 'माती' ( मेलेल्या जनावरांचें मांस ) खात नाहींत. ते आळशी आणि उडाऊ असतात, आणि बायका व पुरुष दोघेही दारू-बाज असतात. त्यांच्या बायका दुराचारी असतात. एखादा वाघरी घरीं नसला आणि त्याला बाहेरून पोलिसनें हांक मारली तर त्याची बायको हुबेहूब त्यासारखा आवाज काढून जबाब देते. चिकडिया वाघरी लांब दाढी वाढवितात, आणि मोठें पागोटें घालतात. त्यांच्या गळ्यांत एक रुप्याची पेटी असते, तिच्या एका बाजूला बालबोधींत 'रामदे पीर' हीं अक्षरें लिहिलेलीं असतात, आणि दुसऱ्या बाजूला घोड्याचा ठसा असतो. कंकोडी दाढी वाढवीत नाहींत, आणि गळ्यांत असली पेटीही घालीत नाहींत.

**भाषा:**– ते गुजराथी बोलतात व शब्द घोळघोळून बोलतात.

## सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| माड, माढ, माडिओ, बिलाडी | पोलीस. |
| झेमराळू, झेमी ... | घरफोडी, चोरी. |
| माढेनो ... ... | चोरलेलें जवाहीर. |
| हाथवान ... | चोरीचें कापड. |
| वेचवली खवून ... | विकणें. |
| तांडा ... ... | धान्य. |
| तांडालेवा ... | धान्य चोरणें. |
| तारखो ... ... | रुपया. |
| पिलिऊन ... | सोनें. |
| धोलीऊन ... | रुपें. |
| लरपळून, लरपळी | सुरा किंवा धारिया ( अणीदार सुरा ). |
| चमई जावन ... | लप. |
| खावरी ... ... | वाघरी. |
| वैडी ... ... | वाघरीण. |
| झांखलु ... ... | कुत्रें. |
| भुंकरू ... ... | गाढव. |
| दातरडू ... ... | घरफोडीचें हत्यार |
| चिरिओ ... | किल्ल्यांचाजुडगा |
| दिगाडून ... | मोर. |
| खरपाली लेवून... | लुटणें. |
| बांदो ... ... | साथीदार. |
| नोरकून, दोडी ... | धाराळ. |
| डुचो ... ... | कुणबी. |
| बंदून, मोकून ... | मुसलमान. |
| छामन ... ... | ब्राह्मण. |
| चेनिओ ... | वाणी. |

| | | | |
|---|---|---|---|
| पपकलिजावन ... | पळ. | टेंतो ... | रजपूत अथवा गिराशिया. |
| भुऱ्यो किंवा माकडो | युरोपियन. | वसू ... ... | पैसे. |
| पेलौ, जेलवो ... | परकी माणूस. | | |
| ओहडे छे, ... चातेरे छे ... | येत आहे. | | |

कोल्ह्यांची हूक वाघरी हुबेहूब तोंडावाटें काढतात. असा आवाज जिकडून येईल तेथें टोळीचे लोक जमतात.

**उपजीविकेचीं बाह्य साधनें:**— चुनारिया चुना भाजतात आणि जमीन कसतात. अहमदाबादेंत ते जुन्या विटा विकतात व बैलावर गोण्या वाहतात. ह्या जातीचे लोक गुन्हे करीत नाहींत. दातनिया दांतण विकतात आणि लग्नकार्यांत ढोल वाजवितात. ते कांकड्या, चिबड्या वगैरे भाजीपाला करतात, आणि तो त्यांच्या बायका विकतात. ते शिकारही करतात. वेड् शेती, व पावसाळ्यांत भाजीपाला करतात. ते बांबू व काठेवाडी चिलमी विकतात, बरूच्या तट्ट्या करतात आणि " वळू "–टोणगे पाळतात. चुंवालिया भाजीपाला करतात, आणि बनावट मध विकतात. कंकोडिया शेती करतात, आणि मध व औषधीवनस्पति विकतात. ते शेळ्यामेंढ्याही पाळतात. चिकडिया अट्टल भिकार आहेत. आपल्याला कांहीं दुर्धर रोग झाला आहे, किंवा आपली कोणी बाई अडली आहे, अगर दुसऱ्या एखाद्या मोठ्या संकटांत आहोंत, असा बाहणा करून ते भोळ्या लोकांकडून पैसा उकळतात. वाघऱ्यांचे आपण गुरु आहोंत अशी ते थाप मारतात. पटनी बैलांची हेड करतात, आणि वर्षानें पैसे घेण्याची बोली करून शेतकऱ्यांला ते विकतात. ते बैल खच्ची करण्याचाही धंदा करतात. तळब्दे शेती व जागलकी करतात. ते लांकडें फोडतात आणि शेळ्यामेंढ्या पाळतात. ते आंबे, मोहाचीं फुलें व फळें विकतात. पावसाळ्यांत ते व त्यांच्या बायका शेतमजुरी करतात. धांडरिये, ढोरें, भाजीपाला, फळें व आंबे विकतात. ते बहुतेक गुन्हा करीत नाहींत. वाघरी शेतीला चिकटून राहत नाहींत. त्यांपैकीं पुष्कळजण अहमदाबादसारख्या

मोठ्या शहरांत गिरण्यांत उद्योगधंदा करून, जनावरें पाळून, मासे किंवा शिकार धरून पोट भरतात. दुष्काळांत ते मुंबईस येतात. कांहीं वाघरी भुईतील शिकार, फांदड्यांनीं ( जाळीं ) करण्यांत फार पटाईत असतात, व पाणकोंबडे, बदक, बगळे वगैरे पकडतात. साहेबलोक त्यांना शिकारी ठेवितात. ते पक्षांसारखे हुबेहूब आवाज काढतात, आणि दयाळू हिंदू-जवळून पैसे घेऊन धरलेलीं पांखरें सोडून देतात. दांतनिये आणि चुंवा-लिये पेटाऱ्यांतील चित्रें दाखवून पैसे मिळवितात.

**वेषांतरः**– सोंग आणण्यांत वाघरी फार निपुण आहेत. त्यांच्या बायका गिरासणी, पाटीदारणी, रजपुतणी, ब्राह्मणीचे वेषानें व पुरुष, घाराळ कोळी, गिरासिया, माळी, फुलमाळी यांच्या वेषानें एखाद्या ठिकाणीं नोकरीस राहतात, आणि संधि मिळाल्याबरोबर चोरी करून बाल्या हांकतात. एखादा सुस्वरूप वाघरी आपणाला ठाकूर म्हणवितो आणि बाकीचे त्याचे नौकर बनतात. अशा रीतीनें वाणी किंवा इतर श्रीमंत मनुष्याची ओळख पाहून ते अंधाऱ्या रात्रीं चोऱ्या करतात. पुष्कळ वेळां आपण जोगी आणि ज्योतिषी आहों अशी वाघरी बता-वणी करतात. गुन्ह्याचे ठिकाणीं जातांना किंवा तेथून येतांना ते वाण्याचा किंवा साधूचा वेष घेतात. त्यांची भाषा, धर्मसंस्कारांचें अज्ञान, खादाडपणा, वेड्यावांकड्या रीति यामुळें त्यांची बतावणी फार वेळ टिकत नाहीं.

**गुन्हेः**– चोरी, घरफोडी, ठकबाजी, खिसाचोरी ( विशेषतः शहरांत ) ह्या गुन्ह्यांत वाघरी निष्णात आहेत. ते कधीं कधीं दरोडा व रस्तालूटही करतात. वेडू आणि दांतनिया जातींच्या बायका रेल्वेंत बायकामुलांचे जिन्नस चोरतात. तळब्दे वाघरी व त्यांच्या बायका उभ्या पिकांच्या चोऱ्या करतात, आणि पुरुष ठकबाजी, घरफोडी व जनावरांच्या चोऱ्या करतात. पाटनी वाघरी जनावरांच्या चोऱ्या करतात. वाघरिणी रेल्वेनें गैरकायदा अफू आणून ती आपल्या आंतल्या कपड्यांत लपवून ठेवितात.

**गुन्ह्यांची पद्धतिः—** भीक मागण्यासाठीं हिंडत असतांना वाघ-ऱ्यांना गुन्ह्याची खबर लागते आणि चोरी करण्याला सवड सांपडते. शहरांत भीक मागत असतांना ते मुक्याबहिऱ्याचें सोंग आणून भीक उकळतात, आणि रात्रीच्या उद्योगाकरितां घरेंही हेरून ठेवितात. भाजी-पाला विकतांना त्यांच्या बायका, व लांकडें फोडण्यासाठीं कुऱ्हाड घेऊन हिंडत असतांना पुरुष चोरीसंबंधानें बातमी काढतात. तसेंच परगांवीं रहाणाऱ्या आपल्या जातभाईशीं ते दळणवळण ठेवितात, आणि त्यामुळें गुन्ह्यासंबंधीं भेटी, बेत वगैरेंची त्यांना योजना करतां येते. गुन्ह्याच्या कामांत ते परजातीच्या लोकांशीं मिसळत नाहींत; पण चोरीसाठीं ते तळब्दे आणि चुंवालिया कोळ्यांना आपल्याबरोबर घेतात. " खातरीया" ( दीड फूट लांब व एका बाजूला आंकडी आणि दुसरे बाजूला टांकीसारखें असलेलें लोखंडी हत्यार ) चालविण्यांत ते फार वाकबगार असतात. खातरीयाच्या टोंकानें ते घराच्या विटा व तोडी उखळतात व आंकडीच्या योगानें पेट्यांचे व दारांचे कोयंडे उचटतात. ते पाण्याच्या नळानें घरावर चढतात, आणि घरामधील शेरी अरुंद असल्यास पाठीनें व पायांनीं चढून जातात. रात्रीच्या वेळीं पडवींत निजणाऱ्या लोकांच्या अंगावरचे दागिने ते चोरपायानें येऊन काढून नेतात. त्यांचा पाठलाग केला तर ते वान्सीचा ( कोयता बसविलेली काठी ) वार करतात. वाघरी पुरुष व स्त्रिया गुन्हा कबूल करीत नाहींत व आपल्या साथी-दारांना गुंतवीत नाहींत. घरफोडीसाठीं ते बिजागऱ्यांवरून दार उचटतात, किंवा चौकटीच्या बाजूला बगलीपद्धतीनें भोंक पाडून कडी अथवा आगळ काढतात, अगर मागच्या भिंतीला माणूस न जाईल असें लहान भोंक पाडतात, किंवा खिडक्यांची चौकट काढतात. घर फोडणाऱ्या टोळींत बहुधा पांचांवर इसम नसतात; दोघे घरांत शिरतात, एखाद-दुसरा पहारा करतो आणि बाकीचे माल लांबवितात. घरांतून लौकर निसटतां यावें ह्मणून ते दार किंवा खिडकी उघडी ठेवितात. सापाप्रमाणें

किंवा उंदराप्रमाणें आवाज काढून ते एकमेकांना खूण करतात. तळब्दे वाघरी अट्टल घरफोडे असतात. बातमी काढण्यासाठीं ते आपल्या जातभाईंच्या घरीं वाण्याच्या वेषानें जाऊन उतरतात. तसेंच वाणी, ब्राह्मण वगैरे परजातीचे लोकही त्यांना खबर देतात. कधीं कधीं जें घर फोडावयाचें तें व त्याच्या आजूबाजूची जागा ते दिवसांच पाहून ठेवितात. रस्त्यानें ते उगीच हिंडतांना दिसतात, पण त्यांचे डोळे गरगर फिरत असतात, इकडे पोलिसनें लक्ष द्यावें. आपले मित्र रहातात त्या गल्लींत आणि चांदण्या रात्रीं ते बहुधा घरफोडी करीत नाहींत. चोरीचा माल घेणाराला खरे किंवा खोटे दागिने दाखवून ते एखाद्या सोईस्कर ठिकाणीं घुलवून नेतात. तेथें त्यांच्याचपैकीं कांहींजण पोलिसच्या वेषानें येतात. पुनः दुसरे एखादे वेळीं सौदा करूं, आतां पैसे व दागिने येथें राहूं द्या आणि झट्कन आधीं निघून जा, असें माल घेणाराचे मनांत भरवून त्याला काढून देतात; किंवा खोटे दागिने त्याच्या माथीं मारून घाईघाईनें त्याला तेथून लावून देतात; अथवा बोभाटा होऊं नये म्हणून आह्मी पोलिसला दागिने देतों, तुम्ही पैसे द्या, असें सांगून त्यांजकडून पैसे देववितात; अगर माल घेणारा सौदा करून परत चालला असतां त्याला रस्त्यानें लुटतात. मोठ्या शहरांत ते भोंदण्याजोगा इसम चाललासें पाहून कृत्रिम सोन्याचा तुकडा रस्त्यांत टाकतात. जाणारा इसम तो उचलतो. मग ते त्याला ह्मणतात कीं, ' वांटा टाक नाहीं तर मी पोलिसला वर्दी देतों. ' हो ना करतां त्याचेजवळून ते दहा बारा रुपये उपटतात. कधीं कधीं त्यांचाच एखादा इसम मध्यें पडून रकम ठरवितो. मुलांच्या अंगावरचे दागिने काढण्यांत वाघरिणी फार पटाईत असतात. लग्नकार्यांत पंक्ति उठून बायका घरोघर जाण्याला निघणार इतक्यांत त्या त्यांच्यांत मिसळून बायकामुलांचें दागिने काढून हातोहात लांबवितात. कधीं कधीं आपणांला ब्राह्मणीं ह्मणवून त्या आयत्या वेळेला पंक्तींत येतात, आणि आपला धंदा चालवितात. रस्त्यांत लहान मूल

एकटेंच दिसलें तर वाघरी व वाघरिणी त्याला फळें किंवा खाऊ देऊन किंवा झुंबराच्या कांचा दाखवून एकांत ठिकाणीं घुलवून नेतात, आणि त्याचे दागिने काढून घेतात. भीक मागतांना ते खुशाल घरांत शिरतात आणि हातीं पडेल तें चोरतात. वाघरिणी दोघी किंवा अधिक मिळून चोरी करतात. रेल्वेंत चोरी करण्याची त्यांची रीत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—दोघी किंवा तिघी आपण वरिष्ठ जातीचे आहोंत असें सांगून रात्रीं बायकांचे डब्यांत बसतात. जागा नाहीं ह्मणून किंवा मूल रडतें ( चिमटा घेऊन त्याला रडवावयाला लावितात ) तें पाजावयाला ह्मणून बांकाखालीं जाऊन एक निजते, तेथें भिंगानें किंवा चाकूनें एखादें पाकीट फोडते, किंवा खिळ्यानें अगर किल्लीनें ट्रंक उघडते, आणि त्यांतील माल बांकावर बसलेल्या आपल्या साथीदारणीला देते. ती तो टांगामध्यें किंवा घागऱ्याच्या चोरखिशामध्यें लपवून ठेविते. नंतर पुढील स्टेशनावर त्या सर्वजणी उतरून पसार होतात. कांहीं देखण्या वाघरिणी ज्या स्टेशनावरून आपल्याला नेहमीं उतरावयाचें चढावयाचें असतें तेथील रेल्वेनोकरांशीं वळण बांधतात. तथापि ज्या स्टेशनावर चोरी उघडकीस आली असेल, त्याच्या मागच्या स्टेशनावर नजीक लांबचीं तिकिटें तपासलीं असतां चोरीचा पत्ता लागण्याचा संभव असतो. लग्नाची अडचण पडलेल्या पाटीदार किंवा कुणब्याशीं वाघरिणी लग्न लावून त्यांच्याबरोबर कांहीं दिवस संसार करतात; व तो बाहेरगांवीं गेला आहे अशा समयीं दागदागिने घेऊन त्या पसार होतात, असें कित्येकदां घडून आल्याचीं उदाहरणें आहेत.

**गुन्ह्यांचीं हत्यारें:**—खातरिया किंवा गणेशिया, विंजनू (पटाशी), करीयली ढांग ( एका टोंकाला लोखंडाच्या विड्या बसविलेली भरीव काठी ), सुरा, वान्सी, धारिया ( अणीदार सुरा बसविला आहे अशी काठी ), किल्ल्यांचा जुडगा, मेणबत्त्या, आगपेट्या हीं त्यांचीं गुन्ह्याचीं हत्यारें होत. वाघरिणीजवळ चोरीचा माल सांठवावयाला बगलेंत एक लहान बटवी, एक कांचेचा तुकडा, किंवा चाकू ह्या जिनसा असतात.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**—चोरीचा माल ते दोन तीन महिने शेतांत पुरून ठेवितात. नंतर तो पाटीदार, गिराशिये, वाणी, रजपूत, पाटील, सोनार व अलीकडे काठेवाडी मेमन लोक यांना विकतात. हे मेमन लोक अत्तर, कापड, मोतीं, जवाहीर, विकतात; आणि त्यांच्या टीनच्या पेट्या चोरीचा माल लपविण्याला सोईस्कर असतात. गुन्ह्यांत पुष्कळ माल मिळाला तर तो बायकांजवळ देऊन रेल्वेनें पाठविण्यांत येतो. हे लोक गुह्यांगांतही माल लपवितात. सबब बायकांपुरुषांचा झाडा नीट घ्यावा. बायकांचे घागऱ्यांना चोरखिसे असतात, तरी ते व पुरुषांचे तंबुरे किंवा एकतारीही तपाशीत जावी. तसेंच त्यांच्या तळाची जागा नीट नांगरून काढावी. चोरी चांगली साधली म्हणजे वाघरी लोक खाण्यापिण्याची चंगळ उडवून देतात. अशा मेजवानीला ते "भुव्याला"-ही बोलावितात.

---

## वड्डर.

**संज्ञाः**—वड्डर लोक तेलंगी आहेत. त्यांच्या खालीं लिहिलेल्या पोट-जाती आहेतः—मण्ण किंवा माती; भंडी किंवा गाडी; पाथरट, जंती, कल्ल किंवा दगडी; ( मद्रासेकडे यांना इसुराये ( = जातें ) वड्डर म्हणतात. ) घट्टी किंवा डोंग ( चोर ) अगर टक्क ( ठक ).

**वस्तिः**— ते महाराष्ट्र, कर्नाटक आणि कोंकणभर पसरले आहेत.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**— वडारी फिरस्ते असून, काम मिळेल तेथें पालांत रहातात. कांहीं भंडी व मण्ण वडार गांवांत स्थाईक झाले आहेत. भंडी आणि घट्टी वड्डर हे विशेष गुन्हेगार आहेत. ते तळापासून

तीस मैल जाऊन दरोडा मारतात. ते बहुधा तळापासून पंधरा मैलांपर्यंत घरफोड्या करतात. पाटील अनुकूल असला व हेरून ठेविलेलें घर एक दोन दिवसांचे मजलेवर असलें तर ते शंभर मैलांवरही जाऊन गुन्हा करतात. ते रहातात त्या तालुक्याचे हद्दीबाहेर गुन्हा करतात.

**लोकसंख्याः**–वड्डर सुमारें चौऱ्याहत्तर हजार आहे.

**स्वरूपः**– ही जात फिरस्ती आहे. त्यांचें शरीर फक्कड व वर्ण काळा असतो. ते मेहनती, श्रमसहिष्णु, घाणेरडे, उडाऊ, दारूबाज असतात. ते डुकरें खातात, गाई खात नाहींत. त्यांना घुशी फार आवडतात. ते गांजा, तंबाखू ओढतात. त्यांच्यांत कपड्याची वानवाच असते. पुरुषांचा पोषाख धोतर अगर चोळणा, आंगी अगर पेहरण, रुमाल, हचडा, कांबळें अगर उपरणें हा होय. ते जोडे घालीत नाहींत. बायका लुगडें नेसतात आणि वरचा पदर डोकें व छाती ह्यांवरून घेतात. त्या चोळी घालीत नाहींत, आणि उजव्या हातांत बांगडी घालीत नाहींत. त्या काशाच्या किंवा पितळेच्या बांगड्या घालतात. भंडी वडार गांवोगांव फिरतात व पडदे सोडलेल्या गवती पालांतून गांवाबाहेर राहतात. त्यांच्याबरोबर बायका, पोरें, आणि लहान चाकाचे गाडे असतात. कल्ल वडार गांवाजवळ गोदड्यांच्या, क्वचित् गवताच्या पालांत उतरतात. त्यांच्याबरोबर त्यांचीं बायकापोरें, गाढवें असतात. घट्टी वडार गांवापासून मैल दोन मैलांवर जंगलांत चटायांच्या पालांत उतरतात. त्यांच्याबरोबर त्यांचीं बायकापोरें, गाढवें, बकरीं असतात. मण्ण वडार गांवोगांव कायमची वस्ति करून राहिले आहेत. कर्नाटकांत वडारांच्या तळाला "गुंपु" म्हणतात, आणि नाईकाला "पेड्डू" ह्मणतात. तो पंचामार्फत जातीचीं भांडणें मिटवितो.

**भाषाः**– वडार आपापसांत तेलगू भाषा बोलतात. तसेंच ते राहतात त्या जिल्ह्याची कानडी किंवा मराठी भाषाही बोलतात.

## कर्नाटकांतील वडाऱ्यांचे सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| शिलाकट्टी ... | घरफोडीचें हत्यार. | मनकलु... ... | बीळ. |
| मुल्ला वाडू ... | कॉन्स्टेबल. | डोंगपानी, वलकमु. | चोरीचा माल. |
| परमेश्वर ... | मोठा पोलिस अमलदार. | कोट्टलु, उंसलु ... | मारणें, छापा घालणें. |
| नेमतु ... ... | गांवकामगार, गांवकरी. | डोंग ... ... | चोरी. |
| पेरडु ... ... | घर. | उंसलु, पेरडु ... | घरावर दरोडा. |

रस्त्यांच्या पटावर किंवा ते वळतात तेथें भुसभुशीत मातीवर घट्टी वडार पावलाच्या बाजूनें एक रुंद रेघ काढून तिच्या शेवटीं ज्या रस्त्यानें ते गेले असतील त्या बाजूला एक पाऊल वठवितात, म्हणजे मागून येणाऱ्याला ते कोणीकडे गेले हें समजतें.

**उपजीविकेचीं दर्शनीं साधनें:**—मण्ण वडार शेती, शेतकाम व मातकाम करतात, विहिरी तळीं खणतात, आणि रस्तादुरुस्ती, मातीचा भराव, वगैरे कामें करतात. भंडी वडार दगडाची खाण लावून एंजीनिअर खात्यामार्फत दगड वाहतात, व विहिरी तळीं खणतात. थोडेसे शेतीही करतात. कल्ल वडार जातीं, उखळें वगैरे दगडाचीं कामें करतात. त्यांच्या बायका जात्याला टांकी लावितात. हे खाऊनपिऊन बरे आहेत. घट्टी वडारांचा निर्वाह गुन्ह्यावर असतो. वडार डुकरें पकडून मारतात. रानडुकरापासून पिकें राखण्यासाठीं गांवकरी लोक त्यांना ठेवितात.

**वेषांतर:**— दरोड्याच्या वेळीं ते धाटे बांधतात आणि छातीला व तोंडाला चुना फांसतात. ते शिटीनें व हातवाऱ्यांनीं एकमेकांस खुणा करतात.

**गुन्हे:**—मण्ण वडार घरफोडी, लहान चोऱ्या, उभें पीक चोरणें आणि पेंव फोडणें हे गुन्हे करतात. भंडी वड्डर पटाईत घरफोडे आहेत. ते मेंढ्या चोरतात, लहानसान चोऱ्या करतात, आणि कधीं कधीं दरोडा किंवा जबरीची चोरी करतात. कल्ल वड्डर बहुधा गुन्हे करीत नाहींत.

पण ते कधीं कधीं घरें फोडतात, व मेंढ्या चोरतात. घट्टी वड्डर दरोडा, जबरीची चोरी, रस्तालूट, घरफोडी, मेंढ्या चोरणें वगैरे गुन्हे करतात. यात्रांत किंवा बाजारांत त्यांचीं बायकापोरें उचलेगिरी करतात. घराबाहेर निजलेल्या इसमांच्या अंगावरचे दागिने या जातीचे पुरुष रात्रीं काढून घेतात. वड्डर गुन्ह्यासाठीं दुसऱ्या जातीला जाऊन मिळतात आणि दुसऱ्या जातीचे लोकही आपल्यांत घेतात.

**गुन्ह्यांची पद्धतिः**—घरावर दरोडा. जातीं लावण्याच्या मिषानें घरोघर जाणाऱ्या वडारणींमार्फत अगर भिकेसाठीं म्हणून हिंडणाऱ्या आपल्या मुलांमार्फत किंवा आपल्या दोस्तींतल्या गांवच्या बदमाषांमार्फत घट्टी वडारी बातमी काढतात. त्यांच्या बायकांबरोबर मोठीं मुलें किंवा म्हातारे असतात. हे पुढें टोळींतल्या घरफोड्यांना घरें दाखविण्याच्या कामीं उपयोगी पडतात. अशा प्रकारें मिळालेली माहिती अपुरी वाटल्यास टोळींतील एखादा इसम गाढवावर बसून येतो आणि चुकलेलें गाढव शोधण्याच्या मिषानें घराची जागा वगैरे पाहून घेतो. नंतर ते लांबच्या गांवाला तळ नेतात. टोळींत दहा ते पंधरा इसम असतात व ते एका किंवा अधिक तांड्यांतून ( गुंपु ) भरतात. सव टोळी जमून गुन्ह्याचा बेत व टोळीनें कोठें केव्हां जमावयाचें वगैरे मुक्रर करते. संकेतस्थानीं जमण्यासाठीं दोन दोन, तीन तीन इसम रात्रीं निरनिराळ्या मार्गांनीं प्रवास करतात, आणि दिवसां कोठें तरी लपून राहतात. तेथें जमल्यावर " पेड्डू " ज्याचें त्याला काम नेमून देतो. कांहींनीं दगड फेंकणें, कांहींनीं वाटा रोंखणें आणि अनुभवशीर व धीट इसमांनीं आंत घुसून घर लुटणें, याप्रमाणें कामाची वांटणी असते. ते संकेतस्थानीं फाजील कपडा वगैरे काढून ठेवितात, तोंडाला राख किंवा चुना फांसतात, धोतराचे ओंचे खोंवतात, कमरेला काचा आंवळतात, कांबळें किंवा पासोडी खांद्यावरून कमरेला बांधतात व त्यांत दगड ठेवितात, आणि बरोबर लाठ्या, गोफण, धोंडे व एक दोन मशाली घेतात. रात्रीं

घरें उघडीं आहेत तोंच टोळी गांवांत घुसते व घरावर चालून जाऊन आंतील माणसांस ठोकून लुटीसह पसार होते. ते बायकांना मारहाण करीत नाहींत आणि त्यांचें मंगळसूत्र, जोडवीं नेत नाहींत. माल ताबड-तोब काढून दिला नाहीं किंवा जवाहिराची जागा दाखविली नाहीं किंवा कोणी आडवें आलें, तर ते बेसुमार मारहाण, वेळेवर खूनही करतात. गांवाबाहेर "पेड्डू" सर्वांची हजिरी घेतो आणि सर्वजण संकेत-स्थानीं येतात. जें कांहीं जवळ असेल तें प्रत्येकजण काढून देतो. " पेड्डू " सर्वांचा झाडा घेतो. एक दोघा विश्वासू इसमांच्या ताब्यांत ते चोरीचा माल देतात. पोलिसला हूल दाखविण्यासाठीं आणि दुसऱ्या जातीचा संशय यावा म्हणून ते लमाणांच्यासारखे पानसुपारीचे बटवे गुन्ह्याच्या ठिकाणाजवळ टाकतात. ते एका फेरींत एकच घर मारतांत.

रस्त्यावर दरोडाः– लुटण्याजोग्या गाड्या किंवा प्रवाशी शोधून काढण्यासाठीं गांवानजिकच्या हमरस्त्यावर, धर्मशाळांत किंवा उताराच्या जागीं ते हेर बसवितात. बाकीची टोळी नाल्यांत, पुलाखालीं किंवा खडकाच्या आड दडून रहाते. बातमी मिळाल्यावर शिकार आली कीं टोळी बाहेर पडते. ते बैल सोडतात, गाड्या उलथवितात, वाटसरांना ठोकतात, त्यांच्याजवळचें जडजवाहीर हिसकून घेतात, पेट्या फोडून त्यांतला माल काढून घेतात आणि आडरस्त्यांनीं जातात. जर फारसा ऐवज हातीं लागला नाहीं तर ते दुसऱ्या ठिकाणीं जाऊन वरीलप्रमाणें वाटसरांवर हल्ला करतात, आणि माल घेऊन तळावर जातात. तळा-पासून दहा मैलांवर उजाडण्याचे सुमारास किंवा अंधार पडण्याचे सुमारास ते हमरस्त्यावर दरोडा घालतात.

घरफोडीः– बगली किंवा रुमाली पद्धतीनें कृष्णपक्षीं उत्तररात्रीं दोन ते पांच वडारांची टोळी घरफोडी करते. तोंडीमधील चिखल ते सुरीनें अगर पहारीनें अगर कनगट्टीनें ( अठरा इंच लांब व दीड इंच व्यासाचा पुढें चपटा होत गेलेला लोखंडी बत्ता ) काढतात. पहारीचे

वेडेवांकडे मारे घरांवर बसले म्हणजे वडारांचें काम समजावें. भिंतीला जलद भोंकें पाडण्यांत वडार फार तरबेज असतात. जर एका घरीं कांहीं मिळालें नाहीं तर ते दुसरें घर फोडतात.

वड्डुर बहुधा गुन्हा कबूल करीत नाहींत, आणि एकमेकांला गुंतवीत नाहींत. फोडलेल्या घरांतील इसमांनीं घुशीसारखा भिंत उकरण्याचा आवाज ऐकला असेल, आणि जवळपास वडाऱ्यांचा तळ असेल तर तेथें अवश्य तपास करावा.

**गुन्ह्यांचीं हत्यारें**:–सोडगे, गोफण, धोंडे, सुऱ्या, कनगट्टी, पहार हीं त्यांचीं गुन्ह्यांचीं हत्यारें होत.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**– चोरीचा माल ते टोळींतील विश्वासू इसमाजवळ देतात, तो तो माल तळाजवळच्या शेतांत अगर जंगलांत पुरतो. नंतर तो दोस्तींतले सोनार, कलाल, सावकार यांना विकतात. ते जवाहीर कधीं वांटून घेत नाहींत, त्याचे पैसे करतात. त्यांत पेड्डूचा वांटा मोठा असतो. वडाऱ्यांजवळ चोरीचा माल बहुधा मिळत नाहीं.

# मुंबई इलाख्यांत येणारे इतर प्रांतांतील गुन्हेगार.

## बौरी किंवा बौरिये.

**संज्ञा:**— मुंबई इलाख्यांत ज्या परप्रांतांतल्या गुन्हेगार जाती येतात त्या सर्वांत बौरी किंवा बौरिये फार चतुर व चिकाटीचे असतात. त्यांच्या पोटजाती खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:— दिल्लीवाल, मालपुरे किंवा करौली, खैरवाडे किंवा केरार, बदक, मारवाड बौरी, पंजाबी, माळवी अथवा मोघिये बौरी. त्यांच्यांत सोलंकी, कोळी, दाबी, चव्हाण, वधियेरे, दांडल, परमार, वगैरे रजपुतांच्याप्रमाणें कुळया आहेत.

**वस्ति:**— दिल्लीवालांचें मूळ ठिकाण मुजफरनगर, मालपुऱ्यांचें भोपाळ, खैरवाडांचें ग्वाल्हेर, बदकांचें भोपाळ आणि संयुक्तप्रांत, आणि मारवाड्यांचें मारवाड होय.

**गुन्ह्यांचें क्षेत्र:**— बौरी सिलोनखेरीज करून चोहींकडे गुन्हे करतात. ते जगन्नाथ, त्रिंबक, द्वारका, रामेश्वर, प्रयाग, काशी, अयोध्या, ओंकार, हरिद्वार येथें जातात. परंतु मोघीये गुजराथ व खानदेश ह्यांच्याखालीं उतरत नाहींत. बौरी लोक खेड्यांत तसे शहरांतही गुन्हे करतात. त्यांच्या टोळींत दहांपर्यंत इसम असतात. संशय येईपर्यंत ते मोठ्या गांवीं सर्वजण एकत्र काम करतात. मोठ्या घरफोडीकरितां ते दिवसांतून चाळीस चाळीस मैल जातात. दिल्लीवाल व मारवाडांच्या टोळीच्या नायकाला “ कमाऊ, ” मालपुऱ्यांच्याला “ काडु, ” बद-

कांच्याला " उपकारे " आणि मोघीयांच्याला " जमादार " ह्मणतात. दिल्लीवाल आणि मालपुऱ्यांच्या टोळींत कमाऊ, भंडारी ( स्वयंपाक्या ), कोठारी ( हरकाम्या ), पिटवाडी ( टोळींतील चोरी करणारे लोक ) असे असतात. मालपुरे आणि मोघीये सडे असतात; दिल्लीवालांच्या टोळीबरोबर कधीं कधीं बायकापोरें असतात; आणि बदक, मारवाड, खैरवाड ह्यांच्याबरोबर बायकामुलें नेहमीं असतात. माणसें व सामान नेण्यासाठीं बदक तट्टें, गाढवें, गाई, ह्मशी बरोबर नेतात. खैरवाड नुसते बैलच नेतात. मारवाड आणि दिल्लीवाल नुसतीं तट्टेंच नेतात, आणि मोघ्यांच्या टोळीबरोबर कधीं कधीं एकादटुसरा उंट असतो. खैरवाड आणि मारवाड बौरी गांवांत धर्मशाळांत किंवा देवळांत उतरतात. बाकी सर्व जातींचे बौरी गांवकुसाजवळ मैदानांत, पाण्यानजीकच्या बागेंत अगर झाडींत, किंवा वस्ति नाहीं अशा एखाद्या मठांत किंवा देवळांत उतरतात. बदक बहुधा पालें ठोकून रहातात; आणि दिल्लीवाल बरोबर बायकामुलें असल्यास पावसाळ्यांत पालें देतात.

**लोकसंख्याः**— या जातीची मुंबई इलाख्यांत वस्ति किती आहे, याजबद्दल माहिती मिळून येत नाहीं.

**स्वरूपः**— खानदेशचे बंजारी किंवा पंचमहालचे लभाण यांप्रमाणें ते दिसतात. त्यांची उंची सरासरी, शरीर रासवट व इंद्रियें तीक्ष्ण असतात. ते मजबूद, बांधेसूद, फिकट किंवा काळसर, चपळ व श्रमसहिष्णु असतात. गुन्हा करण्याचे कामीं त्यांना बायकांची मदत नसते. परंतु त्या चोरीच्या मालाची व्यवस्था लावण्याचे कामांत व वकील देण्याचे कामांत मदत करतात. बौऱ्यांच्या धोतराचे आंतून लंगोटी नसते. ते दहा हाती धोतर किंवा सहा हाती पंचा ( आंगोचा ) नेसतात. धोतर उजव्या मांडीकडे व पंचा डाव्या मांडीकडे अपरा असतो. ते कुडतें व मोठा फेटा घालतात. मारवाडी बौरी उजव्या पायांत कडें घालतात. बदक बौऱ्यांची रहाणी सर्वांत घाणेरडी आणि अव्यवस्थित असते.

बौऱ्यांच्या बायका आपल्या देशांत घागरा, ओढणी, कांचोळी, किंवा " सुटना " ( पायजमा ) आणि " मिरजाई " ( चोळीवरील अंगरखा ) घालतात. दक्षिणेंत त्या लुगडें नेसतात. नाकाडोळ्यांच्या कडा, हनुवटी, मनगट, हात, बोटें वगैरेंवर त्या फार गोंधतात. बौरिये घरीं व बायका बरोबर असल्यास मुशाफरींतही मडक्यांत स्वयंपाक करतात, पण परमुलखीं ते साधूच्या वेषानें हिंडतात, म्हणून ते धातूंच्या भांड्यांत स्वयंपाक करतात. ते गांजा, तंबाखू ओढतात, व दारूही झोंकतात. कांहीं अफू खातात. ते गोमांस सोडून सर्व प्रकारचें मांस खातात, व अंत्यज खेरीज करून सर्व जातींचे लोक आपल्या जातींत घेतात. गुन्ह्यांत पुष्कळ माल मिळाल्यास ते खाण्यापिण्याची रेलचेल करून मजा मारतात.

**भाषा:–** अशुद्ध हिंदी आणि गुजराथी मिळून त्यांची भाषा झालेली आहे. ते बोलतांना सूर काढतात, आणि त्यांच्या भाषेंत **स**च्या जागीं **ख** येतो. जसें– " खाब अगाडी खाची वात कोहिओ मा ' " साहेबके आगे सच बात मत् बोलो. " ते हिंदुस्थानी जलद बोलतात. मोघीयांना माळवी भाषाही बोलतां येते.

## दिल्लीवाल, खैरवाड व मालपुरे, ह्यांचे सांकेतिक शब्द.

दटोनी, नेत्री ... सुरी.
पिड ... ... सोनें.
ढवळी ... ... रुपें.
नकोनी ... ... नथ.
भाजी ... ... मांस.
कलाडी ... ... दारू.
दांडो ... ... रस्ता.
गोमती ... ... रात्र.
भोगी ... ... लूट.
ग्यान, ग्यानदास.. घरफोडीचें हत्यार.
तेरवा, तरकड ... शिपाई.
तोडी, फोडी, चगडी, गेरो } फोडून टाक.

गाळी गेरो ... गाळून टाक.
मंडलोन ... टोळी.
गोड्डामरतो आवई. पावलें पुसून टाक
तेरवाथै आवेसे... शिपाई येत आहे
येक येक घाख खैजाव } वेगवेगळाले पळून जा.
हेट्टेकरी गेरो ... जमिनींत पूर.
कोलदाख ... दडून रहा.
उझंतो ... ... डागिने ओरबड.
जमनो डावो ... उजवा डावा.
तूक ... ... भाकरी.


## बदकांचे सांकेतिक शब्द.



| | |
|---|---|
| मांखो, मांखिया | पुरुष. |
| मांखी … … | बायको. |
| रोखलो … … | भाकर. |
| ढोरी … … | रुपें. |
| नेत्री … … | सुरी. |
| बवन … … | नातलग स्त्री. |
| काळी भोर … | शिपाई. |
| मोटा मोंडो … | अंमलदार. |
| खबर थै गै… | खबर मिळाली. |
| खतीजाव … | लप. |
| रमई दो … | ते घेऊन जा. |
| यमइ कचुनही झरकरीयो | मला माल सांपडत नाहीं. |
| एक जणे आले लीदो | एका इसमास अटक केली. |
| मने झाल लिदो… | मला अटक केली. |
| हिरो चुडवेले … | त्याला सोडवूं या. |
| उपर पडा … | दरोडा. |
| खोईजा… … | नीज. |
| खांकरो, चरणदासी | जोडा. |
| पटकरी … … | बंदूक. |
| तेरवा … … | चौकीदार. |
| तलरो, खपकर्नी.. | तरवार. |
| लोंड्रीया पोखी रहो | कुत्रा भोंकतो. |
| पिलो … … | सोनें. |

ग्यानको थई नई—बत्ता आंत गेला नाहीं.

## दुसऱ्या पोटजातींचे सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| भिंडो, भिंडिया… | पुरुष. |
| भिंडी… … … | बायको. |
| कजली … … | चोरी. |
| संटो … … … | घरफोडी. |
| दौलत्तीया … … | बौऱ्यांचा बत्ता. |
| तनै लिया … … | त्यांना अटक केली. |
| बझडलो … … | त्याला सोडीव. |
| नही हदलो … | पळ. |
| हरा … … … | दरोडा. |
| नखल्या, गंगाराम | जोडा. |
| भूतकनी … … | बंदूक. |
| नोकिया … … | चौकीदार. |
| बझतैडो … … | ती जिन्नस लपीव. |
| नइतेरी … … | तरवार. |
| रामराज … … | सोनें. |
| बत्ती … … … | सुरी. |
| खौरा, बजनीया… | रुपाया. |

दिल्लीवाल आणि मालपुरे, यांच्या कांहीं सांकेतिक खुणा आहेत. घरें, धर्मशाळा, देवळें वगैरेंच्या भिंती आणि पूल, नावा वगैरे यांजवर कोळशानें, किंवा रस्त्याच्या कडेच्या जमिनीवर काठीनें ते त्या खुणा काढतात. त्यांची मुख्य खूण आंकडीच्या काठीसारखी असते.  सदर आंकडीचें सरळ टोंक ज्या दिशेला असतें, तिकडे

टोळी गेली असें समजावें. आंकडींत जितक्या उभ्या रेघा तितके पुरुष  टोळींत असतात. वर्तुळ काढून त्याच्यांत टोळींतले इसम दर्शविणाऱ्या उभ्या रेघा काढलेल्या असल्या, म्हणजे असें समजावें कीं, टोळी सुखरूप आहे, ती लौकरच परतणार आहे, आणि तिचा तळ नजीक आहे  . चौकटीभोंवतीं, कडें काढून त्या कड्यापुढें एक रेघ काढलेली असली, म्हणजे असें समजावें कीं, साथीदार माल घेऊन  रेघेच्या दिशेला गेले. ( चौकट = पेटी ). ह्या खुणा स्पष्ट सुमारें एक फूट लांब असून त्या सहज दिसतील, अशा जागीं काढलेल्या असतात. त्या पाहून बौरी शंभर मैलपर्यंत एकमेकांच्या मागें जातात.

**उपजीविकेचीं बाह्य साधनें:-** आपल्या मुलखांत शेती, शेतकाम, सरपण, गवत विकणें वगैरेंवर बौरी लोक पोट भरतात. कांहीं जागले व माग काढणारेही असतात. ह्या इलाख्यांत ते बहुधा भीक मागतात; आणि कांहीं जण अत्तरें, धातुपौष्टिक औषधें वगैरे विकतात. मोघिये मात्र आगाऊ ठरविलेला गुन्हा करण्यापुरती वाटखर्ची पदरांत बांधून येतात.

**वेषांतर:-** बायकापोरें बरोबर असल्यास गोसाव्याचे वेषानें व सडेपणीं बैराग्याच्या वेषानें ते इकडे येतात. ते कपाळाला भस्म किंवा गोपीचंदन लावतात, तुळशीरुद्राक्षांच्या माळा घालतात, आणि त्यांच्या हातांत चिमटा व कमंडलु असतो. ते भगवीं वस्त्रें परिधान करितात; व दोघे तिघे मिळून तुळशीदासाचें रामायण पढत बसतात. कोणी हजामत करतात, कोणी जटा वाढवितात. ते आपल्या नांवा-

पुढे दास ( बैरागी ) किंवा गिर ( गोसावी ) असें लावतात. त्यांचीं नांवें दोन असतात. एक आईबापांनीं ठेविलेलें व दुसरें गुरूनें ठेविलेलें. पण ते आपलीं नांवें वरचेवर बदलतात. त्यांच्या दंडावर द्वारकेच्या किंवा अयोध्येच्या तप्त मुद्रा असतात. कमाऊ ( नाईक ) गुरु आणि बाकीचे इसम चेले बनतात. ते आपले तळाला " आसन " व टोळीला " मंडल " किंवा " गिरो " म्हणतात. एकंदर टिळाटोपी जेथले तेथें करून ते आणलेल्या सोंगाची बतावणी उत्कृष्ट करतात. परंतु कधीं कधीं भलतीकडे जानव्याची गांठ दिल्यानें, किंवा तिलक लाविल्यानें, किंवा वर्ज्य पदार्थ खाल्ल्यानें त्यांचें बेंड फुटतें. ते बहुधा गांवाबाहेर रहातात; आणि उघड रीतीनें मांस खातात, व दारू पितात. खरे साधु बहुधा आपआपला स्वयंपाक वेगळा करतात. पण बौरिये एकत्र स्वयंपाक करून एका पंक्तींत जेवतात. साधूंच्या मेळ्यांत ठिकठिकाणचे वेगवेगळी भाषा बोलणारे लोक असतात. पण बौऱ्यांचे टोळींत असें कांहींच नसतें. मारवाड बौरिये आपणांला कधीं कधीं संजोगी बैरागी किंवा हिंदुस्थानी ब्राह्मण म्हणवितात, आणि पाणक्याचें वगैरे घरकाम पत्करतात. अशा वेषानें ते वर्षानुवर्ष रहातात, आणि रात्रीं चोऱ्या करतात. कधीं कधीं ते गंगाजलाच्या कावडी घेऊन फिरतात. बदक बौरी, रामनंदी बैराग्यांचा वेष घेऊन फिरतात. बौऱ्यांचा एक कुलस्वामी असतो. त्यावरून ते ओळखतां येतात. कांहीं गहूं व " ममरखी " नांवाच्या वेलाच्या तूप लावलेल्या बिया, तांब्याच्या किंवा पितळेच्या डबींत घालतात; आणि ती डबी, एक मोरपीस, व घंटा, हीं सव्वादोन हात लांब, दोन हात रुंद अशा पांढऱ्या रुमालजोडींत गुंडाळून ठेवितात. या वळकटीवर बकऱ्याचे रक्ताचा पंजा उठविलेला असतो; आणि ही वळकटी दोन खारवी रुमालांत गुंडाळलेली असते. ते जर इमारतींत उतरले, तर हा देव भिंतीवर टांगून ठेवितात; आणि मैदानांत उतरले, तर कोणी पुरुष माणूस तो उशाला घेतो. त्याला ते पुरुषाशिवाय किंवा वरिष्ठ जातीच्या हिंदू-

शिवाय कोणाला शिवूं देत नाहींत. बदक, मारवाड, खैरवाड आणि मोघिये सद्दर वळकटींत आणखी घागऱ्या किंवा घंटा घालतात, आणि त्याला देवी म्हणतात.

**गुन्हे:**– ह्या जातीचा मुख्य गुन्हा घरफोडी होय. दिल्लीवाल, मालपुरे व खैरवाड बौरी रात्रीं चोरी, पेट्या उचलून नेणें आणि घरफोडी करतात. ते दिवसां घरफोडी करीत नाहींत. दिल्लीवाल तंबूंतल्या चोऱ्या शिताफीनें करतात. बदक दिवसां व रात्रीं घरफोडी, पिकें, जनावरें व इतर जिनसांची चोरी आणि रस्तालूट करतात. त्यांचीं बायकापोरें लहानसान चोऱ्या व उचलेगिरी करतात. मोघिये घरफोडी, रस्तालूट, दरोडा आणि पिकाजनावरांची चोरी करतात. मारवाड घरफोडी, रस्तालूट, दरोडे, जनावरें उचलणें आणि ठकबाजी करतात. पंजाबी बौरी आपणाला खसवाले म्हणवितात. त्यांच्या बायका यात्रा वगैरेच्या ठिकाणीं जाऊन खिसाचोरी किंवा मुलांच्या अंगावरील दागिन्यांची चोरी करतात. त्या मोठ्या घरीं मोलकरीण म्हणून किंवा कधीं कधीं रखेली म्हणून राहून गुन्ह्यासंबंधानें बातमी आपल्या पुरुषांना देतात. लहानसान जिनसा त्या आपल्या अंगावर लपवितात, किंवा गिळतात. पोलीसशीं हे लोक मारामारीही करतात, आणि खोटीं नाणीं व नोटा करतात. मालपुरे, मारवाड व बदकबौरी रेल्वेंतील प्रवाशास भूल देतात, अशी समज आहे.

**गुन्ह्यांची पद्धति:**– बौरी "रामथे" ला (फेरीला) कार्तिकांत निघतात आणि आषाढांत परत आपल्या घरीं जातात, अगर एखाद्या ठिकाणीं पावसाळाभर वस्ति करूनही रहातात. शुद्धपक्षीं एखाद्या गांवीं तळ पडला म्हणजे कमाऊ आणि एखादा दुसरा हुषार पिटवाडी, आसपासचीं गांवें धुंडाळण्यासाठीं निरनिराळ्या दिशांनीं निघतात. घरोघर भिक्षा मागतां मागतां जेथें गुन्हा करावयाचा तें घर, त्याच्या वाटा, त्यांतील माणसांची सांपत्तिक स्थिति वगैरे सर्व ते लक्षांत ठेवतात.

घरच्या बायका भिक्षा घालण्याला आल्या ह्मणजे त्यांच्या अंगावरील दागदागिने ते नीट पाहून ठेवतात. खैरवाड मोठ्या गांवांत तेलें, औषधें, घरोघर विकतांना वरीलप्रमाणें माहिती मिळवून गुन्हे करतात. बौरी लोक दुसऱ्या जातीच्या इसमांकडून बातमी काढीत नाहींत व त्यांना आपल्या कटांतही घेत नाहींत. लुटण्यालायक घरें शोधून ठेविल्यावर टोळी कांहीं मैल कुच करिते, आणि तेथेंही वरीलप्रमाणें आसपासच्या गांवचीं घरें शोधून ठेविते. याप्रमाणें कृष्णपक्षापर्यंत निरीक्षण चालतें. मग ते शोधून ठेविलेल्या घरांपैकीं कोणावर तरी अतिशय काळोख्या रात्रीं धाड घालतात. पहिल्याच घरीं चांगला डल्ला मिळाला तर बाकीचीं घरें ते फोडीत नाहींत. मोठमोठ्या शहरीं तीन तें सहा महिनेपर्यंत देखील मुक्काम करून चांदण्या रात्रीं घरें रोंखणें आणि अंधाऱ्या रात्रीं चोरी करणें, याप्रमाणें एखादी टोळी सपाटा लावते. दुसऱ्याच्या नजरेस न पडतां ज्या घरांत जातां येतें आणि ज्यांतून जलदी बाहेर पडतां येतें, अशा घरीं बौरी चोरी करितात. ज्या घरांच्या भोंवतीं अरुंद रस्ते किंवा बोळ असतात, तेथें ते जात नाहींत. कारण असल्या घरांच्या वाटा अडवितां येतात व गुन्हेगार खोड्यांत सांपडतो. जे मारवाड बौरी बायकामुलांसुद्धां फिरतात आणि ब्राह्मण असल्याचे बहाण्यावर घरकाम पत्करतात, त्यांना घराचा ठाव घेणें, गुप्त मसलती व केलेला बेत पार पाडणें वगैरेंची आयतीच संधि मिळते. मोधियांची घरफोडी करण्याची रीत अशी आहे कीं, एकजण पुढें येऊन ब्राह्मण, रजपूत किंवा खाकी साधु, ( हे अंगाला भस्म चर्चितात, लंगोटी लावतात आणि धुनीजवळ शेकत बसतात. ) ह्यांच्या वेषानें एखाद्या शहरांत राहतो, आणि घर शोधून ठेविलें ह्मणजे लांबून आपल्या टोळीला घरफोडीसाठीं बोलावून घेतो. बौरीये बगली पद्धतीनें ग्यान किंवा दौलतीया नांवाच्या हत्यारानें घर फोडतात. तंबू फाडण्यासाठीं, किंवा चालून आलेल्या इसमावर वार करण्यासाठीं नाईक अणीदार सुरी कातड्याच्या किंवा लांकडाच्या म्यानांत घालून आपल्या बरोबर

घेतो. मोघिये सुरीऐवजीं वस्तरा घेतात. पिटवाडी आपल्याबरोबर काड्या घेतात. ते चिरगुटाला मेण लावून त्याची उजेडासाठीं वात करतात. बगली पद्धतीनें साधलें नाहीं तर ते रुमाली पद्धतीनें भिंतीला इतकें लहान भोंक पाडतात कीं, त्यांतून फरपटत मात्र जातां येईल. टोळींतील एक इसम कापडानें तें भोंक झांकून घेतो. त्यामुळें आंतल्या माणसांची झोंप हवेच्या गार झुळकेनें किंवा उजेडानें मोडत नाहीं, व बाहेरच्या माणसांना खोलींतला उजेड दिसत नाहीं. कधीं कधीं खिडक्यांचे गज वांकवून काढून ते त्यांवाटें आंत शिरतात. टोळीचा नाईक एकटाच घरांत शिरतो,वात लावतो आणि लोक कोठें निजले आहेत,पेट्या कोठें आहेत, हें ध्यानांत आणतो. वात विझवून कोणाला किती झोंप लागली आहे,याचा कानोसा प्रत्येकाजवळ ओणवा होऊन तो घेतो. नंतर शिजविलेलें अन्न व धान्य वगळून जें हातीं लागेल, तें तूप, मिठाईसुद्धां उचलून बाहेर पिटवाडी असतात, त्यांच्याजवळ तो देतो. ते पेट्या न फोडतां बाहेर नेतात. निजलेल्या माणसांच्या अंगावरचे दागिने ते शिताफीनें जलद काढतात; कोणी जागें झालें, किंवा अंगावर आलें, तर हातीं लागेल तें घेऊन ते पळून जातात. निसटून जाण्यासाठींच फक्त ते दुसऱ्याला मारहाण किंवा दुखापत करतात, एरवीं नाहीं. नाईक आंत सांपडला तर बाहेरचे साथीदार त्याच्या मदतीला येतात. आणि मग ते हवी ती जखम करतील, पण आपली सुटका करून घेतील. पिटवाड्यांपैकीं कांहीं आंत नाईकाला मदत करतात, तर कांहींजण पाळत ठेवतात. पकडलेल्या सशाप्रमाणें त्यांनीं शब्द काढला म्हणजे कांहीं दगा आहे, असें समजावें. पिटवाड्यांच्या दृष्टीआड आंतल्या खोलींत जावयाचें असल्यास, नाईक त्यांना तसें कळवितो; कां कीं वेळ पडल्यास त्यांना लौकर मदतीला येतां यावें. शकुन पाहाण्यासाठीं आणि कोणी काय करावें, हें ठरविण्यासाठीं बौरी थोडे ज्वारीगव्हाचे दाणे, व ममरखीच्या बिया चिंध्यांत बांधून बरोबर नेतात. मालपुऱ्यांतला ज्योतिषी किंवा मंत्रतंत्र जाणणारा इसम घर फोडण्याचे आधीं त्यावर पांढरी गुंज फेंकतो. दिल्ली-

वाल आणि मालपुऱ्यांच्या टोळींतले गैरहजर इसम छपविण्याची त्यांची युक्ति पोलिसनें लक्षांत ठेवावी. ते काय करतात कीं, निजलेल्या माणसांसारखे दगड किंवा गांठोडीं मांडून त्यांवर पांघरूण घालतात, आणि कोणी पूसतपास केला तर जागे असलेले दोघे तिघे त्यांच्या त्या पांघरुणांकडे बोट दाखवून सांगतात कीं, बाकीचे निजले आहेत. अटकेंतले बौरी पोलीसशीं दंगामस्ती करून पळून जातात, सबब त्यांजवर विशेष काळजीनें पहारा करावा.

एखादा भीक मागणारा किंवा भटकणारा गोसावी बैरागी, बौरी असावा असा संशय आला, तर त्याला कांहींएक न विचारतां त्याच्या मागोमाग हळूच तळापर्यंत जावें. कारण त्याला विचारलें तर तो कांहीं थांग लागूं देणार नाहीं. बौऱ्यांच्या तळाला मोठ्या सकाळीं वेढा देऊन झाडा घ्यावा, म्हणजे कांहींना कांहीं सबब काढून त्यांतले लोक इकडे तिकडे जाऊन सुरी पुरतांना, किंवा मुद्देमाल कुपाटींत, अगर भिंतीवरून टाकतांना नजरेस पडतील. "भंडारी" बहुधा "ग्यान" स्वयंपाकाच्या भांड्यांत ठेवतो. ग्यान कोणालाही ओळखण्यासारखा असला, तर तो पुरून ठेवतात, किंवा वळकटींत, खोगरांत, लपवितात. ग्यानाला ते इतके जपतात कीं, चिलीम ओढण्यासाठीं थोडा वेळ रस्त्यावर बसले तरी ते तो पुरून ठेवितात. पोलीसनीं ओळखिलें म्हणजे ते खूप कांगावा करतात. पळीनें पाडल्यासारखें लहान भोंक भिंतीला दिसलें म्हणजे दिल्लीवाल, किंवा मालपुरे बौऱ्यांनीं घरफोडी केली, असें समजावें. कुच करीत असतांना टोळीचा झाडा घेतल्यास मुद्देमाल सांपडण्याचा संभव असतो.

बौऱ्यांच्या एका टोळीजवळ गैरहजर इसमांचे जुने दाखले सांपडले. त्यांच्या जोरावर ते दुसऱ्या टोळ्यांपासून पैसे उकळीत.

सन १८८३ चे सुमारास बलदेवदास बिन भूपालसिंग ऊर्फ भोपडा नांवाचा मालपुरा बौरी विजापुरास आला, आणि ताजबावडी मठांत उतरला. तेथील इनामदार बुवा दुर्गाप्रसाद होता. बलदेवदास त्याचा

चेला बनला. त्यानें त्याची इतकी मनधरणी केली कीं, त्याच्यामागें तो त्याचा वारस म्हणून मठाधिपति झाला. विजापूरचे लोकांचा त्यावर भाव बसला, तो इतका कीं, त्याला कोठेंही मज्जाव नव्हता. लोकांत व सरकारांत त्याचें वजन बसलें. मठासंबंधीं एक काम त्यानें खुद्द कलेक्टरसाहेबांकडून करवून घेतलें. मठांत पक्कीं तळघरें असून, भोंवतीं मोठा बगीचाही होता. त्यामुळें आपले जातभाई जमवून त्यांजकडून गुन्हे करविण्याला त्याला चांगली सोय झाली. सन १८८७ सालीं त्यानें ३८ लोकांच्या टोळीकडून विजापूर जिल्ह्यांत पुष्कळ घरफोड्या करविल्या. तेव्हां शिवंगी, हरनाळ, व ताजबावडी मठ, यांजवर पाळत ठेवून व कांहीं गोसावी हाताशीं धरून थेट भोपाळपर्यंत पोलीसनें पाठलाग करून त्यांच्या गुन्ह्यांचा पत्ता लावला. ती सर्व हकीकत येथें दिली असतां पुष्कळ विस्तार होईल.

**गुन्ह्यांचीं हत्यारें**:- ग्यान ( परक्यांच्या देखत ग्यानदास म्हणतात म्हणजे त्यांना वाटावें कीं, त्या नांवाचा कोणी माणूस आहे.) किंवा दौलतीया, सुरी, वस्तरा, काठ्या, मेणवात, काड्यांची पेटी, हीं बौऱ्यांचीं हत्यारें होत. सुरीच्या पात्याला मेणवात गुंडाळून ती नाईक धोतरांत डाव्या बाजूला खोंवतो. ग्यान तीन प्रकारचे असतात. दिल्लीवाल यांचा ग्यान लोखंडी पळीसारखा पण साधारण पळीपेक्षां जड असतो. तो लोखंड व पोलाद यांचा करतात, आणि त्याच्या दांडीला पाणी देऊन धार लावतात. मालपुरे आणि खैरवाडांचा ग्यान पोलादी बत्त्याप्रमाणें सुमारें पंधरा तें अठरा इंच लांब असतो. त्याच्या एका बाजूला बोंड असून दुसऱ्या बाजूला धार व अणी असते. बदकांचा ग्यान लोखंडी व पोलादी असून बत्त्यासारखा असतो. त्याची लांबी सहा तें दहा इंच असून त्याला तेवढीच लांकडाची मूठ असते. असें म्हणतात कीं, मोघ्यांचा दौलतीया सर्पाकृति असतो.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**– चोरीच्या मालाचे ते पांच वांटे करतात. एक वांटा नाईक उचलतो; आणि बाकीच्या चार वांट्यांचे नाईक व गैरहजर इसम धरून टोळींत जितके लोक असतील, तितके वांटे करतात. नायकाला या मानानें शेंकडा २० प्रमाणें अधिक ऐवज मिळतो. त्यांतून त्यानें खर्च करावयाचा तो ( १ ) ब्राह्मणदक्षणा. ( २ ) आप्तांपैकीं अनाश्रित स्त्रियांस मदत. ( ३ ) टोळींतील पुरुषांना जेवण देऊन देवताराधना. ( ४ ) डोमांचा हक्क. ( ऐवज मिळाल्याची बातमी लागतांच हे लोक भाटांच्या वेषानें प्रवास करून टोळीला गांठतात, आणि आपला हक्क उकळतात. ) लुटीचे हिस्से पाडतांना पुष्कळ भांडणें तंडणें होतात. असें झालें म्हणजे मालाचे तुकडे करून ज्याचा त्याला हिस्सा देतात. जो तो आपल्या वांट्याचें सोनें, रुपें, जसेंच्या तसें किंवा तेथल्या तेथें बनविलेल्या कापसामातीच्या मुशींत गाळून विकून टाकतो. सराफ, सोनार, वाणी, गुजर, बोहारी वगैरे या लोकांकडून चोरीचा माल विकत घेतात. टोळीचा समाईक माल नाईक आपले जवळ ठेवितो, आणि कुच करतांना तो एखाद्या धडधाकट पायशूर इसमाजवळ देतो. मोत्यांच्या किंवा जवाहिरांच्या जिनसा नाईक आपलेपाशीं ठेवून सोयीप्रमाणें विकतो, आणि आलेल्या पैशाचे हिस्से ज्याचे त्याला देऊन टाकतो. विक्री किंवा वांटणी होईपर्यंत ते तळाजवळ चोरीचा माल पुरून ठेवितात. कुच करतांना प्रत्येक जण आपापल्या हिश्शाचा माल आपले अंगावर नेतो, आणि तळाचे जागीं पुरून ठेवितो; पण पुरलेल्या जागेपासून तळापर्यंत उमटलेल्या पावलांवर कापडाचा कांठ फिरवून माग बुजवून टाकण्याची जो तो खबरदारी घेतो. कांहीं धोका दिसल्यास मागील तळावर माल ठेवून तेथें साधूचे वेषानें एकजण रहातो, आणि संधि पाहून तो ते तेथून नेतात. बनावट नांवावर मनिआर्डरीनें ते रोकड पाठवितात, आणि नक्त माल टोळींतील एक दोन इसमांबरोबर घरीं पाठवितात. एका दिल्लीवाल्यांच्या टोळींतील बाईनें चपात्यांत चोरीचा माल लपवून ठेविला

होता. ते आपल्या मुलखींचा पत्रव्यवहार बहुधा एखाद्या स्थानिक मित्रामार्फत करतात; परंतु त्याला आपल्या जातीचा व धंद्याचा पत्ता लागूं देत नाहींत. त्यांच्या पत्रांत मंदर म्हणजे घर, आटा म्हणजे चोरीचा माल, शेर म्हणजे शंभर, हे सांकेतिक शब्द असतात. माल पुरून ठेवण्यासाठीं बौरी जें छिद्र पाडतात, तें तोंडाशीं चिंचोळें व बुडाशीं रुंद असतें. आपल्या तळापाशीं एका बाजूला धावें पाडून त्याच्यांत ते माल ठेवितात. ते सुऱ्या गोदडींत शिवतात, आणि त्या झटकतांना, सुऱ्या शिवलेल्या असतात त्या ठिकाणीं गोदड्या धरतात; म्हणजे झाड्यांत त्या सांपडत नाहींत.

---

## मारवाड किंवा गुजराथ बौरी.

**संज्ञाः**– मारवाड वाघरी किंवा बौरी यांना गुजराथ बौरी म्हणण्याचा प्रघात आहे, पण तो चुकीचा आहे. परमार, सोलंकी, शोंकला किंवा वाघेला, दमद्वारा, दाभी, गेलडा किंवा गेलोट, चोंहाण (सोहाण), अधानी, राठोड, ढेंगानी, अटानी, सांगानी, डेवडा, वगैरे बौऱ्यांच्या कुळ्या आहेत.

**वस्तिः**– त्यांचें मूळ ठिकाण मारवाड होय, परंतु त्यांचे कांहीं लोक गुजराथेंत येऊन राहिले आहेत. काठेवाड, सिंध, राजपुताना ह्यांत कांहीं बौरी सांपडतात, थोडेसे मध्यप्रांतांतही आहेत.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**– बायकापोरें व तट्टें घेऊन ते मद्रास, बंगाल, मध्यप्रांत, वऱ्हाड, पंजाबापर्यंत वर्षभर हिंडतात; त्यांच्या टोळींत अजमासें दहा इसम असतात. पावसाळ्यांत जेथें ओळख पडली असेल

अशा ठिकाणीं ते मुक्काम करतात. सडे पुरुष नांवें बदलून आगगाडीनेंही प्रवास करतात.

**लोकसंख्या:–** ह्यांची गणति २००० आहे, पण हा आंकडा संशयास्पद आहे.

**स्वरूप:–** ते काळे, मध्यम बांध्याचे, श्रमसहिष्णु असून गलिच्छ राहतात. ते दिवसांतून तीस चाळीस मैल चालून जातात. पुरुषांच्या व बायकांच्या पोटावर डागल्याचे वण असतात. धोतर, बंडी किंवा आंगरखा, मारवाड्या किंवा गुजराथ्याप्रमाणें बांधलेलें जुनें पागोटें, किंवा दुपेटा, हा पुरुषांचा पोषाख होय. बायका घागरा ( तो काळा किंवा सफेत कधीं नसतो. ) किंवा लुगडें, काचोळी व ओढणी नेसतात. त्या हातांत नारळीच्या करवंटीच्या बांगड्या, कानांत तोटी, नाकांत लवंग, पायांत रुप्याचे किंवा काशाचे पैंजण आणि जोडवीं घालतात. दोन्ही डोळ्यांजवळ व कानसुलांकडे एक रेघ, डाव्या डोळ्याजवळ नाकपुडीच्या बाजूला एक ठिपका, डावा गाल आणि हनुवटी यांवर एक ठिपका, याप्रमाणें त्या गोंधतात. शिवाय हात, ऊर आणि पोटऱ्या यांवरही त्या गोंधतात. ही जात दारूबाज असून गाय, डुक्कर सोडून सर्व प्रकारचें मांस खाते. फेरीला निघण्यापूर्वी ते देवदेवक करतात. गांवाबाहेर झाडींत, शेतांत, किंवा मैदानांवर ते पालें ठोकतात. पावसाळ्यांत धर्मशाळेंत किंवा देवळांत ते बिऱ्हाड देतात, अगर गांवकुसाजवळ भाड्यानें घर घेतात. तांड्याच्या नायकाला जमादार, मालक, पंचसाती, किंवा झागर्दु म्हणतात.

**भाषा:–** बौरी भाषेचें मारवाडीशीं साम्य आहे. गुजराथेंत रहाणारे अशुद्ध गुजराथी बोलतात. त्यांना हिंदुस्थानी येतें, व जेथें जातात, तेथलीही भाषा ते उचलतात.

## सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| मुलगो ... ... | साहेब. |
| फासल ... ... | शिपाई. |
| लसुरिया, लहूर, किंवा फोगडा | बनावट रुपाया. |
| अदीय, ननामा | सांचा. |
| कडशी ... | धातू वितळण्याची पळी. |
| मुंदाला दला, रेंगा | खरा रुपाया. |
| पीलवा ... ... | सोनें. |
| कौली ... ... | रुपें. |
| ननामी ... ... | कथील. |
| वावरी, सपर्दी, मोडी जाव | पळ. |
| वहोदी गयो ... | अटक झाली. |
| रतडीया, लकडीयो | शिवराई. |
| अगटो, अगटी... | बौरी पुरुष, स्त्री. |
| खेंगरो, खेंगोलियो | गांव किंवा घर. |
| वपरा, बव्हा, तापुआ | भाकर. |
| मजुहा ... ... | गहूं |
| लेकटी ... | सापाच्या वेटाळ्यासारखा रस्त्यावर काढलेला माग. |
| नाकरा ... ... | बैल. |
| कुंजरी ... ... | म्हैस. |
| नाहोरी ... ... | कोल्हा. |
| कोनलिया ... | मुलगा. |
| मानहोन ... | पुरुष. |
| गुंजोन ... ... | धो चोरखिसा. |
| निरखून... ... | पाणी. |
| दंतिओ... ... | मांस. |
| हल्कस ... ... | कट्यार. |
| कौनली... ... | माती. |
| डुंगरीया ... | कुऱ्हाड. |
| रर, बनबल ... | खोटें नाणें चालविणें |
| फ़हरतो... ... | घोडा. |
| अथरीयो ... | खोगीर. |
| पिल्., नमयन ... | तूप. |
| तुकरीओ ... | ब्राह्मण. |
| तरगोली ... | जानवें. |
| वमरय ... ... | पळून जाणें. |
| जर्मन ... ... | पितळी भांडें. |
| रंग होको ... | त्याला लांच दे. |
| औरचे ... ... | येत आहे. |
| लट्टी, नरशी, जशीं | तें सांपडेल. |
| पी ... ... | बदलणें. |
| मान ... ... | नाहीं. |
| हॅसनपिअरो ... | आतां बदल, मोड. |
| नर्साओ, पोसोहोकरो | तें नाणें परत कर. |
| हतरी नाको ... | तें लपव. |
| खादरो ... ... | भोंक. |
| वेलिअन ... | भाबडा माणूस. |
| ववको, किंवा होकरो | खोट्या नाण्याची अदलावदल कर. |

बग्गलः—कांसें, तांबें आणि कथील यांचें सारखे प्रमाणानें केलेलें मिश्रण.

मावाः—कांसें, तांबें, आणि कथील यांचें, १—१ आणि १० या प्रमाणांत अनुक्रमें केलेलें मिश्रण.

टोळी कोणत्या रस्यानें गेली, हें मागून येणाऱ्या साथीदारांना कळावें ह्मणून तिच्यांतली एखादी बाई वाटेवर मातींत काठीनें नागमोडी आकृती काढते. तसेंच रस्त्यानें ठिकठिकाणीं दगडाखालीं ते पाला ठेवतात, आणि तळाच्या आजूबाजूलाही असल्या खुणा करतात.

**उपजीविकेचीं बाह्य साधनें**:—मारवाडांत हे लोक जमीन कसतात. इतर ठिकाणीं ते एक सालीं पट्ट्यानें जमिनी करितात. गुजराथेंत ते काकड्या वगैरे शाक लावतात. पण त्यांचा मुख्य धंदा भीक मागण्याचा आहे. कांहीं जण भागीरथीच्या कावडी आणून गंगोदक विकतात, कांहींजण गोपीचंदन कालवून गढूळ केलेलें पाणी गंगोदक ह्मणून विकतात. ते आपणाला गंगाजल वाघरी, किंवा बौरी म्हणवितात.

**वेषांतर**:— ते भाटांच्या किंवा कबीरपंथ्यांच्या वेषानें फेरीला निघतात आणि बाण्या, दोहरे न अडखळतां ह्मणतात. खोटीं नाणीं चालविण्यासाठीं ते एकटे किंवा जोडीनें गिरी गोसाव्यांच्या भगव्या वेषानें रुद्राक्षांच्या माळा घालून तळांतून बाहेर पडतात. ते आपल्या नांवापुढें गीर किंवा दास लावतात. ते गुजराथेंत सलात ( पाथरट ) ह्मणून मोडतात. शिवाय ते ब्राह्मण, कुणबी, कुंभार, रजपूत किंवा चारण ह्मणूनही गणले जातात. महाराष्ट्रांत ते आपल्याला माळी किंवा फूलमाळी ह्मणवून गांवांत बिऱ्हाड देतात. ते आपलीं नांवें वारंवार बदलतात.

**गुन्हे**:— या जातीचा आनुवंशिक धंदा बनावट नाणीं करण्याचा होय. त्यांत पुरुष व स्त्रिया दोन्ही तरबेज असतात. ते रुपये, अधेल्या, पावल्या, चवल्या पाडतात.

**गुन्ह्यांची पद्धति**:— त्यांचीं खोटीं नाणीं छप्परबंदांपेक्षां सुबक असतात. कुंभाराच्या मातींत थोडासा कापूस किंवा लोंकर घातली म्हणजे तिला चिकणाई येते. सांच्यासाठीं असल्या मातीचे पाऊण इंच उंचीचे व तीन इंच चौरस असे दोन गोळे करतात. सांच्याच्या खालच्या भागांत समोरासमोरच्या कोनांत दोन लहान चुका ठोकतात. त्या

चुकांचीं डोकीं वर आलेलीं असतात. खालच्या भागावर तंतोतंत बसल असा दुसरा भाग तयार करून, खालच्या भागांतील चुकांचीं डोका बसतील अशीं भोंकें त्यामध्यें ठेवितात. नंतर सांच्याचीं दोन्हीं शकलें सावलींत वाळवितात, व त्याच वेळीं हातानें घांसून दोन्ही भाग साफ करितात. तीं कडक वाळल्यावर आंतील तोंडें दगडानें दोरीसूद घांसून एकमेकांशीं जुळतीं करतात. नंतर तीनअष्टमांश इंच खोल व रुपयापेक्षां अंमळ मोठा असा एक खळगा खालच्या सकलांत कोरतात, व त्यांतून एक लहान पन्हाळी काढतात. खालच्या सकलांतील खळगा व पन्हाळी ह्यांशीं मिळतें असें गोल भोंक व पन्हाळी वरच्या सकलांत पाडतात. पुढें चुनखडीच्या ( त्यांच्या भाषेंत, मरद्का पथर ) वस्त्रगाळ पुडींत थोडेंसें तूप घालून लुकण बनवितात. तें खालच्या सकलांतील खळग्यांत व वरच्या सकलाच्या भोंकांच्या तोंडाशीं बसवितात. त्याचा चिकटा मोडला नाहीं, तर त्यावर जरा राख उधळतात. स्पष्ट ठसा असलेला रुपया खालच्या खळग्यांत अर्धा बुडेल असा युक्तीनें दाबून बसवितात. त्या रुपयाच्या उलट बाजूचा ठसा उमटेल अशा रीतीनें वरचें सकल खालच्यावर ठेवून लुकणावर भार घालतात. नंतर शिताफीनें रुपया काढून घेऊन धातूंचा रस ओतण्यासाठीं त्या लुकणांत तजविजीनें एक पन्हाळी काढतात. ह्याप्रमाणें सांचा झाल्यावर कासें, कथील ( रांगा ) व तांबें समभाग घेऊन वेळणींत आटतात. त्याला " वग्गर्ल " म्हणतात. त्यांत आणखी नऊ भाग कथील घालून " मावा " तयार करितात. पळीवर चिखल सारवून तिच्यांत मावा आटतात, आणि हा रस ठशांत ओततात. सांच्यांतून बनावट रुपया काढला ह्मणजे त्याच्या कडा सुरीनें नीट करितात; आणि त्या चांगल्या उमटाव्यात ह्मणून खऱ्या रुपयाच्या कडांवर त्या दाबतात. नंतर शेण, काजळी, तुरटी, सोरा किंवा हळद ह्यांनीं बनावट रुपया घांसतात. ह्मणजे तो उजळ होतो, किंवा तो वापरल्यासारखा दिसतो. एका सांच्यांतून पुष्कळ नाणीं पाडतां येतात, पण मधील लुकण वीस वेळ वापरल्यावर बदलावें लागतें.

याप्रमाणें रुपये तयार झाल्यावर ज्यांना ते चालवावयाचे असतात, ते एकटे किंवा जोडीनें टोळींतून बाहेर पडतात. त्यांच्या धोतराच्या निऱ्यांना चोरखिसे असतात. त्यांत ते खोटीं नाणीं ठेवितात. ते खोटे रुपये व अधेल्या, पावल्या, वगैरे एकत्र नेत नाहींत. दांतणाएवढी एक काडी व खोटा रुपया त्यांच्या उजव्या हातांत असतो, त्यामुळें सहज मूठ वळलेली राहते. नंतर खेडवळाचें किंवा यात्रेकरूचें सोंग घेऊन बौरी एखाद्या बाईला, किंवा क्वचित् पुरुषाला गांठतो; आणि राजशाही किंवा हाली रुपया येथें चालतो कां, तुह्मी तो मोडतां कां, असें विचारितो. राजशाही नाणें चालत नाहीं असें उत्तर मिळालें म्हणजे तो ह्मणतो, कोणता रुपया चालतो तो मला दाखवा. त्याचे डावे हातांत राजशाही रुपया असतो, तो देऊन आपल्या सावजाजवळून तो खरा रुपया घेतो. नंतर तो पाहून त्याबद्दल बोलाचाली करीत असतांना शिताफीनें चटकन् तो उजव्या हातांत घेऊन त्यांतला खोटा रुपया डावे हातांत घेतो. हें चाललें असतां तो आपल्या सावजाच्या तोंडाकडे एकसारखी टक लावितो, व त्याचें लक्ष वेधण्यासाठीं नजरबंदाप्रमाणें एकसारखी पुटपुट लावितो; आणि शेवटीं खोटा रुपया त्याचे हातांत टाकितो. ह्याप्रमाणें एका वेळेला बौरी साधल्यास वीस नाणीं चालवितात. परंतु ते एका वेळेला बहुधा दोन आणि एका दिवसांत दहा ते वीस नाणीं चालवितात. त्यांची दुसरी युक्ति अशी आहे कीं, आणा दोन आण्याचें सामान घेऊन खोटा रुपया देऊन बाकीचीं मोड घ्यावयाची; किंवा राजशाही अगर बादशाही रुपया दुकानदारास द्यावयाचा; त्यानें तो नाकारला, ह्मणजे खरा रुपया त्याजवळून पहाण्यासाठीं मागून घेऊन त्याच्या बदलीं चलाखीनें खोटा रुपया द्यावयाचा. अगर दुकानदाराला खरा रुपया द्यावयाचा, आणि घेतलेल्या मालाविषयीं त्याच्याशीं घासाघीस घालून त्याजवळून तो परत घ्यावयाचा. असें हो ना करीत शेवटीं माल पुन्हां परत घेऊन अखेर दुकानदाराच्या माथीं खोटा रुपया मारावयाचा. तूप वगैरे घेऊन वजन कळत नाहीं, असें दुकानदाराला सांगून त्याला लोखंडी पावशेरास वीस रुपयेप्रमाणें रुपये तागडींत घाला-

वयाला बौरी लोक लावितात, आणि वेळ पाहून त्या रुपयांच्या बदलीं खोटे रुपये घुसडतात.

खोट्या मोहोरांची ठकबाजी करण्याची त्यांची रीत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:– एक मोहोर मावेल अशा दोन अगदीं सारख्या पिशव्या तयार करतात. एकींत सुमारें चोवीस रुपये किंमतीची खरी मोहोर घालतात, आणि दुसरींत खोटी मोहोर घालतात. खरी मोहोर पिशवीसुद्धां शेंकडा वीस टक्के व्याजावर वीस रुपयांस गहाण ठेवितात. कांहीं दिवसांनीं गहाण ठेवणारा येतो, आणि व्याज जबर आहे, म्हणून ती मोहोरेची पिशवी परत मागून घेतो. नंतर त्याची व त्याच्या सोबत्यांची नाटकी बोलाचाली होऊन ते मोहोर गहाण ठेवण्याविषयीं त्याचें मन वळवितात, आणि अशा रीतीनें खोट्या मोहोरेची पिशवी वाण्याचे पदरांत टाकितात.

**गुन्ह्यांचीं उपकरणें:**–सांचा, लोखंडी पळी, खुर्दा, कासें, कथील, सुरी, चुनखडी, माती, वेळणी आणि राजशाही किंवा हालीशिक्का रुपये हीं त्यांचीं उपकरणें होत. धातूच्या रसाची धार इकडे तिकडे सांडूं नये, ह्मणून पळीच्या कांठाला थोडी धार पाडलेली असते.

**गुन्ह्याचे मालाची व्यवस्था:**–तळापासून वीस पंचवीस पावलांवर अगर अंथरुणाखालीं किंवा चुलीखालीं जमिनींत ते खोटीं नाणीं व सांचे पुरतात. त्यांच्या धोतरांच्या पुढच्या निऱ्यांच्या चोरखिशांत खोटे रुपये असतात. आणि कासोट्याच्या निऱ्यांच्या चोरखिशांत खरे रुपये येतील तसे ते ठेवितात. त्यांच्या कासोट्याचा कल उजवीकडे असतो. प्रवास करतांना खोटीं नाणीं पाडण्याचें सामान मुलांच्या खिशांत किंवा बायकांच्या घागऱ्यांच्या चोरखिशांत असतें. खोटीं नाणीं चालविणारे टोळी सोडून वेगवेगळे जातात.

# उजळ मिने.

**संज्ञाः**—मिन्यांमध्यें चौकीदार व जमीनदार ह्या दोन पोटजाती आहेत. चौकीदारांचीं गोतें ( कुळें ) खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः— कागोट, भोनरायत, जेफ, शेवरीया, सीन्हा, झिरवाल, पब्दी, बागडी, गोमलाडू, बासनवाल, खाट, नऊगाड, देवांद. चौकीदार गुन्हे करतात, त्यांतले त्यांत पहिलीं पांच कुळें फारच गुन्हे करणारीं आहेत.

**वस्तिः**— जोधपूर, जयपूर, भरतपूर, बिकानेर, अलवार हीं संस्थानें आणि पंजाबांत शहाजानपूर येथें त्यांची अव्वल वस्ति आहे. कागोट, अलवारमध्यें मंदवर व शहाजानपूर येथें; भोनरायत, जयपूरमध्यें तोरवटी येथें; जेफ, जयपूरमधील निमकाठाणा येथें; शेवरीया, जयपूर जिल्हा बैराट येथें; आणि सीन्हा, जयपूरमधील कोटपुतली आणि खेटडी येथें रहातात.

**गुन्ह्याचें क्षेत्रः**—मिने बहुतेक सर्व हिंदुस्थानभर—विशेषतः मुंबई इलाखा, मध्यप्रांत, म्हैसूर व निजामशाहींत गुन्हे करतात. ते स्थाईक असून गुन्ह्यासाठीं दसरा—दिवाळीनंतर बाहेर पडतात, आणि शिमग्यापूर्वीं घरीं येतात. पुन्हां ते शिमग्यानंतर बाहेर पडून आषाढांत परततात. घरीं आले असतां पकडण्याची भीति, किंवा बाहेर मोठ्या लुटीची आशा असली तर, ते पावसाळाही बाहेर काढतात. तेव्हां ते शहरांत राहतात व इकडे तिकडे फिरत नाहींत. या इलाख्यांत पुरुष सडे येतात, आणि रेल्वेनें व सडकेनें प्रवास करतात. ते आपल्या मुलुखांतून पुष्कळजण मिळून एकदम बाहेर पडतात. परंतु ते दोन ते सहाजणांची क्वचित् बाराजणांची टोळी जमवून गुन्हे करतात. त्यांच्यापैकीं, पटाईत गुन्हेगारांच्या टोळ्यांत दोन किंवा तीनच इसम असतात. हे लोक धर्मशाळांत

किंवा देवळांत उतरतात, आणि गुन्हे करतात. शहरांत त्यांचे स्नेही त्यांच्यासाठीं भाड्यानेंही घरें घेतात. ते रेल्वेच्या मोठ्या स्टेशनावर, किंवा गुन्हा करावयाचा त्या गांवच्या स्टेशनावर उतरत नाहींत, मधल्याच स्टेशनाचें तिकिट काढून कांहीं थोडासा रस्ता पायीं पायीं चालतात; आणि पुन्हां किरकोळ स्टेशनावर बसून, एखाद्या मधल्या स्टेशनचें तिकिट काढतात. याप्रमाणें एकेका फेरीला ते तीन तीन चार चार वेळां तिकिटें काढतात. गेल्या वाटेनें ते कधीं परतत नाहींत, आणि जेथें गुन्हे करतात त्याचे आसपास दुसऱ्या टोळ्यांना गुन्हे न करण्याविषयीं सांगतात. मिन्यांसंबंधानें ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे कीं, जिकडे एक टोळी गेली तिकडे त्यांची दुसरी टोळी जात नाहीं, जी ती टोळी स्वतंत्रपणें गुन्हे करते. मुंबई शहर, महाराष्ट्र, गुजराथ, काठेवाड, कर्नाटक, पंढरपूर वगैरे ठिकाणीं ते गुन्हे करतात. ते एक दोन दिवसांपेक्षां जास्त एकाच गांवांत रहात नाहींत, आणि वाट चालतां चालतां गुन्हे करतात.

**स्वरूपः**—मिने सुदृढ, बांधेसूद, देखणे आणि मध्यम ते पुऱ्या उंचीचे असतात. त्यांची रहाणी व पोषाख स्वच्छ असून ते रोज स्नान करतात. ते मांसाहारी, दारूबाज व अफूबाज असतात. पण ते गोमांस खात नाहींत. ते परमुलुखांत दाढी काढून टाकतात. ते गोंधीत नाहींत, व लहान कानबाळीशिवाय कोणताही दागिना घालीत नाहींत; आणि बहुतेक रजपुतासारखे दिसतात. ते श्रमसाहिष्णु व पायशूर असतात, आणि वेळेवर दिवसांतून साठ मैल चालून जातात. गुन्हे करण्याच्या कामीं ते धीट व युक्तिबाज असतात.

**भाषाः**—जन्मभूमीपरत्वें ते मारवाडी किंवा रजपुतानी भाषा बोलतात. ते हिंदी आणि उर्दू न अटकतां बोलतात. त्यांच्यांत पुष्कळ शिकलेसवरलेले असतात.

## सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| रुमाल ... ... | घरफोडीचें हत्यार. | जमादार ... | गिरो ( = टोळी )-चा नाईक. |
| काजळी, चाई ... | अंधारी रात्र. | | |
| मच्छर, कुत्ता, डास | पोलीस शिपाई. | | |

आपल्यामागें दुसऱ्या टोळ्यांनीं येऊं नये ह्मणून जमादार उर्दू किंवा हिंदीमध्यें आपलें नांव धर्मशाळेंतील भिंतीवर किंवा देवळावर किंवा मैलाच्या दगडावर दिसेल असें लिहितो. टोळी कोणत्या रस्त्यानें गेली हें गुन्ह्याच्या धांदलींत मागें राहिलेल्या इसमांना कळविण्याची त्यांची रीत येणेंप्रमाणें आहेः— गुन्ह्यापूर्वी ज्या संकेतस्थानीं कपडे वगैरे ठेविलेले असतात, तेथें हे मागें राहिलेले लोक जातात. त्यांच्यापूर्वी सामानसुमान घेऊन गेलेले लोक त्या ठिकाणीं जमिनीवर आणि नजीकच्या वाटेवर वेडेंवांकडें सापाचें चित्र काढतात; किंवा ज्या झाडावर कपडे ठेविले असतील त्याचीं पानें तोडून तीं तेथून अगदीं जवळच्या वाटेपर्यंत पसरतात व या वाटेच्या बाजूला सापाचें चित्रही काढतात. जिकडे सापाची शेप असते, त्या बाजूनें टोळी गेली असें समजावें. वाटा फुटतात किंवा मिळतात, तेथेंही सापाचें चित्र काढलेलें असतें.

**उपजीविकेचीं बाह्य साधनें:**— ते आपल्या मुलुखांत जमीन कसतात, जागलकी करतात, किंवा पलटणींत नौकरी धरतात. गुन्ह्यासाठीं फेरीला निघाले ह्मणजे ‘ जय बालाजीकी जय, ’ असें ललकारून ते भीक मागतात किंवा तंबाखू, काड्याच्या पेट्या, शेवभजीं विकतात. बहुधा ते पैसे गांठीला लावूनच घर सोडतात.

**वेषांतरः**— ते हजामत वगैरे बरोबर करवून मारवाडी किंवा गौड चोन्निअती ब्राह्मणाच्या वेषानें फिरतात. कधीं कधीं पढविण्यासाठीं किंवा प्रश्नोत्तरें देण्यासाठीं टोळीबरोबर ते एखादा खरा ब्राह्मणही घेतात. अलीकडे ते संजोगी साधूंचा वेष घेऊं लागले आहेत. संजोगी साधू ब्राह्मणाप्रमाणें पोषाख करतात, व केव्हां केव्हां भगवा फेटा किंवा पागोटें घालतात.

आपण ठाकूर असून पलटणींतल्या आप्ताला भेटण्याला अमुक शहरीं चाललों, असेंही ते सांगतात. अशा वेळीं ते दाढी काढीत नाहींत, व वेषही पालटीत नाहींत. कधीं कधीं ते आपणांला " डकोट " (ज्योतिषी) ह्मणवितात. तेव्हां त्यांच्या खांद्यावर " खुर्जी " ( लहान पडशी ), व कधीं कधीं डावे हातांत शनीची मूर्ति, व उजव्या हातांत हुक्का असतो. कधीं कधीं खांद्यावर कुऱ्हाड टाकून लांकूड फोडण्याचें सोंग करून ते गांवांत हिंडतात, पण कांहीं केल्या लांकडें ह्मणून फोडीत नाहींत. खालीं लिहिलेल्या खुणेवरून मिने ओळखावेत:– ( १ ) ते मारवाड्याप्रमाणें चढाऊ जोडा घालतात व त्याचा शेंडा कापतात. ( २ ) ते शुद्धपक्षांत हजामत करतात, आणि चांगली लूट मिळाल्याशिवाय हजामत करीत नाहींत. ( ३ ) परमुलुखांत ते तांदूळ, ऊंस, फुटाणे, लाह्या व बकऱ्या-खेरीज इतर कोणतेंही मांस खात नाहींत. ( ४ ) ते लग्नांत जेवावयाला जात नाहींत, पण मारवाड्याच्या दिवसाला जातात. ( ५ ) ते एका ताटांत दोघे तिघेही जेवतात, ब्राह्मण असें जेवत नाहींत. ( ६ ) आंघोळीचे वेळीं ते पाय घांशीत नाहींत. ( ७ ) ते आपले कपडे सोबकून पिळतात. ( ८ ) ते रामानंदी ( त्रिकोणासारखा ) किंवा श्रीधारण ( त्रिशुळा-सारखा ) तिलक कपाळाला लावितात. ( ९ ) त्यांची पगडी मारवाडी पद्धतीची असते. ( १० ) बकऱ्याची वाळलेली जीभ किंवा तिचे तुकडे अगर तिच्या हरभऱ्याएवढ्या गोळया त्यांच्याजवळ असावयाच्याच. कारण बकऱ्याचे जिभेचें मांस त्यांना शकुन पाहण्यासाठीं लागतें. ते ती ( जीभ ) फडक्यांत गुंडाळून मसाल्यांत, तंबाखूंत किंवा मिठांत ठेवितात.

**गुन्हे:**–ह्यांचा कटाक्ष घरफोडीवर असतो. तिच्यांतून एखाद्या वेळेला दरोडा निष्पन्न होतो, पण ते जाणूनबुजून दरोडा घालीत नाहींत. खा-ण्याला कांहीं नसलें तर एखाद्या वेळेला ते बकरें–मेंढरूं चोरतात.

**गुन्ह्यांची पद्धति:**–मोठ्या शहरांत बहुधा ब्राह्मण, ठाकूर, राथोड, सराफ, मारवाडी वगैरेंत मिन्यांचे दोस्त असतात. ते त्यांना गुन्ह्यासाठीं

त्यांचे मुलुखांतून बोलावून घेऊन त्यांची बरदास्त ठेवितात. जेथें गांवचे घरभेद्यांची व मिन्यांची दोस्ती नसते, त्या गांवांत ते फार दिवस ठरत नाहींत. तेथें एखाद्या सावकाराच्या किंवा श्रीमंत मारवाड्याच्या घराशेजारीं ते शेवभजीं किंवा बिड्यातंबाखूचें दुकान घालतात, आणि घर हेरल्यावर संधि सांपडतांच तेथें घरफोडी करतात. शुद्ध पक्षांत ते घरें टेहळण्याचें व बेतबात करण्याचें काम करतात, आणि कृष्ण पक्षांत गुन्हे करतात. गांवांत आले म्हणजे एक दोन घाटाच्या किंवा पाणी भरण्याच्या विहिरीच्या आसपास इकडे तिकडे फिरत राहतात, आणि पैकेवाल्यांच्या बायका दिसल्या म्हणजे त्यांच्यामागें जाऊन त्यांचीं घरें टेहळून ठेवितात. दोघे तिघे मिळून भिक्षेला निघतात, आणि भीक मागतां मागतां कोणतें घर पैकेवाल्याचें दिसतें, तें फोडण्याला काय अडचणी आहेत, वगैरेचा तलास व विचार करून ठेवितात. याप्रमाणें दर मुक्कामाच्या गांवीं करीत करीत टोळी पन्नाससाठ मैल शुद्ध पक्षांत चालून जाते; आणि निरनिराळीं गांवें मिळून दहा पंधरा घरें हेरून ठेविते. कृष्णपक्ष लागला ह्मणजे ती परत मागें वळते, आणि अखेर शोधून ठेविले असेल त्या घरापासून घरफोडी करण्याला सुरुवात करते. गुन्हा करण्याला निघण्यापूर्वीं ते हात मोकळे ठेवून अंगावरून खादीची पासोडी बांधतात, तिला " भजंगी " किंवा " गाटी " ह्मणतात. तिच्यांत ते आपले जोडे कमरेला बांधून ठेवितात. धोंडे, सुऱ्या, झाडाच्या नुकत्याच काढलेल्या काठ्या, कुऱ्हाड, आणि बत्ता वगैरे ते बरोबर घेतात. कडची किंवा पळीही कांहींच्याजवळ असते. पण बहुधा त्यांचेजवळ गाडीचा दाबखिळा, अगर मोटेच्या खालच्या चाकाची आरी किंवा गुळमेख असते; यांना ते " गणेशखिळा " म्हणतात. त्याचीं वरचीं बोंडें कापसांत गुंडाळतात, आणि खालचीं टोंकें दगडावर पाजळतात. कधीं कधीं गुप्तीवजा आंत खिळा असलेली, व बाहेरून लोखंडी विड्या बसविलेली लाठीही त्यांच्याजवळ असते. गुन्ह्याच्या ठिकाणापासून सुमारें दोन मैलांवर फाजील कपडे वगैरे सामान काढून त्याचें गांठोडें एखाद्या झाडावर ठेवितात.

घराच्या भिंतीला " बगली " किंवा " रुमाली " पद्धतीनें धारें पाडून ते घरांत शिरतात, किंवा माळ्याला धारें पाडून धोतरानें किंवा दोरीनें एक माणूस आंत जातो, आणि तो दार उघडतो. तसेंच मिने दुभाळक्या हत्यारांनीं दाराच्या भेगेवाटें खिडक्यांच्या कड्या काढून घरांत येतात. मोठी पेटी नेणें झाल्यास, मोठें चौकोनी धावें पाडतात. या लोकांनीं पाडलेलें धावें फारच साफसूफ, नीटनेटकें व दोरीसूद असतें. आवाज होऊं नये म्हणून ते तिजोऱ्या गोदडीवरून दारापर्यंत किंवा धाव्यापर्यंत ढकलीत नेतात. ते खंबीर तारेनें कुलुपें काढतात. बोऱ्यानें पाडलेल्या धाव्यांतून फार झालें तर माणूस पोटानें सरपटत जाईल. पण मिन्यांच्या धाव्यांत माणसाला बसतां येतें, इतकें तें मोठें असतें. धाव्यांतून शिरण्यापूर्वीं काठीला कापड गुंडाळून आंत कोणी आहे कीं नाहीं, हें पाहून एक इसम आंत शिरतो. आंत गेल्याबरोबर अगकाडी उजळून कोठें काय आहे, हें पाहून ठेवितो. मोठी पेटी किंवा तिजोरी उचलावयाची असली, किंवा आंत माणसें फार असलीं तर दुसरे इसम मदतीला आंत जातात.हवा, उजेड,किंवा आवाज येऊं नये ह्मणून ते धाव्याच्या आड कापड धरतात.टोळींतील कांहीं इसम घराच्या वाटा रोखतात. आंतून दिलेला माल घेण्यासाठीं एकजण धाव्याजवळ रहातो. सर्व ठीक चाललें आहे हें टोळींतील इसमांना कळविण्यासाठीं बाहेर एक इसम उंदराप्रमाणें चिव चिव करीत रहातो. कांहीं दगा दिसून आला तर घुबडांप्रमाणें ते " घू घू " करतात. घरांत कोणी जागा झाला तर त्याला ते गप्प बसवितात, तो ऐकूं नच लागला तर त्याला ठोके देतात, मग त्याचा प्राण गेला तरी बेहेत्तर. रोकड, जवाहीर व जरतारीचें कापड ठेवून घेऊन बाकीचा कपडा गांवाबाहेर रहाणाऱ्या हलक्या जातीच्या वस्तींत, किंवा भटकणाऱ्या जातीच्या तळावर, किंवा एखाद्या कुपाटीला परत जातांना ते टाकून देतात; असा कीं, जाणारे येणाऱ्याच्या दृष्टीस तो पडावा. गुन्हा करतांना ते एकमेकांशीं आपल्या भाषेंत बोलतात. गुन्ह्याच्या प्रसंगीं

त्यांचा एखादा इसम जखमी किंवा ठार झाला तर, ते हरप्रयत्नानें त्याला नेतात, आणि पुढें मागें त्याबद्दल सूड उगवितात. उन्हाळ्यांत घराबाहेर निजलेल्या बायकांच्या अंगावरचे दागिने काढण्यांत मिने फार पटाईत आहेत. ज्योतिषी, ( डकोट ) परीट, व भंगी यांचीं घरें, तसेंच देवळें, मशिदी ते फोडीत नाहींत. परंतु टोळीचा बरेच ठिकाणीं लाग लागला नाहीं तर उटें निघण्यासाठीं ते भंग्याचें घर फोडतात, पण आंत जात नाहींत. एखाद्या घरीं कांहीं मिळालें नाहीं तर, मिने त्या घरांत शौचाला बसून चालते होतात. पुष्कळ लूट मिळण्याचा संभव असला तरच मिने रस्त्यावर दरोडा घालतात. त्यांची दरोडा मारण्याची रीत सानसी लोकांप्रमाणें आहे. अटकेंतल्या मिन्यांवर खबरदारीनें पहारा केला पाहिजे. कारण ते पळून जातात, किंवा पहारेकऱ्यांवर हल्ला करतात.

**गुन्ह्याचीं हत्यारें**:—मिन्यांच्या टोळ्यांजवळ दांड्यावेगळी कुऱ्हाड, काठ्या, चाकू व गणेशखिळा असतो. राजपुताना माळव्यांत त्यांच्याजवळ तलवारी, बंदुकाही असतात.

**चोरीच्या मालाची निर्गति**:—चोरीचा माल विकून त्याचे पैसे येतात ते ते वांटून घेतात. त्यांतून एक हिस्सा धर्मासाठीं,आणि दुसरा साथीदारांच्या विधवांसाठीं, आणि न्हावीचांभारांसाठीं काढून ठेवितात. मिन्यांच्या जमादाराला कांहीं अधिक हिस्सा मिळत नाहीं. वाट चालतांना चोरीचा माल व वहिमी जिनसा एकजण आपल्याबरोबर घेतो. त्याच्यामागें व पुढें दोन तीनशें यार्डांवर दोन तीन इसम चालतात. कांहीं दगा फटका दिसल्यास कापड फडफडून, किंवा शब्द बोलून ते इशारा देतात. मग मालासह तो इसम आडरस्त्यानें चालता होतो व परसाकडेचें निमित्त करून माल जमिनींत पुरतो. तळापासून थोड्या अंतरावर तें चोरीचा माल जमिनींत पुरतात, आणि पुढें तो शहरांत नेऊन ओळखीच्या वाणी, मारवाडी किंवा सराफास विकतात. मौल्यवान

कापड आणि जवाहीर ते पार्सल पोस्टानें एखाद्या सोबत्याच्या नांवावर पाठवितात, किंवा क्वचित् प्रसंगीं एखाद्या इसमाबरोबर आपल्या मुलुखांत घरीं पाठवितात. सोबत्याच्या नांवावर ते पैशाची मनीऑर्डरही घरीं पाठवितात.

---

# मैले मिने.

**संज्ञाः**— यांच्या दोन पोटजातीः—खैरवाडे आणि भिलवाडे. खैरवाड्यांचीं गोतें:—चिता, डांकल, धावना, जोनरवाल, सिंगाल, सेवगन, मेर आणि पदीय. भिलवाड्यांचीं गोतें:—बूज, माल, बेरड.

**वस्तिः**—त्यांचें रहाण्याचें ठिकाण राजपुताना व उदेपूर होय.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**— खैरवाडे दहा दहांच्या टोळ्या करून सर्व इलाखाभर फिरतात. दिवाळीनंतर ते रेल्वेनें प्रवासाला निघतात, आणि पावसाळ्यापूर्वीं परततात. मजुरीसाठीं ह्मणून ते व्यापाराच्या मोठ्या शहरांत वस्ति करतात, आणि आपल्या रोजगाराच्या गांवापासून दहा पंधरा मैलांच्या आंत गुन्हा करतात. भिलवाडे बहुधा गुजराथेंत गुन्ह्यासाठीं उतरतात. गुजराथच्या सरहद्दीवरच्या संस्थानांच्या भिल्लांशीं त्यांचा लागाबांधा असतो.

**स्वरूपः**— खैरवाडे उंच, पिळदार आणि काळे असतात. त्यांच्या मनगटावर डागल्याचे वण असतात. मारवाड्यांप्रमाणें ते माथ्याची हजामत करतात, "गिरदा" पद्धतीनें केंस राखतात, व मारवाडी रजपुताप्रमाणें दाढी वाढवितात. ते मारवाड्याप्रमाणें पांढरी किंवा तांबडी पगडी बांधतात. खादी, धोतर, बंडी आणि मारवाडी जोडे हा त्यांचा

पेहराव होय. ते सर्व प्रकारचें मांस व अफू खातात, तंबाखू ओढतात, आणि अतिशय दारू पितात. त्यांची रहाणी गदळ असून त्यांच्या अंगाची घपघपा घाण येते. भिलवाडे पंचमहालच्या भिल्लांप्रमाणें दिसतात, व त्यांशीं त्यांचा रोटीव्यवहार होतो.

**भाषाः**—खैरवाडी भाषा मारवाडीप्रमाणें असते. भिलवाडे भिल्ल-बोली बोलतात.

**उपजीविकेचीं बाह्य साधनें:**—खैरवाडे आपल्या मुलुखांत जमीन कसतात, व चौकीदार असतात. ते पलटणींत व पोलिसांत चाकरी धरतात. परमुलुखीं ते लांकडें फोडतात, आणि गिरण्यांत, गोद्यांत व रेल्वेवर मजुरी करतात.

**वेषांतरः**—क्रौर्ययुक्त गुन्हे करतांना खैरवाडे धाटा बांधतात. ते आपणाला गुजर, जाट किंवा ठाकूर ह्मणवितात. भिलवाडे आपणांला भिल्ल ह्मणवितात.

**गुन्हे:**—घरफोडी आणि दरोडे हे खैरवाड्यांचे गुन्हे होत. भिलवाडे जबरीची चोरी, रस्तालूट, दरोडे मारतात, आणि जनावरें चोरतात.

**गुन्ह्यांची पद्धतिः**— खैरवाड्यांची गुन्ह्यांची धाटणी उजळे मिन्यांप्रमाणें, आणि भिलवाड्यांची भिल्लांप्रमाणें असते. भिलवाड्यांची टोळी मोठी असते, आणि कोणी आडवें आलें असतां ते मारहाण करतात.

**गुन्ह्यांचीं हत्यारें:**—त्यांच्याजवळ तलवारी, बंदुका, तीरकमठे असतात. खैरवाड्यांच्या जवळ मजुरीचीं हत्यारें, काठ्या, सुऱ्या असतात.

**चोरीच्या मालाची निर्गतिः**—चोरीचा माल खैरवाडे पुरून ठेवितात, आणि पुढें आपल्या मुलुखांतल्या वाण्यांना विकतात. ते रोकड मनीऑर्डरीनें घरीं पाठवितात. बहुधा ते ज्या त्या ठिकाणीं आपले मित्र करून ठेवितात, आणि त्यांच्या मार्फत चोरीच्या मालाची निर्गति लावि-

तात. भिलवाडे चोरीचा माल आणि जनावरें आपल्या मुलुखांतील ठाकूर, कलाल वगैरेंना विकतात. कधीं कधीं चोरलेलीं जनावरें ते कापून खातात, आणि कातडीं विकतात.

---

# औधीये.

**संज्ञाः**—ह्यांना स्वदेशी, आवधपुरी किंवा अयोध्यावासी म्हणतात. मुंबई इलाख्यांत ते आपल्यांला तीर्थवासी, बैरागी, रेवडीवाले, खुंचेवाले ( मिठाई विकणारे फेरीवाले ), गयावळ आणि तेवारी ब्राह्मण असें ह्मणवितात. त्यांचे दोन वर्ग आहेतः—उंच, आणि नीच ( अकरमासे ).

**वस्तिः**—ह्यांचा भरणा कानपूर व फत्तेपूर या जिल्ह्यांत आहे. अलीकडे ते इंदोरपैकीं गंगलखेडी येथें, व निजामशाहीपैकीं हैदराबाद, मोमिनाबाद, उद्गूर, घडेंटी आणि हुल्लीखेडी येथें येऊन राहिले आहेत. शिवाय ते क्वचित् अलाहाबाद, लखनौ, हमीरपूर जिल्ह्यांतही सांपडतात.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**—हे लोक भटकणारे आहेत. ते मुंबई इलाखा, मध्यप्रांत, मध्य हिंदुस्थान, दक्षिण बंगाल येथें व जगन्नाथ ते रामेश्वरपर्यंत गुन्हे करतात. पंजाब, सिंध व गंगायमुनांमधील अंतर्वेदींत ते गुन्हे करीत नाहींत.

**लोकसंख्याः**—ह्यांची खात्रीलायक गणती झाली नाहीं.

**स्वरूपः**—त्यांचें मुख्य दैवत काली माई होय. ते आपापसांत भांडतील, पण गुन्ह्यासंबंधानें त्यांच्या जातीचा आळा मोठा विलक्षण आहे. ते सडसडीत, चपळ, टणक आणि पायशूर असतात. ते आपल्या मुलुखांत गुन्हे करीत नाहींत. इकडे गुन्हे करण्यासाठीं, ते जून महिन्यांत

सडे एखादद्दुसरा छोकरा घेऊन निघतात, आणि मे महिन्याच्या सुमाराला परततात. ते टोळीबरोबर इकडचीच एखादी बाई घेतात. फेटा अगर पांढरी टोपी, सद्रा, पांढरें जाकीट, गुडघ्यापर्यंत धोतर, हिंदुस्थानी जोडा, छत्री किंवा काठी हा त्यांचा पेहराव होय. ते एक गोदडी व एखादद्दुसरी पासोडी खांद्यावर टाकून तिच्यावरून धोतर बगलांखालून घेऊन पुढें गांठ मारतात. शिवाय खांद्यावर " झोला " (पडशी) लटकत असतो. त्याच्यांत शिधा, तवा, पितळी, लोटा, डेगची, पळी, (ग्यान) चिमटा, आरसा, फणी, कुंकू, गोपीचंदन वगैरे सामान असतें. औधीये फार मुखजड असतात, व जपून उडवाउडवीचीं उत्तरें देतात.


**भाषाः**—त्यांचे भाषेला पुरभय्याची बोली असें म्हणतात. आवतहै, जावतहै, वगैरेप्रमाणें ते क्रियापदांचे प्रयोग करितात. परकीयांशीं बोलतांना ते शुद्ध हिंदुस्थानी बोलण्याचा आव घालतात.

## सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| उलाही हो गई, झोंकगई ... | अटक झाली. | गयना ... | ... घर. |
| | | चोहारी ... | ... खबर. |
| बरीलेव ... | ... तपास कर. | बारु बैथारो | ... सोनें गाळ. |
| बारूफांक देव ... | चोरीचा माल लांबव | खालो भाव | ... सवडीनें काम कर. |
| मौसी असूरी है... | आपल्या मागें पोलीस आहेत. | अखरू ... | ... ये. |
| | | लखैतू ... | ... पेटी. |
| नेदतानो छू छालो | लांच दे म्हणजे झाडा घेणार. | लखैतिन | ... कुलूप. |
| | | कची ... | ... पितळी डबा. |
| न ले ... ... | नाहींत. | फुंदी ... | ... आगळ, कडी. |
| धरारी ... | ... पळी किंवा चमचा. | लोहीया... | ... तिजोरी. |
| कोंखी ... ... | पार्सल,मनीऑर्डर किंवा पत्र. | कोडी ... | ... चोरी. |
| | | कोडेरा ... | ... चोर. |
| कोंख ... | ... कोळसा, कागद. | शियंघी... | ... सोनें. |
| बारू ... | ... माल. | ओवीन ... | ... रुपें. |
| सौंधी सेहि लेव पर काच न पर्ने ... | मारलें तरी कबुली जबाब देऊं नको. | धरवत ... | ... जवाहीर. |
| | | तिमनी ... | ... गोफ. |

| | |
|---|---|
| सिरोखा ... | डोक्यावर घालण्याचा दागिना. |
| गेटला ... ... | दक्षणी ब्राह्मण. |
| पंद्रेहा ... ... | वाणी. |
| देदर ... ... | रजपूत. |
| लेडर ... ... | मराठा. |
| पांडे ... ... | सोनार. |
| हडक्या ... ... | सराफ. |
| कोंग ... ... | मुसलमान. |
| खडीक ... ... | पाटील. |
| कच्र्या ... ... | शिपाई. |
| दसूवा ... ... | पोलीस अंमलदार. |
| दसूई ... ... | पोलीस ठाणें. |
| दुबील ... ... | मागचें दार. |
| बस्की देना ... | भिंतीला भोंक पाड. |
| चसाना ... ... | फोडणें. |
| फन ... ... | उघडणें. |
| समो ... ... | चांगली संधि. |
| लादना ... ... | पळणें. |
| माधू, महादु ... | राहण्याचें गांव. |
| रेह ... ... | माल छपविण्याची जागा. |
| पानखाना ... | सांकेतिक भाषा बोलणें. |
| अकौटी ... ... | वांटा. |
| सहात ... ... | संकेतस्थान. |

| | |
|---|---|
| बडी आये ... | कांहीं माल आणला आहे. |
| साख ... ... | चोरी करण्याला अनुकूल काळ. |
| पेरभाव ... ... | टेहळणें. |
| गोरकीया ... | जागल्या. |
| आखिला ... | औधीया. |
| नजुवा ... ... | खिसाचोर. |
| कजरिया ... | रात्रचोर. |
| बवूस ... ... | दरोडखोर. |
| काटी हो गयी ... | सजा झाली. |
| उभै गई... ... | सुटला. |
| कचरा ... ... | लुच्चा. |
| करची ... ... | फटके मारणें. |
| टांच ... ... | दंड. |
| अनसानेवाला ... | घरफोडया. |
| जोरीह ... ... | हर. |
| अंतरकोडी ... | आपसांत चोरी करणारा औधीया. |
| फेरैया... ... | चोरी करण्याला गेलेला औधीया. |
| डेरहा ... ... | तळावर राहिलेला. |
| बडगवा ... | शहर. |
| बचडा ... ... | लहान गांव. |
| लाली ... ... | टोळी. |

रस्त्याच्या कडेला  आंकड्याच्या काठीसारखी खूण असली म्हणजे टोळी कोणत्या रस्त्यानें गेली हें तिच्यांतील इसमांना कळतें. जेथें दोन किंवा अधिक रस्ते मिळतात, तेथें आलेल्या रस्त्यावरून रेघ काढून ते ज्या रस्त्यानें गेले असतील त्या रस्त्याला ती मिळवितात. तळाच्या जवळच्या रस्त्याचे कडेला ते एकावरएक  अशा दोन रेघा काढतात.

**उपजीविकेचीं बाह्य साधनें:**— गुन्ह्याच्या पैदासीवर ते स्वदेशीं आळसांत व ख्यालीखुशालींत दिवस काढतात.

**वेषांतर:**— ह्या इलाख्यांत ते बैराग्याचे वेषानें भीक मागतात, अगर मिठाई, आइसक्रीम विकीत फिरतात. ते बैराग्याचा किंवा ब्राह्मणयात्रेकरूंचा वेष घेऊन गळ्यांत जानवें, रुद्राक्षांच्या किंवा तुळशीच्या माळा घालतात; व कपाळाला, मानेला गोपीचंदनाचे पट्टे उभे आडवे ओढतात. शिवाय त्यांचेजवळ भिक्षेची तुंबडी ( कटोरी ) असते. या वेषानें ते भोळ्या बायांशीं ओळख पाडून आसपासची बातमी काढतात. तसेंच टोळींतील एखादा इसम आपणाला हिंदुस्थानी वाणी ह्मणवितो, आणि दुकान लावतो. तेथें गप्पा ठोकावयाला मंडळी जमतात, त्यामुळें आयतीच इकडची तिकडची बातमी लागते. शिवाय आसपास हिंडणाऱ्या टोळींतील इतर इसमांना तेथें जमतां येतें, सामान ठेवितां येतें, व तेथून पत्रव्यवहार करतां येतो.

**गुन्हे:**— ते दिवसां घरफोडी, चोरी व ठकबाजी करतात, पण क्रौर्ययुक्त गुन्हे करीत नाहींत. ते पूर्वीं छप्परबंदांप्रमाणें खोटीं नाणीं करीत.

**गुन्ह्यांची पद्धति:**— ठकबाजी:—कवठाचे किंवा नारळाचे करवंटींत तूप घेण्याला ते वाण्याच्या दुकानीं जातात, तिच्या भेगेला फडक्यांत गंडाळलेलें व आंत शिसें ओतून जड केलेलें बूच बसविलेलें असतें. त्या बुचासह तिचें अभंड करतात. नंतर ती साफ करण्यासाठीं म्हणून ते घेतात, आणि हातचलाखीनें जड बूच काढून घेऊन त्याच्या जागीं हलकें बूच बसवितात; व अशा तऱ्हेनें वाण्यास फसवून जास्त तूप उपटतात. ते सोनाराला किंवा चोरीचा माल घेणाराला एकांतस्थलीं नेऊन तेथें त्याचे पैसे लुटतात, आणि खरे म्हणून खोटे दागिनेही विकतात.

चोरी:— त्यांची चोरीची पद्धत भामट्यांप्रमाणें आहे, पण ते रेल्वेंत चोरी करीत नाहींत. ते लहान टोळ्या करून यात्रा, देवळें, स्नानाचे घाट वगैरे गर्दीच्या जागीं चोऱ्या व उचलेगिरी करतात, जवाहीर काढतात,

खिसे कातरतात, गांठोडें उचलतात, आणि हातोहातीं चोरीचा माल लांबवितात.

घरफोडी:– कोणत्या शहरांत अगर रहाळांत गुन्हा करावयाचा हें ठरविल्यावर, तेथून तीन चार मैलांवरील मठांत किंवा देवळांत ते उतरतात. आम्ही तीर्थवासी किंवा यात्रेकरू आहोंत, आणि वाटखर्चापुरती भिक्षा मागण्यासाठीं, किंवा मागें राहिलेल्या इसमांना मिळण्यासाठीं, थोडे दिवस मुक्काम करावयाचा आहे, अशी पुजाऱ्याला थाप देऊन त्याची मर्जी संपादन करतात. नंतर टोळी मोठी असल्यास ते तिच्या लहान लहान तुकड्या करतात. ह्या तुकड्या स्वतंत्रपणें गुन्हे करतात. पण एकजण मठांत अगर देवळांत सदैव असतो, आणि टोळींतील बाकीचे इसम जरूरीप्रमाणें एकमेकांना भेटण्यासाठीं वगैरे तेथें येतात. सारांश, ह्या मध्यवर्ती ठिकाणापासून सर्व व्यवस्था चालते. दोनतीन इसम आटा मागतां मागतां ज्यांतील इसम घर लावून गेले असतील, असें एकांत घर शोधून काढून त्याच्या मागच्या दरवाज्याचें कुलूप काढतात. एकजण आंत जातो. बाकीचे रस्त्यावर टेहळणी करतात. नंतर आंतील इसम चटकन् पेट्या, फडताळें फोडून दागदागिने काढून घेतो. वेळ सांपडल्यास ते पेट्या वगैरे जेथल्या तेथें ठेवितात, म्हणजे मालकाला ताबडतोब संशय येत नाहीं. संधि सांपडल्यास मिळालेला माल सर्वजण वांटून घेतात, आणि वेगवेगळ्या रस्त्यांनीं मध्यवर्ती स्थानाकडे चालते होतात. कोणाला संशय येऊं नये, म्हणून एकमेकांशीं ओळख नाहीं, असें ते परकी माणसाला भासवितात. या लोकांचा आपल्या घरीं व आजूबाजूला गुन्हे करणाऱ्या टोळ्यांशीं पत्रव्यवहार चालतो. ते पुजारी, चोरीचा माल घेणारा इसम किंवा एखादा संभावित मनुष्य ह्यांच्या पत्त्यावर पत्रें मागवितात. कांहींजणांना नागरी लिपी लिहितां वाचतां येते. त्यांच्या पत्रांत ज्यांना पत्रें पाठवितात, त्या सर्वांचीं नांवें आरंभीं असतात; आणि नांवाच्या पुढें “ वा ” हा प्रत्यय लावितात. जसें “ बिसनु वा. ”

**गुन्ह्यांचीं हत्यारें:**– त्यांचा ग्यान (दांड्याच्या टोंकाला पाणी दिलेली पळी) बौऱ्यांच्यापेक्षां लहान आणि सफाईदार असतो. मजबूत आणीदार चिमटा आणि आणीदार मुठीची सुरी ह्यांनीं मोठालीं कुलुपें ते फोडतात, आणि दाभण, नऱ्हाणी, बांकडे चाकू, पोलादी तारा, कान-कोरणीं, ह्यांनीं लहान लहान कुलुपें काढतात. नऊ इंच लांब, एक इंच रुंद असा बांबूचा तुकडा, टोंकाला दुभाळका करून तो कवाडांच्या फटींतून घालून ते कडी उचटतात, किंवा मागें रेटतात. कोणी विचारलें तर सांगतात कीं, ह्यानें आम्ही भाकरी उचटतों.

**चोरीच्या मालाची निर्गति:**– चोरीचा माल ते पार्सल करून पोस्टानें किंवा रेल्वेनें पाठवितात. बहुधा तो ठिकठिकाणच्या दोस्तींतल्या खरेदीदाराला विकून मनीऑर्डरीनें ते पैसे घरीं पाठवितात. कधीं कधीं ते गोपीचंदन वस्त्रगाळ करून त्यांत कापूस घालून त्याची मूस तयार करून त्यांत सोनें-रुपें आटतात. चोरीचा माल ते क्वचित् जवळ बाळगितात. त्याची व्यवस्था लावण्यापूर्वी ते तो माल मुक्कामाच्या जागेजवळ पुरतात. माल फार असला तर निरवानिरव होईपर्यंत तो तेथेंच ठेवून ते पुढें जातात. मग एकजण ब्राह्मण ज्योतिषाच्या वेषानें येऊन तपास घेतो कीं, परदेशांवर किंवा बैराग्यांवर चोरीचा वहीम आहे कीं काय ? आहे असें कळल्यास ते बरेच दिवसपर्यंत जेथल्या तेथें माल राहूं देतात, नाहीं तर टोळी परत येऊन माल काढून घेते. गम्मत ही कीं, असल्या तपासासाठीं चोरीच्या घरीं सुद्धां जाऊन मालकाला कोण चोर होता, वगैरे मंत्राच्या योगानें सांगण्याची सदर औधीया बतावणी किंवा धाडस करतो.

---

## पठाण.

**संज्ञा:**– ह्यांना रोहिले, काबुली, पेशावरी, खान, अफगाण, कंदाहारी, पशतुनी, पेशीनी ह्मणतात. ते स्वात, बुनेर, बाजौर, तिऱ्हा,

कंदाहार, पेशावर येथून येतात. मुंबई इलाख्यांत आढळतात ते बहुतेक युसफझै ( यांत खुडुखेल येतात ), वरचे व खालचे मोहमंद ( यांत हलीमझै, तरकझै, बैझै, खवैझै येतात ), तर्कानी ( यांत सलारझै येतात) साफी, आफ्रिडी ( विशेषतः उस्मानखेल, सुलेमानखेल ), उत्खेल आणि काकड असतात. सिंधी, बलुची बायका पोरांनिशीं हिंडतात. त्यांना इराणी ह्मणतात, व ते पठाणांहून भिन्न असतात.

**वस्ति आणि गुन्ह्यांचें क्षेत्रः**– पठाण फिरस्ते नाहींत. ते अफगाणिस्थान व वायव्य सरहद्द येथून येतात, आणि कोठेंतरी वस्ति करून आसपासचीं खेडीं फिरतात. मुंबई, घाटकोपर, कुर्ले, पुणें, हुबळी, बेळगांव, सुरत, अहमदाबाद, वगैरे ठिकाणीं ठाणें देऊन त्यांनीं एकजुटीनें पुष्कळ गुन्हे केले. वस्तीच्या गांवापासून बऱ्याच अंतरावर ते मोठाले व टोळीचे गुन्हे करतात. त्यासाठीं ते कधीं कधीं रेल्वेनें शंभर मैलांवर प्रवास करतात. ते जबर पायपीट करणारे असल्यामुळें एका दमांत साठ मैल कांटतात. एका देवळावर दरोडा घालून ते दोन दिवसांत दीडशें मैल गेले. मुक्कामाच्या आसपास ते घरफोडी, चोऱ्या वगैरे करतात. ते बहुतेक सडे असतात. पण कांहीं इकडील बायका करून स्थाईक झाले आहेत.

**लोकसंख्याः**– मुंबई इलाख्यांत त्यांची वस्ति दोन हजारांवर आहे.

**स्वरूपः**– ते लालबुंद, सुरेख, पिळदार, सशक्त, सतेज, पुष्ट, बांधेसूद, उग्र, मध्यम ते पुऱ्या उंचीचे असतात. त्यांचा स्वभाव लोभी, दगलबाज व शीघ्रकोपी असतो, आणि राहणी थाटाची असते. ते इकडील लोकांना तुच्छ मानतात, आणि लोकही त्यांच्या उद्दाम वर्तनाला भिऊन त्यांच्यापासून लांब राहतात. निमाज वगैरे धार्मिक बाबी ते फार जपून पाळतात. स्वाती " अखून साहेब " व इतर पठाण " पीर बाबा,

काकासाहेब, लोयेझवान " ( बगदादपीर ) यांच्या नांवानें शपथ घेतात. पोकळ पायजमा, कापडाचा किंवा रुईचा अंगरखा, पगडी किंवा लुंगी आणि बहुधा तिच्या आंत एक टोपी ( कुला ) हा त्यांचा नेहमींचा पोषाख होय. कधीं कधीं कुला व बंडी ह्यांवर जरीचें काम असतें. त्यांच्यांतील गरीब लोक कपड्यांना नीळ देतात. कांहीं लोक लांब केंस व दाढी ठेवितात आणि मोहमंद व स्वात कानसुलांवर कुरळीं झुलपें ठेवितात. त्यांची राहणी व पोषाख गदळ असतो.

**भाषाः**– त्यांची जन्मभाषा पश्तु होय. त्यांना हिंदुस्थानी येतें, आणि ज्या जिल्ह्यांत राहतात तेथलीही भाषा ते कशीबशी बोलतात. सांकेतिक भाषा– ते व्यावहारिक भाषेनें एकमेकांना इंगित कळवितात. जसें:–रस्ता तापला आहे (पोलीस पाळतीवर आहेत.) औषध (गुन्ह्याचा बेत. ) हवा चांगली आहे, दोन तीन शाली पाठवा = सर्व ठीक आहे, हातीं घेतलेलें काम पार पाडण्याकरितां दोघे तिघे या. जाड काड्या, रुपये = माणसें इत्यादि.

**उपजीविकेचीं बाह्य साधनें:**–पठाण लोक व्याजबट्ट्याचा धंदा करतात व किरकोळ सामान विकीत फिरतात. कोणी घोडे, पलटणचे जुने बूट, पट्टे विकतात. सावकार लोक त्यांना रखवालीसाठीं किंवा तगाद्यासाठीं नौकरीस ठेवितात. ते कोठें गाड्या हांकतात व मजुरीही करतात. कांहीं रेल्वेवर किंवा कचेऱ्यांत शिपाई, रामोशी राहतात; कोणी चहा, कॉफी, धान्य, लांकडें, मोच्याचें, शिकलकराचें वगैरेंचीं दुकानें घालतात. कांहींजण भीक मागतात, दवा, दारू विकतात, आणि मशिदींत " बांगीची " नोकरी करतात. महार, मांग, कोळी, भिल्ल, भंगी, कुणबी, मोठ्या रेल्वे स्टेशनवरील हलके नौकर वगैरे बिनपतीच्या लोकांना ते कर्ज देतात. ते तारण किंवा दस्तऐवज घेत नाहींत, म्हणून लोकांना वाटतें कीं हें बरें आहे. त्यांचें व्याज अतोनात जरब असतें, आणि कितीही लहान रक्कम असली तरी भाडेंखर्चाची

पर्वा न करतां ते ती उगविल्याखेरीज राहत नाहींत. वायदा संपला कीं ते कुळाला उसासा देखील टाकूं देत नाहींत. तांबडें फुटलें कीं पठाण सोटा घेऊन तगाद्यासाठीं दारांत आडवा तयार ! फिरून ये म्हटलें तरी आपल्या भोंवतीं चक्कर देऊन तेथेंच ! दम धर ह्मटलें कीं नाक दाबलेंच ! ते कुळाला ह्मणतात कीं, आज हिशेब चुकता कर आणि पाहिजे तर पुन्हां आतांच नवीन कर्ज घे. कुळाला तेंच पाहिजे असतें. ते कुळाला पहिल्यानें गोडीनें घेतात, आणि जर नच जमलें तर मारपीट करावयाला सोडीत नाहींत. फेरीवाले पठाण, कापड, हिंग, चाकू, कातरी, सुऱ्या, सुकीं केळीं, चित्रें, सुरमा, औषधी, खोटें जवाहीर, खडे, वगैरे विकतात. कधीं कधीं ते सनया, बगलबाजा वाजवितात. ते कापड, शाली वगैरे पिकाच्या हंगामावर उधार देतात. तेव्हां गिऱ्हाईक फार खुष असतें. पण देण्याचे वेळीं मोठें जड जातें. कारण पठाण माराची किंवा धर्म बाटविण्याची दहशत घालून पैसे उगवितात. लोकांत राम नाहीं म्हणून पठाणांचें हें सर्व निभतें. वेळेवर पठाण त्यांना गैरकायदा कैद करतात, पण लोक हूं कां चूं करीत नाहींत, किंवा त्यांच्याविरुद्ध पुरावा करावयाला धजत नाहींत. त्यांची जरब इतकी भयंकर बसलेली आहे कीं, कांहीं लोक जमिनीच्या भांडणांत त्यांना नौकर ठेवितात म्हणजे दुसरी बाजू मुकाट्यानें माघार घेते. ते कित्येक वेळां सरकारी नौकरांनाही ठोकतात. सारांश, मेंढ्यांना जसा लांडगा तसा इकडच्या लोकांना पठाण होय. पुष्कळजण पलटणींत आहेत आणि ते फार चांगले लढवय्ये आहेत. परंतु पलटण कूच करण्याला निघाली म्हणजे त्यांतले कांहींजण गुन्हे करतात.

**वेषांतरः**— गुन्हे करतांना ते बहुधा बोलत नाहींत. क्वचित् एखाददुसऱ्या उर्दू शब्दानें सोबत्यांना सावध करतात. ते कधीं कधीं पोलिसचा जुना पोषाख चढवितात, धोतर किंवा तंग पायजमा नेसतात, तोंड झांकून घेतात, आणि जेथें गुन्हा करावयाचा तेथील लोकांचा नेहमींचा

पोषाख घालतात. ते आपळीं व आपल्या गांवांचीं नांवें वरचेवर बद्लतात. त्यांना ओळखण्यासाठीं खालील माहिती अवश्य आहे:– नांव, बापाचें नांव, जात, पोटजात, गांव, जिल्हा, “ मलिक ” किंवा मुख्याचें नांव, चेहरेपट्टी आणि आंगठा.

**गुन्हे:–** जबर व्याज, धाक घालून पैसे उपटणें वगैरेंपासून त्यांच्या गुन्ह्यांना आरंभ होतो. आणि ते एखाद्या ठिकाणीं ठाणें करून राहिले, व तेथें त्यांच्या जातींचा जमाव जुळला म्हणजे आसपासच्या गांवांत त्यांची धामधूम बोकाळते. ते जमवाजमव करून दरोडे, रस्तालूट, घरफोडी, चोऱ्या वगैरे गुन्हे अतिक्रूरतेनें करतात. दक्षिणेंत ते देवळांत दरोडे मारतात आणि उत्तरेकडे बंदुका चोरतात, अशी जनवार्ता आहे. सूड घेण्यासाठीं किंवा मोठ्या गुन्ह्यांत त्वेषांत येऊन, ते खून किंवा जबर दुखापत करतात. बहुतेक पठाण वहिमी लोकांकडून चोरीचा माल घेतात. ते गैरकायदा हत्यारें, दारू व अफू आणतात व बेसुमार जुवा खेळतात, क्वचित् खोट्या नोटा चालवितात, आणि खरे म्हणून खोटे दागिने विकतात. रस्त्यांत एखादा जिन्नस किंवा खोटा डाग ठेवून तो जाणाऱ्या येणाऱ्यांनीं घेतला म्हणजे त्यांजजवळून कोणाला न सांगण्याबद्दल ते पैसे घेतात. अगर तो घेणार इतक्यांत स्वतःच उचलून घेऊन हो ना करून तो त्याचे माथीं मारतात, आणि तो जी रोकड देईल ती घेतात. सावकाराच्यातर्फे वसूल केलेल्या पैशाचा ते विश्वासघातही करतात. गुन्हा करतांना ते सोमल किंवा भुलीचें औषध देतात असा संशय आहे. ते मुलें पळवून त्यांच्या अंगावरचे दागिने काढून घेतात. उत्तरेकडे ते खिसाचोरी करतात, व रेल्वेवरील धर्मशाळांत, धक्क्यांवर किंवा आगगाडींत निजलेल्या उतारूंची चोरी करतात. अदेझाई, हस्तनगर आणि मतनी येथील पठाण पैसे घेऊन मारेकऱ्यांचें काम पत्करतात.

**गुन्ह्यांची पद्धति:–** जुगार आणि वहिमी लोकांकडून बातमी काढून ते घरफोडी करतात. दारें, खिडक्या फोडून किंवा भिंतीला मोठें

भगदाड पाडून ते घरांत घुसतात, आणि हातीं पडेल तें नेतात. बगली पद्धतीनें ते मोठ्या गिरमिटानें दारांना किंवा खिडक्यांना प्रथम एक भोंक पाडतात; आणि त्याच्या भोंवतीं दुसरीं भोंकें पाडून तें हात जाईल एवढें मोठें झालें म्हणजे आंत हात घालून कडी काढतात; कोणी आडवें आलें तर नागव्या तलवारी दाखवून त्यांना भिववितात आणि वेळ पडल्यास भोंसकतात. ते बहुतेक एकसारखे दिसत असल्यामुळें त्यांना ओळखून काढण्याची फार पंचाईत पडते. दरोड्यापूर्वीं एकजण हकीम म्हणून एखाद्या वस्तींत राहतो, आणि एखादें घर शोधून काढतो; अगर गांवचा दुसरा एखादा बदमाष इसम हातीं धरून त्याचेकडून माहिती मिळवून मग ते दरोडे घालतात. फेरीवाल्याच्या किंवा व्याजबट्ट्याच्या धंद्यामुळें स्वतः घरें हेरीत, किंवा त्याबद्दल पूसतपास करीत या जिल्ह्यांतून त्या जिल्ह्यांत जाण्यास, आणि लुच्चा-सोद्यांची ओळख पाडण्यास त्यांना आयतें फावतें. शहरांतील पार एकीकडच्या घरावर ते जमावानें दरोडा घालतात. कधीं कधीं पठाण एखाद्या सावकाराचे घरीं नौकरीस राहतो, आणि घरचा ठाव घेतो. मग मुलुखांत जाण्याचें निमित्त करून तो नोकरी सोडतो, आणि टोळी बनवून त्या घरावर दरोडा आणतो, किंवा नौकरी न सोडतां आपल्या परठिकाणच्या स्नेह्यांस बातमी देऊन दरोडा आणतो. तें घर लुटीत असतांना हा आपल्या इमानाचें नाटक करण्यास चुकत नाहीं, आणि संशय येऊं नये म्हणून कांहीं दिवस तसाच नोकरही राहतो. देवळावर दरोडा घालण्यापूर्वीं माहिती काढण्यासाठीं एखाद्या परदेशी हिंदूची ते योजना करतात. तो व्यापाराच्या वेषानें तेथें जाऊन आपलें काम करतो. नंतर टोळींतील एकदोन पुढारी तें ठिकाण नीट पाहून घेतात, व तेथें किती अडथळा कसा येईल याची चौकशी करतात. जेव्हां नोंदीसाठीं हत्यारें पोलीस ठाण्यांत आणतात अशा संधीला ते दरोडा घालतात, व साधारणतः लांबच्या देवळावर किंवा घरांवर धाड घालतात. गुन्ह्याचे ठिकाणापासून थोड्या अंतरावर ते संकेतस्थान

ठरवितात. त्या स्थानापासून एक दिवसाच्या टप्प्यावरच्या निरनिराळ्या गांवीं एकेक दोघे दोघे जातात, आणि सर्वजण संकेतस्थानीं येऊन गोळा होतात. तेथें कोणी घरभेदे असल्यास ते त्यांना येऊन मिळतात, आणि अंधार पडल्यावर गुन्हा करण्याला सर्वजण निघतात. त्यांच्याजवळ बहुधा रिव्हॉल्व्हर, बंदुका असतात. गांवांत पोलीस स्टेशन असल्यास ते तेथील हत्यारें जबरदस्तीनें घेतात. घरफोडीच्या ठिकाणीं आल्यावर ते चोहोंकडे दगडांचा वर्षाव करतात, व बंदुका झाडूं लागतात. ते दारें फोडून आंत शिरले म्हणजे कपाटें, पेट्या उचकतात, जमिनी खणतात, कोने–कोंपरे धुंडाळतात, माल काढून देण्यासाठीं घरांतलि माणसांना मारहाण करतात, व कोणी आडवें झालें तर त्याचा जीव सुद्धां घेतात. ते बहुधा बायकांच्या वाटेस जात नाहींत. एक दोन तासांत ते आपलें काम उरकून शेतांतून व जंगलांतून जे पसार होतात, ते थेट दहा पंधरा मैलांवर थांबतात; व तेथें सर्वांचा झाडा घेऊन मालाची वांटणी करतात. नंतर टोळींतील इसम वांकड्यातिकड्या मार्गानें आपल्या ठिकाणीं जातात. एखाद्या जिल्ह्यांत गुन्हे फार होऊं लागले म्हणजे पठाणही वाहत्या गंगेंत हात धुवून घेतात व गुन्हे करूं लागतात; कां कीं, आळ वहिमी जातींवर जातो. दरोडा मारण्याला ते कधीं कधीं घोड्यांवर जातात. जुनीं नाणीं मिळविण्याच्या किंवा परदेशीं नाणीं मोडण्याच्या मिषानें ते एखाद्या दुकानीं जातात, आणि सौदा करतां करतां एखाददुसरें नाणें लांबवितात. ते इतक्या लांबून दरोडा घालतात, आणि त्यांच्या टोळींतील इसम इतक्या लांबलांबून जमतात कीं, गुन्ह्याचा पत्ता लावणें मुष्किलीचें होतें. पठाण रस्तालूट क्वचित् करतात. परंतु चांगली लूट मिळण्याची नक्की बातमी लागली म्हणजे ते रस्त्यावर दरोडा मारतात. पहिल्यानें सावकारांना साळसूदपणा दाखवून ते आपली साख वाढवितात; आणि सावकारानें शेंकडावळ देऊं करून पुष्कळ वसूल करण्याला पाठविलें म्हणजे पैसे तिकडे व तेही तिकडे. ते हत्यारें

मोठ्या शिताफीनें लपवून आणतात; कधीं उशांमध्यें, कधीं कुराणासारख्या पुस्तकामध्यें वगैरे. १८९८।९९ सालीं पुण्यास साहेबलोकांच्या येथें चोऱ्या झाल्या; त्यांतील माल पठाण पलटणीच्या सुभेदाराच्या घरीं निघाला. एखाद्या मोठ्या गुन्ह्यांत सांपडले म्हणजे ते पोलिसाला अटक करूं देत नाहींत. त्यांच्यावर सक्त पहारा ठेवावा. विचारपूस केली तर ते वेड्याचें सोंग घेतात.

**गुन्ह्यांचीं हत्यारें:–** दरोड्यासाठीं ते लोखंडी विडीच्या मोठमोठ्या काठ्या, सुऱ्या, कट्यारी, तलवारी, बंदुका, पिस्तुल व रिव्हॉल्व्हर नेतात. कधीं कधीं कुऱ्हाडी–पहारी नेऊन ते त्या तेथल्या तेथेंच टाकून देतात. घरें फोडण्यासाठीं कधीं कधीं ते खिळे, पहारी, गिरमिटें, मेणबत्त्या, आगकाड्या, किल्ल्या वगैरे घेऊन जातात. पठाणांच्या घरांत केव्हां केव्हां तराजू, वजनें आणि सोनें–रुपें गाळण्याचें सामान सांपडतें.

**चोरीच्या मालाची निर्गतिः–** त्यांना एकमेकांचा भरंवसा नसतो. चोरीचा माल ते ताबडतोब वांटून घेतात. टोळींतील इसमांचा एकमेकांशीं फारच स्नेह असला तर एक दोघे पुढारी मौल्यवान् जिनसा विकून टाकतात आणि मग पैसा वांटून देतात. दरोडा मारून रेल्वेनें प्रवास करतांना चोरीचा माल ते एखाद्या एतद्देशी मुसलमानाजवळ देऊन त्याला दुसऱ्या डब्यांत बसवितात. एका पठाणानें आपल्या वृषणाखालीं माल लपविला होता. मारवाडी, बोहरी, खोजे, गुजर, सोनार, सराफ, सावकार वगैरे लोक त्यांचेजवळून चोरीचा माल घेतात. एका प्रांतांतील माल ते दुसऱ्या प्रांतांत विकतात. ते कधीं कधीं चोरीचा माल " गुड्यांत " ( सामानाचा कातडी थैला ) घालून एखाद्या विश्वासू स्नेह्याबरोबर किंवा आप्ताबरोबर देऊन आपल्या मुलुखांत पाठवितात. कधीं कधीं चोरीचा माल ते आपल्याच घरांत चुलीखालीं किंवा झाडाखालीं पुरून ठेवितात. एकदां तर चोरीचा माल एक पठाण अंगावर घालून फिरत होता.

# सांसी आणि बेरिये.

**संज्ञाः**–यांना सांसी, कंजार, आदोदीय, पोपट, घागरे पलटण, हाडकुटे, छार, गिधीये, हबूडे, कजरहातिये, कंचीरे, चिरोखरवाल, भांटू, भानतुडे, कंजर–बेडिये, पोमळे, बागोरिये, उंचालेंगा ( आंखूडबंडी ) किंवा बैलवाले कंजार ह्मणतात. त्यांच्या दोन पोटजाती आहेत. माल्ह आणि बिधू अथवा काळकर. त्यांचीं मुख्य गोतें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः– झोजा, बेलिया, पटीया, गेहला, चंदुवाडा, तमैची, गड्डू, कोठन, धापो, रायचंद्र, स्याहान, दर्हीया, पोपट, साध, भुरा, भाना, द्रसा.

**वस्तिः**– ही जात फिरस्ती आहे, तथापि भरतपूर व धोलपूर संस्थानांत यांचे कांहीं लोक सांपडतात.

**गुन्ह्यांचें क्षेत्रः**– ते बायकापोरें, गाईबैल, टोणगे, गाढवें, तट्टें, शेळ्यामेंढ्या आणि विजाती टेरीअर कुलंगीं कुत्रीं घेऊन फिरतात. एका टोळींत बहुधा वीस बिऱ्हाडें असतात. सांसी गांवापासून दोन तीन मैलांवर पाण्याच्या आसपास पिकाच्या किंवा जंगलाच्या आडो-शानें आडरानांत उतरतात. दर डेऱ्याला नाईक किंवा “ सरगणा ” असतो. त्याची निवडणूक त्याच्या कर्तबगारीवर असते, आणि गुन्ह्याचे वेळीं तो काम करो अथवा न करो त्याचा वांटा शेंकडा पांचांनीं अधिक असतो. सांसी “ सरकी ” ( गवती पाल ) मध्यें राहतात. ज्या गांवांत किंवा जेथील पोलिसांमध्यें त्यांचे स्नेही असतील अशा आगाऊ ठरविलेल्या गांवानजीक बरसातींत अनेक टोळ्या गोळा होतात, तेव्हां तळांवर शेंदोनशांवर इसम असतात. उघाडीचे दिवसांत सशक्त लोक गुन्ह्यांसाठीं तळाबाहेर पडतात. पावसाळा संपला म्हणजे पुन्हां त्यांचें भटकणें सुरू होतें. मेंढ्यांची चोरी सोडून ते तळाचे गांवीं दुसरा कोण-

ताही गुन्हा करीत नाहींत. तेथें एखादें चांगलें घर दिसलें तर दहा पंधरा मैलांवर तळ हलवितात, आणि कांहीं दिवस लोटल्यावर तेथें घरफोडी करतात. गुन्ह्यांसाठीं पुरुष लहान लहान टोळ्या करून रेल्वेनें आणि सडकेनें प्रवास करतात. पायरस्त्यानें ते ३० ते ५० मैलांत गुन्हा करतात आणि रेल्वेनें ते हवे तितकें लांब जातात.

**स्वरूपः—** सांसी आणि बेरिये चपळ, मजबूत, टणक, मध्यम बांध्याचे व उंचीचे असतात. ते आपला तळ गांठण्यासाठीं चाळीस पन्नास मैल सहज चालून जातात. गुन्ह्याचे कामीं त्यांना माया, दया बिलकुल नसते व ते कधीं माघार घेत नाहींत. सांशांच्या बायका नाजूक, देखण्या व बांधेसूद असतात. बेरियांच्या बायका गद्‌ळ, अस्ताव्यस्त आणि रासवट असतात. सांसी डोकें व दाढी वाढवितात, परंतु अलीकडे हजामत करूं लागले आहेत. ते कधीं खाटांवर निजत नाहींत; बेरिये मिशा व शेंडी ठेवितात आणि खाटांवर निजतात. सांशांच्या बायका पांढरें नेसत नाहींत, व कांचेच्या लांकडाच्या किंवा करवंटीच्या बांगड्या घालतात. बेरियांच्या बायका मळकट पांढरीं वस्त्रें नेसतात, बांगड्या घालीत नाहींत आणि क्वचित् गोठ घालतात. पुरुष धोतर, कुडतें, जुना अंगरखा व परदेशी तऱ्हेचा फेटा घालतात. बेरियांचीं धोतरें पांढरीं किंवा भगवीं असतात. सांसी आणि बेरिये धोतर आडबंद ( पुढें गांठ मारून ) नेसतात. त्यांच्या गळ्यांत दोन किंवा अधिक पदरी पोवळ्यांची व सोन्याच्या मण्यांची कंठी आणि सोन्याचा किंवा रुप्याचा टांक असतो. त्यावर रामदेव पिराची किंवा वडलांची घोड्यावर बसलेली मूर्ति असते. त्याला ‘ झुजा ’ म्हणतात. बायकांचा पोषाख व दागिने मारवाडणीप्रमाणें असतात; कांठांचा घागरा, कुडतीं, आंगिया आणि ओढणी. त्या गळ्यांत पोतीमध्यें ‘ चीड ’ ( कोयंड्यासह कलदार रुपया ) लटकवितात, डाव्या कानांत लवंग घालतात आणि दांतांना मिशी ( दांतवण ) खूप लावितात. सांशांच्या बायका नाकांत बुलाक

घालतात. पुरुष आणि स्त्रिया चढाऊ जोडे घालतात. कोल्हा खेरीजकरून सर्व प्रकारचें मांस सांसी लोक खातात. त्यांच्या डेऱ्यांत वाळविलेल्या मांसाच्या थैल्या आणि चरबीचीं मडकीं असतात. बेरिये मासे आणि गोमांस खात नाहींत. त्यांच्या बायका आणि मुलें पुरुषाप्रमाणें हुक्का ओढतात. दोन्ही जातींचे लोक फार दारूबाज असतात, आणि भांग, गांजा व तमाखू ओढतात. दोन्ही जातींच्या बायका तपकीर ओढतात. त्यांच्यांत जी कसब करते तिचें नांव बेरिये आपल्या डेऱ्याला ( तांड्याला ) देतात. सांसी आपल्या " सरगण्या " चें नांव डेऱ्याला देतात. गुजराथमध्यें आढळून येणारे सांसी किंवा छरे फार गदळ राहतात. त्यांना पोपलिये ह्मणतात. त्यांच्या बायका, सुटने किंवा पायजमे आणि कुडतें घालतात. सांसी आणि बेरिये लहानपणीं आपल्या मुलाला पोटावर आणि छातीवर डागतात. बायका नाक, हनुवटी, छाती, कानसूल, मनगट, हात आणि पोटऱ्यांवर गोंधतात; पुरुष खांदा, मनगट आणि पाठीवर गोंधून कट्यार किंवा विंचू काढतात. ते फार भांडकुदळ असतात, आणि दारूनें झिंगले म्हणजे मारामारी करतात. त्यामुळें सांशांचे डोक्याला पुष्कळ खोंका असतात. सांसी सर्व जातींचे लोक आपल्यांत घेतात, व गंगा किंवा कालिकेची शपथ घेतात. ते भांड्यांत पाणी, मीठ, कोळसा आणि ज्वारीचे दाणे घालून तें गंगेची शपथ घेतांना उचलतात, आणि कालिकेची शपथ घेतांना बाटलींतून थोडीशी दारू जमिनीवर ओततात. पुष्कळ लूट मिळाली ह्मणजे ते खाण्यापिण्याची चंगळ करतात. दोन्ही जातींचे लोक मोठे अबोल असतात, आणि कितीही विचारपूस केली तरी स्तब्ध राहतात. पण एखादा भेद्या किंवा दारू त्यांच्या तोंडाची खीळ उचटते. त्यांच्या मुलांना एकीकडे नेऊन प्रश्नामागें प्रश्न केले तर त्यांच्याकडून महत्वाची माहिती मिळते.

**भाषा:**– ते हेल काढून नाकांत बोलतात. त्यांची भाषा हिंदी आणि गुजराथी मिळून झालेली आहे. ती फक्त कंजाऱ्यांना समजते. बेरियांच्या बोलण्यांत " बौदे " हा शब्द फार येतो.

## सांसी आणि बेरिये ह्यांचे सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| नांद ... ... | गांव. |
| खाका ... ... | दरोडा. |
| खोला ... ... | घर. |
| बैया ... ... | रस्ता. |
| खावर ... ... | घरफोडी. |
| खराच. रिहिला | घरफोडीचें हत्यार. |
| गेम्मी ... ... | चोरी. |
| बुतना ... ... | लुटणें. |
| ढम्माल,खमाय... | लूट. |
| चीवड ... ... | कॉन्स्टेबल. |
| न्हनेदार ... | पोलिस अंमलदार. |
| बलवा ... ... | रुपया. |
| डोखला, निस्सा | खुर्दा. |
| पांखली ... | सॉव्हरिन. |
| चांटू, चटानी ... | सांसी पुरुष, स्त्री. |
| खडबीजेसर ... | लप. |
| निज ... ... | चोरीचा माल. |
| बंकी जेसर ... | पळ. |
| न्होरी ... ... | सुरी. |
| बोन्न ... ... | सोनें. |
| बेली ... ... | बकरा. |
| खेढब्री ... ... | मेंढी. |
| हेट्टा, हेटी.... | परजातीचा पुरुष स्त्री |
| नोकीदार ... | चौकीदार. |
| नटेल ... ... | पाटील. |
| चेकडी लिया ... | अटक झाली. |
| न्होडा ... ... | तुरुंग. |
| न्हुदायीलो ... | अटकेंतून सोडव. |
| बांडी ... ... | रुपें. |
| कलु, गिनाई ... | दारू. |
| खेख ... ... | मांस. |
| खड्डन ... ... | दिवस. |
| कुरत ... ... | रात्र. |
| तेवा ... ... | टोळी. |
| राळीदे ... ... | गाळ. |
| नोडीदे, रेडो ... | फोड. |
| खनाईक ... | मुख्य. |
| न्हाबरदार रोधिओ | खबरदार रहा. |
| लोठी रेडो ... | मार. |
| न्हासीले,बिन्नीले | ओरबडून घे. |
| टीपी, टूक ... | भाकर. |
| छंगली ... ... | बंदूक. |
| चिमडी... ... | तलवार. |
| नमिचा... ... | पिस्तुल. |
| लोड ... ... | बैल. |
| नालसी, कौरी ... | गाय. |
| कुद्दा ... ... | घोडा. |
| रेढी ... ... | गाढव. |
| न्हज, दायेली ... | सजा. |
| न्हूक ... ... | लांच. |
| बेक ... ... | एक. |
| ढोर ... ... | दोन. |
| थेर ... ... | तीन. |
| छोग ... ... | चार. |
| नाच ... ... | पांच. |
| न्हे ... ... | सहा. |

| | | | |
|---|---|---|---|
| न्हाड ... | ... सात. | न्हो ... | ... शंभर. |
| कोट ... | ... आठ. | कोंगल ... | ... हजार. |
| खनो ... | ... नऊ. | नेटी न्हंदुक | ... पेटी. |
| खस ... | ... दहा. | न्हबर ... | ... खबर. |
| खबीस ... | ... वीस. | येपिया ... | ... गोफण. |
| खतिस ... | ... तीस. | खनदी ... | ... नदी. |
| नालीस ... | ... चाळीस. | न्हाल ... | ... नाला. |
| नच्यास... | ... पन्नास. | न्हराई ... | ... सरई. |
| न्हाट ... | ... साठ. | खरूक ... | ... झाड. |
| खस्ती ... | ... ऐंशी. | खडरतीयाम,रड्डीदे | जमिनींत पूर. |

जेथें वाटा फुटतात आणि मिळतात तेथें, ज्या रस्त्यानें सांसी गेले असतील त्याच्या बाजूला ते हाताहाताच्या अंतरावर पांच किंवा सहा मातीचे ढीग करतात. आडरस्त्यानें गेले तर त्याच्या बाजूला थोड-थोड्या अंतरावर ते झाडपाला पसरतात.

**उपजीविकेचीं बाह्य साधनें**:– सांसी आणि बेरिये भीक मागतात. बायका सारंगी, चिकार ( सतार ) व ढोलकें वाजवून नाचतात. पोरी कसबाला लावून कांहीं बेरिये पैसे कमवितात.

**वेषांतर**:–सांसी आणि बेरिये हरवक्त आपलें नांव, गांव बदलून सांगतात. सडे असले म्हणजे थाटाचा पोषाख करून ते आपणाला ठाकूर, अहिर, भोई, रजपूत, कहार, जाट, कुणबी किंवा पुरभय्ये म्हणवितात. बरोबर बायकापोरें असलीं म्हणजे ते आपणांला गुजराथी भाट, सळात अगर कर्नाटकी नट किंवा धेड, भंगी, माळी, काची, ढोराधान्याचे व्यापारी म्हणवितात. ते आगगाडींत चोरी करतांना बायकांचा पोषाख करून बायकांचे डब्यांत बसतात. दिवसां गुन्हा करतांना ते धाटे बांधतात.

**गुन्हे**:– बिशेषेंकरून रस्त्यावर दरोडा व गाड्या लुटणें, घरफोडी, तंबूमध्यें चोरी, तळ किंवा तुटक झोंपड्या लुटणें, रात्रीं किंवा दिवसां ढोरें आणि मेंढ्या चोरणें, रेल्वेच्या उतारूंची व मालगाड्यांत चोरी

करणें वगैरे गुन्हे ते करतात. त्यांचीं बायकामुळें उचलेगिरी व लहान लहान चोऱ्या करतात. सांसिनीपेक्षां बेरियांच्या बायका अट्टल असतात. त्या वस्तिरहित घरांचीं कुलुपें काढून सांपडेल तें चोरून नेतात

**गुन्ह्यांची पद्धतिः**— दरोडाः—सांशांच्या टोळींत वीस इसम असतात. ते परकी माणसांकडून बातमी काढीत नाहींत, व त्यांचा विश्वास धरीत नाहींत. परंतु गुन्हे करण्यासाठीं सांसी आणि बेरिये एक होतात. टोळींतील एक दोन हुषार इसम मुक्कामाच्या जागेभोंवतीं घिरट्या घालतात. आणि एखादें लग्न वगैरे वाट चालत आहे कीं काय, तें केव्हां निघणार, त्यांत मंडळी किती आहे वगैरे शोध घेतात. त्याप्रमाणें बेत ठरवून टोळी दिवसां किंवा रात्रीं हल्ला करण्यासाठीं दडून बसते, आणि शिकार आली कीं बाहेर पडून हल्ला करते. दोन्ही बाजूला दोघेजण रस्ता अडवितात आणि बाकीचे ताज्या तोडलेल्या काठ्या, गोफण, धोंडे, सुऱ्या, कुऱ्हाड वगैरेंसह हल्ला करतात. उत्तेजन वगैरे देणें झाल्यास नाईक पुरभय्याप्रमाणें हिंदुस्थानींत बोलतो. कोणत्या घरावर दरोडा घालावा हें शोधण्यासाठीं टोळींतील एखादा इसम, तळें, विहीर, किंवा घाटावर इकडे तिकडे फिरत राहतो, आणि दागदागिन्यांनीं लढलेली एखादी बाई दिसली म्हणजे तिच्यामागें जाऊन तिचें घर पाहून ठेवितो. गुन्ह्याचे स्थानापासून सुमारें एक मैलावर एखादें झाड, विहीर किंवा नांगरलेल्या जागेजवळ टोळी थांबते. तेथें ते फाजील कपडालत्ता काढून ठेवितात. गुन्ह्याच्या ठिकाणाजवळ आले म्हणजे ते दगडांचा सपाटा चालवितात. नायकाच्या सांगण्याप्रमाणें जो तो नेमल्या ठिकाणावर जातो. ते रस्ते आणि बोळ यांवर सक्त पहारा ठेवितात, कुऱ्हाडीनें दारें फोडतात व बायकांना तपासून त्यांचे दागिने काढून घेतात. सांसी बहुधा बायकांची अब्रु घेत नाहींत. ते घरांतील पुरुषाला माल काढावयाला लावितात, पेट्या वगैर फोडून तपासून घेतात, व कोणी आडवें आलें तर मारहाण करतात. इतक्यानें भागलें नाहीं तर त्यांची मजल खुनापर्यंत देखील जाते. याप्रमाणें तास दोन तासांत काम करून जेथें कपडे

वगैरे ठेविले असतात त्या ठिकाणीं टोळी पुन्हां थांबते; आणि तेथून होईल तितक्या त्वरेनें परत जाते. टोळींतील एखाद्दुसऱ्या इसमाबरोबर ते चोरीचा माल देतात, आणि तो तळाजवळ जमिनींत पुरतात व तळ हलला म्हणजे बाहेर काढतात. डेऱ्यांत जाऊन पैसे करीपर्यंत ते चोरीच्या मालाची वांटणी करीत नाहींत. वांटे करतांना प्रत्येकजण गंगेची किंवा कालिकेची शपथ घेऊन सांगतो कीं, मीं चोरून कांहीं एक ठेविलें नाहीं. सांसी अविचारी असल्यामुळें एखादे वेळेला ढवळ्या दिवसां धर्मशाळा, यात्रा किंवा रेल्वेवरील उतारू बसण्याची जागा वगैरे ठिकाणीं दरोडा घालतात.

घरफोडीः– अगोदर घराच्या वाटा वगैरे नीट पाहून ठेवून अंधेऱ्या रात्रीं ते घरफोडी करतात. आजूबाजूच्या गल्ल्या आणि वाटा रोंखून ठेवून गपचीप मध्यरात्रीं ते त्या घरीं जातात. त्यांच्याजवळ लाठ्या, गोफण, धोंडे असतात. नंतर एक चलाख इसम खिडकी फोडून किंवा खराच्यानें ( एक फूट लांब खिळा, त्याला बोंड व पोलादाचें पाणी दिलेलें चापट टोंक असतें ), कसाबाच्या सुरीनें किंवा एखाद्या मोठ्या खिळ्यानें बगली किंवा रुमाली पद्धतीनें भिंतीला भोंक पाडून आंत शिरतो. आंत शिरण्यापूर्वी काठीला फडकें गुंडाळून आंत कोणी जागें आहे कीं नाहीं हें ती आंत फिरवून तो शोधतो. आंत उजेड किंवा हवा येऊं नये म्हणून भोंकाच्या तोंडाशीं ते कापड आडवें धरतात. सर्व ठीक आहे हें दर्शविण्यासाठीं बाहेर एक इसम चुटकी वाजवीत राहतो, घरांत जो जातो त्याच्याजवळ तुपांत किंवा तेलांत भिजविलेली एक वात, आगकाड्या आणि एक सुरी असते. वात उजळून कोण कोठें निजलें आहे, कोठें काय जिन्नस आहे हें तो पाहतो, व निजणारांना गाढ झोंप लागली आहे कीं नाहीं याचा ओणव्यानें कानोसा घेतो. लहान डबे वगैरे तो जसेचे तसेच बाहेरच्यांना देतो, आणि मोठाल्या जड पेट्या फोडून आंतील जिनसा बाहेरच्यांना देतो. मोठाल्या जड पेट्या

बाहेर नेणें झाल्यास तो एक दोघे मदतीला बोलावितो, व दुसऱ्या खोलींत जाणें झाल्यास वात लावून तिचा ठाव घेतो. रोकड, जवाहीर, कपडे, भांडीं व डेरा जवळ असल्यास खाण्याच्या जिनसाही, जें हातीं पडेल तें ते घेतात. निजलेल्यांच्या अंगावरचे दागिने काढण्यांत ते फार पटाईत असतात. ते सहज काढतां न आले तर बेलाशक ते ते ओरबडून घेतात. घरांतले लोक जागे झाले तर ते पळून जातात. प्रसंग पडलाच तर आंतल्या इसमांची सुटका बाहेरचे इसम फार प्रयत्नानें करतात. सांसी आणि बेरिये प्रेताचा पोषाख निजलेल्या इसमावरून फिरवितात. अशानें निजलेले इसम जागे होत नाहींत अशी त्यांची समजूत आहे.

मेंढ्या किंवा ढोरें चोरणें:— गाड्यांच्या तळांवरून, गोठ्यांतून, मेंढवाड्यांतून किंवा चारणीच्या मैदानांतून मेंढ्या आणि ढोरें ते चोरतात. गरीब जनावरांच्या आश्रयानें द्वाड जनावर ते पकडतात, त्याच्या शिंगाला दावें लावितात आणि तें घेऊन जातात. मेंढवाड्यांत जाऊन लठ्ठ लठ्ठ मेंढ्या चापसून त्या ते लांबवितात.

मालगाडी हळू चालली ह्मणजे फळीवर किंवा पायरीवर चढून पोतीं ते उचलून घेतात, किंवा लोखंडी आंकडींच्या लांब काठ्यांनीं तीं खालीं पाडतात. आगगाडींत खिडकीपाशीं बसलेल्या बाईचे दागिने ते ओरबडून घेतात, किंवा चोरलेला माल खिडकीवाटें बाहेर झोंकून पुढें उचलून घेतात. गाडी चालू झाली म्हणजे डब्याच्या दरवाज्याजवळचें गांठोडें ते उचलतात.

सांसी आणि बेरिये ह्यांच्या तळाचा झाडा घेणें झालें तर पोलिसांनीं पुष्कळ लोक बरोबर घ्यावेत. कारण त्यांच्या बायका फार कजाग असतात. त्या पोलिसापुढें नागव्या होतात, त्यांच्या कपड्याला झोंबतात, किंवा त्यांच्या पुढें पोरें आपटण्याची भीति घालतात. बेरियांच्या बायका तर लघवी करून त्यांच्या तोंडावर फेंकतात. पोलिसची संख्या कमी पडल्यास हे लोक त्यांना पिटून लावितात. तपास

करतांना सांसी आणि बेरियांच्या टोळींतील इसम वेगवेगळे करून त्यांना विचारावें; आणि एकमेकांना खुणा करतां येणार नाहींत, इतक्या अंतरावर त्यांना ठेवावें. त्यांच्यांतील सशक्त पुरुष बहुधा डेऱ्यांत सांपडत नाहींत. ते जवळच्या जंगलांत किंवा दरींत दडून बसतात.

**गुन्ह्यांचीं हत्यारें**:- हत्यारें बाळगण्याची परवानगी आहे अशा मुलुखांत सांसी आणि बेरिये तलवारी, बंदुका घेऊन गुन्हे करतात. इतर ठिकाणीं ते लाठ्या, गोफण धोंडे, सुऱ्या, कुऱ्हाडी, खराच, लोखंडी मेखा, आगकाड्या, तेलवात, वगैरे घेऊन गुन्हे करतात.

**चोरीच्या मालाची निर्गति**:-चोरलेल्या मालाचे ते पैसे करून वांटण्या करतात. तोंपर्यंत तो डेऱ्यानजीक एखादें वारूळ किंवा नाल्यांतील झाड वगैरेंजवळ, किंवा डेऱ्यांत चुलीजवळ, अगर जनावरांच्या मेखांजवळ पुरतात. सांसी कधीं कधीं सामानाच्या घडवंचीखालीं आणि बेरिये अंथरुणाखालीं चोरीचा माल पुरतात. चोरलेलें जवाहीर आणि रोकड ते कधीं कधीं गोधडी किंवा वळी यांमध्यें शिवतात, किंवा ज्या पोत्यांत किंवा मडक्यांत घाण, वाळलेलें मांस, चरबी असेल त्यांत लपवितात. प्रवासांत या जिनसा त्यांच्या बैलांवर किंवा तट्टांवर असतात. तेव्हां त्यांचा झाडा घेतला तर वायां जाणार नाहीं. ज्या विशेष मौल्यवान् जिनसा डेऱ्यापाशीं पुरलेल्या असतात, त्या टोळींतील एक दोन इसम पुढच्या तळावरून रात्रीं येऊन घेऊन जातात, आणि तेथें पूर्ववत् पुरून ठेवितात. सोनार, वाणी, कलाल, सराफ, आणि कधीं कधीं पाटील पटवारी त्यांच्याकडून चोरीचा माल घेतात. चोरलेलीं ढोरें ते मारून खातात, किंवा लांबच्या बाजारांत विकतात. तीं ओळखण्याची भीति नसली तर त्यांवर ओझें घालून नेतात. उचललेलीं बकरीं, मेंढरें ते ताबडतोब मारून खातात. सांसी आणि बेरिये यांच्या बायकांचा झाडा एखाद्या बाईकडून घ्यावा; कारण त्या मायांगांत लहान लहान डाग आणि पैसे लपवितात. पुष्कळ चुन्या असल्यामुळें त्यांचे घागऱ्याला एखादा मोठा चोरखिसा

राहतो. खाटांच्या भोंकांत ते माल दडवितात, सबब त्यांचें सुंभ उलगडावें तसेंच झाडा चालला असतां ते पाण्याला वगैरे बायकामुलें पाठवितात, व त्यांच्याबरोबर माल लांबवितात. तरी पोलिसानें त्यांच्या मागोमाग जाऊन त्यांचा झाडा घ्यावा. डेऱ्याजवळची जागाही नांगरून काढावी. असें ह्मणतात कीं, हे लोक ज्या मुलुखांतून जातात, त्यांमध्यें सोईस्कर ठिकाणीं जिनसा पुरून ठेवितात, आणि अनेक वर्षांनीं ठेवल्या ठिकाणीं अचूक घेऊन त्या घेऊन जातात. टोळींतील इसमांना सारखी वांटणी मिळते, मग ते प्रत्यक्ष गुन्हा करोत किंवा न करोत. विधवांना आणि तुरुंगांत पडलेल्यांच्या बायकांना निम्मा वांटा मिळतो.

---

## लंगोटी पारधी.

हे लंगोटी नेसतात, केंस वाढवितात, आणि परसाकडेला पाणी नेत नाहींत. ह्यांची वस्ति मध्यप्रांतांत आहे.

ह्यांच्यांत तीन गोतें आहेत:-- चव्हाण, पोहार, साळुंकी. चव्हाणांची देवी अंबा, पोहारांची मरी माता, आणि साळुंक्याची काली. या देवतांना सर्वसाधारणतः भवानी ह्मणतात. ते मराठी आणि उर्दू जलद बोलतात, परंतु त्यांचें बोलणें नवशिक्या गुजराथ्याप्रमाणें असतें.

### सांकेतिक शब्द.

| | | | |
|---|---|---|---|
| जान ... ... | चोरीचा माल घेणारा. | कुमाई ...... | धान्याची हलकी चोरी. |
| इशाली ... ... | चोरी. | कुटो ... ... | लहान दरोडा. |
| बरवरा ... ... | दरोडा. | कुतुर्नी ... ... | घरफोडीचें हत्यार. |
| जुपडा ... ... | घरफोडी. | काळी कुत्री ... | पोलीस. |
| | | गोबर ... ... | चोरीचा माल. |

त्यांच्या बायका पायांत रुप्याचे दागिने घालीत नाहींत, आणि भिंतीवर किंवा खुंटीवर लुगडें न ठेवितां तें सदोदित जमिनीवर ठेवितात. त्यांच्या स्त्रिया पुरुषांबरोबरच जेवावयाला बसतात, मागें राहत नाहींत. गांव सोडतांना हे लोक पाटलाजवळून दाखला घेतात. ते देवकार्य करतात तेव्हां एखादा हेला मारतात, आणि यथेच्छ दारू पितात. जातीचे तंटेबखेडे त्याच प्रसंगीं मिटवितात, व गुन्ह्याचे बेत ठरवितात. जातीसंबंधाच्या गुन्ह्याचा दंड अमुक अमुक दारू असतो. पुरुषांचा गुन्हा असल्यास पुरुष ती दारू पितात, बायकांचा असल्यास बायका पितात. पुरुष किंवा स्त्री शिंदळकींत सांपडली तर डावा कान वस्ताऱ्यानें कापतात. त्यांच्यांत खऱ्या खोट्याचा निवाडा येणेंप्रमाणें करतात:–( १ ) एक चक्र काढतात त्याला कुंड म्हणतात, त्याच्यांत एक पाण्याचें भांडें ठेवून त्यामध्यें एक रुपया आणि सुरी घालतात. आणि तोहमतदार मनुष्याला शपथ घेऊन त्यांतील रुपया व सुरी काढण्यास सांगतात. त्याचें मन पापामुळें कचरत असलें तर तो सुरीला हात लावीत नाहीं. ( २ ) तोहमतदार इसमाला सुरी घेऊन छाती किंवा मानेइतक्या पाण्यांत जाऊन देवीची शपथ घ्यावयाला सांगतात. ( ३ ) वाळूंत सात काठ्यांच्या अंतरावर दोन रंगणें काढून, त्यांत दोघेजण उभे राहतात. तोहमतदार मनुष्य एकाजवळ उभा रहातो, व त्याचा स्नेही नदींत उभा रहातो. तोहमतदार एकाला शिवून पळत जाऊन दुसऱ्याला शिवून परत येतो. तो पहिल्याला शिवल्याबरोबर नदींतला इसम बुडी घेतो. तोहमतदार दुसऱ्याला शिवून परत येईपर्यंत तो तसाच पाण्यांत राहिला म्हणजे तोहमतदार निर्दोषी आहे, असें समजतात. तोहमतदारानें गुन्हा केला असल्यास त्याला रक्ताची गुळणी येऊन तो मरतो असें ह्मणतात. ( ४ ) तोहमतदार नऊ किंवा एकवीस पिंपळाचीं पानें हातांत घेऊन त्यांवर लाल तापविलेली कुऱ्हाड ठेवून नऊ दहा पावलें जातो; पोळलें नाहीं म्हणजे तो निर्दोषी समजावयाचा.

पारध्यांना पकडलें म्हणजे ते लांच देऊन सुटका करून घेण्याचा प्रयत्न करतात. घर फोडतांना कधीं कधीं आरपार भिंत न फोडतां कानोसा घेण्यासाठीं ते एक पापोद्रा ठेवितात. आरपार भोंक पाडल्यावर नाईक काडी ओढून आपल्यासमोर हाताचा पंजा धरतो म्हणजे त्याच्या-वर सावली पडून आंतील सर्व जिनसा त्याला दिसतात. चोरलेला माल घेऊन एक इसम टोळीच्यामागें चालतो, ह्मणजे टोळीला कोणी अडविलें कीं ह्याला मागचे मागें निसटावयास सांपडतें. पारधी लोक पोलीस ठाण्याच्या सरहद्दीवरच्या गांवांत राहतात, आणि सदरहु हद्दींत ते गुन्हे करीत नाहींत.


------

## हरणी.

हे लोक पंजाबाकडचे आहेत. " तापा " किंवा घरफोडी करतांना त्यांच्यांतला एक माणूस भिंतीपाशीं हात वर धरून घट्ट उभा राहतो. दुसरा त्याच्या पाठीवरून चढून हातावर उभा राहून भिंतीच्या वरवंडी-वरून आंत उतरतो. याप्रमाणें जरूर तितके लोक आंत जातात. निज-लेल्या माणसांना भय घालण्यासाठीं कांहीं इसम त्यांच्यावर काठ्या घेऊन आडवे उभे राहतात. कधीं कधीं आसपासच्या घरांना कड्या लावून एक इसम चोरीच्या घरांत उतरतो, आणि कडी काढून आपल्या साथीदारांना आंत घेतो. दागिने सहज काढतां न आले तर ओरबडून किंवा हिसकाहिसकी करून ते ते काढून घेतात.

घर फोडण्यापूर्वीं एक इसम फकिराच्या वेषानें गांवांत येऊन बायका मुलांच्या दागिन्यांवरून घर शोधून काढतो. त्यांच्या घरफोडीच्या हत्या-राला सब्बळ ह्मणतात; तें लोखंडी, गोल, टोंकाकडे निमुळतें, सुमारें दीड फूट लांब व एक इंच जाड असून त्याचे डोक्याला एक भोंक पाडलेलें

असतें. त्यांत एक दोरी ओवून तें बगलेला अशा रीतीनें लटकवितात कीं तें हाताखालीं झांकून जावें. त्यांच्या कोयत्याला दात्री ह्मणतात. ते भिंतीच्या तळाशीं किंवा माळवदाला सब्बळानें भोंक पाडून डोक्याकडून आंत शिरतात. आवाज होऊं नये म्हणून सब्बळानें मोकळा झालेला भिंतीचा भाग ते हातांत घेतात, आणि डोळ्यांत धूळ जाऊं नये म्हणून पागोट्याचा पदर डोळ्यांवरून घेतात. सब्बळाच्या टोंकाला कापड गुंडाळून त्यानें कुलुपें काढतात. कोणी जागें झाल्यासारखें दिसलें तर भोंकाबाहेर ते येऊन थांबतात, आणि तो पुन्हां निजला तर आंत शिरून आपलें काम चालूं करतात. ह्या लोकांनीं पाडलेलें भोंक फार लहान आणि नीटनेटकें असतें. हे लोक माग नाहींसा करण्यांत मोठे हुषार असतात. त्यासाठीं ते चवड्यावर चालतात, पायांस चिंध्या गुंडाळतात, व आल्या पावलांनीं ज्या गांवीं गुन्हा केला असेल, त्या गांवीं परत चालत येतात. चोरीचा माल खेंचरांवरून नणें झाल्यास, चौकीसारख्या ठिकाणीं ते खेंचरावरील मालावर महारोगी बसवितात, म्हणजे कोणी झाडा घेण्याला जवळ येत नाहीं. ते रस्त्यावर एक कडें काढून त्यांतून एक रेघ ओढतात, म्हणजे जिकडे रेघेचें टोंक असेल त्या बाजूनें टोळी गेली, असें

मागून येणाराला कळतें.  खूण न दिसली तर तो एखाद्या टेंकडीवर जाऊन आगाऊ ठरल्याप्रमाणें एखाद्या पाखराचा किंवा जनावराचा आवाज काढतो, म्हणजे त्याचे साथीदार त्याप्रमाणें हांक देतात. ते सांसीशिवाय इतर कोणत्याही जातीची गुन्ह्याचे कामीं मदत घेत नाहींत, व तुपावांचून कधीं जेवीत नाहींत. बीर आणि मिरपूर येथील हरणी लोक मुंबई इलाख्यांत नाशिक, मुंबई, सुरत, वगैरे ठिकाणीं, व परभणी येथेंही जातात. मुंबई शहरांत ते गोदीवर जहाजें रंगाविण्याचें किंवा एंजिनमध्यें कोळसे घालण्याचें काम पत्करतात. जगराव इलाख्यांतल्या पुष्कळ हरणी स्त्रिया आपल्या

नवऱ्यांच्या संमतीनें मुंबईंत कसब करतात. मुंबईंत हरणी लोक दुकानां-पुढचा माल उचलतात, जुगार खेळून ठकबाजी करतात, खिसे कातर-तात, आणि भूल देऊन जबरीच्या चोऱ्या करतात. बंदीकुई येथील एक श्रीमंत खाटीक त्यांना फकीर समजून पदरचें भाडें देऊन मुंबईस रवाना करतो. ते खालीं लिहिल्याप्रमाणें सोंगें घेतात:--

( १ ) जादूचा व कसरतीचा तमाशा करणारे.

( २ ) हुस्सेनी आणि नऊशाही पंथाचे पंजाबी फकीर; आपला पीर सुरतचा तैमूरशहा आहे व अल्ली पैगंबराचे आपण वंशज आहोंत, असें ते सांगतात.

( ३ ) मिराशी किंवा ढोलकीवर गाणारे.

( ४ ) कालंदर, अस्वल--माकडांचे खेळ करणारे.

( ५ ) कुंभार, बंजारे किंवा बैसाती ( धान्याचे व्यापारी ), रैन ( खाटीक, किंवा शेतकरी, किंवा कातडीं आणि ढोरें विकणारे ).

( ६ ) एकदां एका हरणीनें ब्राह्मणाचें सोंग घेतलें होतें.

( ७ ) हकीम ( दवा देणारे ).

## सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| बाहली... | ... हरणी. |
| निखारो | ... चोर. |
| पोथी ... | ... चोराचे साथीदार. |
| गंडी ... | ... घरफोडी. |
| भसरीवाल | ... घरफोडीचें हत्यार. |
| तौरीवाला | ... चौकीदार. |
| खोंक ... | ... घर. |
| बग्गी ... | ... रुपें. |
| हातोंगार | ... दागिने. |
| ओभरजा | ... पळ. |
| जमजाव | ... लपीव. |
| धुखन ... | ... गुजर. |
| तुशीआन | ... पोलीस. |
| धोतनी ... | ... बायको. |
| खसन ... | ... भिंत. |
| च्छित्र ... | ... रुपया. |
| खुंडी ... | ... अधेली. |
| अग्री ... | ... चवली, पावली. |
| मातहोजा | ... नाहींसा हो. |
| नरवारबरकी हुई | चोरीचा माल. |
| बरमोहान | ... तुरुंग. |
| बंब ... | ... दारू. |
| ओभाकव्वा | ... पेटी. |
| थोंगरिया | ... सोनार किंवा सराफ |
| बग्गे छोकरेवाला | युरोपियन. |
| धारीवाला ... | पोलीस ठाणें, अंमलदार. |

हरणी लोकांच्या बोटांचे ठसे फिल्लूर इलाखा पंजाब येथें घेतलेले आहेत.

## चंद्रवेदी.

चंद्रवेदी ही जात नसून एक पंथ आहे. त्यांत ब्राह्मण, किरार, कंगार, काची, आहिर वगैरे ( भंगी, चांभारखेरीज ) हिंदु व मुसलमानही असतात; आणि जे ते आपापल्या धर्माप्रमाणें राहतात. त्यांना सनोरिया, तीर्थवासी, बेपारी असेंही ह्मणतात. ह्या पंथांत मुलांना लहानपणींच घेतात, व उचलेगिरी शिकवितात. मोठ्या माणसाला पंथाचीं गुह्यें न फोडण्याविषयीं " तुळशी—गंगेची शपथ " देऊन पंथांत घेतात. पहिल्या वर्षी त्याला डेरेवाला, दुसऱ्या वर्षी उपरदार ( नाईक ) किंवा छावा ( खलेत, उथेगीर, उचल्या ) करतात. पुढें त्याच्या चौरकर्मांतल्या कर्तबगारीवर त्याला नालबंद ( जैता, मुख्य ) निवडतात. त्यांच्या टोळ्या अलमपूर, दतिया, ग्वाल्हेर, झांशी, इंदूर व बुंदेलखंडांत आहेत.

नालबंद एक ते सहांपर्यंत मुलें ठेऊन त्यांना सांकेतिक शब्द ( पार्सी ) व गुप्त खुणा ( तेनी ) शिकवितो.

### सांकेतिक शब्द.

| | |
|---|---|
| खुतरिया ... गांठोडें. | खांचदेव ... लपव. |
| कनोयै ... ... पैशाची थैली. | उकन जाव ... पळ. |
| पुजनी ... ... लोटी. | सेयंद ... ... सोनें. |
| दमरी, नेदी ... रुपया. | उबेन ... ... रुपें. |
| दंढे ... ... खुर्दा. | खोल ... ... दुकान. |
| गल्ली ... ... मोहोर. | कथरी ... ... तिजोरी. |
| पायटी ... ... तोडा. | तेड ... ... कुलूपकिल्ली. |
| पीट घेसा, गुंजितलै सोन्याची कंठी. | ममद भपट है ... तुझ्यावर डोळा आहे. |
| नुकली ... ... नथ. | |
| टोकिया... ... कॉन्स्टेबल. | |

**तेनी**:—उपरदारानें गालाला हात लाविला म्हणजे जवळ ये असें समजावें. तो जिकडे कोंपर करतो त्या बाजूची जिन्नस उचलावी, मूठ वर करून दुसऱ्या हातावर मारिली, म्हणजे पळ, तुजवर नजर आहे असें साथीदार पोरानें समजावें, त्यानें छातीवर हात ठेवून कोंपर वर केला म्हणजे निर्भय समजून जिन्नस घेऊन पळावें. जिन्नस उचलतांना त्या मुलाला पकडलें तर उपरदार कोंपर खालीं करून खांद्यापर्यंत हात नेता; ह्याचा अर्थ असा कीं, जिन्नस टाक आणि पळ. हातावर हात ठेविला म्हणजे ती जिन्नस पुरावी. एक कोंपर वर करून दुसऱ्या हाताचा आंगठा कमरेवरून त्यानें फिरविला, म्हणजे कमरेचा कसा काढून घे, असें समजावें.

दसऱ्यानंतर नालबंद दहा ते विसांची टोळी घेऊन ज्योतिषी सांगेल त्या दिशेला फेरीला निघतो. टोळींत निमे छोकरे व निमे बापे असतात. ज्योतिषी सांगेल त्याप्रमाणें कांहीं दहीं, भात आणि गूळ व कांहीं सुपारी खातात. फेरीला निघण्यापूर्वी टोळींतील लोकांच्या बायकापोरांची तरतूद नालबंद करतो. सर्वजण एखाद्या गांवाबाहेर जमतात. तेथून एक उपरदार आणि एक दोन छावे अशा पोटतुकड्या करून ज्या गांवीं जावयाचें असेल, त्याच्या अलीकडच्या स्टेशनचें तिकीट घेतात, आणि पूर्वसंकेतानुरूप डेरेवाल्यासह नालबंद उतरला असेल तेथें सुमारें पंधरा दिवसांनीं येऊन मिळतात.

**गुन्हे**:—बाजारांत गर्दी जमली म्हणजे एखाद्या दुकानाजवळ दोघेजण खूप जोरानें भांडतात. तेथें लोकांचा घोळका जमतो, त्यांत दुकानदार-ही येतो. मग उपरदाराच्या इशारतीप्रमाणें छावा जिच्यावर डोळा असेल ती जिन्नस घेऊन पसार होतो. तसेंच व्यापारी म्हणवून उपर-दार दुकानदाराशीं सौद्याबद्दल जिकीर घालतो, इतक्यांत छावा त्याची थैली लांबवितो. यात्रेमध्यें एखादे मिठाईचे दुकानीं ते जातात, आणि गिऱ्हाईक आपलें गांठोडें खालीं ठेवून पैसे देण्यांत किंवा माल घेण्यांत

गुंतलें म्हणजे उपरदार इशारत करतो, आणि छावा त्याचें गांठोडें घेऊन निसटतो. रस्त्यांत एखाद्या उच्च जातीच्या श्रीमंत मनुष्याच्या कपड्याला छावा काठीनें घाणीचे डाग पाडतो. उपरदार येऊन त्या गृहस्थाला म्हणतो कीं, तुम्ही बसला होता तेथें कपडे मैले झाले, त्यांचे डाग धुतले पाहिजेत. बापडा विहिरीवर किंवा नदीवर कपड्याचे डाग काढण्याला जातो. उपरदारही त्याचेबरोबर तोंड धुण्याला म्हणून जातो. आणि कांठावर त्यानें थैली ( बसनी ) किंवा गांठोडें ठेविलें असेल तें घेऊन छावा पोबारा करतो. एखादे वेळीं उपरदार एखाद्या गृहस्थाशीं बोलूं लागतो. दुसरा येऊन त्याला खेंटून जातो, आणि म्हणतो कीं, मी भंगी आहें, शिवल्याबद्दल माफ करा. त्यासरसें उपरदार आणि तो गृहस्थ आंघोळीला जातात, व छावा गांठोडें किंवा थैली लांबविण्याचें काम करतो. तिघे चौघे चंद्रवेदी आंघोळीच्या घांटावर जातात, व स्नान करणारांना बोलण्यांत वगैरे गुंतवितात. इतक्यांत उपरदाराच्या इशारतीप्रमाणें छावा त्यांच्या जिनसा घेऊन पळून जातो. एखादी स्त्री गांठोडें पुढें ठेवून बसते व उपरदार तिच्यासमोर शौचाला बसतो. तिनें तोंड फिरविलें कीं छावा तिचें गांठोडें घेऊन जातो. चंद्रवेदी श्रीमंताच्या घरीं नौकरीस राहून आपल्या इमानाची साक पाडतात. कालांतरानें जडजवाहिराची माहिती झाली म्हणजे ते तें पसार करतात. बाहेरगांवीं गेलेल्या लोकांच्या घराचे आपण मालक आहोंत असें भासवून, त्याचें कुलूप उघडून त्यांत ते दोन तीन दिवस राहतात; आणि शेवटीं असेल नसेल तें घेऊन चालते होतात. एखादें मोठें लग्न वाट चालत असतांना एक दोघे चंद्रवेदी त्याबरोबर निघतात, आणि त्यांतील एखाद्या भाबड्या श्रीमंत मनुष्याची ओळख पाडतात. पुढें एखाद्या मुक्कामाला त्याला चांगली गाढ झोंप लागली आहे, अशी वेळ पाहून त्याची दागिन्यांची थैली वगैरे घेऊन तडाख्यानें लांबवर निघून जातात. आगगाडीच्या प्रवाशाचें गांठोडें उचलून त्याच्या जागीं ते आपलें ठेवितात, निजलेल्या उतारूंचें

गांठोडें आपल्या साथीदारांना देतात, व कधीं कधीं तें खिडकीवाटें बाहेर टाकतात, आणि तारेच्या खांबाचा नंबर लक्षांत ठेवून तें घेऊन जातात. बायकांचा पोषाख करून एखाद्या निजलेल्या बाईचें बोचकें किंवा दागिने ते लांबवितात.

नालबंदाच्या तळाला बंद ह्मणतात, तेथें चोरीचा माल येऊन थडकतो. टोळीपैकीं कोणाला पकडलें तर त्याच्या सुटकेसाठीं तो पैसे पाठवितो, आणि त्याला कैद झाली तर, तो सुटेपर्यंत त्याच्या बायकापोरांना पोसतो. चंद्रवेदी पावसाळ्याच्या सुमाराला घरीं परततात. ते मुंबई, पुणें, काठेवाड, भावनगर, अजमीर, जोधपूर, पंजाब, मध्यहिंदुस्थानांतील संस्थानें, वगैरे ठिकाणीं जातात. ते हत्यारें घेऊन मोठाले गुन्हे करीत नाहींत, आणि रात्रीं चोऱ्या करीत नाहींत.

---

## नौसारिये.

हे पत्त्यांनीं जुगार खेळतात. टोळींतील एकजण थाटाचा पोषाख करून नबाब बनतो. तो फार पैसेकरी आहे, आणि जुगारीचा त्याला फार नाद आहे, वगैरे अफवा ते पसरतात. त्यामुळें पुष्कळ लोक जुगार खेळावयाला येतात आणि फसतात. हे लोक संयुक्तप्रांतांतील राहणारे आहेत.

---

## भत्रे किंवा माध्व.

ह्यांची मुख्य वस्ति पंजाबांत सियालकोट येथें आहे. ते बंगाल, मुंबई, वऱ्हाड, निजामशाही, ग्वाल्हेर, सिंध, तेलंगण, वगैरे सर्व हिंदुस्थान-

भर हिंडतात. त्यांची रहाणी गलिच्छ असते. ते जुवेबाज आणि दारू-बाज आहेत. एका वर्षाच्या फेरींत त्यांनीं साडेसात हजार रुपयांच्या मनीआर्डरी घरीं पाठविल्या असा दाखला आहे.

ते आपणांला फकीर, पंडित किंवा नशीब सांगणारे म्हणवितात, आणि गांवोगांव लोकांच्या (युरोपियनांच्यासुद्धां) गांठी घेतात. त्यांच्याजवळ एक दुहेरी कागद असतो, त्यावर तुरटीनें गाईचें किंवा चेटकीचें चित्र काढतात. तो कागद पाण्यांत बुचकळून चेटकीचें चित्र दिसलें तर प्रश्न विचारणाराला ते असें सांगतात कीं, ही चेटकी तुझा जीव घेईल; तेव्हां मंत्रांचें कांहीं साधन केलें पाहिजे. गाईचें चित्र दिसलें तर त्याला असें सांगतात कीं, तूं केव्हां तरी गाईचा छळ केला, ती शाप देत आहे; परंतु मंत्रसाधनानें तिचें दर्शन झालें आहे, तेव्हां आतां कांहीं सोन्या-रुप्याचें अगर कापडाचें दान कर. ते कधीं कधीं फाकि-राच्या वेषानें बारीक लोखंडी चिमटा घेऊन एखाद्या गृहस्थाच्या घरीं जातात त्याच्या नोकराकडून त्याच्यासंबंधानें माहिती मिळवितात, नंतर त्याला भेटतात; आणि पाण्यांत कांहीं मीठ व दुसरे पदार्थ घालून त्यांत तो चिमटा बुडवितात. त्या चिमट्यांतून ठिणग्या निघूं लागतात आणि चिमटे वेगळाले होतात. मग पूर्वीं मिळविलेल्या माहितीप्रमाणें त्याचें नशीब सांगतात, आणि हळूच गोष्ट काढतात कीं, ‘ मुलीचें लग्न करावयाचें आहे अगर पोरक्या मुलांचा अनाथाश्रम आहे, आमचें एखादें देऊळ आहे, किंवा आम्ही अमुक अमुक महंताचे चेले आहोंत, ’ वगैरे बहाणा करून ते पैसे उकळतात. कांहीं लोक तेलाच्या प्याल्यांत पाहून आम्हांला नशीब सांगतां येतें, असें भासवितात. कांहीं वैदिक औषधें विकतात, आणि भावड्या लोकांकडून स्टांप कागदावर करार करून घेतात कीं, गुण आल्यावर सुमारें पन्नास रुपये देईन. ग्रहणपर्व-णीच्या सुमाराला या लोकांना चांगलें गिऱ्हाईक मिळतें. हे लोक बाय-कांना लागणारे किरकोळ जिन्नसही विकतात. यांच्या मुख्यास चौधरी म्हणतात.

---

## ओरिसामधील पानलोक.

हे कनिष्ठ जातीचे हिंदू लोक, ढेनकनल व गुर्जतमध्यें राहतात. ते जातीनें विणकर असून कांहींजण शेतीपोती व चौकीदारी करतात. ते सुदृढ, लुच्चे आणि धीट असतात. यामुळें जमिनींच्या तंट्यांत जमीनदार लोक दांडगाईसाठीं त्यांना नौकरीस ठेवितात. तसेंच गाडीवान लोक रात्रीं पहाऱ्यासाठीं त्यांना बरोबर नेतात. ते ढोरें चोरणें व मारणें, आणि उचलेगिरी वगैरे गुन्हे करितात. पण अलीकडे टोळ्या करून दरोडे घालणें, खून करणें, वगैरे गुन्हे ते करूं लागले आहेत. सन १९०२ सालीं नट नाईक व नंतर कुसन डिगल यांच्या टोळ्यांनीं बराच धुंडावा माजविला होता.

## हबुरे.

ही जात गंगायमुनेच्या मध्यदुआबामध्यें आढळते. ते फिरस्ते असून चोरटे आहेत. दुसऱ्या जातींनीं वाळींत टाकलेल्या बायका आपल्या जातींत ते घेतात. इटा जिल्ह्यांतल्या जेलसर परगण्यांतील नोखेरा गांवीं त्यांच्या जमाती होतात. ते लहानपणींच मुलांना शेतांतल्या चोऱ्या करण्यास शिकवितात, आणि मोठे झाल्यावर घरफोडी वगैरे गुन्हे ते करतात. शेतचोरीला त्यांची टोळी निघते तेव्हां तिच्यांत सुमारें वीस असामी असतात, आणि घरफोडीच्या टोळींत सुमारें आठ नऊ असामी असतात. गुन्ह्याच्या वेळीं त्यांच्याजवळ सोडगीं असतात. त्यांचा गुन्हा पकडला तर टोळीचा नाईक दोन तीन इसमांस स्वाधीन करण्याचा

पोलिसाशीं ठराव करतो. मग याप्रमाणें बळी दिलेले इसम गुन्हे कबूल करून शिक्षा भोगतात. गुन्हा करतांना एखादा हबुरा ठार झाला तर त्याचे सांथीदार त्याच्या बायकोला १५० रुपये देतात, आणि एखाद्याला पकडलें, तर त्याची सुटका होईपर्यंत त्याच्या बायकापोरांला पोसतात. ते दागिने घालीत नाहींत, व त्यांच्या अंगावर वस्त्रही अब्रु झांकण्यापुरतें असतें. चोरीचें जवाहीर, कपडे, भांडीं ते आपल्या तळानजीक पुरतात. रुपयांत चार आणे बट्टा देऊन एखाद्या जमीनदारामार्फत ते चोरीचा माल विकतात.

---

## जदुये ब्राह्मण.

हे लोक एखाद्या गांवीं जाऊन डाळतांदुळाचें दुकान घालतात. नंतर एकजण महंताच्या वेषानें तेथें येतो. जमीनदाराच्या वेषानें दुसरा येऊन सांगतो कीं, मी लांबून आलों आहें. नंतर महंताला पाहून आनंद झाल्यासारखें तो दाखवितो, व त्याच्या भजनीं लागून लोकांत खूप छत भरतो कीं महंताची करामत, जादू फार मोठी आहे; त्यानें मला लुगडीं, पैसे, जनावरें वगैरे पुष्कळ दिलीं. तो महंताला आपल्या घरीं येण्याबद्दल पुष्कळ आग्रह करतो, आणि अशा रीतीनें लोकांचा त्याचेवर भाव बसून त्यांच्या ठकबाजीला सुरुवात होते. भोंदण्याजोगा मनुष्य अमक्या गांवांत आहे, अशी माहिती मिळवून एकजण साधूच्या वेषानें त्या गांवीं येतो, त्याजबरोबर दुसरा एकजण चेला म्हणून येतो. साधु समाधि लावण्याचें ढोंग करतो. येथें कोणी पवित्र ब्राह्मण आला आहे कीं काय असें विचारीत टोळींतील इतर इसम तेथें येतात, आणि ज्याला भोंदावयाचें असतें, त्याच्या घरीं जातात. तो विचारतो कीं, त्या ब्राह्मणाशीं तुम्हांला काय कराव-

याचें आहे ? तेव्हां हे त्याला सांगतात कीं, त्यानें आमच्या पितळेच्या आणि रुप्याच्या दागिन्यांचें सोनें केलें म्हणून दर्शन घ्यावयाचें आहे. अर्थात् तो भाबडा मनुष्यही त्या सोद्यांच्या बरोबर त्या ब्राह्मणाच्या शोधार्थ निघतो, आणि " बावाजी " व त्यांचे साथीदार यांचे नमस्कारचमत्कार आणि संवाद पाहून थक्क होतो, व फांसांत पडतो. नंतर 'माझ्या रुप्याच्या दागिन्यांचें सोनें करून द्या ' असा तो आग्रह धरतो. तो ब्राह्मण नाहीं नाहीं असें म्हणून अखेर त्या इसमाबरोबर जाऊन त्याच्या घराच्या मागच्या बाजूच्या अंधेऱ्या खोलींत बिऱ्हाड देतो. त्याचा भाव वाढावा म्हणून ते खालीं लिहिल्याप्रमाणें युक्त्या करतात. बावाजी मंत्रसामर्थ्यानें अदृश्य होतात; ह्याची प्रतीति पाहण्यासाठीं त्या भावार्थ्याला सांगतात कीं, कपाळावर एक रुपया ठेवून उन्हांत जाऊन सूर्याकडे पांच मिनिटें पहा. असें पाहिल्यावर परत अंधारकोठडींत आल्यावर अर्थात् त्याला कांहीं दिसत नाहीं. आणि हा काय चमत्कार आहे, असें त्याला वाटतें. थोड्या वेळानें दिसूं लागल्यावर बावाजीही दिसूं लागतात. भगवतीचें दर्शन करवितों, असें सांगून एखाद्या रात्रीं त्याला गांवाबाहेर एखाद्या बगीच्यांत घेऊन जातात, आणि एकजण तेथें भगवती बनून त्या भाबड्याला रेलचेल आशीर्वाद देतो. रुप्याच्या दागिन्यांचें गांठोडें करून तें खोलींतील जमिनींत पुरल्याचें भासवितात. नंतर बावाजी तेल, तूप, ऊद आणावयास सांगून त्या जागेवर भट्टी पेटवितात, आणि बावाजी परत येईपर्यंत त्या भट्टीवर नजर ठेव, असें त्या भाबड्याला सांगतात. पुढें तो ब्राह्मण आणि त्याचे चेले आपल्या अंगावर दागिने लपवून चालते होतात. वाट पाहून पाहून थकला म्हणजे तो इसम भट्टीखालीं उकरतो, आणि आंत पाहतो, तों फडक्यांत नुसती दगड-माती निघते. वरीलप्रमाणेंच दुप्पट वजन करण्याच्या मिषानें सोन्याचे दागिने मिळवून त्यांसह हे लोक पसार होतात.

---

# खोटीं नाणीं कशीं ओळखावींत ?

( १ ) ज्या नाण्याचा संशय असेल त्याचा त्याच प्रकारच्या दोन खऱ्या नाण्यांशीं पडताळा पहावा. ( २ ) खोटें नाणें दगडावर चांगला नाद धरीत नाहीं. ( ३ ) त्याचा रंग पितळी किंवा शिशाप्रमाणें मलीन असतो. पण कांहींना विशेष जिल्हई असत. ( ४ ) त्याची कड एकसारखी जाड नसते, व त्याला थोडासा बांक असतो. ( ५ ) १९०४ नंतरच्या सर्व खऱ्या नाण्यांच्या कडांना १५० सरळ दांते असतात. खोट्या नाण्यांचे दांते जरासे तिरपे असून ते धड व एकसारखे नसतात, आणि त्यांतील अंतर कमजास्त असतें. कडा तपासण्यासाठीं खोटें नाणें दोन खऱ्या नाण्यांमध्यें धरावें. ( ६ ) खोट्या नाण्यांच्या आंतील कडांवरचे रवे ओबडधोबड असून ते एकसारखे व सारख्या अंतरावर नसतात. ( ७ ) अपुरा छाप अगर पुसलेल्या किंवा दुहेरी रेघा दिसल्या म्हणजे नाणें संशयास्पद आहे असें समजावें. ( ८ ) कांहीं खोट्या नाण्यांवरचीं अक्षरें खऱ्यापेक्षां पातळ असतात. ( ९ ) छापाव्यतिरिक्त जागा मऊ एकसारखी नसली किंवा तिच्यावर डाग दिसले तर नाणें संशयास्पद समजावें. ( १० ) कडा हाताला मऊ लागल्या नाहींत, तर नाणें संशयास्पद समजावें. ( ११ ) सर्व ओतींव नाणीं खोटीं समजावींत. त्यांचा पृष्ठभाग दाणेदार किंवा टांचणीचे अग्राइतक्या बारीक छिद्रांनीं व्यापलेला असतो, तीं काळीं दिसतात, पण सुई–टांचणीनें तीं तेव्हांच समजून येतात. सांच्यांत रस ओततात तेथील कड साफ नसते, आणि अक्षरें व आकृति चतुष्कोनी व ठळक कडांच्या नसून वाटोळ्याशा असतात. ( १२ ) वरीलपैकीं निदान दोन दोष तरी खोट्या नाण्यांत असतात. म्हणून एकच दोष असलेलें नाणें एकाएकीं खोटें म्हणूं नये.